CMYK

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा

SOLAPUR TARUN BHARAT

सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | शनिवार, ८ मार्च २०२५। युगाब्द ५१२६ । वर्ष ४१ वे अंक १२० । पाने १२ । किंमत रु. ६/-

| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |

ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही

dainiktarunbharat.com

epaper.dainiktarunbharat.com








## महत्त्वाचे

### दोन दिवसांच्या वाढीनंतर बाजार सपाट



मुंबई : दोन दिवसांच्या चांगल्या वाढीनंतर देशांतर्गत शेअर बाजार शुक्रवारी सपाट बंद झाले. दिवसभरातील चढ-उतारामुळे निफ्टी २२,५५० च्या जवळ बंद झाला. निर्देशांकात ५० अंकांची घसरण झाली होती. निफ्टीत अवघ्या ८ अंकांची वाढ झाली. निफ्टीमध्ये समाविष्ट असलेल्या शेअर्समध्ये रिलायन्सच्या शेअरमध्ये सर्वाधिक ३ टक्क्यांची वाढ दिसून आली. त्यापाठोपाठ टाटा मोटर्स, भारत इलेक्ट्रॉनिक्स, बजाज ऑटो आणि हिंदाल्को हे शेअर्स वाढीसह बंद झाले. इंडसइंड बँक, श्रीराम फायनान्स, एनटीपीसी, बीपीसीएल आणि इन्फोसिस हे शेअर्स सर्वाधिक घसरले होते.

# राज्याची अर्थव्यवस्था मजबूत

### आर्थिक स्थितीत ७.३ टक्के वाढ अपेक्षित

### आर्थिक पाहणी अहवाल विधिमंडळात सादर

◆ **मुंबई, ७ मार्च**

राज्याच्या अर्थव्यवस्थेबाबत विरोधकांकडून भ्रम पसरविल्या जात असला तरी, महाराष्ट्राची आर्थिक स्थिती मजबूत असून, राज्याचा आर्थिक विकास दर ७.३ टक्के असण्याची शक्यता असल्याची बाब २०२४-२०२५ च्या आर्थिक सर्व्हेक्षण अहवालातून स्पष्ट झाली आहे. हा विकास दर देशाच्या सरासरी ६.५ टक्के विकास दरापेक्षा अधिक आहे, हे विशेष.



अधिवेशनाच्या पाचव्या दिवशी राज्याचे अर्थमंत्री अजित पवार यांनी २०२४-२५ चार राज्याचा आर्थिक पाहणी अहवाल विधिमंडळात सादर केला. अहवालानुसार, कृषी व संलग्न क्षेत्रात ८.७ टक्के, उद्योग क्षेत्रात ४.१ टक्के आणि सेवा क्षेत्रात ७.८ टक्के वाढ अपेक्षित आहे. यामुळे देशांतर्गत सकल उत्पन्नात वाढ, प्रतिव्यक्ती उत्पन्नवृद्धी, औद्योगिक गुंतवणूक आणि नागरी विकासाला चालना देणारा ठरणार आहे.



अहवालानुसार, २०२४-२५ साठी वित्तीय तूट २.४ टक्के तर महसुली तूट ०.४ टक्के इतकी अंदाजित करण्यात आली आहे. भांडवली उत्पन्नाचा वाटा २४.१ टक्के आणि भांडवली खर्चाचा हिस्सा २२.४ टक्के इतका आहे. महसुली जमा ४ लाख ९९ हजार ४६३ कोटी रुपये अपेक्षित असून, महसुली खर्च ५ लाख १९ हजार ५१४ कोटी अपेक्षित आहे.

राज्याच्या आर्थिक पाहणी अहवालानुसार, राज्याचे २०२४-२५ चे स्थूल उत्पन्न ४५ लाख ३१ हजार ५१८ कोटी इतके आहे. स्थूल राज्य उत्पन्नाच्या तुलनेत कर्ज आणि व्याजापोटी १७.३ टक्के रक्कम खर्च होत आहे. ◂ *(तभा वृत्तसेवा)*

महाराष्ट्राचा आर्थिक विकास दर **७.३** टक्के

कृषी क्षेत्राचा विकास **८.७** टक्के

उद्योग क्षेत्राचा विकास **४.९** टक्के

सेवा क्षेत्राचा विकास **७.८** टक्के

#### ठळक वैशिष्ट्ये

- २०२४-२५ साठी नाममात्र जीएसडीपी ४५.३१लाख कोटी असण्याचा अंदाज.
- एप्रिल-डिसेंबर २०२४ मध्ये राज्यातील सरासरी ग्राहक किंमत निर्देशांक ग्रामीण भागात ३९४.१ आणि शहरी भागात ३७१.१ होता.
- २०२४-२५ मध्ये राज्याचा अपेक्षित महसूल ४,९९,४६३ कोटी असून, यापैकी कर महसूल ४,१९,९७२ कोटी आणि बिगर करमहसूल ७९,४९१ कोटी राहण्याचा अंदाज.
- २०२४-२५ च्या खरीप हंगामात १५७.५९ लाख हेक्टरवर पेरणी, तृणधान्य उत्पादन ४९.२ टक्के, कडधान्य ४८.१ टक्के, तेलबिया २६.९ टक्के वाढली
- २०२४ मध्ये राज्याची वीज निर्मिती क्षमता ३८,६०१ मेगावॅट, यातील ५२.८ टक्के थर्मल, ३२ टक्के नवीकरणीय ऊर्जा.
- १०४,४९९ प्राथमिक शाळा आणि २८,९८६ माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळा.

# विदर्भ दुष्काळमुक्त करणार : मुख्यमंत्री

### महाराष्ट्राला अधिकाधिक उत्तम राज्य बनवू



### प्रधानमंत्री आवास योजनेतील २० लाख घरांना मोफत सौरऊर्जा

◆ **मुंबई, ७ मार्च**

महाराष्ट्र हे देशात सर्वच क्षेत्रांमध्ये आघाडीवर असलेले राज्य आहे. उद्योगांपासून ते शेती, सेवा क्षेत्र व आरोग्य सुविधा यात राज्य अग्रेसर आहे. पायाभूत सुविधांचा विकास आहे, देशात सर्वाधिक महाराष्ट्रातच आहे. कुठल्याही क्षेत्रात 'सेकंड टू नन' नसलेल्या महाराष्ट्राला अधिकाधिक उत्तम राज्य बनविण्याची ग्वाही देत, विरोधकांनी राज्यकारभारासाठी आपल्याकडील चांगल्या सूचना देण्याची अपेक्षा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज विधानसभेत राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चेच्या उत्तरादतव्यक्त केली.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, महाराष्ट्रातील महत्त्वाकांक्षी नार-पार-गिरणा नदीजोड प्रकल्पाला राज्यपालांची मंजुरी मिळाली असून, यामुळे नाशिक आणि जळगाव जिल्ह्यातील हजारो शेतकऱ्यांना सिंचनाचा मोठा लाभ होणार आहे. हा प्रकल्प राज्यातील दुसरा मोठा नदीजोड प्रकल्प असून, यामुळे ४९,५१६ हेक्टर क्षेत्र सचनाखाली येणार आहे. वैनगंगा ते नळगंगा नदी जोड प्रकल्पांतर्गत ३१ नवीन धरणांचे बांधकाम करण्यात येणार आहे तसेच ४२६ किलोमीटरचा कालवा निर्माण करण्यात येणार आहे. या प्रकल्पामुळे विदर्भाचे चित्र बदलणार असून, प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर विदर्भात दुष्काळ दिसणार नाही.

राज्य शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी नेहमीच खंबीरपणे उभे राहिले असल्याचे सांगून मुख्यमंत्री म्हणाले, सोयाबीनसाठी ४८९२ इतका हमीभाव जाहीर करण्यात आला होता. राज्य शासनाने ५६२ केंद्रांवर सोयाबीनच्या खरेदीची व्यवस्था केली. सोयाबीन खरेदीला केंद्र सरकारने दोन वेळा मुदतवाढ दिली असून, तिसरी मुदतवाढ देण्याची मागणी केंद्राकडेकरण्यात आली आहे.राज्य शासनाने जवळपास ११ लाख २१ हजार ३८५ मे. टन इतकी सोयाबीनची खरेदी केली आहे. आतापर्यंतचे सर्वांत जास्त विक्रमी सोयाबीन खरेदी शासनाने केली आहे. हमीभावाने तुर खरेदीस शासनाने प्राधान्य दिले. तुरीला ७ हजार ५५० प्रति क्विंटल इतका हमीभाव दिला, जो मागील वर्षीपेक्षा ५५० रुपये जास्त आहे. यंदा तुरीचे जवळपास १२.१० लाख हेक्टर क्षेत्र लागवडीखाली होते. यातून सुमारे ११ लाख टन उत्पादन अपेक्षित आहे. हमीभाव केंद्रावर पहिल्या टप्प्यात २ लाख ९७ हजार मे.टन तूर खरेदीचे उद्दिष्ट ठेवण्यात आल्याचे मुख्यमंत्री म्हणाले. ◂ *(तभा वृत्तसेवा)*

# ९५ टक्के घरगुती ग्राहकांना वीज दरात कपात

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची मोठी घोषणा

**मुंबई, ७ मार्च**

राज्यात १०० ते ३०० युनिट वीज वापरणाऱ्या ग्राहकांसाठी दर १७ टक्क्यांनी कमी केले जात आहेत. यामुळे ९५ टक्के घरगुती ग्राहकांना वीज दर कपातीचा थेट लाभ मिळणार आहे. ग्राहकांनी स्मार्ट मीटर बसवले तर दिवसा वापरलेल्या विजेवर १० टक्के सवलत मिळेल. प्रीपेड मीटर ऐच्छिक स्वरूपाचे ठेवण्यात आले असून, ग्राहकांना पोस्टपेड मीटरचा पर्याय उपलब्ध असणार आहे, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज विधानसभेत दिली.

राज्यात सौरऊर्जा आणि ऊर्जा क्षेत्रातील क्रांतीमुळे ऊर्जा विभागाला २१ प्रतिष्ठित राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त झाले आहेत. ऊर्जा क्षेत्रातील विकासासोबत सरकार शेतकऱ्यांचेही प्रश्न सोडवत आहे. शेतकऱ्यांचे ७५ हजार कोटींचे थकित वीज बिल हळूहळू फेडण्याची योजना आहे. महाराष्ट्र वीज वितरण कंपनी शेअर मार्केटमध्ये सूचीबद्ध करण्याचा शासनाचा विचार असून, असे झाल्यास महावितरण ही देशातील पहिली शेअर मार्केटमध्ये सुचिबद्ध होणारी वीज वितरण कंपनी ठरणार आहे.

#### १.३० लाख घरांना मोफत वीज

यासंदर्भात मुख्यमंत्री म्हणाले, महाराष्ट्र सरकारने 'सूर्यघर मोफत वीज योजना' प्रभावीपणे राबवून देशभरात पहिल्या क्रमांकावर झेप घेतली आहे. या योजनेंतर्गत ३०० युनिटपर्यंत वीज वापरणाऱ्या ग्राहकांना मोफत वीज मिळणार असून, त्यांनी अतिरिक्त वीज निर्मिती केल्यास ती सरकार खरेदी करणार आहे. त्यामुळे ग्राहक वीज देयकांच्या चतेतून मुक्त होणार आहेत. या योजनेंतर्गत आतापर्यंत १ लाख ३० हजार घरांवर रूफटॉप सोलर पॅनल बसवण्यात आले आहेत. राज्य सरकारने या ग्राहकांना १००० कोटींपेक्षा अधिक अनुदान दिले आहे. प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत उभारण्यात येणाऱ्या २० लाख घरांमध्ये थेट सोलर पॅनल बसवले जाणार आहेत. त्यामुळे या घरांना वीज देयक येणार नाही. राज्य सरकारने केंद्राच्या धर्तीवर एक नवीन योजना आणण्याचा निर्णय घेतला आहे. राज्यातील ७० टक्के घरगुती ग्राहक दरमहा ० ते १०० युनिट वीज वापरतात. नवीन योजनेच्या माध्यमातून ही कुटुंबे त्यांच्या घरावर सोलर पॅनल बसवू शकतील आणि वीज बिलमुक्त होतील.

#### शक्तिपीठ महामार्गाची उभारणी

नागपूर ते गोवा शक्तिपीठ महामार्गाची उभारणी राज्यात करण्यात येणार आहे. हा महामार्ग वर्धा जिल्ह्यातील सेवाग्रामपासून सुरू होईल. राज्यातील १२ जिल्ह्यांमधून जाणाऱ्या या महामार्गामुळे सर्व तीर्थक्षेत्र जोडण्यात येणार आहेत. महामार्गाच्या निर्मितीमुळे मराठवाड्यातील जिल्ह्यांचा गतीने विकास होणार आहे तसेच दक्षिण महाराष्ट्र आणि कोकणला मध्य भारताशी जोडण्यासाठी हा महामार्ग महत्त्वाचा ठरणार आहे. या महामार्गाला काही भागात शेतकऱ्यांचा विरोध होता. कोल्हापूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी महामार्गाच्या संपादनाकरिता दर्शविली आहे. जमीन संमती देशातील सर्वांत मोठ्या वाढवण बंदराला चांगली कनेक्टिव्हिटी देण्यासाठी नाशिक ते वाढवण १०० किलोमीटरचा रस्ता तयार करण्यात येणार आहे.

## राज्यात विक्रमी परकीय गुंतवणूक

**मुंबई, ७ मार्च**

केंद्र सरकारच्या डीपीआयआयटीने परकीय गुंतवणुकीचा डिसेंबर २०२४ अखेरचा अहवाल जाहीर केला. गेल्या १० वर्षांतील सर्वाधिक वार्षिक परकीय गुंतवणूक ९ महिन्यांत महाराष्ट्रात झाल्याचे या अहवालातून स्पष्ट झाल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांच्या एक्स या सोशल मिडियावर दिली.

२०२४-२५ या आर्थिक वर्षातील पहिल्या ९ महिन्यांत आतापर्यंत एकूण १,३९,४३४ कोटी रुपये इतकी परकीय गुंतवणूक आली आहे. या आर्थिक वर्षातील एक तिमाही आणखी बाकी असल्याचे मुख्यमंत्र्यांनी म्हटले आहे. संपूर्ण महाराष्ट्राचे पुन्हा एकदा मनःपूर्वक अभिनंदन! माझे सहकारी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार आणि मंत्रिमंडळाच्या नेतृत्वात आपल्या महाराष्ट्राची घोडदौड अशीच कायम राहील, असेही फडणवीसांनी अधोरेखित केले.

## तहव्वूर राणाची याचिका फेटाळली

◆ **न्यू यॉर्क, ७ मार्च**

२००८ च्या मुंबई हल्ल्यातील सूत्रधार तहव्वूर राणाचे भारतात प्रत्यार्पण रोखण्याची याचिका अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयाने फेटाळून लावली. तहव्वूर राणाने भारतात प्रत्यार्पण होऊ नये म्हणून न्यायालयात धाव घेतली होती.

राणाने सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करून त्याच्या प्रत्यार्पणाला तत्काळ स्थगिती देण्याची मागणी केली होती. याचिकेत राणाने म्हटले होते की, जर मला भारतात प्रत्यार्पण केले, तर माझा छळ केला जाईल. मी भारतात जास्त काळ टिकू शकणार नाही. तथापि, न्या. एलेना कागन यांनी ही याचिका फेटाळून लावली.

तहव्वूर राणाला २००९ मध्ये एफबीआयने अटक केली होती. अमेरिकेत राणाला लष्कर-ए-तोयबाला पाठिंबा दिल्याबद्दल दोषी ठरवण्यात आले. ◂ *(वृत्तसंस्था)*








# सोलापूरच्या पाणीपुरवठ्यासाठी १०० कोटी तात्काळ देणार

### मुख्यमंत्री फडणवीसांची ग्वाही : पालकमंत्री गोरे आणि आ. कोठेंच्या उपस्थितीत मंत्रालयात बैठक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर,दि. ७ मार्च-**

सोलापूर शहराच्या पाणीपुरवठ्यासाठी अमृत २ योजनेकरिता ८०० कोटी रुपयांचा प्रस्ताव सोलापूर महानगरपालिकेने त्वरित पाठवावा. यातील हद्दवाढ भागातील पाण्याच्या टाक्या बांधण्यासाठी १०० कोटी रुपये तत्काळ वितरित करण्यात येतील, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी दिली. आमदार देवेंद्र कोठे यांच्या उपस्थितीत शुक्रवारी सोलापूरच्या पाणीपुरवठाबाबत झालेल्या बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले.

आमदार देवेंद्र कोठे यांच्या पुढाकाराने झालेल्या या बैठकीमध्ये पालकमंत्री जयकुमार गोरे, आमदार देवेंद्र कोठे यांची प्रमुख उपस्थिती होती. सोलापूर शहराच्या पाणीपुरवठ्यासाठीच्या दुहेरी जलवाहिनीच्या कामाचा आढावा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतला. कोणत्याही परिस्थितीत ३१ मार्चपर्यंत दुहेरी जलवाहिनीचे काम पूर्ण करण्याचे आदेश यावेळी मुख्यमंत्र्यांनी सचिवांना दिले. पाकणी येथील जलशुद्धीकरणासाठीची जागा मनपाला देण्याबाबत वन सचिवांना सूचनादेखील दिल्या. दुहेरी जलवाहिनीचे काम पूर्ण झाल्यानंतर शहराच्या पाणीपुरवठ्यासाठी अतिरिक्त टाक्या, शहरांतर्गत नव्या जलवाहिनी तसेच इतर कामे अमृत २ योजनेतून करण्याकरिता सोलापूर महानगरपालिकेने त्वरित ८०० कोटी रुपयांचा प्रस्ताव पाठवावा. यातील शहराच्या हद्दवाढ भागातील पिण्याच्या टाक्या बांधण्यासाठी १०० कोटी रुपये सोलापूर महानगरपालिकेसाठी तत्काळ वितरित करण्यात येतील. तसेच उर्वरित निधीही देण्यात येईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी याप्रसंगी बैठकीत सांगितले. देगाव येथे ३५० कोटी रुपये खर्चून बीओटी तत्त्वावर नागपूरच्या धर्तीवर मलनिस्सारण केंद्र बांधून तेथे टीटीपी प्लांट उभारून शुद्ध केलेले पाणी एनटीपीसीला द्यावे आणि एनटीपीसी सध्या वापरत असलेले ८० एमएलडी पाणी सोलापूरकरांना पिण्यासाठी वापरावे, अशी योजना प्रस्तावित आहे. या योजनेबाबत आम्ही आग्रही असून या योजनेच्या कृती आराखड्यासाठी आणि अंमलबजावणीसाठी तज्ज्ञांना पाठवून पाहणी करण्यात येईल, असेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

या बैठकीस मंत्रालयातील वरिष्ठ अधिकारी असीम गुप्ता, श्रीगोविंदराज, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, सोलापूर महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. सचिन ओंबासे, स्मार्ट सिटीचे अधिकारी गोपीचंद कदम, सार्वजनिक आरोग्य अभियंता वेंकटेश चौबे आदी उपस्थित होते.

#### निधी कमी पडू देणार नाही : मुख्यमंत्री

सोलापूर हे महाराष्ट्रातील महत्त्वाचे शहर असून या शहराच्या विकासासाठी विशेषतः पाणीपुरवठ्यासाठी कोणताही निधी कमी पडू देणार नाही अशी ग्वाही यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. सोलापूर शहराच्या हद्दवाढ भागात अतिरिक्त टाक्या, जलवाहिनी आदी कामे करण्यासाठी आगामी काळात गतीने अंमलबजावणी होईल असेही मुख्यमंत्र्यांनी याप्रसंगी सांगितले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# भारताचे तिसऱ्यांदा चॅम्पियन्स चषक जिंकण्याचे लक्ष्य

◆ **दुबई, ७ मार्च**

रविवारी दुबई आंतर ाष्ट्रीय स्टे ियमवर होणाऱ्या अंतिम क्रिकेट सामन्यात न्यूझी लंडचा सामना करताना आत्मवि वासाने परिपूर्ण व फॉर्मात असलेला भारतीय संघ तिसऱ्यांदा आयसीसी चॅम्पियन्स चषकाचे विजेतेपद पटकाव ण्याचे लक्ष्य ठेवेल. भारताने यापूर्वी २००२ व २०१३ मध्ये चॅम्पियन्स चषकाचा मान मिळविला होता. ऑस्ट्रे ियानेही दोन वेळा या स्पर्धेचे विजेतेपद पटकावले आहे.

यंदाच्या आयसीसी चॅम्पियन्स चषकात दुबईतील एकाच ठिकाणी सर्व सामने खेळण याचा लाभ घेत भारतीय संघाने भरभराट केली आहे व पाच फिरकी टूंसह १५ सदस्यीय संघ तयार करण्याचा त्यांचा निर्णय महत्त्वाचा ठरला आहे.

साम ाच्या कोणत याही टप्प्यावर काम करण्यास सक्षम असलेले चार जागतिक दर्जाचे फिरकीपटू असल्या मुळे, त्यांच्या मजबूत फलंदा जीच्या फळीसह भारताकडे एक मोठी ताकद आहे.

२०१७ च्या चॅम्पियन्स चषकाच्या अंतिम सामन्यात भारत विरुद्ध पाकिस ानच्या फखर जमानने जबरदस्त कामगिरी केली होती. त्यादृष्टीने न्यूझीलंड संघाकडे फलंदाजी आणि गोलं ाजीत भारताच्या आक्रम णाला रोखण्य ासाठी पुरेशी ताकद असल्याचे बघणे अवघड आहे.

तथापि, न्यूझी लंडला कमी लेखता येणार नाही. कारण त्यांनी दोन आयसीसी स्पर्धा विजेतेपद भारताला हरवून जिंकले आहेत. २००० मध्ये आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफीच्या अंतिम सामन्यात त्यांनी भारताचा पराभव केला होता. २१ वर्षांनंतर साऊद म्पटन येथे झालेल्या पहिल्या जागतिक कसोटी अजिं क्यपद स्पर्धेच्या अंतिम सामन्यात न्यूझी लंडने भारतीय संघाला पराभूत करून आयसीसी कसोटी अजिंक पदाचा मान मिळविला होता.

२०१९ च्या विश चषक उपांत्य साम ातही न्यूझी लंडने भारतावर मात केली आणि टी-२० विश्वच कातील तीन सामन्य ांमध्ये त्यांना कधीही पराभव पत्करावा लागला नाही.

पुन्हा एकदा नाणेफेक महत्त्वाची भूमिका बजावेल. रोहित शर्माने स्पर्धेत आतापर्यंत चारही नाणेफेक गमावली असली तरी, भारताने सातत्याने या प्रतिकूल परिस्थितीवर मात करण्याचा मार्ग शोधला आहेत.


सराव सत्रादरम्यान भारतीय क्रिकेटपटू

पहिल्या उपांत्य फेरीत भारताने ऑस्ट्रे ियाविरुद्ध २६५ धावांचा यशस्वी पाठलाग केला व कोणत याही टप्प्यावर ऑस्ट्रे लयाचा वरचष्मा दिसत नव्हता. त्यातून हे दिसून आले की दुबईच्या या मैदानावर दुसरी फलंदाजी करणे सोपे असू शकते व फिरकी गोलंद ाजांची मोठी भूमिका असेल.

हार्दिक पांड्या व केएल राहुलने काही षट्कार मारून खेळ लवकर संपवला तेव्हा शेवटच्या काही षटकां शिवाय भारताला संपूर्ण खेळीमध्ये आक्रमक पवित्रा घेण्याची गरज भासली नाही.

तथापि, कर्णधार मिशेल सॅण्ट रच्या नेतृ ाखाली न्यूझी ंडच्या फिरकी गोलंदा ाजीमुळे निर्माण झालेल्या धोक्याची जाणीव भारताच्या फलंदा जांना असेल. त्याने भारत विरुद्ध नेहमीच चांगली कामगिरी केली आहे आणि न्यूझी लंडचा आत्म ि वश्वास वाढवणारी गोष्ट म्हणजे मायकेल ब्रेसवेल, रचिन रवींद्र व ग्लेन फिलिप्स यांच्यासह त्यांच्या इतर फिरकी टूंनी दक्षिण आफ्रि ेच्या स्फोटक फलंदाजी संघाविरुद्ध लाहो मध्ये चांगल्या खेळप ट्टीवर कामगिरी केली. ◂(वृत्तसंस्था)

# वरुण चक्रवर्ती धोकादायक खेळाडू : गॅरी स्टेड

◆ **दुबई, ७ मार्च**

चॅम्पियन्स चषकाच्या अंतिम सामन्यात आमच्यासाठी चक्रवर्ती हा "मोठा धोकादायक" खेळाडू असेल आणि भारताच्या रहस्यमय फिरकी गोलंदाजाला कसे रोखायचे यावर काम करण्यासाठी न्यूझीलंड आपल्या "विचारसरणी" क्षमतांचा वापर करतील, असे न्यूझीलंड संघाचे प्रशिक्षक गॅरी स्टेड म्हणाले.

रविवारी येथे आयसीसी चॅम्पियन्स चषकाच्या अंतिम फेरीत भारताचा सामना न्यूझीलंडशी होणार आहे.

गत सामन्यात आमच्याविरुद्ध ४२ धावांत ५ बळी टिपल्यानंतर तो खेळेल अशी आम्हाला नक्कीच अपेक्षा आहे. तो एक उत्कृष्ट गोलंदाज असून त्याने गत वेळी आमच्याविरुद्ध आपले कौशल्य दाखवले व तो आता या अंतिम सामन्यात आमच्यासाठी एक मोठा धोकादायक खेळाडू आहे, असे स्टेड यांनी शुक्रवारी येथे पत्रकारांना सांगितले.

आम्ही त्याची गोलंदाजी निष्प्रभ कशी करू व आम्ही त्याच्याविरुद्ध कसे धावा काढू शकतो, यावर आमचे विचारमंथन सुरु आहे, असेही ते म्हणाले.

काही दिवसांपूर्वी भारताविरुद्ध खेळलेल्या शेवटच्या गट साखळी सामन्यातून न्यूझीलंडचा संघ काही धडे गिरवण्याचा प्रयत्न करेल, असेही ते म्हणाले.



भारताला एकाच ठिकाणी सर्व सामने खेळल्याचा लाभ झाला असे मला वाटत नाही. चॅम्पियन्स चषकाच्या वेळापत्रकाबद्दल निर्णय घेणे आमच्या हातात नाही, म्हणून आम्हाला जास्त काळजी करण्याची गरज नाही. भारताला जसे सर्व सामने दुबईमध्ये खेळावे लागले तसेच आम्हालासुद्धा येथे एक सामना खेळावा लागला आहे व आम्ही त्या अनुभवातून आम्ही लवकरच शिकू, असे ते म्हणाले.

अशा परिस्थितीत असणे नेहमीच रोमांचक असते, तेव्हा आम्ही रविवारी भारताला हरवण्यास पुरेसे चांगले असू, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.



तथापि, न्यूझीलंडला आपल्या शेवटच्या गट साखळी फेरीतील सामन्यासाठी, दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या उपांत्य फेरीसाठी व अखेर येथे अंतिम फेरीसाठी पाकिस्तान व दुबई दरम्यान प्रवास करावा लागला.

आमचा संघ अशा वेळापत्रकांशी जुळवून घेण्यास पुरेसा चांगला आहे. लाहोर खेळून इथे आलो व काल आमचा पूर्ण दिवस प्रवास झाला, त्यामुळे तुम्हाला थोडेसे आराम मिळेल, पण आता आमच्याकडे थोडेसे पुनर्प्राप्ती, नियोजन आणि खेळासाठी प्रशिक्षण घेण्यासाठी काही दिवस आहेत, असे ते म्हणाले.

प्रशिक्षणापेक्षा मन आणि शरीराचे समन्वय असणे अधिक महत्त्वाचे आहे.कधीकधी जास्त प्रशिक्षणाची आवश्यकता नसते, केवळ समसन्वयाने शरीर व मन अंतिम फेरीत स्पर्धा करण्यासाठी योग्य बनवणे महत्त्वाचे असते आणि पुढील दोन दिवसांत आमचे मुख्य लक्ष हेच असेल, असे ते म्हणाले. ◂(वृत्तसंस्था)

## महत्त्वाचे

### तायक्वांदो विजेती जेड जोन्स वळली मुष्टियुद्धाकडे



**लंडन** : तायक्वांडोमध्ये दोन वेळा ऑलिम्पिकचे सुवर्णपदक जिंकणारी जेड जोन्स आता मुष्टियुद्धाकडे वळली आहे.

जोन्सने २०१२ व २०१६ मध्ये ब्रिटनसाठी ऑलिम्पिक सुवर्णपदक जिंकले व गत वर्षी पॅरिसमध्ये झालेल्या चार खेळांमध्ये भाग घेतला. पण, वयाच्या ३१ व्या वर्षी,तिने मुष्टियुद्धामध्ये प्रवेश करण्याची घोषणा केली आहे.स्वप्न हे विश्वविजेते होण्याचे आहे. दोन खेळांमध्ये विश्वविजेते होणे खूप छान असेल, असे जोन्सने सांगितले. तिला माजी ब्रिटिश आणि राष्ट्र कुल विजेता स्टीफन स्मिथ मुष्टियुद्धाचे प्रशिक्षण देतील. जोन्स ५७ किलोग्रॅम श्रेणीत स्पर्धा करणार असून ती मुष्टियुद्धामध्ये फेदरवेट विजेता होऊ शकेल.२०१२ मध्ये लंडनमध्ये ब्रिटनचे पहिले ऑलिम्पिक तायक्वांदो सुवर्णपदक जिंकले, तेव्हा ती १९ वर्षांची होती. त्यानंतर चार वर्षांनी तिने रिओ डी जानेरियोमध्ये यशस्वीरित्या विजेतेपदाचे रक्षण केले. जोन्स टोकियो ऑलिम्पिकमध्ये पदक जिंकू शकली नाही आणि गत वर्षी पॅरिसमध्ये ती पहिल्या फेरीतच पराभूत झाली.

### आचारसंहिता उल्लंघनाबद्दल हरमनप्रीत कौरला दंड

**लखनौ** : मुंबई इंडियन्सची कर्णधार हरमनप्रीत कौरला शुक्रवारी एकाना क्रिकेट स्टेडियमवर युपी वॉरियर्सविरुद्धच्या सामन्यादरम्यान पंचांच्या निर्णयावर असहमती दर्शविल्याबद्दल तिच्या सामना शुल्काच्या १० टक्के दंड ठोठावण्यात आला.

यूपीडब्ल्यूच्या डावाच्या १९ व्या षटकाच्या शेवटी ही घटना घडली. तेव्हा पंच अजितेश अर्गल यांनी हरमनप्रीतला सांगितले की, संथ गतीने षटक सुरु असल्यामुळे शेवटच्या षटकात केवळ तीन क्षेत्ररक्षक वर्तुळाबाहेर असू शकतात.

या निर्णयावर हरमनप्रीत कौर नाराज झाल्याचे दिसली व तिने पंचांशी थोडक्यात वाद घातला. या शाब्दिक बाचाबाचीत हरमनप्रीतच्या संघातील सहकारी ॲमेलिया केर सुद्धा सहभागी झाली होती. या वादविवादामुळे स्क्वेअर-लेग पंच एन. जनानी आणि यूपी वॉरियर्सच्या कर्णधार दीप्ती शर्मा यांनी हस्तक्षेप केला आणि तणाव कमी केला. हरमनप्रीत कौरने कलम २.८ अंतर्गत लेव्हल १ चा गुन्हा मान्य केला आहे.

### जागतिक पॅरा ॲथ्लेटिक्स ग्रॅण्ड प्रिक्स ११ मार्चपासून

NEW DELHI 2025
WORLD PARA ATHLETICS GRAND PRIX

**नवी दिल्ली** : आगामी ११ ते १३ मार्चदरम्यान जवाहरलाल नेहरू स्टेडियमवर जागतिक पॅरा ॲथ्लेटिक्स स्पर्धा होणार आहे. या स्पर्धेत आघाडीचे पॅरा-ॲथ्लिट प्रवीण कुमार, नवदीप सिंग आणि धरमबीर यांच्यासह भारताचे अव्वल पॅरा-अथ्लिट्स भारताचे प्रतिनिधीत्व करणार आहेत.

तीन दिवसांच्या या स्पर्धेत ९० हून अधिक स्पर्धा होतील आणि २० देशांचे प्रतिनिधित्व करणारे अव्वल पॅरा-ॲथ्लिट सहभागी होणार आहेत. भारताचे नेतृत्व पॅरिस पॅरालिम्पिक सुवर्णपदक विजेते प्रवीण कुमार (उंच उडी,टी-६४), नवदीप सिंग (भाला, एफ ४१) आणि धरमबीर (क्लब थ्रो, एफ ५१) करतील. त्यांच्यासोबत भारतातील काही सर्वोत्तम पॅरा-ॲथ्लिट्स असतील, यात राष्ट्रीय पॅरा ॲथ्लेटिक्स स्पर्धेत सुवर्णपदक जिंकणारा रवी रंगोली याचा समावेश आहे. स्पर्धेत एकूण २५० पॅरा-ॲथ्लिट्स सहभागी होणार असून यात सुमारे १४५ भारतीय आणि १०५ आंतरराष्ट्रीय स्पर्धक असतील.

अशा प्रतिष्ठित स्पर्धेत स्थानिक प्रेक्षकांसमोर स्पर्धा करणे खरोखरच विशेष आहे. नवी दिल्लीतील ग्रांप्री ही भारतातील पॅरा-ॲथ्लिट्ससाठी एक मोठी पर्वणी आहे आणि मी आमच्या समर्थकांसाठी एक उत्तम कामगिरी करण्यास उत्सुक आहे, असे प्रवीण कुमार म्हणाला.

भारतातील पहिली पॅरा-ॲथ्लिट् ग्रांपी हा एक ऐतिहासिक क्षण आहे. आपल्याच देशात ग्रांप्री असणे हे एक स्वप्न पूर्ण होणे आहे आणि भविष्यातील जागतिक स्पर्धांसाठी तयारी करण्यासाठी ते आपल्याला एक परिपूर्ण व्यासपीठ देते, असे धरमवीर म्हणाला.

# सोलापूर विद्यापीठास ५ पारितोषिके

## नोयडा येथील राष्ट्रीय युवा महोत्सवातील कामगिरी



**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ७ मार्च-**

अखिल भारतीय विश्वविद्यालय संघ, नवी दिल्ली अंतर्गत ३८वा राष्ट्रीय आंतरविद्यापीठीय युवा महोत्सव अमिटी विद्यापीठ, नोएडा येथे पार पडला. देशातील आठ विभागातून जिंकलेल्या १२२ विद्यापीठाचे प्रथम, व्दितीय, तृतीय क्रमांक प्राप्त संघ या राष्ट्रीय म होत्सवात सहभागी झाले होते. यामध्ये पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाने पहिल्यांदा पाच पारितोषिके मिळवत इतिहास रचला आहे.

गेल्या वीस वर्षातील विद्यापीठाच्या इतिहासातील ही सर्वोत्तम कामगिरी आहे. राष्ट्रीय पातळीवरील ही स्पर्धा अत्यंत चुरशीची असते. या महोत्सवात सोलापूर विद्यापीठाच्या संघाने उत्तम कामगिरी केली आहे. देशपातळीवर कलाक्षेत्रात विद्यापीठाचे नाव ठळक करत इतिहास रचला आहे. एकूण पाच पारितोषेके मिळवत नेत्रदिपक यश मिळवले आहे.

**या महोत्सवातील पारितोषिके अशी**

मिमिक्री : तृतीय क्रमांक- जैद शेख. पोस्टर : व्दितीय क्रमांक- निसर्ग लोहार. कार्टुनिंग- तृतीय क्रमांक- निसर्ग लोहार. एकांकिका : प्रथम क्रमांक (सामुहिक) आणि शोभायात्रा- प्रथम क्रमांक (सामुहिक).

विद्यापीठाच्या इतिहासात प्रथमच इतकी पारितोषिके प्राप्त झाली आहेत. यापूर्वी राष्ट्रीय युवा महोत्सवात कोणताही सामुहिक कलाप्रकार जिंकलेला नव्हता व कधी एकाच वेळी इतकी पारितोषिके मिळालेली नव्हती. युवा महोत्सवात विद्यापीठाने मिळवलेले हे यश ऐतिहासिक आहे. या यशाबद्दल कुलगुरू प्रा. प्रकाश महानवर, प्र-कुलगुरू प्रा. लक्ष्मीकांत दामा, कुलसचिव योगिनी घारे यांनी अभिनंदन केले. या यशात संघप्रमुख, प्रशिक्षक आणि विद्यार्थ्यी तसेच विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. केदारनाथ काळवणे यांचा मोलाचा वाटा आहे.

# टेबल टेनिस प्रशिक्षक भिवंडीकर यांची सोलापुरात उद्या कार्यशाळा

**सोलापूर, दि. ७ मार्च -**

भारताच्या जुनिअर टेबल टेनिस संघाचे आंतरराष्ट्रीय प्रशिक्षक जगदीप भिवंडीकर यांची कार्यशाळा इंदिरा गांधी स्टेडियमवरील मुळे पव्हेलियन हॉल येथे ९ व १० मार्च रोजी होईल.



भिवंडीकर यांनी आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताला ९ सुवर्ण, १३ रौप्य आणि २५ कांस्य पदके मिळवून दिली. टेबल टेनिस खेळाडूंनी कठीण परिस्थितीत तसेच तणावपूर्ण प्रसंगात आपला खेळ कसा उंचवावा याविषयी मार्गदर्शन करण्यासाठी या विशेष कार्यशाळेचे आयोजन केले आहे. या कार्यशाळेत केवळ खेळाडूंचेच नव्हे तर त्यांच्या पालकांचे देखील समुपदेशन करण्यात येणार असून खेळाडूंनाही त्यांचे खेळातील कौशल्य कसे विकसित करायचे आणि आपला सर्वोत्तम खेळ करून जिल्हा, राज्य, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर पदके कशी मिळवावीत यासाठी त्यांना प्रोत्साहित करण्यात येणार आहे.

भारतीय टेबल टेनिसच्या इतिहासात पहिल्यांदाच भिवंडीकर एक आगळी वेगळी संकल्पना घेऊन आले असून याच कार्यक्रमातून भारताला भविष्यात पदके मिळवून देऊ शकतील अशा म हाराष्ट्रातील वंचित आणि पॅरा खेळाडूंसह गुणवान खेळाडूंचाही शोध घेण्यात येणार आहे. यासाठी मराठवाडा, विदर्भ, उत्तर आणि पश्चिम महाराष्ट्र तसेच कोकण विभागात हा कार्यक्रम राबविण्यात येणार असून यातून गुणवान मुलांची निवड करून त्यांना एक वर्षासाठी भिवंडीकर यांचे मार्गदर्शन आणि मोफत प्रशिक्षण देण्यात येणार आहे. राष्ट्रकुल महासंघाच्या पॅरा (लेव्हल वन) प्रशिक्षक असणारे जगदीप भिवंडीकर हे भारतातील पहिले आणि एकमेव प्रशिक्षक आहेत ज्यांची भारतीय टेबल टेनिस महासंघ आणि आंतरराष्ट्रीय टेबल टेनिस महासंघाने त्यांना पॅरा मेंटॉरशिप प्रोग्रॅम साठी नामनिर्देशित केले आहे.

भिवंडीकर हे सध्या महाराष्ट्र राज्य टेबल टेनिस संघटनेच्या पॅरा कमिटीचे चेअरमन देखील असून गुड डीड वेल्फेअर फौंडेशन आणि आर.एन.एफ. वेल्फेअर असोशिएशन यांच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या योजनांसाठी भिवंडकर यांच्याशी ९८२१२०७००७ या भ्रमणध्वनी क्रमांकावर संपर्क साधता येईल.

# सोलापुरातील सिंथेटिक ट्रॅक हा तांत्रिकदृष्ट्या योग्य करा

## जिल्हा ॲथलेटिक्स संघटना व क्रीडा शिक्षक संघटनेचे जिल्हाधिकारी यांना निवदेन

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ७ मार्च-**

कुमठा नाका येथील जिल्हा क्रीडा संकुलात ॲथलेटिक्सचा सिंथेटिक ट्रॅक होत आहे. तो ट्रॅक तांत्रिकदृष्टया योग करावा, अशी मागणी सोलापूर शहर व जिल्हा ॲथलेटिक्स असोसिएशन व सोलापूर शहर व जिल्हा शारीरिक शिक्षण शिक्षक महासंघाने जिल्हाधिकारी यांना केली आहे.

तसे निवेदन त्यांनी निवासी जिल्हाधिकारी यांच्याकडे दिले. यावेळी सोलापूर शहर व जिल्हा ॲथलेटिक्स असोसिएशनचे सचिव राजू प्याटी, सोलापूर शहर व जिल्हा शारीरिक शिक्षक महासंघाचे जिल्हाध्यक्ष दशरथ गुरव, शहर अध्यक्ष विठ्ठल कुंभार, सोलापूर शहर शारीरिक शिक्षण महासंघाचे सचिव प्रमोद चुंगे, सहसचिव प्रा.राहुल हजारे, महिला आघाडीच्या जिल्हाअध्यक्षा प्रा.सुवर्ण कांबळे, सौ. भारत, आरती मलजी, क्रीडा शिक्षक संतोष जाधव, अथलेटिक कोच रवी राठोड आदी उपस्थित होते.



ॲथलेटिक्स व शारीरिक शिक्षण शिक्षक संघटना यांनी दिलेल्या निवेदनात असे नमूद आहे की, अध्यायावत असा मंजूर झालेला सिंथेटिक ट्रॅक हा पश्चिम दिशेस ११० मीटर हर्डल्स व १०० मीटर धावणे दहा लेनचा व दोन्ही डी सिंथेटिक कराव्यात. आठ लेनचा अध्यायावत सिंथेटिक ट्रॅक असून आतील बाजू देखील सिंथेटिक करायचे असून विविध खेळांसाठी फेकीच्या व उड्यांच्या बाबी यासंदर्भात योग्य त्या रचना करून टेक्निकल बाजूने विचार करून बांधण्यात यावा. तसेच मंजूर झालेला संपूर्ण निधी हा सिंथेटिक ट्रॅक कामी वापरावा व सोलापूर शहर व जिल्ह्यातील त्याचे योग्य असे व्यवस्थापन व्हावे. यामुळे सोलापूर शहर व जिल्ह्यातील नवख्या खेळाडूंना मैदानी स्पर्धेत राज्य, राष्ट्रीय ,आंतरराष्ट्रीय स्तरावर दर्जा उंचावण्यास मदत होईल जेणेकरून सोलापूर शहर व जिल्ह्याचे नाव राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय स्तरावर क्रीडा क्षेत्रात मैदानी प्रकारात गाजावे ही संघटनेची या पाठीमागची भूमिका आहे.

# क्रिकेट प्रशिक्षक प्रकाश कंपली यांचा द्रोणाचार्य पुरस्काराने गौरव

## ह. दे. प्रशालेच्या वतीने सन्मान

**सोलापूर, दि. ७ मार्च-**

हरिभाई देवकरण प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालयाच्या वतीने क्रिकेट प्रशिक्षक प्रकाश कंपली यांना द्रोणाचार्य पुरस्काराने गौरविण्यात आले.

क्रिकेट क्षेत्रातील त्यांच्या २८ वर्षांतील उल्लेखनीय कामगिरीबद्दल शालेय, जिल्हा, राज्य आणि राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत हरिभाई देवकरण प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालयाच्या खेळाडूंना मार्गदर्शन करून अप्रतिम यश प्राप्त करुन दिल्याबद्दल त्यांना गौरविले. शाळा समिती अध्यक्ष राजेशजी पटवर्धन यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालयाचे प्रभारी मुख्याध्यापक हनुमंत मोतीबने यांच्या हस्ते श्री. कंपली यांना सन्मानपत्र, मानचिन्ह, शाल व श्रीफळ देऊन सन्मान करण्यात आला.



याप्रसंगी उपमुख्याध्यापक रवींद्र पानसरे, पर्यवेक्षक श्री.सर्वगोड, श्री. कमळे, श्री. रणधीर, श्री.नेवरे, श्री.शहाणे, क्रीडाशिक्षक प्रमोद चुंगे, माणिक साळसकर व अक्षय गवळी आदी उपस्थित होते.

श्री. कंपली यांनी घडवलेले काही क्रिकेट खेळाडू उच्चस्तरावर पंच, निवड समिती व क्रीडा प्रशिक्षक या पदावरही कार्यरत आहेत. त्यांच्या मार्गदर्शनामुळे ह. दे प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालयाचा मुलींचा संघ तीन वेळा तर मुलांचा संघ दोनवेळा राज्य चॅम्पियन झाला. अनेक वेळा विभागीय पातळीवर विजेतेपद मिळवले. दरवर्षी त्यांच्या मार्गदर्शनामुळे ह. दे.प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालयाचा संघ जिल्हा पातळीवर अजिंक्य ठरला आहे. १९९६ पासून आजतागायत १९ वर्षे, १७ वर्षे व १४ वर्षाखालील मुलांचे संघ तर १७ वर्षे व १९ वर्षाखालील मुलींचे संघ असे एकूण पाच गटाला श्री. कंपली यांचे मार्गदर्शन लाभते. त्यांच्या मार्गदर्शनाखालील अनघा देशपांडे व स्वरूपा कदम हे आंतरराष्ट्रीय खेळाडू तर शंभरहून अधिक खेळाडू राष्ट्रीय व राज्य पातळीवर तर पन्नासहून अधिक खेळाडू विद्यापीठ पातळीवर खेळले आहेत.




# वैयक्तिक सूर्यनमस्कार स्पर्धेत सुमतीबाई स्कूलची कामगिरी

**सोलापूर, दि. ७ मार्च-**

राणी कित्तूर चन्नम्मा स्मारक भवन समिती यांच्यामार्फत घेण्यात आलेल्या वैयक्तिक सूर्यनमस्कार स्पर्धेमध्ये पी. एस. इंग्लिश मीडियम स्कूल विद्यार्थ्यांनी कामगिरी केली. त्यांना क्रीडा शिक्षक अजित पाटील, रोहन घाडगे व सोमनाथ मगर यांचे मार्गदर्शन लाभले.

या यशाबद्दल श्राविका संस्थेचे विश्वस्त यतीन शहा, मुख्य कार्यकारी अधिकारी देवई शहा, मुख्याध्यापिका स्वाती कांबळे, पर्यवेक्षक जयेश शिरढोणे, कल्पना रमावत अर्चना अक्कलकोटे यांनी अभिनंदन केले.

**यशस्वी विद्यार्थी असे**

**वयोगट : पहिली आणि दुसरी :** श्रेया हरके (द्वितीय). **तिसरी व चौथी :** वरद घोंगडे (प्रथम), पृथ्वीराज शिंदे (द्वितीय), ध्रुव कांबळे (तृतीय), आर्य ढेपे, समृद्धी वाघमारे (उत्तेजनार्थ). **पाचवी ते सातवी :** हर्ष चव्हाण (तृतीय). **आठवी ते दहावी :** मनीष माने (द्वितीय). **१६ ते ३५ वयोगट :** सोमनाथ मगर (द्वितीय).



# महिला दिन विशेष

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/
शनिवार, ८ मार्च २०२५



## तू विधात्याची एक सुंदर निर्मिती सांग जगाला ठणकावूनी...

दे पायातील शृंखला तोडूनी
मानेवरील जोखड दे भिरकावूनी।।
तू विधात्याची एक सुंदर निर्मिती
सांग जगाला ठणकावूनी।।

८ मार्च हा दिवस जागतिक महिला दिन म्हणून जगभर साजरा केला जातो. आजच्या दिवशी वेगवेगळ्या क्षेत्रात स्वतःचा ठसा उमटवणाऱ्या महिलांचा गौरव केला जातो. सर्वच क्षेत्रात महिला आज पुरुषांच्या बरोबरीने काम करीत आहेत. असे कोणतेही क्षेत्र नाही की ज्यात महिला पुरुषांच्या मागे आहेत. राजकारण, समाजकारण, कला, क्रीडा, साहित्य,विज्ञान, तंत्रज्ञान, शिक्षण, उद्योग अशा सर्वच क्षेत्रात महिला आपल्या कर्तृत्वाचा झेंडा रोवताना दिसत आहे. पूर्वी चूल आणि मूल ही जी महिलांची ओळख होती ती आता पुसली गेली आहे. अनेक महिलांनी सर्व प्रकारच्या प्रतिकूल आणि कठीण प्रसंगांना तोंड देत त्यावर मात करून आपले नाव इतिहासात अजरामर केले हे देखील तितकेच खरे आहे. आज भारतातील स्त्री प्रत्येक क्षेत्रामध्ये प्रगतीपथावर आहे. शेतीतील मजुरापासून ते देशाच्या राष्ट्रपती पदापर्यंत महिलांनी मोलाची कामगिरी बजावली आहे. महिला दिनाच्या पार्श्वभूमीवर सोलापुरातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी बजावित असलेल्या कर्तबगार महिलांच्या प्रतिक्रिया....

### सर्वच क्षेत्रात महिलांचे विशेष योगदान :



स्त्रियांच्या कार्यक्षेत्रात होत जाणारे परिवर्तन हे अतिशय अभिनंदनीय व गौरवास्पद आहे. आज प्रत्येक क्षेत्रात तिने तीची ओळख सिद्ध केली आहे. समाजात स्त्रियांचे योगदान पुरुषांच्या बरोबरीने नाही, तर त्या पुरुषांच्याही पुढे गेल्या आहेत हे नाकारता येणार नाही. शिक्षण क्षेत्रापासून ते आरोग्य क्षेत्रापर्यंत अनेक क्षेत्रात महिलांनी विशेष योगदान दिले आहे. उद्योग, व्यवसाय करताना अडचणी आणि संकटे येणे, हा त्या कामाचा अविभाज्य भाग असतो. व्यवसायात कोणतीही लाज न बाळगता कष्ट करायची तयारी ठेवली पाहिजे. व्यवसायात अनेक चढ-उतार येत असतात. यामध्ये यशस्वी होण्यासाठी सहनशीलता असावी लागते. व्यवसायात अनेक संकटे येत असतात त्यावर मात करायला शिका. यश निश्चित मिळते. एक यशस्वी उद्योजक होण्यासाठी महत्त्वाकांक्षा, धैर्य आणि जोखीम घेण्याची क्षमता, सर्जनशीलता, शिकण्याची इच्छा, आत्मविश्वास आणि चिकाटी यांचा विचार केला पाहिजे. नवनवीन संकल्पनेच्या आणि इच्छाशक्तीच्या जोरावर यशस्वी उद्योजिका होता येते, असा सल्ला पेठे फूड्सच्या संचालिका सुवर्णा पेठे यांनी महिला दिनाच्या पूर्वसंध्येला दिला. आपण सर्वांनी महिलांच्या उत्कर्षासाठी आणि त्यांच्या स्वाभिमानाचा रक्षण करण्यासाठी शपथ घेऊया की, प्रत्येक महिलांच्या सन्मानाचे रक्षण करू. त्यांचा सन्मान करू आणि त्यांना पुढे जाण्यास मदत करू. त्यांच्या प्रगतीस हातभार लावू. हा संकल्प प्रत्येक व्यक्तीने घेतला तर तो दिवस दूर नाही जेव्हा महिलांना खऱ्या अर्थाने त्यांचा हक्क आणि सन्मान मिळेल. आणि त्या देशाच्या प्रगतीत आपले महत्त्वाचे योगदान देऊ शकतील. नोकरी अथवा व्यवसाय करत असताना काही गोष्टीकडे आपसूकच दुर्लक्ष होतेच. अनेक समस्यांना तिला सामोरे जावे लागते. मात्र दोन्ही जबाबदाऱ्या सक्षमपणे ती तेव्हाच पेलू शकते जेव्हा तिला माहेरी आणि सासरी कुटुंबाचा भक्कम आधार मिळतो. ही भक्कम साथ अनेक महिलांसाठी ऊर्जास्त्रोत असल्याचे पेठे यांनी सांगितले. महिलांना घरातील काम सांभाळून, नोकरी करताना अनेक समस्यांचा सामना करावा लागते. अशावेळी मग पती, आई, वडील, सासू, सासरे दोन्ही कुटुंबाकडून मिळणारी साथ मोलाचा ठरतो.

......... **सुवर्णा पेठे, संचालिका, पेठे फूडस्**

### यश हे शाश्वत असतं



महिला दिनानिमित्त मी पुरस्कार विजेत्या सर्व महिला आणि समाजातील सर्व माझ्या महिला भगिनींना मनापासून शुभेच्छा देते. आज सर्वच क्षेत्रात महिला आघाडीवर आहेत. कुटुंब सांभाळून कोणत्याही क्षेत्रात करिअर करण्यामध्ये महिला अग्रेसर आहेत. आज मी कुटुंब सांभाळून बांधकाम व्यवसाय क्षेत्रामध्ये यशस्वीपणे कार्यरत आहे. कोणताही व्यवसाय असो कोणतेही काम असो अपयश आणि यश हे असते. परंतु माझ्या महिला भगिनींनी एक लक्षात ठेवलं पाहिजे की अपयश हे क्षणिक आहे, परंतु यश हे शाश्वत आहे. त्यामुळे अपयश आल्यास खचून न जाता पुन्हा जोमाने कामाला लागावे प्रयत्नांची कास कायम धरावी. प्रयत्न हे आपल्याला यशाकडे घेऊन जातात. आणि आपण नक्कीच यशस्वी होतो. प्रत्येक महिलेचे यश दुसऱ्या महिलेसाठी प्रेरणादायी असले पाहिजे.

**-शुभांगीनी नवनाथ चव्हाण, डायरेक्टर, श्री व्यंकटेश मल्हार बिल्डर्स**

### महिलांचा आदर करणे गरजेचे



आंतरराष्ट्रीय महिला दिन केवळ एक दिवस साजरा केल्याने महिलांची स्थिती सुधारणार नाही. दररोज त्यांचा आदर करणे गरजेचे आहे. आपल्या मुलांना देखील महिला, मुलींचा आदर करायला शिकवणे आवश्यक आहे. आजच्या युगात महिला घरापासून ऑफिसपर्यंत सर्व काही सांभाळत असताना आणि कोणत्याही क्षेत्रात पुरुषांच्या तुलनेत मागे पडलेले आढळत नाही. उलट त्या घर संभाळून ऑफिसचे काम करताना दिसतात. भारत असा देश आहे जिथे महिलांना देवी मानले जाते. नवरात्रीमध्ये मुलींची पूजा केली जाते. पण खऱ्या अर्थाने आपण अजूनही महिलांना हवा तसा सन्मान देऊ शकलो नाही. आजही अनेक मुली शिक्षणाच्या हक्कापासून दूर आहेत. सुरक्षेच्या दृष्टिकोनातून अजूनही मुली रात्री उशिरा घराबाहेर पडू शकत नाहीत.

**- श्रीमती सुषमा तानाजी कट्टे, आदर्श माता**

### सर्वच क्षेत्रात महिलांनी यशाची पताका फडकावली



प्रत्येक महिलांनी आपली स्वप्नपूर्ती करण्यासाठी आणि स्वतःला सशक्त बनवण्यासाठी सातत्याने परिश्रम घेणे गरजेचे आहे. प्रत्येक आव्हाने, अडथळा स्वीकारण्याची स्त्रीमध्ये ताकद असते आणि ते अशक्य ही शक्य करुन दाखवते व प्रत्येक संधीचं सोनं करु शकते. घरच्या जबाबदाऱ्या सांभाळत मी आज रॉयल हॅट पब्लिकेशनसाठी संपादिका म्हणून काम करत आहे. या कामात मला घरच्यांचा संपूर्ण पाठिंबा मिळत आहे. आपण घेतलेल्या शिक्षणातून व आपणास आलेल्या अनुभवातून प्रत्येकाचा आत्मविश्वास वाढू शकतो, असा मला विश्वास वाटतो. सकारात्मक दृष्टिकोनातून पाहिल्यास प्रत्येक क्षेत्रात महिलांनी प्रगती केली असली तरी महिलांच्या स्वप्रगतीसाठी अजूनही खूप काही करायचे आहे.

**- हर्षदा चव्हाण, संपादिका, रॉयल हॅट पब्लिकेशन**

### जबाबदारीपासून मागे हटू नका



भारतामध्ये माता दुर्गाची पूजा केली जाते, म्हणून आपल्या देशात महिलांना देवी म्हटले जाते. स्त्री शिवाय मानवी जीवन अस्तित्वात नाही. माझ्यासाठी एक सैनिकाची पत्नी होणे सोपे नव्हते. पती देशाच्या रक्षणासाठी हातात बंदूक घेऊन उभे असताना इकडे मला कुटुंबंची जबाबदारी, मुलांसाठी आईचे प्रेम व वडिलांची सावली मुलांना देणं हे आव्हान माझ्यापुढे होते. आयुष्याची १८ वर्षे वेगळे राहून आम्ही फक्त मुलांच्या भविष्याच्या विचाराने आणि देशसेवेच्या कार्यात मग्न राहून संसार केला. आणि माझे पती सीमेवर आणि मी जबाबदारीपासून कधीही मागे हटले नाही.

**- सुवर्णा माने, वीरपत्नी, वीरमाता**

### स्वतःच्या क्षमतेवर विश्वास ठेवा



मराठी माणूस आणि कला याचं अतूट नातं आहे. नृत्य, गायन, वादन, चित्रकला, हस्तकला या विविध कलांमधे स्त्रियांनी आपले कर्तृत्व सिध्द केले आहे. सोलापुरात मी गेल्या १० वर्षांपासून नृत्य प्रशिक्षक म्हणून काम करत आहे. स्त्रियांना कुटुंब आणि नोकरी अशी दुहेरी भूमिका सांभाळायची असते. घरच्यांचा पाठिंबा असल्यामुळे नोकरी आणि घर या दोन्ही जबाबदाऱ्या पेलू शकतो. महिलांना समान अधिकार समान संधी आणि आदर हा स्वातंत्र्याचा पूर्ण अधिकार आहे. फक्त एक गोष्ट आपण स्वतः समजून घेतली पाहिजे ती म्हणजे आपली प्रतिभा, कार्यक्षमता, आवड आणि कल ओळखा. यांत्रिकपणे काम करण्याऐवजी स्वतःला आनंदी ठेवण्याचे काम करा तसेच स्वतःच्या क्षमतेवर, कर्तृत्वावर विश्वास ठेवा तरच तुम्हाला सभोवतालचे वातावरण आपोआप आनंदी दिसेल.

**- रचना व्हनमोरे, नृत्य दिग्दर्शिका**

### कायद्याचे ज्ञान पाहिजे



महिलांनी शारीरिक दृष्ट्या आणि मानसिक दृष्ट्या सक्षम झाले पाहिजे. कठीण प्रसंगाला न डगमगता धैर्याने तोंड दिले पाहिजे. स्वसंरक्षणासाठी तयार असले पाहिजे. महिलांसाठी असलेल्या कायद्याचे ज्ञान असले पाहिजे. आपले कर्तृत्व आणि नेतृत्व सिद्ध करण्याची जिद्द व चिकाटी स्वतःमध्ये ठेवावी. कुटुंबाबरोबर इतरही जबाबदाऱ्या पेलण्यासाठी सबळ होणे काळाची गरज आहे. निर्भय बनून पुरुषाच्या बरोबरीने कार्य केले पाहिजे. बेटी बचाव, बेटी पढाव या योजनेतून मुलगी किती महत्वाची आहे. हे समाजाला पटवून द्या. सध्या सुनेच्या छळाच्या बातम्या अजूनही वाचावयास मिळतात तेंव्हा सुनेची सासू न होता आई व्हा, नातवंडाची लाडकी ग्रँड माँ व्हा. पाटबंधारे विभागात ३३ वर्षाच्या सेवेत निष्ठेने काम केले. निवृत्तीनंतर सामाजिक बांधिलकी जपत पती वसंत पोतदार समवेत सामाजिक कार्यात सक्रिय सहभाग असतो.

**- चित्रा पोतदार, सहाय्यक आरेखक, सेवानिवृत्त**

### स्त्री शिकली अन् प्रगती झाली



आज आपण सगळेजण महिला दिन अतिशय उत्साहाने साजरा करतो. किंबहुना मला असे वाटते की महिला दिन चांगल्या प्रकारे साजरा करण्यासाठी पुरुषच जास्त आघाडीवर असतात. याला कारणही तसेच आहे एकीकडे नोकरी, व्यवसाय सांभाळत दुसरीकडे घराची जबाबदारी नेटाने सांभाळणाऱ्या सुपर वुमन आज सर्वत्र वावरताना दिसत आहेत. 'स्त्री शिकली. प्रगती झाली' हे वाक्य आज कितीतरी कुटुंबातील स्त्रियांनी सिद्ध करून दाखविलेले आहे. अनेक क्षेत्रात स्त्रियांनी आपले प्रतिभाविश्व निर्माण केले आहे. प्रत्येक स्त्रीने आपल्यातील 'स्व' ला ओळखले पाहिजे. प्रत्येकीला 'स्व' ची जाणीव होणे गरजेचे आहे. अशी 'स्व' ची जाणीव झालेली स्त्री ही कधीच संधीची वाट पाहत बसणार नाही, तर स्वतः संधी निर्माण करेल.

**- सुचिता मदने**
सहशिक्षिका-श्री सिद्धेश्वर प्राथमिक शाळा

## महिला दिनानिमित्ताने....

शुभेच्छांनी भरला तिचा स्मार्टफोन
पण वाचायला मिळाला नाही, दिवसभरातील
एकही क्षण तिच्या कर्तृत्वाला सलाम..
तिच्या मातृत्वाचे गुणगान
चर्चा तिच्या त्यागाची
दखल तिच्या दातृत्वाची...
तिचे कौतुक तिचे अप्रूप तिच्या चांगुलपणा
डंका खूप दिवसभर केली, पुरुषांनी स्तुती,
तिच्या गुणांची सौंदर्याची
कला तिच्या अंगीची
कुटुंबाचा भार कसा पेलला संसार माझा कसा
सावरला..तीच खरा आधार.. खरा कणा
असं म्हणत टाकला, सर्व डोलारा
तिच्या अंगा खांद्यावर संसाराचा
तीच माझी खरी पतिव्रता..
असं म्हणून तो निघून गेला मस्त
जगायला निवांत
त्याला हवे तसे
त्याला हवे तसे...

**- प्रा. डॉ. श्रुती वडगबाळकर, सोलापूर**

### संसार आणि स्वप्न दोन्हीमध्ये समतोल राखा :



खर तर मनाचा निश्चय दृढ असेल तर माणूस त्याचे स्वप्न कसेही करून पूर्ण करतोच. माझ्या मते सर्व महिलांनी आधी मनात दृढ संकल्प घ्यावा की स्वतःसाठी काहीतरी करणार आणी स्वाभिमानी जीवन जगणार. कारण आपले शरीर हे आपल्या मनाचे ऐकत असते आणि त्यानुसार शरीराची आपल्याला साथ मिळते. खूप साऱ्या महिला आहेत ज्यांना सांसारिक जबाबदारीमुळे घराबाहेर पडता येत नाही. मात्र त्या महिला देखील आता होजीअरी गारमेंट फॉर लेडीज, साडी व्यवसाय, ज्वेलरी व्यवसाय, शिवणकाम असे कित्येक काम आहेत जे तुम्ही घर सांभाळूनही करू शकता. आपल्याला बाहेर जाऊन काम करणे शक्य नसेल तर बाहेरच्या कामांना घरी घेऊन या आणी पैसे कमवा. तुमचा संसार आणी स्वप्न दोन्हीमध्ये समतोल राखा.

**- प्रगती क्षीरसागर, मेकअप आर्टिस्ट**

### परिवर्तन करण्याची शक्ती



महिला दिनानिमित्त सर्व महिलांना एक संदेश, देऊ इच्छिते की, आपले राणीसारखे विचार हवे, राणी ही अपयशाला घाबरत नाही. कारण अपयश हे महानतेचे आणखी एक पाऊल असते आपण महिलांसाठी सर्वात कठीण गोष्ट म्हणजे कृती करण्याचा निर्णय घेणे, बाकी फक्त दृढनिश्चय करुण आपण साध्य करू शकतो. स्त्री ही स्वतः संपूर्ण वर्तुळ असते. तिच्या आत निर्माण करण्याची, संगोपन करण्याची आणि परिवर्तन करण्याची शक्ती असते. आणि ही शक्ती सर्वांनीच बघितली आहे. आजच्या व्यस्त जीवनशैलीत महिलांसाठी योगा करणे अत्यंत आवश्यक आहे. महिलांसाठी योगाचे अनेक फायदे आहेत. सूर्यनमस्कार, मार्जरी आसन, व्याघ्रासन, शंशाकासन, ग्रीवासन, सर्वगासन, धनुरासन आणि सुप्त ब्रजासन हे विशेषतः स्त्रियांसाठी फायदेशीर आहेत.

**- वंदना शिंदे, योग प्रशिक्षक, आहारतज्ञ**

### ....तर स्त्री सक्षम होण्यास वेळ लागणार नाही



स्वातंत्र्य जपताना आपली संस्कृती, परंपरा जपण्याची खूप मोठी धुरा अथवा जबाबदारी आपल्या सर्व माता-भगिनीवर अर्थात स्त्रीवर आहे, याचा विचार प्रत्येकाने करणे गरजेचे आहे. महिला सक्षम होताना आपल्या संस्कृतीचा वडीलधाऱ्या व्यक्तींचा, त्यांच्या विचारांचा आदर करणे आवश्यक आहे तरच आपण खरे अर्थाने सक्षम होणार आहोत. सक्षमीकरणाच्या वाटेवर चालताना स्वतःमध्ये प्रथम बदल करणे गरजेचे आहे. स्वतःमधील बदल हा सकारात्मक असायला हवा. वीस वर्ष महिला महाविद्यालयात काम करताना एक गोष्ट वारंवार खटकत राहिली की, महाविद्यालयामध्ये येणारी मुलगी कुटुंबाच्या कुबड्या घेऊन चालायची.आत्मविश्वासाचा अभाव मुलींना सक्षम करण्यास मारक ठरतोय.

**- डॉ. वासंती पांढरे-येळे, प्राचार्या, मातोश्री गिरिजाबाई ढोबळे महिला शिक्षणशास्त्र महाविद्यालय.**

### महिलांनी देश अन् विदेश याकडे लक्ष देण्याची गरज



महिलांनी फक्त 'चूल आणि मूल' याकडेच लक्ष दिले पाहिजे असे अनेक जणांना वाटते, पण आता महिलांनी चूल आणि मुलासोबतच 'देश आणि विदेश' यांकडे सुद्धा लक्ष देण्याची गरज आहे. स्त्रियांची मानसिकता बदलणे हे अतिशय महत्त्वाचे आहे. ग्रामीण भागात स्त्रिया अजूनही स्वतः निर्णय घेऊ शकत नाहीत. तेथे त्या पुरुषांच्या निर्णयावर अवलंबून राहतात. त्यांची निर्णय क्षमता वाढणे गरजेचे आहे. घटनेने अनेक अधिकार दिलेले आहेत, याची माहिती त्यांच्यापर्यंत पोहचली पाहिजे, प्रबोधन झाले पाहिजे. स्त्री संरक्षण, स्वयंरोजगार, सुरक्षित मातृत्व, या प्रबोधनासाठी महिला शक्ती केंद्र होणे गरजेचे आहे. पुरुषाच्या मानसिकतेबरोबर स्त्रियांची ही मानसिकता बदलण्याची प्रचंड गरज आहे. स्त्रियांचे सबलीकरण झाले तर भारत विवेकी विचाराने समृद्ध होऊन जाईल.

**- डॉ. नयना व्यवहारे,** शतायु आयुर्वेद, संशोधन केंद्राचे संचालक

### स्त्री-पुरुष समानता मजबूत व्हावी



महिलांना समाजामध्ये सन्मानाने जगण्यासाठी त्यांना शिक्षण देणे गरजेचे आहे. तसेच आर्थिकदृष्ट्या सक्षम करणे, महिलांना स्वावलंबी होण्यासाठी त्यांना आर्थिक सहाय्य व वेगवेगळ्या क्षेत्रात रोजगाराच्या संधी उपलब्ध करु देणे गरजेचे आहे. कायदे व कल्याण कार्यक्रमाच्या माध्यमांतून महिलांना सर्वच क्षेत्रामध्ये पुरुषांच्या बरोबरीने हक्क देवून स्त्री-पुरुष समानता मजबूत व्हावी. स्त्री ही आई, बहीण, पत्नी, मुलगी अशा अनेक नात्यांना यशस्वीपणे सांभाळत असते. नीतीमूल्य जपणारी शक्ती म्हणून स्त्रीकडे पाहतात. कुटुंबाच्या जबाबदाऱ्या पार पाडत असताना तिने आर्थिकदृष्ट्या सक्षम असणे गरजेचे असते. प्रत्येक महिलामध्ये कला, कौशल्य दडलेले असते. त्या कौशल्य क्षमतेनुसार त्यांनी आर्थिकदृष्ट्या सक्षम व्हावे.

**- सोनाली चौगुले, शिक्षिका, वोरोनोको माध्यमिक शाळा.**

### स्वतःला ओळखा अन् सक्षम व्हा



स्त्री ही शक्तीची प्रतीक आहे, तिला अडथळे ओलांडण्याची सामर्थ्य प्रकृतीनंच दिले आहे. समाजात आजही अनेक महिलांना त्यांच्या स्वप्नांपर्यंत पोहोचण्यासाठी जातीने, धर्माने, किंवा पारंपारिक व्यवस्थेच्या नावाखाली अडथळ्यांना सामोरे जावे लागते. संयुक्त कुटुंब ही मर्यादा नसून, एक आणि संधी असू शकतो. प्रत्येक महिलांकडे एक अजिंक्य शक्ती आहे. कुटुंब आणि करिअर यात संतुलन साधण्यासाठी वेळेचे योग्य व्यवस्थापन करा. छोट्या- छोट्या टप्प्यांनी उद्दिष्टांकडे जा. दररोज स्वतःसाठी वेळ काढा. शिक्षण, तुमचं आरोग्य हेच कुटुंबाचं समाधान आहे. शिक्षण हे केवळ नोकरीसाठी नाही, तर स्वावलंबन अन् आत्मसन्मानासाठी आहे. जेव्हा एक महिला स्वतःला सक्षम करते, तेव्हा ती संपूर्ण पिढीला प्रेरित करते. स्वतःला ओळखा, सक्षम व्हा, जगाला दाखवा की स्त्री म्हणजे अमर्याद शक्ती आहे.

**- निधी सेठिया, लेखिका, गायिका.**

## दुर्गा, रणरागिणी..

माझ्याच अस्तित्वात आहे, आजही यज्ञबली सती।
भर सभेत भूमिगत होणारी सीता, माझ्या रोमा
रोमात आहे, निरपेक्ष प्रेमाची कृष्ण राधा। अन्
समर्पणाची छाया रुक्मिणी मीच आहे।
दुर्गा, रणरागिणी.. दुष्टांचा नाश करणारी मर्दिनी
मीच होते शापित अहिल्या.. अन् पती विरहातील
योगिनी उर्मिला..
कुमारी मातेची वेदना भोगणारी कुंती.. पुत्रवधाने
जखमी झालेली द्रौपदी.. माझ्याच अवतीभवती
आहेत।
पदराला हात घालणारे दुःशासन।अन् लंकेला
घेऊन जाणारे रावण। मी ही अशी, त्यांच्या छायेत
आज्ञेत..
वचनात सत्तेत जगवले गेले मला रूढीच्या
व्युव्हरचनेत त्यांच्या वासनेच्या अभिलाषेच्या
हक्काच्या मस्तीच्या रणांगणात
युगायुगापासून आजपावेतो आता हे थांबायला
हवे। संपायला हवे। माझ्यातील महिषासुरमर्दिनी
जगायला हवी जिंकायला हवी।

### महिलांमध्ये अनेक कलागुण असतात





महिला दिनानिमित्त विविध क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या महिलांचा सत्कार केला जातो. एकूणच या दिवशी स्त्री स्वातंत्र्याचा उदो उदो केला जातो. पण खरोखरच आजची प्रत्येक स्त्री ही तिच्या मर्यादांमधून बाहेर येवून स्वतःची ओळख निर्माण करत आहे का? हा प्रश्न उपस्थित होतो. तर याचे उत्तर नाही असेच आहे. आजही समाजातील तळागळात स्त्रिया या चूल आणि मूल या चक्रात अडकलेल्या आहेत. स्त्रियांमध्ये अनेक कलागुण, कौशल्य असतात. त्या फक्त ओळखून आपल्यासाठी संधी निर्माण करुन प्रगती साधली पाहिजे. 'जिच्या हाती पाळण्याची दोरी तिच जगाचा उद्धार करु शकते' या सुविचार खऱ्या अर्थाने सार्थ होईल. परंतु समाजात अजूनही काही लोक आहेत ज्यांना महिला केवळ घराच्या चार भिंतींच्या आतच असाव्यात असे वाटते.

**- डॉ. स्नेहल कोंडेवार, डेंटिस्ट**

### महिलांनी हक्काच्या जाणीवेसह सक्षम बनावे



महिला सक्षमीकरणाचा खरा अर्थ महिलांना त्यांच्या हक्काची जाणीव करुन देणे व स्वतःचे निर्णय स्वतः घेणस सक्षम बनवणे. महिलांचे आरोग्य उत्तम असणे हे देखील महिला सक्षमीकरणाचा मोठा भाग आहे. बदलत्या जीवनशैलीमुळे महिलांमध्ये अनेक प्रकारच्या त्रासांना सामोरे जावे लागते. ८ मार्च हा दिवस समाजातील महिलांच्या योगदानाला आणि कर्तृत्वाला आंतरराष्ट्रीय मान्यता देण्यासाठी आणि समाजात त्यांचा आदर व्यक्त करण्यासाठी साजरा केला जातो. समाजात पसरलेल्या दुष्कृत्यांचा सर्वाधिक फटका कोणाला बसला असेल तर तो महिलांना बसला आहे. एकविसाव्या शतकातही अनेक महिला त्यांच्या हक्कांपासून वंचित आहेत. आजही महिला आपल्या मूलभूत हक्कांसाठी लढत आहेत. महिलांची स्थिती पहिल्यापासूनच योग्य असती तर कदाचित आपल्याला आंतरराष्ट्रीय महिला दिन साजरा करण्याची गरज भासली नसती.

**- डॉ. सुप्रिया युवराज पवार**

### महिलांनी आत्मनिर्भर बनावे



आपल्या समाजात महिला फक्त घराच्या चौकटीत मर्यादित न राहता शिक्षण, विज्ञान, क्रीडा, व्यवसाय, प्रशासन अशा विविध क्षेत्रात यशस्वीपणे आपला ठसा उमटविला आहे. प्रत्येक स्त्रीला समान हक्क, संधी आणि आदर मिळायला हवा. स्त्री पुरुष भेदभाव, अन्याय आणि अडथळे यांना सामोरे जात महिलांनी प्रत्येक क्षेत्रात आपले स्थान निर्माण करावे. अजूनही स्त्रियांना अधिकार आणि समान संधी मिळत नाही. तेव्हा आत्मनिर्भर बनून समाजात न घाबरता वावरा. ही आपली सामुदायिक जबाबदारी आहे. आंतरराष्ट्रीय महिला दिन साजरा करण्याचे सर्वात मोठे उद्दिष्ट म्हणजे महिला आणि पुरुषांमध्ये समानता निर्माण करण्यासाठी जागरूकता आणणे तसेच रूढीवादी पद्धतींना आव्हान देणे, महिलांना आदर वाटेल असे वातावरण निर्माण करणे आणि महिलांना त्यांच्या हक्काविषयी जागरूक करणे. यासाठी मी एवढेच म्हणेन की, 'सामर्थ्याची ओढून घे नवी झालर, स्त्रीशक्तीचा होऊ दे पुन्हा एकदा जागर'

**- राजश्री पोतदार**
पद्मश्री सुमतीबाई टेक्निकल हायस्कूल, श्राविका संस्था

## अग्रलेख...

# घेऊनच टाका व्याप्त काश्मीर

व्याप्त काश्मीरबाबत परराष्ट्र व्यवहार मंत्री एस. जयशंकर यांनी केलेल्या ताज्या विधानामुळे पाकिस्तानला चांगलीच मिरची झोंबली आहे. व्याप्त काश्मीर भारताच्या ताब्यात आले की, काश्मीरची समस्या पूर्णपणे संपुष्टात येईल, असे विधान जयशंकर यांनी लंडनमध्ये एका कार्यक्रमात केले. चैथम हाऊसमधील एका कार्यक्रमात पाकिस्तानी पत्रकाराने जयशंकर यांना याबाबत प्रश्न विचारला होता. या प्रश्नाचा योग्य उपयोग करून घेत पाहुण्याच्या हातून साप मारावा, याप्रमाणे जयशंकर यांनी व्याप्त काश्मीर घेण्याबाबतचा भारताचा संकल्प जाहीर करून टाकला. जयशंकर यांची ही कृती म्हणजे 'मौके पे चौका'सारखी म्हणायला पाहिजे. जयशंकर यांचे सणसणीत उत्तर ऐकून कुठून हा प्रश्न मी त्यांना विचारला, अशी त्या पाकिस्तानी पत्रकाराची स्थिती झाली असेल. विशेष म्हणजे व्याप्त काश्मीर परत मिळविण्यासाठी आंतरराष्ट्रीय परिस्थिती सध्या आपल्याला अनुकूल असल्याचा दाखलाही जयशंकर देतात. अमेरिकेत डोनाल्ड ट्रम्प दुसऱ्यांदा राष्ट्राध्यक्ष झाल्यानंतर अमेरिकेच्या परराष्ट्र धोरणात आपल्याला अनुकूल असा बदल होत आहे, याकडे त्यांनी लक्ष वेधले. कधीकाळी अमेरिका पाकिस्तानची पाठराखण करत होता, पाकिस्तानचे हितसंबंध जपताना भारतावर अन्यायही करत होता; पण मोदी पंतप्रधान झाल्यानंतर यात बदल झाला. अमेरिका आता पाकिस्तानची आंधळी पाठराखण करत नाही. भारताचे महत्त्व त्याच्या लक्षात आले आहे. त्यामुळे भारताला दुखावून चालणार नाही, तर भारताला आपल्यासोबत घेऊन चालावे लागेल, असा मोठा धोरणात्मक बदल अमेरिकेच्या परराष्ट्र धोरणात झाला आहे.

अटलबिहारी वाजपेयी, सुषमा स्वराज यांच्यानंतर बऱ्याच वर्षांनी भारताला मुत्सद्दी आणि खमक्या असा परराष्ट्र व्यवहार मंत्री मिळाला आहे. काश्मीर समस्या सोडविण्याचा भारताचा चतु:सूत्री कार्यक्रम आहे. काश्मीर समस्या बऱ्याच प्रमाणात सोडविली आहे, असे जयशंकर म्हणाले. म्हणजे काश्मीर समस्येचा हत्ती गेला आणि शेपूट उरले, अशी स्थिती झाली आहे. काश्मीरला विशेष दर्जा देणारे घटनेतील ३७० कलम हटवणे, हे काश्मीर समस्या सोडविण्याचे पहिले पाऊल होते. काश्मीरमध्ये विकास प्रक्रिया सुरू करीत आर्थिक घडामोडींना गती देत सामाजिक न्यायाचा मार्ग प्रशस्त करणे हा दुसरा तर मतदान टक्केवारी शतप्रतिशत करणे हा तिसरा टप्पा होता, असे जयशंकर यांनी स्पष्ट केले. पाकिस्तानने चोरलेला व्याप्त काश्मीरचा भाग परत मिळविणे हा या लढाईतील चौथा आणि अंतिम टप्पा म्हणायला पाहिजे. ते भारतात येणार नाही, तोपर्यंत काश्मीर समस्या पूर्णपणे सुटली, असे आपल्याला म्हणता येणार नाही आणि पाकिस्तानच्या ताब्यात राहिला तर काश्मीरची जखम नेहमीसाठी भळभळतच राहणार आहे. काश्मीर समस्या सोडविण्याचे चार मार्ग जयशंकर यांनी सांगितले; त्यातील तीन मार्ग पूर्णपणे सुटले आहेत. गणिताच्या भाषेत बोलायचे तर काश्मीर समस्या ७५ टक्के सुटली आहे, आता फक्त २५ टक्के उरली आहे. जयशंकर यांची ही घोषणा मोदी सरकारच्या एका व्यापक धोरणाचा भाग आहे. याआधी गृहमंत्री अमित शाह यांनी संसदेतही व्याप्त काश्मीर परत मिळविण्याचा संकल्प सोडला होता. व्याप्त काश्मीर हा भारताचा आहे आणि भारतातच तो राहील, असे शाह यांनी म्हटले होते. संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनीही हा भारतात आल्याशिवाय राहणार नाही, काश्मीर परिसरात होत असलेला विकास पाहून तेथील लोक भारतात सामील होण्याची मागणी करतील, असे म्हटले होते.

काश्मीर हा भारताचा अविभाज्य भाग आहे, भारताचा मानबिंदू आहे. काश्मीर हा पाकिस्तानचा असूच शकत नाही, त्यामुळे व्याप्त काश्मीरवरील पाकिस्तानचा कब्जा हा पूर्णपणे बेकायदेशीर आहे. भाडेकरूने मालकाच्या घरातील एका खोलीवर बेकायदेशीरपणे कब्जा करण्यासारखे हे आहे. विशेष म्हणजे व्याप्त काश्मीरमधील लोकांना पाकिस्तान सापत्नभावाची वागणूक देत असतो. पाकिस्तानचे मूळ नागरिक त्यांना समजले जात नाही, तर दुय्यम नागरिक म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते. तेथील लोकांना सापत्नभावाची वागणूक दिली जात आहे. त्यांच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर दडपशाही सुरू आहे. व्याप्त काश्मीरमधील लोकांनी चिलास डायमर बाशा धरणाच्या दरवाजावर कुलपे ठोकली होती. हे धरण जगातील सर्वात उंचावरील धरण समजले जाते. मात्र, या धरणामुळे या भागातील लोकांवर पाकिस्तान अन्याय करीत आहे. त्यामुळे तेथील लोकांना आंदोलनही करावे लागले होते.

व्याप्त काश्मीर परत मिळविणे हे कठीण असले, तरी अशक्य बिलकूल नाही. पंतप्रधान मोदी यांनी मनात आणले तर काही मिनिटात ते भारतात समील करून घेऊ शकतात. फक्त त्यासाठी योग्य वेळेची ते वाटत पाहात आहेत, असे म्हटले तर ते चूक ठरू नये. प्रत्येक गोष्टीची एक वेळ असते; ती वेळ आल्याशिवाय काही घडत नाही. मोदी यांच्या नेतृत्वातील भाजपाच्या सरकारने ३७० कलम रद्द केले आणि अयोध्येतील राम जन्मभूमीवर भव्य-दिव्य असे राम मंदिर उभारले. २०१४ च्या आधी या दोन्ही गोष्टी अशक्य मानल्या जात होत्या. अयोध्येत कधीच राम मंदिर बनू शकणार नाही तसेच ३७० कलमही रद्द होणार नाही, असे देशातील बहुतांश लोकांना तेव्हा वाटत होते. कारण देशाची तेव्हाची राजकीय आणि सामाजिक परिस्थिती वेगळी होती. पण २०१४ नंतर देशात मोदी यांच्या नेतृत्वातील सरकार आल्यानंतर या दोन्ही गोष्टी चुटकीसरशी झाल्या. अयोध्येतील राम जन्मभूमीवर उभारण्यात आलेल्या मंदिरात रामललाच्या मूर्तीचे दर्शन घेतल्यानंतर देशातील बहुसंख्य लोकांना आपण स्वप्न तर पाहात नाही ना, असा अजूनही भास होतो. 'मोदी है तो मुमकिन है' असे जे म्हटले जाते, त्यामुळे हे घडून आले. त्यामुळे उद्या व्याप्त काश्मीरही भारताच्या ताब्यात आला तर आश्चर्य वाटण्याचे कारण नाही. मोदी फक्त देशातील जनतेला स्वप्नच दाखवत नाही तर त्या स्वप्नांची पूर्तताही करून टाकतात. पाकिस्तानची अंतर्गत स्थिती आज अतिशय दयनीय अशी आहे. आर्थिकदृष्ट्या तो देश नुसता कर्जबाजारी झाला नाही तर दिवाळखोरीत निघाला आहे. कायदा सुव्यवस्थेच्या बाबतीत त्या देशात आनंदीआनंद आहे. लुटालूट मोठ्या प्रमाणात होत आहे. महागाई आकाशाला भिडली आहे. लोकांना खायला मिळत नाही. अन्नाच्या एका तुकड्यासाठी एक दुसऱ्याचा जीव घेतला जात आहे आणि पाकिस्तानी राज्यकर्ते मूर्खांच्या नंदनवनात वावरत आहे. जम्मू-काश्मिरातील राज्यकर्ते सुरुवातीपासूनच पाकिस्तानधार्जिणे होते. त्यांच्या या भूमिकेत अजूनही फारसा बदल झाल्याचे जाणवत नाही. राज्याचे मुख्यमंत्री उमर अब्दुल्ला यांनी व्याप्त काश्मीर परत आणण्याच्या जयशंकर यांच्या घोषणेचे स्वागत केले असले, तरी त्यातून एकप्रकारे त्यांनी सरकारला आव्हान दिले आहे. व्याप्त काश्मीर परत घेण्याची सरकारची क्षमता असेल तर त्याने ते घेऊन टाकावे. आम्ही कुठे त्यांना रोखले आहे, असे उमर म्हणाले. जम्मू-काश्मीरचा एक हिस्सा जसा पाकिस्तानच्या ताब्यात आहे, तसाच दुसरा चीनच्या ताब्यात आहे, याकडे लक्ष वेधताना उमर अब्दुल्ला यांनी सरकार पाकिस्तानच्या ताब्यातील भारताच्या हिस्स्याबद्दल बोलते; मात्र चीनच्या ताब्यातील हिस्स्याबाबत बोलत नाही, असा टोलाही ते मारतात. हा भाग परत मिळविण्याची घोषणा ही राजकीय नाही तर राष्ट्रीय आहे. त्यामुळे या घोषणेचे कुणीही राजकारण करण्याचे, एक दुसऱ्यावर आरोप-प्रत्यारोप करण्याचे कारण नाही. अखंड भारताचे आमचे स्वप्न आहे. व्याप्त काश्मीर भारतात परत येणे हे त्या दिशेने टाकलेले एक पाऊल मानले जाईल, यात शंका नाही. जयशंकर यांच्या भूमिकेप्रमाणे मोदी यांनी व्याप्त काश्मीर भारतात सामील करूनच टाकावे, म्हणजे खऱ्या अर्थाने काश्मीरचा प्रश्न सुटणार आहे. या देशातील लोकांनी पाहिलेल्या आणखी एका स्वप्नाची पूर्तता होणार आहे.

---

## यंगिस्तान

**जयेश शत्रुघ्न मेस्त्री**

# राजकीय गुंडांचा बंदोबस्त...

छत्रपती शिवाजी महाराजांनी परकीय आक्रमकांच्या तावडीतून देशाला मुक्त करण्यासाठी सकारात्मक प्रयत्न केले. मात्र केवळ मातृभूमीला स्वतंत्र करणे हा एवढाच हेतू नव्हता, तर स्वराज्याबरोबर सुराज्यही त्यांना स्थापन करायचे होते. म्हणूनच त्यांनी सरंजामशाही बंद केली. वतनदारी बंद केली. कारण वतनदारी आली की त्याबरोबर सरंजामशाहीदेखील येते. मग हे वतनदार आपापल्या विभागात स्वतःचं मोठं प्रस्थ निर्माण करतात आणि सुरू होतं अत्याचाराचं चक्र... आपलं प्रस्थ वाढवण्यासाठी त्यांना अनेक 'रॉबिनहुड' कार्यकर्ते लागतात. हे रॉबिनहुड वतनदारासोबत स्वतःचंही प्रस्थ वाढवत जातात. रॉबिनहुड संस्कृती म्हणजे एकाला लुटून स्वतःची तिजोरी भरायची आणि त्यातील थोडा भाग जनतेसाठी खर्च करतोय, असं दाखवायचं. जनतेसाठी खर्च केलेल्या भ्रष्टाचाराच्या, खुनाच्या पैशाचा इतका बोलबाला केला जातो की, या रॉबिनहुडला देव बनवलं जातं. ज्या वतनदारासाठी हे रॉबिनहुड काम करतात ते वतनदार देवांचेही देव असल्याचे भासवतात आणि इथूनच शोषणाची विकृत परंपरा सुरू होते. मोठमोठे बॅनर लावून हे स्वतःला समाजसेवक म्हणून समोर आणत असतात; मात्र करत असतात हे काळे धंदे, खंडणी, भ्रष्टाचार. वतनदार म्हणजेच आताचे आमदार, खासदार व मंत्री या रॉबिनहुडच्या जीवावर करत असतात. कधी कधी प्रकरण गळ्याशी येतं. म्हणून हिंदवी स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांनी ही पद्धतच मोडून काढली होती.

सध्या महाराष्ट्रात राजकीय गुंडगिरीच्या ज्या बातम्या येत आहेत, त्या भयानक आहेत. जरी या विषयाची चर्चा होत असली, तरी हा विषय खूपच जुना आहे. असं म्हणतात ना पकडला जातो तो चोर. अशी कितीतरी प्रकरणे आहेत, जी दाबली गेली, समोर आलीच नाही. संतोष देशमुख यांचं प्रकरण समोर आल्याने राजकीय गुंडगिरीची चर्चा पुन्हा एकदा सुरू झाली. देशमुख यांना ज्या प्रकारे हालहाल करून मारलं, त्यावरून हे स्पष्ट होतं की, या राजकीय गुंडांना कायद्याची भीती वाटत नाही. त्यांचे वतनदार म्हणजे आमदार, खासदार, मंत्री त्यांना कोणत्याही गंभीर गुन्ह्यातून सोडवू शकतात, असा आत्मविश्वास त्यांना असतो. दिशा सालियन, सुशांत सिंह राजपूत, रमेश किणी, मनसुख हिरेन इत्यादी अनेक प्रकरणांचा व्यवस्थित छडा लागलेला नाही. ही न्यायप्रविष्ट प्रकरणे असल्याने यावर बोलूनही चालणार नाही. मात्र मुद्दा असा आहे की, राजकीय गुंड प्रचंड माजले आहेत. त्यांच्यावर असलेल्या राजकीय वरदहस्तामुळे ते कोणत्याही थराला जाऊ शकतात. गल्लोगल्लीमध्ये तर असे अनेक गुंड मवाली असतात, ते छोट्या छोट्या विभागात आपलं प्रस्थ वाढवत असतात. एका रॉबिनहुडच्या हाताखाली असे अनेक 'मिनी रॉबिनहुड' तयार होत असतात. पुणे बलात्कार प्रकरणातील आरोपी दत्तात्रेय गाडे हा देखील राजकीय पक्षाशी संबंधित आहे, असे बातम्यांतून कळले आहे. राजकीय पक्षाशी संबंध असणे म्हणजे गुन्हे करण्याची परवानगी मिळणे, असा चुकीचा अर्थ सध्या समाजात रुजवला जात आहे. जो अत्यंत चुकीचा आहे. त्यामुळे राजकीय गुंड आणि गल्लीछाप मवाल्यांचा कायदेशीर मार्गाने व्यवस्थित बंदोबस्त व्हायलाच हवा.



या मराठी मातीने जगाच्या कल्याणासाठी पसायदान मागणाऱ्या ज्ञानेश्वर माउलींपासून हिंदवी स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज तसेच धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांपासून हिंदू संघटक सावरकर यांच्यापर्यंत अनेक महापुरुषांना जन्म दिला आहे. या महापुरुषांचा आदर्श घेऊन आपण चाललो तर मराठी माणूस जगावर राज्य करू शकेल. या महापुरुषांचे आपल्यावर पुष्कळ उपकार आहेत. या महापुरुषांनी जे आभाळाएवढं काम करून ठेवलं आहे, ते इथे राजकीय गुंडगिरी पोसावी म्हणून नाही, तर महाराष्ट्राने देशाचे व पुढे जाऊन जगाचे नेतृत्व करावे म्हणून... आपण मराठी माणूस जर स्वतःला छत्रपती शिवाजी महाराजांचे वैचारिक वारसदार मानत असू तर आपली जबाबदारी वाढते. आपली वागणूक अशी असली पाहिजे की, जगाने आपला आदर्श घ्यावा आणि म्हणूनच ही राजकीय गुंडगिरी एक शाप म्हणून समोर येत आहे. त्याचबरोबर सोशल मीडियावर वावरणाऱ्या 'भावना दुखावल्या संघटनेच्या' स्वयंघोषित कार्यकर्त्यांकडेही प्रशासनाने लक्ष दिले पाहिजे. हे लोक कोणालाही मारण्याच्या धमक्या देऊन सामाजिक वातावरण बिघडवत असतात. या अशा गुंडांचा बंदोबस्त करण्यासाठी कायदेशीर मार्गाने कठोर पावले उचलावी लागणार आहेत. सोशल मीडियावरही जरी कुणी हिंसक धमकी दिली तरी त्याच्यावर गंभीर गुन्हा दाखल व्हायला हवा तसेच राजकीय सरंजामशाही व रॉबिनहुड निर्माण होऊ नये म्हणून कोणत्याही आमदाराला व खासदाराला त्या मतदारसंघात दोन टर्मपेक्षा जास्त टर्म तिकीट देऊ नये. जर तिकीट द्यायचेच झाले तर लांबच्या मतदारसंघात देण्यात यावे. जेणेकडून तिथे त्यांचं राजकीय प्रस्थ निर्माण होणार नाही. राजकीय प्रस्थ ही वाईट घटना नाही, पण अनेक लोक याचा गैरफायदा घेतात आणि आपण कुणी राजे असल्यासारखे शोषण करायला मोकळे होतात. तसेच ज्यांच्यावर गंभीर स्वरूपाचे गुन्हे आहेत त्यांना राजकारणातून हद्दपार केले पाहिजे. त्यांना राजकारणात असण्याचा कोणताच नैतिक अधिकार नाही. कारण या महाराष्ट्राने टिळकांसारखे लोकांसाठी झटणारे राजकारणी पाहिले आहेत. अशा महाराष्ट्राच्या राजकारणात गुंड-मवाल्यांची भरती करून आपण कोणता आदर्श निर्माण करत आहोत? आणि आपण कोणाचे भले करणार आहोत? एखाद्या राजकीय नेत्याने गंभीर गुन्हा केल्यास त्याला सामान्य गुन्हेगारापेक्षा कठोर शिक्षा व्हायला हवी. कारण लोकांचं रक्षण करणं, त्यांचं कल्याण करणं, न्याय करणं हे राजकारणी व मंत्र्यांचं काम असतं. मग त्यांनीच अन्याय केला तर असा अन्याय पुन्हा होऊ नये याचा आदर्श घालून देण्यासाठी अत्यंत कठोर कारवाई नको का करायला?

न्याय करण्यासाठी, महाराष्ट्रात रामराज्य आणण्यासाठी आपल्याला इथे तिथे पाहायची गरज नाही. छत्रपती शिवाजी महाराजांचा आदर्श आपल्या समोर आहे. 'हर हर महादेव'ची घोषणा करत या राजकीय गुंडांचा आणि गल्लीछाप मवाल्यांचा कायदेशीर मार्गाने कायमचा बंदोबस्त करायला हवा. जगाला हेवा वाटेल असा महाराष्ट्र आपल्याला घडवायचा आहे आणि ही श्रींची इच्छा आहे!

writerjayeshmestry@gmail.com

---

## वेध

**अनिल उमाकांत फेकरीकर**

# पोलिस ठाणे वाढविता, गोधन तस्करीचे काय?

कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्याची सर्वस्वी जबाबदारी पोलिस खात्याची आहे. त्याकरिता पोलिस खाते सक्षम आहे. नव्हे, त्यांचा कारभार हा 'सद्रक्षणाय खलनिग्रहणाय' असे ब्रिद स्वीकारून व्हावा, असेच अभिप्रेत आहे. पण प्रत्यक्षात कार्यरत अनेकांची मानसिकता काम न करण्याचीच आहे. यासंदर्भात कारणे शोधून प्रत्यक्षात उपाय करण्याची वेळ आलेली आहे. एक सांगतो, जे काही प्रामाणिक पोलिस आहेत म्हणूनच जनता सुरक्षित आहे. ही पोलिसांची जमेची बाजू असली, तरी इतरत्र हीच यंत्रणा अपयशी ठरत आहे. सतत वाढत असलेली लोकसंख्या पाहता पोलिस ठाण्यांची संख्या वाढविण्यावर प्रशासनाने भर दिला आहे. परंतु पोलिस ठाणे वाढवून गोधनाची तस्करी, रेतीची तस्करी, घरफोड्यांचे वाढते प्रमाण थांबणार काय? सामान्यांच्या तक्रारींना झटपट न्याय मिळणार का? नागपूर जिल्ह्यात बाजारगाव, मोहपा, वडोदा, पाचगाव, नांद, कान्होलीबारा या नवीन पोलिस स्टेशनच्या निर्मितीचा प्रस्ताव आहे. त्याला मान्यता मिळाल्यास नागपूर ग्रामीणमध्ये २२ वरून २८ पोलिस स्टेशन होतील. भारतात १७,५३५ पोलिस स्टेशन आहेत. महाराष्ट्रात १,१६५ पोलिस स्टेशन आहेत. राज्यात सुमारे २,२९,९६२ कर्मचाऱ्यांच्या बळावर कामकाज सुरू आहे. ही सर्व पोलिस यंत्रणा रात्रंदिवस राबत असते, म्हणूनच १३ कोटी जनता सुरक्षितपणे आपल्या घरात झोपते, असेही म्हटल्यास वावगे होणार नाही. परंतु एक प्रश्न असा पडतो की, एवढी मोठी पोलिस यंत्रणा असताना गोधनाची तस्करी का वाढत आहे? याचे उत्तर शोधण्याचा विचार बहुतांश मंडळी करीत नसल्याने गाई नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत. गोधनाची तस्करी रोखण्याची जबाबदारी केवळ पोलिसांवरच नाही, तर ती सामान्य गोपालकांसह शेतकऱ्यांवरही आहे. पण गोपालकांना आणि शेतकऱ्यांना आता गाई नकोशा झाल्या आहेत. कदाचित याच कारणाने ते सर्रास गाई कुणालाही विकत आहेत. जी मंडळी गाई विकत घेतात ते थेट त्यांना कत्तलखान्यात पाठवित आहेत. आता गाई कत्तलखान्यात पाठविणे हा फार मोठा गुन्हा आहे. हाच गुन्हा रोखण्याची जबाबदारी पोलिसांची आहे. हीच जबाबदारी पोलिस यंत्रणा इमानेइतबारे पार पाडत नसल्याने महाराष्ट्रातून आंध्रप्रदेशातील कत्तलखान्यांमध्ये गाई जाण्याचे प्रमाण मन सुन्न करणारे ठरले आहे. वस्तुतः महाराष्ट्रात गोहत्या बंदी कायदा अंमलात आला आहे. तरीही कायद्यातील पळवाटा आणि पोलिसांचा संपलेला धाक गोधनाच्या तस्करीसाठी कारणीभूत ठरला आहे. पूर्वी एक पोलिस गावात येताच संपूर्ण गावकरी घाबरायचे, एवढा धाक म्हणा किंवा आदरयुक्त भीती तेव्हा होती. कालांतराने ती प्रतिमा पुसल्या गेली आणि पोलिसांबद्दल नकारात्मक भावना वाढीस लागली. उरलीसुरली कसर भारतीय चित्रपटांनी पूर्ण केली. त्यांनी सतत विविध चित्रपटांचे कथानक रंगविताना पोलिसांबद्दल वाईटच गोष्टी दाखविणाऱ्यावर भर दिला. यातून पोलिसांबद्दल सर्वत्र नकारात्मक भावना वाढीस लागली. अनेकदा पोलिसही चुकीचे वागले. पण आता वेळ आलेली आहे की, त्यात बदल व्हायला हवेत. आज पोलिस खात्यात सुशिक्षितांची संख्या वायुवेगाने वाढली आहे. डॉक्टर, अभियंते, वकील या खात्याची शान वाढवित आहेत. पण ज्यांच्या बळावर काम करायचे, त्या खालच्या पातळीवरील पोलिस कर्मचाऱ्यांची काम करण्याची मानसिकता संपलेली आहे. ते तासन्तास मोबाईलच्या चक्रव्यूहात अडकलेले असतात. आता मोबाईलमध्ये गुंतलेले कर्मचारी कसे काय आपल्या कामाला न्याय देतील? केवळ पोलिस ठाण्यांची संख्या वाढवून कायदा सुव्यवस्था अबाधित राहणार नाही. याकरिता खात्यात कार्यरत मनुष्यबळाची मानसिकताही बदलविण्याची गरज आहे. खाते कुठलेही असो, ठरावीक तास काम करणे हा झाला कायदा. पण कामात स्वतःला झोकून देणे ही झाली नैतिकता. मी पगार घेतो म्हणून काम करतो. हा झाला व्यवहार. खात्याच्या अस्तित्वाची, सुरक्षिततेची, प्रतिष्ठेची योग्य काळजी घेण्याचे कार्य मला पार पाडावयाचे आहे, ही आपुलकी तर बहुतांश कर्मचारी विसरले आहेत. समजा त्या सर्व कर्मचाऱ्यांनी स्वतःला झोकून त्यांच्या वाट्याला आलेले काम प्रामाणिकतेने केले तर पोलिस ठाणे वाढविण्याची गरज भासणार नाही. जे आहे त्यातच उत्कृष्ट काम होईल अन् गुन्हेगार तस्करी सोडून प्रवचन ऐकतील, एवढी ताकद पोलिसांमध्ये आहे. तेव्हा तीच पोलिसांमध्ये दडलेली शक्ती जागृत करण्यासाठी प्रयत्न व्हावेत, हीच माफक अपेक्षा.

९८८१७१७८५९

---

## मुंबई वार्तापत्र

**नागेश दाचेवार**

# मर्यादेत राहा...

गावाकडे असलेल्या वडाखालच्या कट्ट्यावर बसून काही रिकामचोट लोकं जागतिक घडामोडींवर चर्चा करत असतात. नव्हे तर, देशाच्या पंतप्रधानांना किंवा अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांना सल्ले देण्याचं कामंही या कट्ट्यावरून चालते. बरं ही मंडळी कोण तर, हाताला काम धंदा नसलेली वेळ घालविण्यासाठी पारावर बसणारी टवाळी करणारी, गावात, गल्लीत कुत्रंदेखील विचारत नाही अशी मंडळी होय. अशीच काहीशी अवस्था आजच्या राजकारणात, महाराष्ट्रात आणि मुंबईत ज्याची होऊन बसली आहे. त्यांना लोकं 'शिल्लक शिल्लक' असे म्हणून टिंगल उडवतात, मजा घेताना दिसतात. मात्र, यांची थोडीथोडकीदेखील अब्रू शिल्लक नसून यांची शिल्लकच शून्य आहे. त्यामुळे ज्यांची स्वतःची लायकी काही नाही, अशा व्यक्ती जगातल्या सर्वात मोठ्या संघटनेवर, त्या संघटनेच्या महत्त्वाच्या पदांवर राहिलेल्या व्यक्तींवर वारंवार बोलताना दिसत आहेत. त्यांनी आपली पायरी ओळखून राहिलं पाहिजे, एवढी माफक अपेक्षा या महाराष्ट्रातील सर्वसामान्य जनता, मराठी माणूस आणि हिंदू समाजाची आहे.

जगात सर्वात मोठी एकमेव संघटना असलेल्या, अर्थात या संघटनेच्या अर्ध्यावरतीदेखील कोणीही पोहोचू शकलेले नाही. एवढं मोठं अतिविराट रूप असलेल्या संघटनेवर किंवा त्या संघटनेच्या दुसऱ्या सर्वोच्च पदावर राहिलेल्या व्यक्तीवर बोलणे म्हणजे सूर्यावर थुंकण्यासारखे आहे. हे वेगळ्याने सांगण्याची गरज नाही. यांची उंची किती, औकात किती आणि हे बोलतात किती... लायकीत राहायचं सोडून चर्चेत राहण्यासाठी मोठमोठ्या व्यक्तींवर टीका करायची ही यांची 'मोडस ऑपरेंडी' झाली आहे. कदाचित सकाळचा भोंगा यांनी त्यासाठीच ठेवला आहे.

बरं, मराठी मराठी करून गळे काढणाऱ्या या लोकांनी आपल्या मुलांना कुठं शिकवलं? स्कॉटिश ख्रिश्चन मिशनऱ्यांद्वारे माहिम येथे चालविल्या जाणाऱ्या बॉम्बे स्कॉटिश स्कूल आणि खाजगी कॅथलिक महाविद्यालय सेंट झेवियर्स येथे... मराठी भाषेचा पुळका येणाऱ्या या लोकांना महानगर पालिकेच्या किंवा सरकारी मराठी शाळा यांचे मुलं शिकवायला मिळाल्या



नाहीत? २०१४ मध्ये मुंबई महानगर पालिका मराठी माध्यमाच्या ३६८ शाळा चालवत होती. आता २०२४ या वर्षात शाळांची संख्या २६२ वर आली होती. १० वर्षांत १०० शाळा बंद झाल्या आहेत. मुंबई महापालिकेने एक 'युनिफाईड डिस्ट्रिक्ट इनफॉर्मेशन सिस्टिम फॉर एज्युकेशन' (यूडीआयएसई) कडे शाळांची माहिती संकलित करून दिली.

या आकडेवारीतून मागच्या दशकभरातील मराठी माध्यमांच्या शाळांची दुर्दशा आणि गळती समोर आली आहे. मुंबई महापालिकेत तब्बल २५ वर्षे याच मराठी मराठी म्हणून गळे काढणाऱ्यांची होती. या २५ वर्षांतल्या १० वर्षांमध्ये १०० मराठी शाळा बंद पडल्या. तेव्हा यांना आपली मराठी शाळा बंद कशी होऊ शकते, असा प्रश्न पडला नाही. त्यासाठी प्रयत्न करावे असे वाटले नाही. तेव्हा आपलेच महापौर, शिक्षण सभापती असताना, त्यांचे कान उपटावेसे यांना वाटले नाही? महानगर पालिकेवर यांचंच राज्य होतं ना... राज्य असताना मराठी माणूस मुंबईबाहेर कसा फेकला गेला?, मुख्यमंत्री असताना गिरणी कामगारांना हक्काची घरं का दिली नाही?, पत्राचाळीतील ६०० हून अधिक कुटुंबांना घरं देऊन न्याय का दिला नाही?, या घोटाळ्यातील आरोपी तुझा माणूस निघाला, मराठी माणसांवर अन्याय करणाऱ्या या माणसाला पक्षाबाहेर का काढले नाही? केवळ मराठी मराठी म्हणून चालत नाही. त्याच्यासाठी काही करावं देखील लागतं. मराठी माणसांसाठी काय केलं जरा एक काम सांगावं यांनी. मुंबई महापालिकेत सत्ता मिळविण्यासाठी मराठी-अमराठी वाद तुम्ही निर्माण केला. मात्र, त्याच अर्थात तुम्हाला मतदान करणाऱ्या मराठी माणसाला मुंबईबाहेर जावे लागले तेव्हा तुम्ही झोपला होतात?

हिंदुत्ववादी संघटना आणि त्याच्या नेत्यांवर बोलायला तत्परता दाखविणाऱ्या साहेबांची, अबू आझमी बोलला तेव्हा तत्परता कुठे गेली होती? वक्फ बोर्डाच्या कायद्यातील सुधारणेला विरोध करतो, मुख्यमंत्री असताना औरंगजेबाच्या मजारीचं नूतनीकरण झालं, अजान पठनाची स्पर्धा तू भरवलीस, ऊर्दूत कॅलेंडर तू छापलीस, हिंदुहृदयसम्राटाचा जनाब तू केला, तेव्हा आमच्या मायमराठीचा अवमान झाला नाही? केवळ एखाद्यानं वेगळ्या उद्देशानं दिलेल्या उदाहरणानं मराठीचा अवमान होतो, नाही का? बरं, तुझं कुटुंब मध्यप्रदेशातून स्थलांतरित झालेलं आहे, हे दिग्विजय सिंगांचं वक्तव्य का खोडून काढलं नाहीस... एका मराठी माणसाला तो माणूस हिंदी असल्याचं म्हणत होता. त्याचा निषेध तर सोडा साधी प्रतिक्रिया दिली नाही आणि आमच्या मराठी माणसावर प्रतिक्रिया द्यायला सरसावतो, हे तुझं जे काही वेगळं मराठीत्व आणि वेगळं हिंदुत्व आहे ना ते सगळ्यांना कळलं आहे. त्यामुळेच तर विधानसभेत लायकी दाखविली या मराठी माणसाने तुम्हाला.

गुरुवारी विधान परिषदेत एका नेत्यानं स्वतःच्या डिंगा हाकताना, संभाजी महाराजांची तुलना स्वतःसोबत केली. तेव्हा बरा मूग गिळून बसलास. 'आज के शिवाजी नरेंद्र मोदी' पुस्तकाचे अनावरण झाले तेव्हा तर थय्या थय्या नाचला होतास ना... आता काय झालं? तुमच्या सडलेल्या मेंदूचे ऑपरेशन जोपर्यंत होत नाही तोपर्यंत राज्यात वैचारिक भाषेची सभ्यता आणि 'हेल्दी पॉलिटिक्स' या महाराष्ट्रात बघायला मिळणार नाही.

तुम्ही मराठी माणसांची, मराठी भाषेची चिंता करण्यापेक्षा स्वतःच्या राजकीय भवितव्याची चिंता करणे गरजेचं आहे. आजची तुमची गरज ती आहे. उगाच कशाला उसने अवसान आणताहेत. मांजर डोळे मिटून दूध पीत असली तरी जगाला कळते, काय काय सोंगं चालू आहेत तुमची ती. जनतेला दूधखुळी समजू नका आणि मर्यादेत राहा...

९२७०३३३८८६

---


### युवकांनो, आव्हानांना सामोरे जा...!

देशातील युवक-युवती उद्याचे खरे आधारस्तंभ असणार आहेत. या युवा शक्तीच्या जोरावर उद्या आपला देश जगातील सर्वशक्तिमान देश ठरावा म्हणून युवा वर्गाने आजच्या या परिस्थितीने गोंधळून न जाता, या विपरीत परिस्थितीने अस्वस्थ न होता किंवा हताश-निराश न होता या परिस्थितीला आत्मविश्वास, धाडस व शौर्याने सामोरे जाण्याची गरज आहे. आजचा युवा वर्ग हा उच्चविद्याविभूषित आहे. त्यांच्याकडे विविध क्षेत्रातील कौशल्य आहे, कला आहे, धाडस आहे. मात्र आजची सामाजिक, राजकीय, शैक्षणिक क्षेत्रातील, कौटुंबिक क्षेत्रातील ढासळत असलेली नैतिकता, मानवी मूल्यांची पायदळी तुडवणूक, अनादरता, राजकीय क्षेत्रातील मक्तेदारी व घराणेशाही मोठ्या प्रमाणात वाढत आहे. या सर्व बाबींचा परिणाम आजच्या युवा पिढीवर होत आहे. देशातील विविध क्षेत्रात वाढत असलेला भ्रष्टाचार, वाढती बेरोजगारी, वाढती व्यसनाधीनता, शासनाची आणि समाजाची उदासीनता याचा परिणाम युवकांच्या मानसिकतेवर मोठ्या प्रमाणात होत आहे. त्यामुळे आजचा युवा वर्ग हा वैफल्यग्रस्त दिसत आहे. मात्र देशातील तमाम युवकांनी या परिस्थितीला सामोरे जाण्याचे बाळगावे, मनी आत्मविश्वास बाळगावा व आज ना उद्या ही परिस्थिती बदलले याबाबत निश्चिंत राहावे.

**धोंडीरामसिंह राजपूत**/९४२१३१२२४४

●● ●●

### वाढते तापमान आणि पाणी समस्या



वर्षभर पाण्याचे स्रोत कायम ठेवत असलेले नदी, नाले, तलाव, विहिरी तापमान वाढताच पाण्याची पातळी झपाट्याने कमी होऊन आटू लागली आहेत. तापमान वाढत आहे, तसे सिंचित पाण्याची पातळी कमी होत चालली आहे. एरवी बाराही महिने पाण्याचे सिंचन स्रोत असलेली साधने आता आटू लागली आहेत. नदी, नाले, तलाव, विहिरींना वर्षभर पुरेल एवढं पाणी साठवले असायचे. परंतु तापमान वाढताच पाण्याची पातळी झपाट्याने कमी होते आहे. त्यामुळे येणाऱ्या काळात पाण्याची समस्या भीषण होऊ शकते. सिंचन क्षेत्र वाढविण्यासाठी शासनाने जलसिंचन क्षेत्रात वाढ केली असली तरी ही पाण्याची पातळी खाली होते आहे. शहर, ग्रामीण भागात पाण्याची समस्या निर्माण होण्याअगोदर उपाययोजना आखल्या पाहिजेत. त्यामुळे पाण्याचा जपून वापर करणे आवश्यक आहे.

**मुनीश्वर मलेवार**/७७४४०१०७८७

## वाचक पत्रे

●● ●●

### पोलिस आयुक्तांचे अभिनंदन

मागील नऊ महिन्यांपासून 'ऑपरेशन थंडर' ही मोहीम राबविणारे नागपूरचे पोलिस आयुक्त डॉ. रवींद्रकुमार सिंगल यांचा नशामुक्त शहर बनविण्याचा संकल्प अभिनंदनीय आहे. सततच्या व्यसनामुळे मानवाच्या शरीराचा नाश होतो. कुटुंब उद्ध्वस्त होते, मुलांचे छत्र हरवते. पर्यायाने समाज, शहर आणि देशाची प्रगती खुंटते. याकरिता पोलिस आयुक्तांनी नशामुक्तीचा पाठपुरावा करून अमली पदार्थांची तस्करी, खरेदी विक्री करणाऱ्यांवर कारवाई सुरू केली आहे. एकदा व्यक्ती नशेच्या आहारी गेल्यावर त्याची गुन्हेगारी प्रवृत्ती वाढते. ही साखळी तोडण्याचे काम ते करीत आहेत. यासाठी त्यांनी या मोहिमेची जनजागृती करून सहकार्य करण्याचे आवाहन केले आहे तसेच ही मोहीम निरंतर चालविण्यासाठी ते प्रयत्नशील राहतील, असा विश्वास त्यांनी दिला आहे. आपण नागरिकांनी सहकार्य केल्यास ही मोहीम नक्कीच यशस्वी होईल त्यासाठी आपणही कटिबद्ध होऊ या.

**स्नेहल खंडागळे**/नागपूर

●● ●●

### औरंगजेबाची पिलावळ...

फाळणी हा भारताला मिळालेला शाप आहे. 'एक ना धड घरभर चिंध्या' अशा स्वरूपात सगळीकडे औरंगजेबी मानसिकतेच्या चिंध्या अजूनही पसरल्या आहेत. सगळे तसे नसतीलही, परंतु बरेचसे तसेच दिसतात. एरव्ही अल्पसंख्यकांच्या एकाही मिरवणुकीत मग ती लग्नाची का असेना, दगडफेक झालेली बातमी मी तर कधी वाचली नाही. परंतु श्रीराम शोभायात्रा, हनुमान जयंती, दुर्गापूजा वगैरे धार्मिकतेच्या वेळी नेमकी दगडफेक कशी होते? आधीच व्यवस्था कशी झाली असते? एका आवाहनावर शेकडो रिकामटवळे कसे एकत्र होतात? म्हणजेच शरीराने इथे राहणारे काही अब्बा मनाने औरंगजेबाच्याच प्रेरणेने जगत आहे असे वाटते. दुर्दैव असे की, समाजवादी, काँग्रेससारखे पक्ष तर आता उघडपणे अल्पसंख्यक पक्ष झाला आहे. त्यांना जनता तसेच 'अल्पसंख्य' जागा देतात हा भाग वेगळा. परंतु जर कधी सत्तापरिवर्तन झाले तर अशा औरंगजेबी वृत्तीच्या लोकांना तर आयतं फावेल. किती मस्ती करतील हे त्यावेळी. अबू आझमी हा काही आज बोलला नाही. तो जन्मल्यापासूनच वादग्रस्त राहिला असेल. आपला मतदार तयार करायचा, विशिष्ट एरिया बनवायचा आणि एक विधानसभा करून वारंवार निवडून यायचे, असेच धंदे या लोकांनी इथे सुरू केले आहे. तिकडे ओवेसी आपल्या बापजादापासून ४० वर्षांपासून एकाच ठिकाणी सत्तेत आहे. तेथेच घरावर घर चढवून आपले मतदार वाढविले आहे. नागपुरातही नवेनवे चेहरे दिसतात. ते कुठे राहतात, काय करतात हे पोलिस विभागाला तरी माहीत आहे का कोण जाणे. अशा औरंगजेबी वृत्तीना वेळीच ठेचलेले बरे.

**मनोज वैद्य**/९८२२९४९२६०

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल अॅड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१** या व्हॉट्स अॅप क्रमांकावर पाठवावा.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## क्राईम वृत्त

### शेटेवस्तीजवळ दुचाकी घसरल्याने तरुण जखमी

**सोलापूर, दि. ७ मार्च-**

तळेहिप्परगा ते बुधवार पेठ जाताना शेटेवस्तीजवळ दुचाकी घसरल्याने तरुण जखमी झाला. हा अपघात गुरुवारी रात्री साडेआकराच्यासुमारास घडला. सोनपाल भिमराव गाडे (वय ३०, रा. बुधवार पेठ, सोलापूर) असे जखमीचे नाव आहे. सोनपाल हा दुचाकीवरून तळेहिप्परगा येथून बुधवार पेठच्या दिशेने जात होता. शेटेवस्तीजवळ आल्यानंतर जात असलेली दुचाकी अचानक घसरली. यात खाली पडल्याने त्याच्या हनुवटीस जखम झाली. भाऊ सत्यपाल गाडे यांनी उपचारास शासकीय रुग्णालयात दाखल केले. रुग्ण पळून गेल्याची नोंद सिव्हील हॉस्पीटल चौकीत झाली आहे.

### शेतीच्या वादातून वृध्दास मारहाण

**सोलापूर, दि. ७ मार्च-**

शेतीच्या वादातून ७५ वर्षीय वृध्दाला लाकडाने तसेच लाथाबुक्यांनी मारहाण केली. हा प्रकार गुरुवारी दुपारी माढा तालुक्यातील वरवडे येथील शेतात घडला. जयसिंग नवनाथ गरड (वय ७५) असे मारहाण झालेल्या वृध्दाचे नाव आहे. जयसिंग हे गुरुवारी दुपारी वरवडे परिसरातील त्यांच्या शेतात होते. त्यावेळी शेतीच्या वादातून अभिजित गरड व इतर एक यांनी त्यांना लाकडाने तसेच लाथाबुक्यांनी मारहाण केली. यात सर्वांगास मुकामार लागल्याने टेंभुर्णी येथील सरकारी रुग्णालयात उपचार करून डॉक्टरांच्या सल्ल्यानंतर रात्री ते स्वत: शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल झाले. या घटनेची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### दुचाकीचा कट लागून रिक्षा पलटी

**सोलापूर, दि. ७ मार्च-**

मोदी चौकी ते डीआरएम ऑफीस या रस्त्यावरून डफरिन चौकाच्या दिशेने वळताना स्टेशनकडील रस्त्यावरून आलेल्या दुचाकीचा कट लागल्याने रिक्षा पलटी होऊन चालक जखमी झाला. हा अपघात शुक्रवारी सकाळी घडला. दिलीप केरप्पा हजारे (वय ६०, रा. विश्राम नगर, होटगी नाका सोलापूर) असे जखमीचे नाव आहे. दिलीप हे शुक्रवारी सकाळी रिक्षा चालवित मोदी चौकी येथून डीआरएम ऑफीसच्या समोरील रस्त्यावरूज जाताना, डफरिन चौकाकडे जाणा-या रस्त्याला वळले. त्यावेळी स्टेशनकडून येणा-या रस्त्यावरून आलेल्या दुचाकीस्वाराने कट मारला. यात धक्का लागून रिक्षा पलटी झाली. डोक्याला आणि चेह-याला जखम झाल्याने अविनाश हजारे याने त्यांना शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल केले. याबाबत सिव्हिल पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

### पैशाच्या कारणातून तेलंगी पाच्छा पेठेत चाकूने हल्ला

**सोलापूर, दि. ७ मार्च-**

येथील तेलंगी पाच्छा पेठेत शुक्रवारी सकाळी पैशाच्या कारणातून एकावर चाकूने हल्ला झाल्याची घटना घडली. जखमीवर शासकीय रुग्णालयात उपचार करण्यात आले. अरबाज सैपनसाब बडेघर (वय २८, रा. तेलंगी पाच्छा पेठ, सोलापूर) असे जखमीचे नाव आहे. शुक्रवारी सकाळी ६.३० च्या सुमारास अरबाज हा राहते घराजवळ होता. त्यावेळी ईस्माईल शेख हा तिथे आला. त्यांच्यात पैशाच्या कारणातून शाब्दिक वाद झाला. त्यानंतर ईस्माईल याने चाकूने तसेच हाताने अरबाजला मारले. यात अरबाजच्या दोन्ही हाताला जखम झाल्याने वडील सैपनसाब यांनी त्यास शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### चिखलीगावाजवळ दुचाकी घसरून पुणे येथील तरुण जखमी

**सोलापूर, दि. ७ मार्च-**

पुणेहून सोलापूकडे येताना मोहोळ तालुक्यातील चिखली गावाजवळ दुचाकी घसरल्याने खाली पडून पुणे येथील तरुण जखमी झाला. हा अपघात पहाटे चारच्या सुमारास घडला. प्रजोत आकाश गायकवाड (वय २०,रा. कोंडवा पुणे) असे जखमीचे नाव आहे. प्रजोत दुचाकी चालवित पुणे येथून सोलापूरकडे जात होता. पहाटेच्या चारच्या सुमारास तो मोहोळ तालुक्यातील चिखली गावाजवळील रस्त्यावर दुचाकी अचानक घसरली. त्यात खाली पडल्याने डोक्याला जखम झाली आहे. तसेच सर्वांगास मुकामार लागल्याने मोहोळ सरकारी रुग्णालयात उपचार करून सोलापूर येथील शासकीय रुग्णालयात दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

# सुरक्षा रक्षकावर कात्रीने हल्ला

**तभा वृत्तसेवा**

**सोलापूर, दि. ७ मार्च -**

गुरुनानक चौकातील जिल्हा सिव्हील हॉस्पीटल येथे गुरुवारी मध्यरात्रीच्या सुमारास सुरक्षा रक्षकास कात्रीने हल्ला करून जखमी केले. या हल्ल्यात सुरक्षा रक्षकाच्या उजव्या आणि डाव्या हातावर जखम झाली आहे.

कृष्णा संजय रेड्डी (वय २७, रा. महिला हॉस्पीटल, सोलापूर) असे हल्ला झालेल्या सुरक्षा रक्षकाचे नाव आहे. कृष्णा हा जिल्हा सिव्हील हॉस्पीटलमध्ये गुरुवारी रात्री कामावर होता.




दरम्यान रात्रीचे १२.३० वाजता हॉस्पीटलच्या गेटवर एकजण गोंधळ घालत होता. त्यास हाकलून लावण्याचे काम करताना, त्या अनोळखी व्यक्तीने त्याच्याजवळील कात्रीने कृष्णाच्या उजव्या आणि डाव्या हातावर मारले. यात जखमी झाल्याने त्यास किरण साखरे यांनी रुग्णालयात दाखल केले. याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### कोंडी येथे दुचाकीच्या धडकेत तरुण जखमी

**सोलापूर :** एमआयडीसी कोंडी येथे दुचाकी चालविताना समोरून आलेल्या दुचाकीस्वाराने धडक दिल्याने एकजण जखमी झाला. अपघात शुक्रवारी सकाळी आठ वाजता घडला. ज्ञानेश्वर बाळू चटके (वय ३५, रा. सावळेश्वर पोफळी सोलापूर) असे जखमीचे नाव आहे. शुक्रवारी सकाळी आठच्या सुमारास यातील जखमी ज्ञानेश्वर हा एमआयडीसी कोंडी येथे दुचाकीवरून जात होता. एआयडीसी कार्यालयाजवळ अचानक समोरून आलेल्या दुचाकीस्वाराने धडक दिली. यात उजव्या पायाला मुकामार लागल्याने पत्नी उर्मिला यांनी उपचारास दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

---

**जाहीर प्रसिध्दीकरण**

पुढील नेमली तारीखः ८/४/२०२५
दि.कि.अ.नं. ३४/२०२५

**बार्शी येथील मे. सि.ज.ज्यु.डि न्यायाधिश यांचे न्यायालयात**

१) सिध्दांत सागर कोठारी, वय-०९ वर्षे, धंदा-शिक्षण, रा.७८३, कसबापेठ, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर-अज्ञान
२) रेयांश सागर कोठारी, वय ०३ वर्षे, धंदा-शिक्षण, रा.सदर- अज्ञान
३) स्वानुभुती सागर कोठारी, वय ३५ वर्षे, धंदा-घरकाम, रा. सदर, (स्वतः करीता व अज्ञान मुले अर्जदार नं.१,२ चे अ.पा.क.आई म्हणून) **-- अर्जदार**
४) जागृती जयेश कोठारी, वय ६५ वर्षे, धंदा-घरकाम, रा. सदर

**विरुध्द**

**कोणी नाही** **-- सा.वाला**

ज्याअर्थी अर्जदार नं.१,२ हे सख्खे भाऊ बहिण असून अर्जदार नं.३ ही त्यांची आई आहे अर्जदार नं.४ ही अर्जदार नं. ३ चे मयत पती सागर जयेश कोठारी यांची आई आहे अर्जदार नं.१,२ चे वडिल म्हणजेच अर्जदार नं.३ चे पती व अर्जदार नं.४ चा मुलगा सागर जयेश कोठारी हे दिनांक १२/१२/२०२४ रोजी बार्शी येथे मयत झालेले आहेत. मयत सागर जयेश कोठारी यांचे वडिल जयेश किशोर कोठारी हे दि. २३/०४/२०२३ रोजी मयत झालेले आहेत मयत सागर जयेश कोठारी हे त्यांचे हयातीत इ.झ.उ.ङ. या कंपनीचे डिस्ट्रीब्युटर होते ते मयत झालेने अर्जदार नं.३ यांनी सदर कंपनीचे कार्यालयाकडे डिस्ट्रीब्युटरशिप तिचें नांवाने ट्रान्सफर करणेबाबत विनंती केली असता तेथील अधिकारी यांनी ता.०२/०१/२०२५. रोजी तुम्ही हेअरशिप/वारस प्रमाणपत्र आणा त्याशिवाय तुम्हास लाभ देता येणार नाही असे सांगितले तसेच अन्यहि शासकीय, कायदेशीर अडचणीचे निवारणाकरीता वारस हेअरशिप प्रमाणपत्राची गरज आहे असे कथन करून अर्जदारानी हेअरशिप/वारस प्रमाणपत्राची मागणीचा अर्ज केलेला आहे.

त्याअर्थी या जाहीर प्रसिध्दीकरणाने कळविण्यात येते की, अर्जदारांच्या वरील मागणी, कथनांसंबंधाने कोणाचे कांही हरकती, तक्रारी, आक्षेप असल्यास वा सदर मिळकतीत अन्य कोणाचे कांही हक्क अधिकार असलेस संबंधीतानी ही जाहीर प्रसिध्दी करण प्रसिध्द झालेपासून ३० दिवसाचे आत अगर पुढील नेमली ता. ४/५/२०१५ रोजी या मे. कोर्टात स्वतः अगर माहितगार वकीलामार्फत हजर राहून आपले लेखी म्हणणे, हरकती, तक्रारी सादर कराव्यात. मुदतीत कोणाच्याही हरकती न आल्यास मा. न्यायालयाचे प्रकरणी पुढील योग्य ते आदेश होतील.

हे जाहीर प्रसिध्दीकरण आमचे सहीनिशी व. मे. कोर्टाचे शिक्क्यानिशी प्रसिध्दी केलेअसे. तारीखः ६/२/२०२५

सही/-
कनिष्ठ लिपीक
दिवाणी न्यायालय क.स्तर, बार्शी

शिक्का

सही/-
सहा. अधिक्षक
दिवाणी न्यायालय क.स्तर. बार्शी

---

**दि पंढरपूर अर्बन को-ऑप. बँक लि; पंढरपूर**

**नोटीस**

आमचे बँकेचे मयत सभासद, ठेवीदार व कर्जदार अरविंद रामलिंग महिमाने राहणार टेंभूर्णी यांचे नावावर सेव्हिंग खाते, मुदत ठेव, सोने तारण, लॉकर खाते असून सदर खत्याला वारस हक्काने नावे दाखल करणेबद्दल मयताचे वारसा पैकी त्यांचा अर्जदार अभिषेक अरविंद महिमाने यांनी बँकेकडे विनंती अर्ज केला आहे. या विनंती अर्जाप्रमाणे अर्जदाराचे नांव वारस हक्काने दाखल करणेस अन्य वारसांची लेखी संमत्या दिलेल्या आहेत. तरी सदर मयतास अर्जदार यांनी अर्जात नमूद केले. व्यतिरिक्त अन्य कोणी वारस, हक्कदार, मृत्युपत्र घालविणारे वगैरे कोणी अल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द केले तारखेपासून सात दिवसाचे आत बँकेकडे लेखी कळवावे. सदर मुदतीत कोणाची कसल्याही प्रकारची लेखी तक्रार न आल्यास अर्जदार यांनी अर्जात नमूद केले व्यतिरिक्त अन्य कोणी वारस, हक्कदार मृत्यूपत्र चालविणारे वगैरे कोणी नाहीत असे समजून मयताचे नावावरील वर नमूद केलेल्या सेव्हींग खाते, मुदत ठेव, सोने तारण, लॉकर खात्यास अर्जदार अभिषेक अरविंद महिमाने यांचे नांव वारसहक्काने दाखल करणेत येईल. मागाहून कोणाची कसल्याही प्रकारची तक्रार चालणार नाही. कळवावे!

तारीख : २७/२/२०२५

सही/-
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**दि पंढरपूर अर्बन को-ऑप बँक लि, पंढरपूर**

---

क्र./न्याय/३९४/२०२५

**सहाय्यक धर्मादाय आयुक्त सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय**

३२९, यादोगोपाळ, पेठ, राजधानी टॉवर्स, ३ रा मजला, सा. दि. २४/०२/२०२५

**सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था नोंदणी कार्यालय, सातारा विभाग, सातारा**
**चौकशीची नोटीस**
(सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० चे कलम २२)

बदल अर्ज क्र. १८८/२४
सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था नाव : **भारतीय भटके विमुक्त विकास व संशोधन संस्था सातारा**
एफ–७०६/सातारा
अर्जदाराचे नाव : **श्री लक्ष्मण बापुराव माने**
कलम २२ अन्वये केलेला अर्ज याच्या संबंधास

या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, सहायक धर्मादाय आयुक्त, सातारा विभाग, सातारा हे वर नमूद केलेल्या चौकशी अर्जासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० चे कलम २२ अन्वये खालील मुद्द्यांवर चौकशी करणार आहेत.

अर्जदारातर्फे सदर बदल अर्जातील कमी होणाऱ्या विश्वस्तांना रजिस्टर पोस्टाने नोटीस काढण्यात आलेल्या होत्या. त्यापैकी श्री अरूण खोरे, यल्लाप्पा वैदु, गीताताई जाधव, बी.जे. रावखंडे, व्यंकाप्पा भोसले, सुरेश गायकवाड या कमी होणाऱ्या विश्वस्तांना नोटीस न बजावता परत आलेल्या आहेत. करीता वरील कमी होणाऱ्या विश्वस्तांना या जाहीर नोटीस द्वारे कळविण्यात येते की, सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेत अशा रितीने पाठवावी, त्यानंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरील मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुर्ण केली जाईल व अर्जाच्या निकालाबाबत योग्य ते आदेश केले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा. सहायक धर्मादाय आयुकत, सातारा विभाग, सातारा यांचे शिक्क्यानिशी आज दिनांक २४/०२/२०२५ रोजी दिली.

(ग.व.पोरे)
न्याय लिपीक

शिक्का

(श्वे. सु. हमने)
अधिक्षक
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, सातारा.

---

**महावितरण**

**ई–निविदा सुचना क्र. २१/२०२४–२५**

महावितरण तसेच शासन ई–नोंदणीकृत व अनुभवी स्थापत्य कंत्राटदाराकडुन कार्यकारी अभियंता (स्था), स्थापत्य विभाग महावितरण, बारामती अंतर्गत सोलापूर सं व सु मंडल कार्यक्षेत्रातील विविध कामे करण्यासाठी खालील प्रमाणे ई–निविदा मागविण्यात येत आहेत.

| निविदा क्र. | कामाचे स्वरूप | निविदा रक्कम रूपये |
|---|---|---|
| टि–०६४/२०२४–२५ | ३३/११ के.व्ही.उपकेंद्र कळमन, पापरी, देवडी येथे बोअरवेल खोदकाम करणे व मोटर बसविणे ता.जि.सोलापूर (कालावधी ३ महिने) | रू.६.३३ लाख |
| टि–०६५/२०२४–२५ | ३३/११ के.व्ही.उपकेंद्र निंबर्गी ता.जि.सोलापूर येथील स्थापत्य दुरूस्तीची कामे करणे. (कालावधी ३ महिने) | रू.३.६६ लाख |
| टि–०६६/२०२४–२५ | ३३/११ के.व्ही.उपकेंद्र हिवरे, भांबेवाडी, कुवणवाडी(आष्टी) ता.जि.सोलापूर येथील स्थापत्य दुरूस्तीची कामे करणे. (कालावधी ३ महिने) | रू.९.९९ लाख |
| टि–०६७/२०२४–२५ | ३३/११ के.व्ही.उपकेंद्र बिटले ता.जि.सोलापूर येथील स्थापत्य दुरूस्तीची कामे करणे. (कालावधी ३ महिने) | रू.८.७५ लाख |
| टि–०६८/२०२४–२५ | ३३/११ के.व्ही.उपकेंद्र तांदुळवाडी ता.जि.सोलापूर येथील स्थापत्य दुरूस्तीची कामे करणे. (कालावधी ३ महिने) | रू.८.७५ लाख |
| टि–०६९/२०२४–२५ | ३३/११ के.व्ही.उपकेंद्र हन्नुर ता.जि.सोलापूर येथील स्थापत्य दुरूस्तीची कामे करणे. (कालावधी ३ महिने) | रू.८.९१ लाख |
| टि–०७०/२०२४–२५ | ३३/११ के.व्ही.उपकेंद्र मानेगाव ता.बार्शी, जि.सोलापूर येथील स्थापत्य दुरूस्तीची कामे करणे. (कालावधी ३ महिने) | रू.६.८० लाख |
| टि–०७१/२०२४–२५ | ३३/११ के.व्ही.उपकेंद्र अडेगाव ता.माढा, जि.सोलापूर येथील भिंतीचे स्थापत्य दुरूस्तीची कामे करणे. (कालावधी ३ महिने) | रू.९.९० लाख |
| टि–०७२ /२०२४–२५ | ३३/११ के.व्ही.उपकेंद्र करकंब ता.पंढरपूर, जि.सोलापूर येथील स्थापत्य दुरूस्तीची कामे करणे. (कालावधी ३ महिने) | रू.९.९९ लाख |
| टि–०७३ /२०२४–२५ | ३३/११ के.व्ही.उपकेंद्र सांगोला शहर पंढरपूर रोड ता.सांगोला, जि.सोलापूर येथील स्थापत्य दुरूस्तीची कामे करणे. (कालावधी ३ महिने) | रू.९.९९ लाख |
| टि–०७४ /२०२४–२५ | ३३/११ के.व्ही.उपकेंद्र वाडेगाव ता.पंढरपूर, जि.सोलापूर येथील स्थापत्य दुरूस्तीची कामे करणे. (कालावधी ३ महिने) | रू.९.९९ लाख |

ई– निविदा विक्रीचा कालावधी दि. ०८.०३.२०२५ ते दि. १४.०३.२०२५ रोजी दुपारी १२.०० वाजेपर्यंत असून ई– निविदा सादर करण्याची अंतिम तारीख दि. १४.०३.२०२५ रोजी दुपारी १५.०० वाजेपर्यंत आहे. ई–निविदा, बयाणा रक्कम ऑनलाईन भरून सर्व तपशिलासह व विहीत नमुन्यात सादर करावी. सविस्तर निविदा महावितरणच्या https://etender.mahadiscom.in/eatApp या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. संपर्क : कार्यकारी अभियंता (स्था), बारामती. मो.७८७५७६८५५५. निविदेची मुदतवाढ झाल्यास वर्तमानपत्रात जाहिरात दिली जाणार नाही. संबंधितानी वेबसाईटला भेट देऊन लक्ष दयावे.मागविलेल्या निविदा कोणत्याही स्तरावर कोणतेही कारण न देता रदद् करण्याचे अधिकार निम्नस्वाक्षरी दारानी राखुन ठेवलेले आहेत.

**कार्यकारी अभियंता (स्था),**
**स्थापत्य विभाग, बारामती.**

PRO/ 214/ 2024-25

---

**महाळुंग-श्रीपूर नगरपंचायत**
**बांधकाम विभाग**
**जाहिर प्रसिध्दिकरण**

जा.क्र. बांधकाम विभाग - १७२/२०२५ दि. ०६/०२/२०२५

**विषय - सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दरसुचित नसलेले दर मंजुरीकरीता सादर करणेबाबत...**

महाळूंग श्रीपूर नगरपंचायत हद्दीतील श्री. यमाई देवी मंदिर परिसर सुशोभिकरण करणे. या कामाचे अंदाजपत्रक तयार करणेसाठी खालील बाबींचे Non-DSR दर मागविणेत येत आहेत.

१) स्टोन फ्लोरिंग - ९" X ९"
२) दगडी कमाण बांधकाम इ. कामे

तरी वरील नमुद बाबींचे दर सबंधित एजन्सी यांनी महाळुंग श्रीपूर नगरपंचायत कार्यालयात दि. ०६/०३/२०२५ ते दि. १०/०३/२०२५ रोजी सायं. ५.०० वा. पर्यंत सादर करावीत.

सही/-
मुख्याधिकारी
महाळुंग-श्रीपूर नगरपंचायत

---

**खरेदीपूर्व जाहीर नोटीस**

तमाम लोकांस या खरेदीपुर्व जाहीर नोटीसीने कळविणेत येते की, डिा व सब डिा सोलापूर तालुका उत्तर सोलापूर पैकी शहर सोलापूर महानगरपालिका हद्दीतील पेठ रविवार येथील येथील सि.स.नं. ९५०७/१२२ यांसी क्षेत्र ३६३.७ चौ.मी. येणेप्रमाणे वर नमुद केलेली घरजागा व त्यातील तदंगभुत वस्तुसह. व येणेजाणेचे वहिवाटीचे हक्कासह. ही मिळकत तुकाराम अंबादास मिड्डा यांचे मालकीचे व कब्जे वहिवाटीचे असून त्यांनी आमचे अशिलाकडून इसारापोटी कांही रक्कम स्विकारुन सदरची मिळकत विक्री करण्याचे ठरले आहे. सदर मिळकत ही निर्वेध व निजोखमी असल्याचे खात्री व हमी आमचे अशिलांस दिलेली आहे.

सबब या खरेदीपुर्व जाहीर नोटीसीव्दारे कळविण्यात येते की, वर नमुद मिळकतीवर कोणाचेही कसल्याही प्रकारचे गहाण, दान, लिज, भाडे, लिव्ह ॲण्ड लायसेन्स, बक्षीस, साठेखत, खरेदीखत, पोटगी, टाच, जप्ती, या व इतर अन्य कोणत्याही स्वरुपाचे बोजा, हक्क व हितसंबंध असल्यास अथवा सदर मिळकतीसंबंधी कोणाचेही कोणत्याही न्यायालयात वाद विषय प्रलंबित असल्यास त्यांनी प्रस्तुतची नोटीस प्रसिध्द झालेपासून ५ (पाच) दिवसांचे आत आम्हांस खालील नमुद पत्त्यावर लेखी कागदोपत्री पुराव्यानिशी वैध हरकती नोंदवावीत. मुदतीत कोणाचेही कसलीही तक्रार व हरकत न आल्यास सदरची मिळकत ही संपुर्ण निर्वेध, निजोखमी व बिनबोजाची आहे, असे गृहीत धरुन आमचे अशिल पुढील खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील. तद्नंतर कोणाचेही हरकत आल्यास ते आमचे अशिलावर व सदर मिळकतीवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद या खरेदीपुर्व जाहीर नोटीसीने घ्यावी.

ही खरेदीपुर्व जाहिर नोटीस दिली ता.०७/०३/२०२५.

सही/-
**ॲड. गुरुदेवी रेवणसिध्द कुदरी**
८७/बी/७५, भवानी पेठ, गिताधाम
गिताधाम अपार्टमेंटच्या पाठीमागे,
सोलापूर मो.नं. ९८२३३४६३२०
अशिला तर्फे ॲडव्होकेट

---

Classifieds

**पाहिजे**

सोलापूर तसेच आसपासच्या जिल्ह्यात कॉम्प्रेसरच्या सेल्स, सर्व्हिससाठी, प्रतिनिधी हवा आहे. स्वराज न्युमॅटीक्स, सोलापूर फोन : ८३८००५०४८३

**भाड्याने देणे**

युनिक हॉस्पिटलजवळ सलग २ गाळे ऑफिस, कुरिअर, डॉक्टर, वकील, थेरपीसेंटर, एजन्सी, गोडाऊन वगैरेसाठी भाड्याने देणे. विष्णू पंपटवार-९८८१२४३६९०

दै. सोलापूर तरुण भारत मध्ये प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसारच प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही मजकुराच्या सत्यतेबाबत दै. सोलापूर तरुण भारत हमी घेऊ शकत नाही, याची वाचकांनी नोंद घ्यावी.

---

**सोलापूर महानगरपालिका, सोलापूर**
**इंद्रभुवन' डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, रेल्वे लाईन्स, सोलापूर ४१३ ००१.**
**उपायुक्त (कर) कार्यालय**

जा.क्र./मा.क.वि./नोटीस/२०३२ दि.७/०३/२०२५

**-: जाहीर नोटीस :-**

**खुल्या जागेच्या मिळकतीची थकबाकी असलेल्या मिळकतीच्या जप्तीची जाहीर नोटीस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसूची ड प्रकरण ८ नियम ४२ प्रमाणे नोटीस**

सोलापूर महानगरपालिका, सोलापूर शहर व हद्दवाढ विभागातील मिळकतदारांना सन २०२४-२५ ची मिळकत कराच्या देयकाची रक्कम भरणे व तसेच ज्या मिळकतदारांना कराची देयके प्राप्त न झाल्यास महानगरपालिकेकडून मालमत्ता कर विभागकडे संपर्क साधून त्यांच्या देयकातील थकबाकीसह संपूर्ण कराची रक्कम भरणेबाबत वेळोवेळी जाहिर आवाहन करण्यात आलेले होते.

खालील नमूद मिळकतदारांनी सोलापूर महानगरपालिकेमध्ये कराचा भरणा केलेला नाही. यास महिती व्हावी कि, मिळकतकराच्या मागील थकबाकीसह ३१/०३/२०२५ अखेर मुदतीपर्यंत खालील रकान्यात दर्शविलेली महानगरपालिका मिळकत कराची रक्कम येणे आहे. सदर रकमेमध्ये दरमहा शेकडा २% प्रमाणे आकरण्यात आलेल्या शास्तीचाही समावेश आहे. या महानगरपालिका कराचे थकबाकीसाठी तुमची मिळकत या नोटीसीव्दारे जप्त करण्यात येईल याची समज देण्यात येत आहे. ही नोटीस प्रसिध्द झालेपासून १५ दिवसाचे आत थकबाकीसह सर्व रक्कम सोलापूर महानगरपालिकेमध्ये तुमचेकडून भरली गेली नाही तर वर नमूद केल्याप्रमाणे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसूची ड प्रकरण ८ नियम ४२ अन्वये जप्त करण्यात येणाऱ्या मिळकतीचा जाहीर लिलाव करुन मिळकत कराची रक्कम वसूल केली जाईल. जाहीर लिलाव करणेपुर्वी सदर मिळकतीच्या ७/१२ उताऱ्यावर / मिळकत पत्रिकेवर महानगरपालिकेचा बोजा चढविणेची कारवाई करणेत येणार आहे, याची कृपया नोंद घ्यावी.

| अ. क्र. | मिळकत क्रमांक | मिळकत धारकाचे नांव | मिळकतीचा पत्ता | थकबाकीची एकूण रक्कम रु. |
|---|---|---|---|---|
| १ | १७३४८० | शरणव्वा कोदावल पापमंडल | सि.स.नं.६८६५, घ.नं. ६८४, उत्तर सदर बझार | ८,२८,७८८/- |
| २ | १७३३०७ | शंकुतलाबाई सुदाम बुधडकर | सि.स.नं.६७५७, घ.नं.५७, उत्तर सदर बझार | ७,०८,९११/- |
| ३ | १७३३४८ | चंदुसिंग किसनसिंग मनसावाले | सि.स.नं.४६२९, घ.नं. ४६२९, उत्तर सदर बझार | ७,१५,५५७/- |
| ४ | १७४६३५ | गेन्टॅल चित्र मंदिर | सि.स.नं.५४७, प्लॉ.नं. ५१/८अ, उत्तर सदर बझार | ७,२४,८२३/- |
| ५ | २००३४३ | नसेमन फिरोजशहा श्रॉफ | ६८ रेल्वे लाईन | ४,५३,३९९/- |
| ६ | २०११२२ | नईमबेगम अ.मन्नान बेसकर . | १६३/६ रेल्वे लाईन | ३,४८,६६२/- |
| ७ | २०११३० | रतन किसनसिंग मन्सावाले | ८४०१/२/४/१६५ रेल्वे लाईन | २,८७,५७३/- |
| ८ | २०३७३४ | व्ही.जे. कनाळे, ॲग्रो फायनान्स | रेल्वे लाईन | ६,१५,१०५/- |
| ९ | ०४०३३६ | बाबुराव नरहरी खंडाळकर | ७२/७३ बुधवार पेठ | ६,८२,३७०/- |
| १० | ०४०३२६ | ब्रम्हा मुकरी | ६६/६७ अ, बुधवार पेठ | ५,६८,६२४/- |
| ११ | ०४१००२ | सिद्राम गेनु पवार | १९०/४०अ, बुधवार पेठ | ३,८८,३९२/- |
| १२ | ५७७७०५ | श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण मंडळ, एस.एच. नवले | सि.स.नं.१२०/१, बाळे | ९,७०,१६३/- |
| १३ | ५६८८८४ | मंगल भिमाशंकर तडवळकर | सि.स.नं.३५७/२अ, सोरेगांव | ४,६४,५२४/- |
| १४ | ६९१२५४५ | व्यंवकटेश पापय्या येदूरे | स.नं.२६/१२६/२, प्रतापनगर | ३,८८,८१०/- |
| १५ | ५३०२८० | बसवेश्वर व शिवशंकर बाबुराव चोतवे | १९६, गावठाण | २,००,४८८/- |
| १६ | ०७०४३६ | अंजय्या हणमंतु कोंगारी | ३४९/२ पूर्व मंगळवार पेठ | ५,८९,९५६/- |
| १७ | ०७०७६४ | फकीर अहमद म. शरीफ नाडीवाले | ६६७अ, पूर्व मंगळवार पेठ | २,५८,७८३/- |
| १८ | ०६०८६७ | मनोहर नेमिचंद गुलेच्छा | सि.स.नं.२८७९, घ.नं.७४७पश्चिम मंगळवार पेठ | ४,६७,२१९/- |
| १९ | ०६०६३६ | राच्छव्वाबाई बाबय्या स्वामी | सि.स.नं.२६८८/अ, घ.क्र.५४६ पश्चिम मंगळवार पेठ | ३,१९,३५०/- |
| २० | ०६०२९२ | विठठलदार हणमंतराव अट्टल | सि.स.नं. २३७८, घ.क्र.२२२ पश्चिम मंगळवार पेठ | ३,८८,३४१/- |
| २१ | ०२१२१० | सिध्देश्वर इन्व्हेसमेंट प्रा.लि. | गोल्ड फिंच पेठ | १०,७०,६६९/- |
| २२ | ३०२२११ | कमलाबाई उडपी | १६४ इंदिरानगर, विजापूर रोड | ५,२०,२४२/- |
| २३ | ३०११७४ | वालाबाई गंगाराम जाधव | नेहरुनगर, विजापूर रोड | ४,०५,६५२/- |
| २४ | २९०६५२ | छूनेश हरेश रामचंदानी | २७३/९३, अंत्रोळीकर नगर, होटगी रोड | ३,४३,९४३/- |
| २५ | १६४०७२ | माणिक रुकप्पा संगबाळ | स.नं.१०३८५/३० ६७५ कर्णिक नगर पाच्छा पेठ | ८,२८,३८३/- |
| २६ | १६०७८२ | अब्दुल करीम पीरसो शेख | स.नं.१०३७३/१३० ३५३/१२ अ पाच्छा पेठ | ५,३१,६१६/- |
| २७ | १६११३९ | बारम्माबाई नागनाथ मुदगल व इतर-१ | स.स.१०३८९/२८, ४८९ पाच्छा पेठ | ४,८२,२७१/- |
| २८ | १६८५४६ | अंजन नारायण गंगशेट्टी | स.नं.१०३८९/अ,३५/३३२ अनुष्का अर्पा. गाळा.नं.१ पाच्छा पेठ | ४,७७,७५५/- |
| २९ | १६१२०९ | सुगलाबाई अण्णाराव जावळे | स.नं.१०३८९/७३ ३७/७३ पाच्छा पेठ | ४,३०,८५०/- |
| ३० | १६११८२ | सखुबाई शामराव पाथरुट | स.न.१०३८९/५९ ५०९ ब, पाच्छा पेठ | ३,६०,७४३/- |
| ३१ | १६९१४५ | अमोल जयप्रकाश सोनकवडे | स.नं.१०३८४/२९/अ/७ पद्मनगर, पाच्छा पेठ | ३,८३,६८५/- |
| ३२ | १३१७८० | विजयकुमार विष्णुकुमार नारायण | स.नं.९६६४/४७२ घ. नं २२६ रविवार पेठ | ६,७३,९४३/- |
| ३३ | १३०२५९ | मुत्तय्या चंद्रय्या इराबत्ती | स.नं.९६९८. घ.क्र.१४/२९ रविवार पेठ | ३,९७,७८८/- |
| ३४ | १३१४१० | पार्वतीबाई ब. लक्ष्मण वडार | स.नं.९५०७/२८ घ.क्र.६५/१३ रविवार पेठ | ३,५८,८८६/- |
| ३५ | १३२३०६ | बापू शिवराम जाधव | टिपी ०१/०९/१९८ २६७/१९८, रविवार पेठ | ३,२२,१८३/- |
| ३६ | ६०२६५५ | ईक्बालहुसेन रियासतअली खान | स.नं.११/१/अ/७/पै घ. क्र.७ सद्गुरु नगर, मजरेवाडी | ४,१७,७६४/- |
| ३७ | ०३०७५१ | मकबुल सलामसो शेख | स.नं.१४५१ घ.क्र.६०७, ६०९, ६११, उत्तर कसबा | ३,३४,०७५/- |
| ३८ | ०३०५३१ | कुशाबा तायप्पा जाधव | स.नं.१२६१ घ.क्र.४१४ उत्तर कसबा | ३,१०,९३७/- |
| ३९ | ०३०७४९ | अ.जब्बार अलीशेर सय्यद | सन. १४५० घ.क्र. ६०५ उत्तर कसबा | २,९३,२३२/- |
| ४० | २३०२१६ | सुभाष संभाजी निकम | १ ते ५/३जी मुरारजी पेठ | ७,३४,०३३/- |
| ४१ | २३६३३७ | साईप्रसाद फुडस् लि. तर्फे तेली संजय रॉय | ९९ ए-बी, ६ वा मजला सिटी कॉर्नर, मुरारजी पेठ | ६,९८,०२९/- |
| ४२ | २३४५५० | सोलापूर जिल्हा हायस्कुल, सुरेश रामचंद्र पाटिल | १२४/२०/१ जुनी पोलिस लाईन, मुरारजी पेठ | ७,६१,६००/- |
| ४३ | ०१०२९५ | मुस्तफा अ.मजिद बेपारी | २५२ अ दक्षिण कसबा | ३,२२,०८५/- |
| ४४ | ०१०२९६ | गुलामगौस दगडूभाई कुरेशी | २५२ ब, दक्षिण कसबा | २,५७,८१९/- |
| ४५ | ५१२१९५ | म. शकूर अब्दुला बागवान | ८३/१, मित्र नगर, शेळगी | १,४७,५८८/- |
| ४६ | ५१४०६३ | सुरेश बसय्या स्वामी | १३-अ, नटराज नगर, शेळगी | १,४४,८७९/- |
| ४७ | १४०४९६ | शिवानंद सिध्दप्पा अलमेलकर | ४६४, शुक्रवार पेठ | ३,३१,०७२/- |
| ४८ | १४०४७६ | अशोक देविदास बोबडे | ४३६, ४३६-अ,४७९/१, शुक्रवार पेठ | ५,४७,३४७/- |
| ४९ | १२१०८१ | देविदास लछमय्या बोल्ली, नागनाथ, रमेश | २८८, तळघर २,४,१ ग्राउंड फ्लोअर, २,४ साखर पेठ | ३,५२,१७१/- |
| ५० | १२०७७३ | नागप्पा बाळप्पा मुटकिरी | ५२४ साखर पेठ | ३,२७,५८९/- |

सही/-
**(आशिष सुधाकरराव लोकरे)**
**उपायुक्त**
**मालमत्ता कर विभाग**
**सोलापूर महानगरपालिका**



# महिला दिन विशेष

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/
शनिवार, ८ मार्च २०२५

## सखी


सखी. तुझ्याबद्दल काय लिहिणार आणि लिहिलं तरी वर्णन रुपी शब्द तरी किती पुरणार. आज ८ मार्च जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने सर्व महिला वर्गास प्रथम हार्दिक शुभेच्छा. ८ मार्च रोजी साजरा होणारा आंतरराष्ट्रीय महिला दिन महिलांच्या कामगिरीचा आणि समानतेसाठी सुरू असलेल्या संघर्षांचा सन्मान करतो १९०० च्या दशकाच्या सुरुवातीला सुरू झालेला हा दिवस एक जागतिक कार्यक्रम बनला.

**स्त्री जन्मा तुझी कहाणी हृदयी पान्हा नयनी पाणी**
**स्त्री म्हणजे ईश्वर व आत्मा यांचे मिलन**

स्त्रीची विश्वाला व्यापून राहिलेली अनेक रूपे आहेत, १९ व्या शतकातील दुर्लक्षित असलेली आणि २१ व्या शतकातील आजची स्त्री यामध्ये पाहिलं तर आज स्त्री ने घेतलेली एक उत्तुंग गगनभरारी दिसून येते. आज कोणतेही क्षेत्र असूद्या तिथे पुरुषाच्या खांद्याला खांदा लावून कष्ट करताना महिला दिसत आहेत. मोल मंजूर असो जवान, वैज्ञानिक, पायलट, रेल्वे ड्राइव्हर किंवा कोणतेही स्थान असे दिसणार नाही की जिथे महिला पोहचू शकली नाही. जिथे तिथे सध्या महिला अग्रस्थानीच आहेत. बालपणा पासून घडवणारी आणि संस्कार करणारी ही माताच असते. याप्रमाणे माता जिजाऊ नसत्या तर शिवबा ही घडले नसते त्याप्रमाणे आजच्या ही युगात प्रत्येक स्त्री जिजाऊ च्या रुपात आपला बाल शिवबा घडवतच आहे. स्त्री नसती तर हे एक वाक्यच आपल्याला सर्व काही विस्तार पूर्वक डोळ्यासमोर चित्रपटच दाखवून जाईल...वर्णन करण्या इतपत खरच आपण पात्र नाही. पण एकाच लेखात बसण्या इतपत स्त्री छोटी ही नाहीच. आपण समाजात वावरत असताना प्रत्येकाने स्त्रीचा आदर तर केलाच पाहिजे पण शिवरायांच्या राज्यात ज्या प्रमाणे स्त्रीला सुरक्षित असल्याचे जाणवत होते तीच सुरक्षितता आजच्या युगात जेव्हा मिळेल तेव्हा खरी स्त्री सुरक्षित होईल. यासाठी प्रत्येकाने आपल्या मुलांवर लहानपणी पासूनच जिजाऊ माता यांचे संस्कार आणि सोबत बाल शिवबा घडवावा लागेल तेव्हा कुठे विकृती जन्माला यायच्या बंद होतील हेही तितकेच सत्य आहे. पण आज मात्र बालवयात इतिहास न समजावता न सांगता मुल शांत होत नाही म्हणून मुलाच्या हातात मोबाईल देऊन कर्तव्य झटकून मोकळे होणे ही खरी आजची शोकांतिका आहे..इथपासून सुरुवात करण्याची गरज आज आपल्या समाजाला आहे आणि हे जेव्हा होईल तेव्हा खरा समाज बदलेल.

**- शब्दांकन : विनायक कासार,**
माढा, ७०२०२०५२९४.

## शक्तीरुपा...तुज वंदन...




हे शक्तिरूपा तुज वंदन आणि अभिवादन. ८ मार्च महिला दिन २०२५... या दिनी तुझ्याकडून महाराष्ट्राला एक अश्वासनही हवे आहे. पुढच्या पिढीसाठी तू आदर्श घडवण्याचे चोख काम बजावशीलच ८ मार्च आज महिला दिनाचे औचित्य साधून. परमेश्वराची सर्वात सुंदर रचना असणाऱ्या सर्व महिला भगिनींना महिला दिनाच्या शुभेच्छा देऊ तर इच्छीते. पण देऊ की नको मी असे का म्हणतेय बरे.. कारण जर आपल्या भारतीय संस्कृतीचा विचार केला तर असंख्य आदर्श माता, भगिनी, पत्नी, स्नुषा आहेत ज्या आपल्याला वंदनीय आहेत. राजमाता माँ जिजाऊँ, राणी लक्ष्मीबाई, राजाराम महाराजांच्या धिरोदात्त शूर रणरागिणी ताराराणी महाराज साहेब. किती नावे घेऊ.. माझी लेखणी अपुरी पडेल संत मीराबाई, संत जनाबाई, मुक्ताई, बाळ संत कान्होपात्रा,लेखिका शांता शेळके, शोभा डे, बहिणाबाई चौधरी, राजकिय वर्तुळातील स्वर्गीय पतंप्रधान दिवंगत इंदिरा गांधी, सुषमा स्वराजजी, माजी राष्ट्रपती प्रतिभा पाटील, विद्यमान राष्ट्रपती द्रोपदी मुर्मू, मनिषा म्हैसकर, किरण बेदी आणि खूप खूप वंदनीय भारतीय महिला. या सर्व जणींना आज महिला दिनी सादर वंदन करून एक सवाल विचारते? आपल्या स्वतंत्र, महासत्ता होऊ इच्छिणाऱ्या भारतात महिला भगिनी स्वतंत्र आहेत? नाही म्हणायला हरकत नाही पण माझा माझ्या संस्कृतीवर विश्वास आहे म्हणून जरा थांबते. जबाबदाऱ्यांचे ओझे खांद्यावर घेऊन महिला प्रत्येक क्षेत्रात कार्यरत आहेत. तरी पण भारत सरकार त्यांना १०० टक्के सुरक्षितता देऊ शकत नाही. यात सरकारचा दोष नाही कारण हा संस्कारांचा दोष आहे.

आईच्या उदरातून जन्म घेणाऱ्या प्रत्येक मुलाला आया बहिणींची इज्ज़त करायला शिकवणे कुठेतरी कमी पडत आहे. लहान लेकरापासून ते ८० वर्षांच्या आजीपर्यंत कायदा आणि सुव्यवस्था कार्य करीत असताना आपल्या माता भगिनी सुरक्षित नाहीत. शिवरायांचे काळात हिरकणीचा गडउतार करून धाडस दाखविल्याबद्दल चोळी बांगडी देऊन सन्मान केला जायचा. आज कुठे गेला तो संस्कार. महाराष्ट्राला आता संस्कारांची गर्भसंस्कारापासूनच गरज आहे असे मला वाटते. परकीय लोक आपल्या संस्कृतीचे अनुकरण आणि मनावर संस्करण करत आहेत आणि आपण भारतीय आपले संस्कार विसरत तर नाही ना चाललो. केशभुषा, वेशभुषा आणि खादय संस्कृती यांची विलासिता थांबून पूर्वीचेच अवलंबन करण्याची गरज आहे असे मला वाटते. फॅशन अधुनिकीकरण बिभत्स चाळे करा म्हणत नाही, लज्जा रक्षणासाठी वस्त्र निर्मिती की कमी तोकडे कपडे घालण्यासाठी नवनिर्मिती तेच आताशा कळेनासे झाले आहे.

सायंकाळी शुभंकरोती म्हणण्याचे संस्कार देणाऱ्या महाराष्ट्रातील इंग्रजी शाळेत स्नेहसंमेलनामध्ये चित्रपटातील नृत्याचे अनुकरण करत आज की रात वर नृत्य करणारी प्राथमिक स्तरावर शिकणारी भावी पिढी जीच्या हाती आहे ती भारतीय नारी कुठे जाणार आहे आपण. माँ साहेबांनी जिजाऊँ राणी साहेबांनी देवी शिवाईला नवस मागून आयाबायांची रक्षा करण्यासाठी शिवबा सारखा मुलगा मागून घेतला. आज महिला दिनी एकच सांगणे आहे, आपल्या मुलाला स्त्रीच्या इज्ज़तीची रक्षा आणि आदर करण्याचा संस्कार दया, म्हणजे पुण्याच्या संस्कृतीवर गालबोट लागणार नाही. दिल्लीतील निर्भया प्रकरण परत परत घडणार नाही. आयटी कंपनीमध्ये काम करणाऱ्या माझ्या लेकी बहिणी कलकत्त्याची डॉक्टर भगिनी निर्भीड पणे काम करतील. रात्रीसुद्धा सुरक्षित रस्त्यावर प्रवास करू शकतील असा आपला देश आपला महाराष्ट्र हिंदुस्तान घडविण्यास आपण महिलांनीच महिला दिनी कटीबद्ध झाले पाहिजे. तरच भारत महासत्ता होण्यात आपले योगदान राहील. नाहीतर महासत्ता भारत दुःशासना सारख्या रावणा सारख्या असुरांच्या हाती न देता प्रभु श्री रामांनी जसा शिळेवत झालेल्या अहिल्येचा उद्धार केला तसा आताच्या मुलांमध्ये तरुण पिढी मध्ये राम लक्ष्मण घडवू याचे आश्वासन आपणच आपल्या मायभूला दिले पाहिजे. मगच या ओळी सार्थ होतील.

**विक्रम वैराग्य एक जागी नांदती,**
**जरी पटका भगवा झेंडाही डोलती**
**जय जिजाऊ जय शिवराय ।।**

**- डॉ. दीपांजली माने-पाटील,**
अध्यक्ष, आदीशक्ती फाऊंडेशन, धाराशिव / ७३८५३०१०१२

### आपण आपल्या मुलांना खालील गोष्टी बंधन कारक करू शकतोच

- रामदासांचे श्लोक अर्थासह पठण करणे
- योग आणि सूर्यनमस्कार बंधनकारक करणे
- व्यसनांपासून दूरी
- तोकड्या कपड्यांना मनाई
- पब बार संस्कृती बंद
- सात च्या आत मुले घरात
- रोजगार संधी
- दारूबंदी
- दुग्ध विक्री आणि खरेदी माफक दरात
- मर्यादित मांसाहार
- शाकाहाराला प्राधान्य
- वेद संस्कृती आणि तत्वज्ञानावर आधारीत अध्यापन व अध्ययन यांना प्राधान्य
- निसर्गसंरक्षण
- देशाभिमान आणि क्रिडेविषयी संस्कृती विषयी निष्ठा
- मोठ्यांचा आदर
- सुविद्य आणि सदाचारी तरुण घडविण्याचा संकल्प घेणे.
- तरच आजचा महिला दिन आपण साजरा केला असे होईल आणि सावित्रीच्या लेकींना ताठ मानेने जगता येईल.

## विद्यापीठातील सामाजिक एकतेचा संदेश

### ▸▸निलोफर बागवान यांचा गणशोत्सव, नवरात्रोत्सोवात राहतो उत्स्फूर्त सहभाग

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातील मुस्लिम महिला कर्मचारी निलोफर बागवान यांचा विद्यापीठातील गणेशोत्सव असो अथवा सोलापूर शहरातील नवरात्र उत्सव असो यामध्ये त्यांचा उत्स्फूर्त सहभाग राहतो. विद्यापीठात विद्यार्थी व कर्मचारी यांच्याकडून साजरा होणाऱ्या गणेशोत्सव काळात त्या दररोज गणपती मंडपासमोर रांगोळीची सेवा स्वयस्फूर्तीने बजावतात. त्याचबरोबर शहरात विविध नवरात्र उत्सव मंडळाकडून आयोजित रास दांडिया, गरबा स्पर्धेत उत्स्फूर्तपणे सहभागी होतात. अनेक महत्त्वाची बक्षीसे त्यांनी पटकावली आहेत. विविध कार्यक्रमातील त्यांचा उत्साह व हिरीरीच्या सहभागाने सामाजिक एकात्मतेचा संदेश त्यांच्याकडून देताना पाहावयास मिळतो.



आज सर्वत्र जातियवाद, धर्मवादाची भाषा सुरू असताना निलोफर बागवान यास अपवाद आहेत. हिंदू-मुस्लिम काही न मानता आपण सर्वजण भारतीय आहोत, असा संदेश नेहमी त्यांच्या कृतीतून दिसून येतो. मूळच्या सातारा येथील असलेल्या निलोफर बागवान यांचा जन्म सामान्य कुटुंबात झाला. वडील मोटार मेकॅनिक असून सुद्धा त्यांना पदवी व त्यानंतर बीएड, एमए हिंदी व एमए एज्युकेशन पर्यंतचे शिक्षण त्यांनी दिले. मुस्लिम कुटुंबात जन्म जरी झाला असला तरी आजी-आजोबांच्या संस्कारामुळे सर्व-धर्म-समभवाची बीजे लहानपणीच रुजल्याचे त्या सांगतात. दिवाळीला किल्ला बनवणे असो अथवा नवरात्रीत भोंडला कार्यक्रम आणि दसऱ्याला शस्त्रांची पूजा व त्यासाठी पुरणपोळीच्या नैवेद्य त्या करीत असल्याचे सांगतात. २००४ ला त्यांचा विवाह झाला. पुढे २००८ मध्ये त्यांची पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ येथे कनिष्ठ लिपिक पदावर निवड झाली. विद्यापीठात मुलींच्या हॉस्टेलचे पहिल्या वार्डन म्हणून देखील त्यांनी काम पाहिले आहे.

लॉकडाउनमध्ये सोलापुरात असताना सातारा येथे मूळ गावी त्यांनी अडीचशे किलोमीटर एकट्या मोटरसायकलवर जाऊन आपल्या मुलाची भेट घेतली होती. २०२२-२३ पासून त्यांनी सोलापुरात घेण्यात येणाऱ्या नवरात्रीच्या विविध स्पर्धांमध्ये आपली नृत्य कला सादर करण्यास सुरुवात केली. २०२४ मध्ये त्यांना सोलापुरातील नामांकित नवरात्रोत्सव गरबा स्पर्धेत एकूण सात मानाची बक्षीसे मिळाली आहेत. यामध्ये पैठणी व सोन्याच्या नथीचा देखील समावेश आहे. त्यांच्या या सामाजिक कार्याची दखल घेत त्यांना पंढरपूर येथील राजमाता जिजाऊ, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले राज्यस्तरीय समाजभूषण पुरस्कारही प्राप्त झाला आहे. नृत्या व्यतिरिक्त त्यांना मेहंदी, चित्रकला, गायन, पाककला स्पर्धेची देखील आवड आहे. विद्यापीठाच्या तक्रार निवारण, विशेष कक्ष स्थायी समितीवर देखील त्या सदस्य म्हणून कार्यरत आहेत.

**दुबईत नृत्याविष्कार!**

अन्नपूर्णा स्वीट्स आणि एका खाजगी एफएमकडून घेण्यात आलेल्या स्पर्धेत त्या लकी ड्रॉ मधून विजेत्या ठरून त्यांना दि. २३ ते २७ फेब्रुवारी २०२५ या कालावधीत दुबई ट्रिपची संधी मिळाली. जिथे एका गावावरून दुसऱ्या गावाला जाण्यासाठी महिलांना भीती वाटते, तिथे या निलोफर बागवान या हिरकणीने आपल्या छोट्या मुलासोबत दुबईला जाऊन तिथे सर्वांसमोर नृत्याविष्काराची झलक देखील दाखवली आहे. त्यांच्या या कार्याचे सर्व स्तरातून कौतुक होताना दिसून येते.

**- राहुल वंजारे, जनसंपर्क अधिकारी**

## हाती शिवणकाम; मुखी हरिनाम

हैद्राबाद रोडवरील जुना विडी घरकुल येथे राहणाऱ्या इंदिरा विलास गड्डम यांच्या दृष्टीने कष्ट हे पाचवीला पूजल्याचे त्यांच्या आजवरच्या जीवनप्रवासाकडे पाहिले असता स्पष्ट होते. रामचंद्र विद्यालयात त्यांनी इयत्ता चौथीपर्यंत शिक्षणाचे धडे गिरविले. वयाच्या आठव्या वर्षी पितृछत्र हरपले. वयाच्या नवव्या वयापासूनच गायनाविषयी विशेष रुची. विड्या वळणे आणि शिवणकाम करता करता गायनसेवाही करतात. आता वयाच्या ५८ व्या वर्षीही 'हाती शिवणकाम, मुखी हरिनाम' असा त्यांचा दिनक्रम आहे.



भूदेवी व लक्ष्मण सिध्दम या दाम्पत्यांच्या पोटी जन्म घेतलेल्या इंदिरा गड्डम यांना दोन बहिणी, एक भाऊ. माहेरची परिस्थिती बेताची हाती. घरात वीज नव्हते. त्यामुळे चिमणीच्या प्रकाशात अभ्यास करावे लागायचे. अभ्यासात हुशार आणि आदर्श विद्यार्थिनी म्हणून शाळेत त्यांची ओळख होती. लहानपणीच वडिल वारल्याने त्यांना शाळा सोडावे लागले आणि बहिणी, भावाबरोबर आईला मदत करावे लागायचे. विड्या वळण्याचे काम शिकून घेतल्या. त्या शेंडपळ असल्याने आई, बहीण, भाऊ त्यांचे लाड करायचे.

कालांतराने राधाबाई व अंबादास गड्डम यांचे चिरंजीव विलास गड्डम यांच्याशी त्या विवाहबध्द झाल्या. त्याच्या लग्नाला सुमारे ४२ वर्षे झालीत. इंदिरा व विलास गड्डम यांच्या पोटी दोन मुले, एक मुलगी जन्मले. गिरीष, महेश हे मुले, अपर्णा ही मुलगी तर अश्विनी ह्या थोरली सून. त्यांना नातवंडे असून नातवंडे शिकून सवरुन नावलौकिक कमवावीत, या जिद्दीने त्या आलेल्या प्रत्येक प्रसंगाला सामोरे जात असतात. 'संसाराची नौका' तारुण नेण्याकरिता त्या शिवणकामात स्वत:ला जुंपुन घेतात.

त्यांच्या माहेरच्या शेजारी असलेले कै. ओंकार तुकाराम हे संवादिनी व गायन प्रकटीस करत असत. त्यांचा सराव कानी पडताच इंदिरा गड्डम ह्या त्यांच्याकडे जावून एकाग्र चित्ताने ग्रहण करायच्या. यातूनच त्यांना लग्नापुर्वी म्हणजे वयाच्या नवव्या वर्षी गायनाविषयी गोडी निर्माण झाली. त्यांच्या गायनकलेला पतीसह कुटुंबियांचा सुरुवातीच्या काळात विरोध होता. मात्र, गायनसेवा म्हणजे 'जीव की प्राण' या ध्येयाने प्रेरित झालेल्या इंदिरा गड्डम यांनी गायनसेवेत कधी खंड पडू दिला नाही. त्यांचे चुलत मामा गोपाळ गड्डम यांच्याकडे दरवर्षी गुरुपूजा केली जाते. अशाच एका गुरुपूजेच्या दिवशी त्या जाहीरपणे गायनसेवेचा श्रीगणेशा केला. मराठी, तेलुगु, हिंदी भक्ती व भावगीते गायनासंदर्भात त्यांची पूर्वभागात ख्याती आहे. त्यांचा आवाज गोड-मधूर असल्याने भरभरून प्रतिसाद मिळत असतो. गोकुल कृष्णा, गोपाल कृष्णा मायलु चालय्या... सावळ्या विठ्ठला, तुझे रे मला वेड लागले... मेरी झोपडीके बाग आज पुल जायेंगे, राम आयेंगे... यांसारखी गाणी त्यांच्या आवाजात ऐकणे जणू पर्वणीच असते. राईनैना काकापोतीनी, राम पादमु सोकागा. हे तेलुगू गीत आपल्या जीवनाशी निगडित आहे की काय? असे वाटत असल्याचे त्या आवर्जून सांगतात.

**- प्रतिनिधी**

## कथा उज्वल जिद्दीची

बाई म्हणजे चूल आणि मूल ही म्हण आज कालबाह्य झाली आहे, बदलत्या परिस्थितीत सर्वच क्षेत्रात महिलांनी झेप घेतली आहे,पुरुषांच्या बरोबरीने महिला ह्या कार्यरत आहेत. स्त्री व पुरुष ही संसाराची दोन चाके आहेत,असे म्हटले जात होते, ते आज अनुभवास येत आहे. आज समाजाच्या कोणत्याही क्षेत्रात गेल्यावर स्त्री शक्तीचे व त्यांच्या कर्तृत्वाचे दर्शन होते.लगेच कर्तृत्व डोळ्यात भरेल अशा पद्धतीने महिला विविध प्रकारची कामे करीत आहेत.त्या अनेकांपैकी एक नाव म्हणजे सौ.उज्वला निलेश यादव(माहेरचे नाव : उज्वला विठ्ठल मस्के) हे होय.शिक्षण एचएससी डीएड इतके झालेले असतानासुद्धा त्यांनी शिक्षकीपेशा स्विकारण्याऐवजी जरा हटके काही तरी करण्यासाठी स्कूल व्हॅन चालविण्याचा निर्णय घेतला,आज त्यांचा आत्मविश्वास प्रचंड वाढला असून त्यांनी चांगला जम बसविला आहे.जवळपास चाळीस शाळकरी मुलांची ने-आण करण्यासाठी त्यांना व्हॅनने दररोज १०४ किलोमीटरचा प्रवास करावा लागतो, त्यासाठी त्यांचा दररोजचा दिवस पहाटे साडेचार वाजता सुरू होतो,घरातील चौघांचा स्वयंपाक व इतर कामे करून त्या सकाळी पावणे सात वाजता घर सोडतात आणि शाळेच्या सर्व वरद्या पूर्ण करून सायंकाळी पाच वाजता घरी परततात. दरम्यानच्या काळात त्यांना वेळ मिळेल तेथे नाश्ता व जेवण करावे लागते.या कामात कसलाच कंटाळा येत नाही उलट मुलांच्या सहवासामुळे दिवस कसा जातो कळत नाही, हे त्या आनंदाने सांगतात.पती निलेश व सासूबाई मंगल यांच्या पाठिंबा,प्रेरणा व प्रोत्साहनामुळे आपण आपले दैनंदिन काम अधिक चांगल्या प्रकारे करु शकलो, हे त्यांनी निदर्शनास आणून दिले व वाहतूक संघटनेचे अध्यक्ष संतोष जाधव यांचेही सतत मार्गदर्शन व सहकार्य मिळत असते.या कामातून आपणास दर महिन्याला चाळीस हजार रुपये उत्पन्न मिळते,त्यामुळे संसाराला हातभार तर लागतोच त्याचबरोबर दोन्ही मुलांना उच्च शिक्षण दिल्याचा आनंद मिळत असल्याचे त्यांनी सांगितले,त्यावेळी त्यांच्या चेहऱ्यावर आनंद व समाधान ओसंडून वहात होता. तुळजापुर तालुक्यातील सलगरा (मड्डी) हे त्यांचे माहेर.निवृत्त विठ्ठल गोविंद मस्के यांच्या त्या कन्या.ते शंकरराव आष्टे प्रशाला, भुरीकवठे (ता.अक्कलकोट) येथे ते मुख्याध्यापक होते. सासरे कै.भगवानराव यादव हे एमएसईबीमध्ये होते तर सासुबाई मंगल ह्या गृहिणी आहेत. पती निलेश भगवान यादव यांचा व्यवसाय स्कूल व्हॅनचा आहे. त्यांना दोन मुले आहेत. कु.साक्षी यादव ही कॉम्प्युटर इंजीनियरिंगच्या सेकंड इयरला तर मुलगा सुयश निलेश यादव हा इलेक्ट्रॉनिक डिप्लोमा सेकंड ईयरला आहे. सौ.उज्वला ह्या सांगतात की, मी २०१६ पासून स्कुल बस चालवते,पतीच्या व्यवसायाला जॉईन झाले. सुरवातीला श्री सिद्धेश्वर वुमन्स पॉलिटेक्निकल,ऑर्चिड कॉलेज,सेंट जोसेफ स्कुल, श्री सिद्धेश्वर प्रशाला सोलापूर,या शाळेसाठी वर्दी करत होते,आता इंडियन मॉडल स्कुल,मॉडेल पब्लिक स्कूल,इंडियन मॉडेल इंटरनॅशनल स्कूल नागेश करजगी ऑर्किड स्कूलसाठी करते.त्यांच्या उच्च शिक्षणासाठी माझ्या उत्पनातून चांगला हातभार लागतो,याचे विशेष समाधान मिळत असल्याचे त्यांनी नमूद केले. या सेवेत पैशापेक्षा आनंद व समाधान फार मिळते व दुसरा व्यवसाय करावासा वाटत नाही,असे एका प्रश्नाला उज्वला यादव म्हणाल्या की,रोजच्या भेटीमुळे व चर्चेमुळे मला लहान मुलांचा फार लळा लागला आहे.माझ्या वर्दीतील मुलांचा वाढदिवस मी व्हॅनमध्येच साजरा करते,माझ्या व्यवसाय मूळचा पेशा शिक्षकी असल्यामुळे विद्यार्थ्यांचा अभ्यास व कविता पाठ करून घेत असते.मला आंटी,आंटी म्हणून मुलेही फार प्रेम देत असतात.आज अनेक मुले व त्यांच्या पालकांशी कौटुंबिक नाते निर्माण झाले आहे,त्यामुळे अनेक पालकांच्या घरगुती कार्यक्रमाचे मला आवर्जून निमंत्रण असते.आम्हा पती-पत्नीच्या या व्यवसायामुळे आमच्याकडे एक व्हॅन व दोन विंगर आहेत. सुट्टीच्या कालावधीत छोट्या घरगुती सहली घेवून जात असतो. सौ. उज्वला यादव यांचा संपर्क : ९७६७२८४०३२



**- संपादन : दशरथ वडतिले,**मो. ९४२२४५७१००



## 'मातृशक्ती' म्हणजे स्त्रीशक्तीचा सन्मान!

यत्र नार्यस्तु पूज्यते ,रमन्ते तत्र देवता । या पवित्र भावनेस केंद्रस्थानी ठेवून वरिष्ठ लेखक अनुवादक महर्षी डॉ.जी. एन. काळे यांनी , ' मातृशक्ती ' हे पुस्तक हिंदितुन लिहिले आहे. या पुस्तकामागे त्यांचा २५ वर्षाचा शोध अभ्यास आहे. वैदिक काळापासून मध्ययुग ते थेट वर्तमान काळात भारतात ज्या महान महिलांनी आपले नाव काळाच्या पडद्यावर सुवर्णाक्षरांनी कोरले त्यांची ही यशोगाथा आहे. लेखकाच्या संग्रहात २००० हून अधिक पुस्तके आहेत. त्याचाच लेखन हा एक परिपाक म्हणावा लागेल . प्रस्तुत पुस्तकात ब्रम्हांडाची उत्पत्ती आदिशक्ती द्वारा कशी होते.ब्रह्मा, विष्णू ,महेश यांचा जन्म त्यांचे कार्यक्षेत्र, सरस्वती- लक्ष्मी- दुर्गा यांची विविध रूपे, पंचकन्या, सप्तमातृका, श्रीकृष्णाच्या अष्ट नायिका, शक्तीपीठे, महान स्त्रीया, संत स्त्रिया , महानमाता जिजाबाई, अहिल्याबाई, सावित्रीबाई फुले यांच्या कार्याचा आढावा घेतला आहे .

विसाव्या शतकात काही विदेशी महिलांनी भारतालाच आपले घर मानले आणि त्यांनी भारताच्या स्वातंत्र्यासाठी सक्रिय योगदान दिले. सिस्टर निवेदिता (मार्गारेट नोबल ) मीराबेन ( मॅडलिन स्लेड ) एनी बेझंट (आयरिश लेडी) मदर टेरेसा (बेल्जियम) भारतरत्न इ. आधुनिक काळात माउंट एवरेस्ट सर करणाऱ्या अनेक तरुणी ,बिना इंजीनच्या नावेत सात समुद्र पार करणाऱ्या सहा तरुणी ,अंतरिक्षात उड्डाण घेणाऱ्या परी ऑलपीड, पॅरा आलमपिकमध्ये पदकं घेणाऱ्या, सहा विश्वसुंदरी, ३ ब्रह्मांड सुंदरी , विश्व फिल्म फेस्टिवलमध्ये जज (टीन ) खेळात नवे नवे कीर्तिमान बनवणाऱ्या मुली आहेत.शिक्षण व आयटी क्षेत्रात नाव गाजवणाऱ्याही अनेक स्त्रीया आहेत. खरे पाहिले तर असे कोणतेही क्षेत्र नाही ज्यात स्त्रीशक्तीने कमाल केली नाही. या देवी सर्व भूतेषू, शक्ती रुपेन संस्थिता, नमस्तस्ये नमस्तस्ये नमो नमः ।। भारतीय इतिहासातअनेक राण्या होऊन गेल्या झाशीची राणी लक्ष्मीबाई, गौडवण्याची राणी दुर्गावती, बुंदेलखंडची राणी अवंती, देवीची उपाधी असणाऱ्या लोकमाता अहिल्याबाई इ.होय.

मातृशक्ती या पुस्तकात संत कवयित्री मीराबाई,संत मुक्ताबाई , संत जनाबाई.. इत्यादी संत स्त्रीयांच्याविषयी गौरव केला आहे.

अमृता प्रीतम ,राजनीतीच्या क्षेत्रात विजयालक्ष्मी पंडित, सरोजिनी नायडू , भिकाजी कामा १९५० मध्ये भारतीय तिरंगा जर्मनीत फडकवला , अंतरिक्ष भरारी घेणारी कल्पना चावला, सुनीता विल्यम . क्रीडा क्षेत्रात सानिया मिर्झा, साईना नेहवाल, मेरी कोम, मिताली राज- क्रिकेट आता स्मृती मंधाना, इंग्लिश चॅनल पाहणारी आरती सहा,ट्रेन चालक, ट्रक चालक, बस चालक इत्यादी धाडसी युवतीचाही समावेश या पुस्तकात केला आहे. अप्सरा, रंभा, उर्वशी मेनका व रुपवतीं राण्यांची चित्रणं , राणी रूपमती- मांडव गुरु व राजस्थानची अनुपम सुंदरी पद्मिनी चारित्र्यवाण राणी, मुमताज महाल इ.तसेच वैदिक काळात ज्या विदुषी विश्ववरा गार्गी, मैत्री ,शारदा ,भारती, शंकराचार्य -२ महेश्वरमध्ये शास्त्रार्थ आहेत त्यांचीही चित्रं वाचनीय झाली आहेत. विमान चालक मिलेकिरीमा,असीन,अवनी, चतुर्वेदी, शिवांगी अमेरिका ते भारत ( बांगलादेश )१७ तास न थांबता विमान चालवणारी जोया आणि सहा सहयोगी महिला पायलट कोणीही पुरुष सहकार्य नसताना विमान चालवले. .इंदोरची पलक मुछाल, देश-विदेशात गायन करून धन गोळा करून ३००० मुला-मुलींच्या हृदयातल्या नलीकेतील अडथळ्यांचे ऑपरेशन करणारी युवती महत्त्वाचे कार्य करते. तसेच दरवर्षी अहिल्या उत्सवात भव्य प्रमाणात साजरा करणाऱ्या सुमित्रा महाजन! पूर्व विश्व साहित्यात पुरस्कार घेणाऱ्या अरुंधती राय,किरण देसाई, मीरा नायर, झुंपा लाहिडी, इंग्रजी भाषेसाठी .भोपाळची अंजुम परवी व संस्कृत मध्ये पी एचडी धारक सरदार पूर होत.मध्यप्रदेशची शिरीन कुरेशी, श्रीलंकेमध्ये हिंदीची प्राध्यापकेने श्री रामावर लिहिलेली लोकगीत ,भजन, सिनेमातली गाणी आहेत . कानपुरच्या २०० च्या वर संकलित प्रकाशित करणाऱ्या डॉ. माही सिद्दिकी यांनी संपूर्ण रामायण उर्दूत लिहिलेले. पार्श्वगायिका लता मंगेशकर, ३५ भाषेत गाणारी दक्षिणची लता सुब्बालक्ष्मी इत्यादी. खरे पाहिले तर डॉ.एन.जी.काळे यांचा हा ग्रंथ एक अनमोल खजिना आहे. कारण आतापर्यंत त्यांची १३६ पुस्तके , ३५० लेख मराठी, हिंदी ,इंग्रजीत संपूर्ण भारतातून प्रकाशित केले आहेत .कवी कालिदास, साने गुरुजी आदर्श शिक्षक पुरस्कार, अहिल्यारत्न, खेळात मल्हाररत्न, डॉ .आंबेडकर, दादासाहेब फाळके ट्रॉफी प्राप्त आहेत तसेच राष्ट्रपती, प्रधानमंत्री, राज्यपाल, लॉन्स गव्हर्नर ,रोटरी इंटरनॅशनल द्वारा दि बेस्ट कॉलेज टीचर सन्मान प्राप्त आहेत. विदेशातूनही १३ उच्च सन्मान प्राप्त आहेत म्हणून या पुस्तकाबद्दल डॉ. काळे यांचे हार्दिक अभिनंदन!

**- प्रा. डॉ. सुवर्ण गुंड-चव्हाण, सोलापूर**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## संक्षिप्त वृत्त



### गाताचीवाडी येथे वीजेची उपकरणे हाताळणीबाबत मार्गदर्शन

**बार्शी, दि. ७ मार्च-**

येथील श्रीमान भाऊसाहेब झाडबुके महाविद्यालयाच्या वतीने गाताचीवाडी येथील श्रमसंस्कार शिबिरात ग्रामीण भागातील वीज वितरण व उपकरण हाताळणी या विषयावर विद्यार्थी व ग्रामस्थांना मार्गदर्शन करण्यात आले. महावितरणचे चंद्रकांत रणझुंजारे यांनी वीज निर्मितीचे भारताचे धोरण वीज निर्मिती ते घरापर्यंत पोहोचणारी वीज याबद्दल सविस्तर माहिती सांगितली. त्यांनी विजेची उपकरणे कोणत्या प्रकारची घ्यावीत किंवा ती हाताळताना कोणती काळजी घ्यावी तसेच दर्जेदार उपकरणे घेतल्यानंतर होणारे फायदे याबद्दल विद्यार्थ्यांना व ग्राम स्थांना सविस्तर मार्गदर्शन केले. महाविद्यालयाचे ग्रंथपाल प्रा.अनिल जेवळीकर यांनी वीज ही राष्ट्राची संपत्ती असून विजेचा योग्य व काटकसरीने वापर करा. विजेचा वापर, उपकरण हाताळणी याबाबत ग्रामस्थांमध्ये जनजागृतीने या शिबिराचा उद्देश सफल होईल, असे सांगितले. कार्यक्रमासाठी कार्यक्रमाधिकारी म्हणून डॉ. स्नेहलता मुळे, डॉ. जयराम काशीद प्रा.संतोष शिंदे व प्राध्यापिका घाटे व गायकवाड मॅडम यांनी परिश्रम घेतले. सदरील कार्यक्रमासाठी प्रमुख उपस्थिती म्हणून महाविद्यालयातील मराठी विभाग प्रमुख डॉ.नवनाथ दणाणे व अजयसिंह गोरे यांची उपस्थिती होती. सूत्रसंचालन मानसी यादव हिने केले. प्रास्ताविक साक्षी भोसले हिने केले. परिचय कुमार यश बारंगुळे तर आभार समीक्षा वाघमारे हिने केले.

### अपहरण करुन गंभीर मारहाण केलेच्या आरोपातून चार आरोपींचा जामीन मंजूर

**बार्शी, दि. ७ मार्च-**

शहर पोलिस स्टेशन गुन्हा रजिस्टर नंबर ११३/२०२५ नुसार आरोपी राज नागनाथ कांबळे,यश निलेश शिंदे,आर्यन निलेश शिंदे,आदित्य दत्तात्रय सावंत यांनी फिर्यादी लखन भारत शिंदे यास अपहरण करुन जबर दुखापत व जिवे मारण्याचा प्रयत्न केलेच्या आरोपावरुन बीएनएस कलम- १४०(४), १३७(२), ११८(२), ११८(१), ११५(२), ३५१(२), ३५१(३), ३(५) प्रमाणे गुन्हा दाखल होता. सदर संशयित आरोपींच्यावतीने प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी यांच्या न्यायालयात ॲड. विवेक गजशिव व ॲड.राहुल पाटील यांच्यावतीने जामीन अर्ज दाखल केला होता. यावेळी आरोपींचे वकील ॲड. विवेक गजशिव यांनी युक्तिवाद करुन आरोपींना खोट्या गुह्यात गोवले आहे. फिर्यादीने फिर्यादीत सांगितलेली वेळ आणि मेडिकल रिपोर्टमध्ये सांगितलेल्या वेळेत तफावत आहे. फिर्यादीने दिलेल्या फिर्यादीत हत्यारांचा उल्लेख आहे तसा उल्लेख मेडिकल रिपोर्टमध्ये नाही. फिर्यादीने खोट्या गुह्यात चारही आरोपींना नाहक त्रास देण्याच्या अनुषंगाने गुंतविले असून सदरची फिर्याद ही खोटी असल्याचा युक्तिवाद यावेळी आरोपींचे वकील ॲड. विवेक गजशिव यांनी केला. यावेळी ॲड.विवेक गजशिव यांचा युक्तिवाद ग्राह्य धरत प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी न्यायधीश गायत्री पाटील यांनी वर नमूद चारही आरोपींचा जामीन अर्ज मंजूर केला. यावेळी आरोपींच्यावतीने ॲड. विवेक गजशिव, ॲड.राहुल पाटील, ॲड. श्रीराम काशीद यांनी काम पाहिले तर सरकार पक्षाच्यावतीने वकील ॲड. रत्नदीप सोनवणे यांनी कामकाज पाहिले.



### सरकारी कर्मचाऱ्याच्या घरात २.३४ कोटींची अवैध मालमत्ता; लोकायुक्त पोलिसांची धाड

**विजयपूर, दि. ७ मार्च-**

उत्पन्नापेक्षा जास्त मालमत्ता जमा केल्याच्या आरोपावरून कर्नाटक गृह मंडळाचे एफ.डी.ए. शिवानंद केंभावी यांच्या घर आणि फार्म हाऊसवर लोकायुक्त पोलिसांनी छापा टाकला. यावेळी अंदाजे २ कोटी ३४ लाख रुपये मूल्याच्या अवैध मालमत्तेची माहिती मिळाली. याबाबत लोकायुक्तांच्या एसपी टी. मल्लेश यांनी दिलेल्या प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की, कर्नाटक गृह मंडळाचे एफ.डी.ए. शिवानंद केंभावी यांचा विजयपूर शहरातील सुकून कॉलनीतील घर आणि विजयपूर तालुक्यातील तिडगुंदी गावाजवळील फार्म हाऊसवर लोकायुक्तांनी छापा टाकला. दस्तऐवजांची तपासणी करत असताना अंदाजे १५ लाख रुपयांच्या रोख रकम, सोनं-चांदीचे दागिने, वाहने आणि इतर मालमत्तेच्या संबंधित दस्तऐवज सापडले. यावरून अंदाजे २ कोटी ३४ लाख रुपये मूल्याच्या अवैध मालमत्तेचा शोध लागला, असे नमूद करण्यात आले आहे. लोकायुक्त एसपी डॉ. मल्लेश यांच्या नेतृत्वाखाली आणि मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली, यामध्ये डीवायएसपी सुरेश रेड्डी, सीपीआय आनंद तकन्नवर, आनंद डोणी आणि लोकायुक्त पोलिस स्टेशनचे कर्मचारी सहभागी होते.

## निधन वृत्त...

### सीताबाई नायकुडे



**अकलूज, दि. ७ मार्च-**

अकलूज येथील रहिवासी सीताबाई विठ्ठल नायकुडे (वय ६७ वर्षे) यांचे शुक्रवार दि. ७ रोजी सकाळी ६:३० वाजण्याच्या सुमारास राहते घरी निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, दोन मुले, दोन मुली, सुना, नातवंडे, परतवंडे असा मोठा परिवार आहे.

### सलीम बेद्रेकर



**पंढरपूर, दि. ६ मार्च-**

येथील सलीम हाजीइसाक बेद्रेकर (वय, ५२, रा. जुना कराड नाका) यांचे अल्पशा आजाराने गुरुवारी (दि.६) सकाळी निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, एक मुलगी नातवंडे असा परिवार आहे.

# करकंबच्या नारीशक्तीची विविध क्षेत्रात तेजस्वी कामगिरी

## सामाजिक, राजकीय, शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय भरारी; संसाररूपी गाडा हाकत विविध पुरस्कारप्राप्त

**तभा वृत्तसेवा । राजू करपे**
**करकंब, दि. ७ मार्च-**

**जागतिक महिला दिन अर्थात स्त्रीत्वाचा उत्सव दरवर्षी ८ मार्च रोजी जगभरात महिला दिन म्हणून साजरा करण्यात येतो. राजकारण, विज्ञान, कला, संस्कृती व इतर विविध क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या महिलांचा सन्मान व्हावा, महिलांमध्ये समान हक्कांविषयी जागरूकता निर्माण व्हावी, या उद्देशाने हा दिवस साजरा करण्यात येतो. विविध क्षेत्रात स्वकष्टाने स्वतःचे कर्तृत्व सिद्ध करून करकंब गावचे नाव उज्वल करणाऱ्या महिला, भगिनींच्या स्वकर्तृत्वावर टाकलेला प्रकाश.**






भारतीय स्टेट बँक ग्राहक सेवा केंद्राच्या माध्यमातून ग्राहकांच्या पैशांची देवाणघेवाण,बँकेच्या सर्व सुविधा खातेदारांना उपलब्ध करून देणे,तहसील ऑफिस संबंधीत कागदपत्रांची पूर्तता करणे. ग्राहक सेवा केंद्राद्वारे भारतीय स्टेट बँकेची ५००० खाती काढून संबंधित ग्राहकांना बँकेच्या सर्व सेवासुविधा पुरविल्या जातात. शिरोमणी महिला बचत गटाच्या अध्यक्षपदाच्या माध्यमातून कर्ज वाटप तसेच बचत गटाच्या माध्यमातून शासकीय सुविधा देण्याचा प्रयत्न. करकंब स्टेट बँक शाखेच्या वतीने २०२३-२४ मध्ये प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा व प्रधानमंत्री सुरक्षा विमा काढण्यामध्ये प्रथम क्रमांक मिळाल्याबद्दल क्षेत्रिय कार्यालय सोलापूर यांच्याकडून सन्मान.

**- सुवर्णा गुंड,** चालक भारतीय स्टेट बँक ग्राहक सेवा केंद्र.

### मृणाल टकलेंचे कौशल्य वैशिष्ट्यपूर्ण



विद्येचे माहेरघर असलेल्या पुण्यासारख्या शहरांमध्ये महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण केल्यानंतर हे विद्यार्थी, विद्यार्थिनी ग्रामीण भागात परत येण्यास तयार होत नाहीत.ज्वेलरी डिझाईनिंगचा कोर्स फर्ग्युसन कॉलेज येथे पूर्ण केल्यानंतर हाऊस ऑफ आद्या डिझायनर पुणे येथे काही दिवस काम करून अनुभव घेतल्यानंतर करकंब येथील मृणाली शुभम टकले या गृहिणीने ग्रामीण भागातील करकंब या आपल्या गावी परत येऊन स्वतःचे राया ज्वेलरी या नावाने नाविन्यपूर्ण दागिन्यांचे दुकान सुरू केले.या ज्वेलरीमध्ये हॅन्डमेड ज्वेलरी,फ्लॉवर ज्वेलरी,हलवा ज्वेलरी,सिल्वर ९२५ ज्वेलरी,गोल्ड ज्वेलरी असे विविध प्रकारचे दागिने उपलब्ध आहेत. मेशो व इन्स्टाग्रामच्या साह्याने त्या आपले दागिने भारतभर पोहोच करतात.सध्या त्या योगाटीचरसाठी प्रशिक्षण घेत आहेत.अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलनात सहभाग.मॅरेथॉन स्पर्धेत कास्यपदक प्राप्त केले. पुण्यासारख्या शहरातून ग्रामीण भागात येऊन स्वतःचा व्यवसाय सुरू करून त्यांनी इतरांसमोर आदर्श ठेवून गावाकडे चला असा संदेशच दिला आहे.



भाग्यश्री शशिकांत चित्राव ही न्यू. इंग्लिश स्कूल करकंब येथे इयत्ता दहावीमध्ये शिक्षण घेऊन बोर्ड परीक्षेचे पेपर देत आहे. घरची आर्थिक परिस्थिती बेताचीच त्यातच आईस अर्धांगवायूसारखा दुर्धर आजार असल्या कारणाने आईची सेवा, सुश्रुषा करतच तिला शिक्षण घ्यावे लागत आहे.वडीलही मोलमजुरीने कामास जातात.आर्थिक परिस्थिती बेताचीच असली तरी केवळ शिक्षण घेऊन चांगल्या प्रकारची नौकरी प्राप्त करावयाची या इच्छेने ती जिद्द व चिकाटीने येणाऱ्या संकटांना तोंड देत अभ्यास करत आहे. शिक्षणासाठी लागणारे शैक्षणिक साहित्य व इतर गरजा भागवण्यासाठी शनिवार, रविवार तसेच इतर शालेय सुट्ट्यांच्या दिवशी परिसरातील शेतामध्ये, द्राक्ष बागांमध्ये छाटणी, फवारणी व तत्सम शेतीची कामे करून पूर्तता करते. प्रशालेतील शिक्षकवर्ग तसेच तिचे वर्गमित्र, मैत्रिणी यांचेही तिला मोलाचे मार्गदर्शन व सहाय्य लाभत आहे.

**- भाग्यश्री चित्राव,** गृहिणी



महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या पंढरपूर आगारामध्ये ८ वर्षांपासून कार्यशाळा लिपीक या पदावर कार्यरत. कर्तव्यदक्षतेमुळे उत्कृष्ट महिला लिपीक म्हणून सन्मान. नम्र व तत्पर लिपिकीय सेवेसाठी अखिल भारतीय ग्राहक पंचायतीकडून गौरव. आगारातील कार्यशाळेच्या संपूर्ण कामकाजाची जबाबदारी यशस्वीपणे पार पाडते. महिला तक्रार निवारण समितीच्या अध्यक्षा या समितीच्या माध्यमातून अनेक महिला कर्मचाऱ्यांचे प्रश्न मार्गी लावले. १५० महिलांना धार्मिक सहल घडवून आणली. पती प्राथमिक शिक्षक असून त्या पतीच्या बरोबरीने दोन मुलांचे संगोपन करत संसाराचा गाडा हाकत आहे.

**- सोनिया थोरात,** एसटी कार्यशाळा लिपीक पंढरपूर आगार.



महिला आर्थिक विकास महामंडळ महाराष्ट्र शासन अंतर्गत विठाई लोकसंचलित साधन केंद्र पंढरपूर संस्थेमार्फत चालविल्या जाणाऱ्या महिलांसाठीच्या बचत गट संस्थेच्या तालुका अध्यक्ष म्हणून कार्यरत. पंढरपूर तालुक्यांमध्ये १८ गावांमध्ये या बचत गटाचे कार्यक्षेत्र आहे. त्यात कार्यरत असून करकंब पोलीस स्टेशनअंतर्गत दक्षता समितीच्या माध्यमातून गरीब व गरजू महिलांना मार्गदर्शन करून त्यांचे समुपदेशन करणे, वैवाहिक जीवनामध्ये लग्न झालेल्या परंतु निर्माण होणाऱ्या कौटुंबिक वादामुळे माहेरी आलेल्या महिलांना मार्गदर्शन व समुपदेशन करून त्यांचे संसार सुरळीत चालावेत यासाठी प्रयत्न केल्याने १५ ते २० मुली सासरी सुखाने नांदत आहेत. महिलांना त्यांचे हक्क मिळवून देण्यासाठी, महिला सक्षमीकरण करण्याच्या कार्याबद्दल महाराष्ट्र शासनाकडून संवेदनी प्रमाणपत्र, गौरव व सन्मान, ग्रामपंचायततर्फे अहिल्यादेवी होळकर पुरस्कार.अण्णाभाऊ साठे महामंडळातर्फे कर्तव्यदक्ष महिला पुरस्कार. नेहरू युवा केंद्र व महाराष्ट्र नवनिर्माण सेना पुरस्कार.

**- सुनिता देशपांडे,** समाजसेविका.



सागर कुंजीर,सहाय्यक पोलीस निरीक्षक करकंब पोलीस ठाणे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस ठाण्यात येणाऱ्या अत्याचारीत व पीडित महिलांच्या समस्या जाणून घेऊन त्यांना योग्य ते मार्गदर्शन व समुपदेशन करून त्यांच्या तक्रारी व समस्या सोडविणे तसेच महिलांचे कौटुंबिक हिंसाचारापासून संरक्षण करण्याचा जास्तीत जास्त प्रयत्न करून पीडित महिलांना न्याय मिळवून देण्याचा नेहमीच प्रयत्न करते. लोकनेते बाबुरावआण्णा पाटील माध्य. व उच्च माध्यमिक विद्यालय भांबेवाडी (ता. मोहोळ) येथे इयत्ता दहावीमध्ये प्रथम क्रमांक आल्यानंतर स्वातंत्र्य दिनानिमित्त१५ ऑगस्ट रोजी फ्लॅग होस्टिंग अर्थात ध्वजारोहण करतानाचा आयुष्यातील अविस्मरणीय प्रसंग कायम लक्षात राहील. नोकरी करत कुटुंबाचा गाडा हाकताना कुटुंबातील पती व सर्वच सदस्य नेहमीच मला समजावून घेऊन मदत करण्याचा प्रयत्न करतात.

**- सिंधू देविदास पवार,** पोलिस हेड कॉन्स्टेबल करकंब पोलीस ठाणे.

# कष्टकरी महिलांचे स्थान सर्वश्रेष्ठ

## जिल्हा प्रशासन अधिकारी वीणा पवा; महिला दिनानिमित्त विविध स्पर्धा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ मार्च-**

जागतिक महिला दिनानिमित्त एमआयडीसी परिसरातील स्वामी विवेकानंद प्रशाला येथे विविध स्पर्धा आणि कार्यक्रमांचे आयोजन केले होते.

या स्पर्धेचे उद्घाटन जिल्हा प्रशासन अधिकारी वीणा पवार फिजिओथेरपिस्ट डॉ. नेहा सिंह रोडा यांच्या हस्ते करण्यात आले. प्रारंभी सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. अध्यक्षस्थानी संयोजिका मुख्याध्यापिका सीमा श्रीगोंदेकर-यलगुलवार ह्या होत्या. पाककला स्पर्धेत १०० महिलांनी यामध्ये भाग घेतला होता. रवा व बटाटा यापासून तिखट पदार्थ बनविणे तसेच खव्यापासून गोड पदार्थ बनवणे अशा दोन प्रकारच्या स्पर्धा



भरवण्यात आल्या होत्या. प्रथम, द्वितीय, तृतीय व उत्तेजनार्थ असे अनुक्रमे रुपये ४, ३, दीड हजार व ५०० रुपये अशी बक्षीसे प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते देण्यात आली. या स्पर्धेचे परीक्षक म्हणूनअर्चना अडसूळ यांनी काम पाहिले. सूत्रसंचालन वैशाली शहापुरे यांनी केले. मानसी निलंगीकर यांनी आभार मानले.

**अंतिम निकाल (प्रथम तीन व उत्तेजनार्थ) : रवा व बटाटापासून बनवलेल्या तिखट पदार्थ विभाग :** स्मिता शहाणे, सुमन माणेकरी, विजयालक्ष्मी हंडलगी, विजयालक्ष्मी नागठण.

**खव्यापासून गोड पदार्थ बनवणे विभाग :** शबाना शेख, दिपाली बंगरगी, लक्ष्मी कल्याणम, राधा राजखडे.



# सांगोला विद्यामंदिर प्रशाला व ज्यु.कॉलेज सेवकांची सहकारी पतसंस्थेची निवडणूक बिनविरोध

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. ७ मार्च-**

सांगोला विद्यामंदिर प्रशाला व ज्यु.कॉलेज सेवक सहकारी पतसंस्था मर्यादित, सांगोला सन २०२५-२०३० या कालावधीकरिता नवनिर्वाचित संचालक मंडळाची बिनविरोध निवड झाली.

संचालक मंडळामध्ये सचिन पाटणे, सुनिल भोरे, निलेश जंगम, अमोल महिमकर, धोंडिराम पाटील, यतिराज सुरवसे, संध्या तेली, अर्चना कटरे, अमोल गायकवाड, राजेंद्र कुंभार, उत्तम बेहेरे यांची निवड झाली. यावेळी अध्यासी अधिकारी म्हणून सहायक निबंधक ए.एस.पुजारी यांनी काम पाहिले.

नवनिर्वाचित संचालक मंडळाच्या झालेल्या पहिल्या सभे मध्ये पतसंस्थेचे चेअरमन म्हणून अमोल गायकवाड तर व्हा.चेअरमन म्हणून सुनिल भोरे यांची एकमताने निवड झाल्याचे ए.एस.पुजारी यांनी जाहीर केले.

या निवडीबद्दल नूतन चेअरमन व व्हा. चेअरमन यांचा सां.ता.शि.प्र.मंडळाचे सचिव म.शं.घोंगडे, सदस्य विश्वेश झपके यांनी अभिनंदन केले. निवडणूक प्रक्रिया व्यवस्थितपणे पार पाडण्यासाठी सचिव उत्तम सोनलकर यांनी परिश्रम घेतले.

# बार्शीत बँक कर्मचाऱ्यांची निदर्शने

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ७ मार्च -**

युनायटेड फोरम ऑफ बँक युनियन्स अंतर्गत सर्व संघटनाच्या वतीने नोकरभरती, पाच दिवसांचा आठवडा, आणि बाराव्या द्विपक्षीय करारातील उर्वरित प्रश्न या मुद्द्यांवर एक अखिल भारतीय आंदोलन पुकारण्यात आले आहे.

त्या अंतर्गत दि. १४ व २१ फेब्रुवारी रोजी निदर्शने करण्यात आली. तसेच सोशल मीडिया कॅम्पेन, बॅजेस वेयरिंग व दिल्ली पार्लमेंट समोरील धरणे आंदोलन यशस्वीरित्या आयोजित करण्यात आले होते.

आंदोलनाच्या कृती कार्यक्रमानुसार बार्शी शहरातील णत्र्ङ्गण चे बँक ऑफ महाराष्ट्र , बँक ऑफ इंडिया , सेंट्रल बँक ऑफ इंडिया चे कर्मचारी व अधिकारी यांच्या वतीने आज दि. ७ मार्च २०२५ रोजी बँक ऑफ इंडिया कुर्डुवाडी रोड येथे जोरदार निदर्शने करण्यात आली.

सरकारने तातडीने यावर तोडगा न काढल्यास कृती कार्यक्रमानुसार २४ व २५ मार्च असे दोन दिवस ४८ तासांचा संप करण्यात येईल असे बँक कर्मचारी समन्वय समितीच्या समन्वयक कॉ. सरिता कुलकर्णी यांनी सांगितले तर आपल्या मागण्या




रास्त असून त्या मान्य होईपर्यंत हा लढा चालू राहील , तो तीव्र करण्यात येईल असे सह समन्वयक कॉ. अमोल काळदाते यांनी सांगितले.

# १४९ महिला बचतगटांना ८ कोटींचे कर्ज वाटप

**तभा वृत्तसेवा,**
**सदाशिवनगर, दि. ७ मार्च-**

महिला आर्थिक विकास महामंडळ सोलापूर अंतर्गत तालुका अभियान कक्ष माळशिरस अंतर्गत आनंदमूर्ती,कस्तुरी,श्री स्वामी समर्थ बचत गटासह १४९ बचत गटास उद्योग व्यवसायसाठी १४९ महिला बचत गटाना ८ कोटी ५ लाख ४७ हजार रुपयांचे कर्ज वाटप करण्यात आले असून याचा धनाधेश माळशिरसचे अप्पर जिल्हा न्यायाधीश आर व्ही ताम्हाणेकर,सह दिवाणी न्यायाधीश एस.यु. न्याहारकर, सह दिवाणी न्यायाधीश यु.बी. पेठे यांच्या हस्ते जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून महिला गटाना देण्यात आला. यावेळी गटविकास अधिकारी आबासाहेब पवार,तालुका व्यवस्थापक रणजित शेंडे उपस्थित होते.

तालुका विधी सेवा समिती माळशिरस यांच्यावतीने माळशिरस पंचायत समि



ती सभागृहात महिलांना कायदे विषयक माहिती,सार्वजनिक उपयोगिता सेवा केंद्र व राज्य सरकारच्या योजना बाबत माहिती तसेच बेटी बचाओ बेटी पढाओ या बाबत मार्गदर्शन करण्याकरिता माळशिरस पंचायत समिती सभागृहात मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते,यावेळी महिलांना मार्गदर्शन करण्यात आले. तसेच बेटी बचाओ बेटी पढाओची शपथ देण्यात आली. तसेच १४९ महिला गटाना १४९ महिला बचत गटाना ८ कोटी ५ लाख ४७ हजार रुपयांचे कर्ज वाटपाचा धनादेश देण्यात आला.

# चारा छावणी थकीत बिलाबाबत आ. सुभाष देशमुखांनी अधिवेशनात उठवला आवाज

**सोलापूर, दि. ७ मार्च-**

अर्थसंकल्पीय अधिवेशनात आ. सुभाष देशमुख यांनी चारा छावण्यांच्या थकीत बिलाचा मुद्दा मांडला. बिले थकण्यासाठी कारणीभूत अधिकाऱ्यांवर कारवाईची देखील मागणी त्यांनी सभागृहात केली.

मुंबईतील अर्थसंकल्पीय अधिवेशनात चारा छावण्यांच्या संदर्भात विस्तृत चर्चा झाली. २०१८-१९ पासून सुरू असलेल्या या छावण्यांसाठी मंजूर झालेल्या निधीच्या वितरणात विलंब झाला. याबाबत सभागृहाचे लक्ष वेधून घेतले. काही जिल्हाधिकाऱ्यांनी छावण्यांना भेट दिल्यावर जनावरांची उपस्थिती आढळली नाही, त्यामुळे काही निधी शासनाला परत पाठवण्यात आला. त्यामुळे तक्रारी व तपासणीच्या प्रक्रियेमुळे सहा वर्षे विलंब झाला. यास जबाबदार असलेल्या अधिकाऱ्यांवर कारवाई केली जाईल, असे आश्वासन मंत्रीमहोदयांनी दिले. शासनाने अधिवेशन संपण्यापूर्वी शेतकऱ्यांना चारा छावणीसाठीचे थकबाकीचे पैसे तातडीने वितरित करण्याचा निर्णय घेतला आहे, असे मंत्री महोदय यांनी सांगितले. निधीच्या विलंबामागील कारणांचा सखोल तपास करून, यापुढे अशा अडचणी येऊ नये यासाठी कठोर पावले उचलली जातील, असे आश्वासन देखील मंत्री महोदयांनी दिले.



सोलापूर : रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीचे अध्यक्ष म्हणून पुन्हा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची निवड झाली. उपाध्यक्षपदी डॉ. विनय सहस्त्रबुध्दे, सरचिटणीस विनोद पवार आणि कोषाध्यक्ष म्हणून नीलेश गोसावी यांची निवड झाली आहे.

# जिल्हा दूध संघाचे संचालक मंडळ बरखास्त

## ● तीन सदस्यीय प्रशासक मंडळ नियुक्तीचे विभागीय दुग्ध उपनिबंधकाचे आदेश

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि.७ मार्च-**

अनियमितता, मनमानी, नियमबाह्य कारभार करून संस्थेच्या व सभासदांच्या हिताला बाधा आणल्याप्रकरणी सोलापूर जिल्हा दूध उत्पादक व प्रक्रिया संघाचे (दूध पंढरी) संचालक मंडळ बरखास्त करून तीन सदस्यीय प्रशासक मंडळ नियुक्त करण्याचा आदेश विभागीय दुग्ध उपनिबंधक राजकुमार पाटील यांनी दिला आहे. या आदेशाने दूध संघाच्या संचालक मंडळात एकच खळबळ उडाली आहे.

तीन सदस्यीय प्रशासक मंडळात जिल्हा विशेष लेखापरीक्षक दुग्ध श्रीनिवास पांढरे हे अध्यक्ष तर सहकारी संस्थांच्या सहायक निबंधक डॉ.वैशाली साळवे व सहकार अधिकारी व्ही.जे.वडतिले यांची सदस्य म्हणून नियुक्ती केली आहे. दूध संघाच्या संचालक मंडळाने संघ व सभासदांच्या हिताच्या दृष्टीने कामकाज न करता सभासदांच्या हितास बाधा आणणारे कृत्य केले आहे. तसेच संघाचे व्यवस्थापन व्यावसायिक पध्दतीने न केल्याने संघाची आर्थिक परिस्थिती बिकट झाली आणि तोटा सतत वाढत गेला. संचालक मंडळाने



संघाप्रती असलेली कर्तव्ये पार पाडण्यात कसूर केल्याचा ठपका विभागीय दुग्ध उपनिबंधक पाटील यांनी आदेशात ठेवला आहे.

अध्यक्ष रणजितसिंह शिंदे, उपाध्यक्ष दीपक माळी यांच्यासह बाळासाहेब माळी, मारुती लवटे, औदुंबर वाडदेकर, संभाजी मोरे, राजेंद्र मोरे, विजय येलपल्ले, अलका चौगुले, योगेश सोपल, वैशाली शेंबडे, बबनराव अवताडे, मनोज गरड, छाया ढेकणे, निर्मला काकडे, जयंत साळे, राजेंद्रसिंह पाटील अशी बरखास्तीची कारवाई झालेल्या संचालकांची नावे आहेत. सोलापूर जिल्हा सहकारी दूध उत्पादक व प्रक्रिया संघाला अनेक वर्षांपासून आर्थिक तोटा होत आहे. संचालक मंडळाचा निष्क्रिय कारभारच याला जबाबदार आहे. प्रचंड मोठा तोटा होत असतानाही संचालक मंडळाने काहीच उपाययोजना केल्या नाहीत. संचालक मंडळाच्या कार्यकाळात सभासदांच्या हिताचा कारभार होत नाही, यासह इतर विविध ११ मुद्यांवर दूध संघ बचाव कृती समितीचे अध्यक्ष अनिल अवताडे यांनी विभागीय दुग्ध उपनिबंधकांकडे तक्रार दाखल केली होती. याची दखल घेऊन दूध संघाच्या कारभाराच्या चौकशीसाठी विभागीय दुग्ध उपनिबंधकांनी लेखापरीक्षक पी.आर.शिंदे यांची चौकशी अधिकारी म्हणून नियुक्ती केली होती. शिंदे यांनी चौकशी करून अहवाल सादर केला होता. या अहवालात संचालक मंडळावर अनेक गंभीर ठपके ठेवण्यात आले आहेत.

या अहवालानुसार विभागीय दुग्ध उपनिबंधकांनी संचालक मंडळाला कारणे दाखवा नोटिसा बजावल्या होत्या. याप्रकरणी विभागीय दुग्ध उपनिबंधकांकडे ९ व २२ जानेवारी, ५, १७ व २७ फेब्रुवारी रोजी अशा एकूण पाच सुनावण्या झाल्या. यात दूध संघाला व संचालक मंडळाला म्हणणे मांडण्याची संधी दिली होती. त्यानुसार दूध संघ व संचालक मंडळाने वकिलांमार्फत स्वतंत्रपणे खुलासे सादर केले होते. परंतु विभागीय दुग्ध उपनिबंधक पाटील यांनी हे खुलासे अमान्य करीत संचालक मंडळावर बरखास्तीची कारवाई केली आहे.

# ५० हजार रुपयांसाठी विवाहितेचा छळ

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ मार्च-**

व्यापारासाइी ५० हजार रुपये माहेरून आणावेत म्हणून विवाहितेचा छळ करणाऱ्या पतीसह पाचजणांविरुध्द विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत प्रियंका शिवकुमार राठोड (वय ३२, रा. साईधन नगर, प्रताप नगर रोड, सोलापूर) या विवाहितेच्या फिर्यादीवरुन पती शिवकुमार, सासू कमलाबाई, सासरे रामू, नणंद कविता, सुनिता (रा. ओम नगर, कलबुर्गी, कर्नाटक) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १५ जून २०१२ ते ३ डिसेंबर २०२४ या कालावधीत प्रियंका राठोड या सासरी नांदण्यास होत्या. त्यावेळी पती शिवकुमार व त्याच्या घरातील लोकांनी विनाकारण किरकोळ कारणावरून प्रियंका यांना शिवीगाळ करून शारीरीक व मानसिक त्रास देऊन मारहाण केली. तसेच माहेरून व्यापारासाठी ५० हजार रुपये घेऊन ये, अन्यथा तुला नांदायला घेणार नाही अशी धमकी देऊन हुंड्याची मागणी केली. म्हणून विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार सोनार पुढील तपास करीत आहेत.

# घटस्फोटित मुलीचा नातलगाकडून विनयभंग

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ मार्च-**

घटस्फोटित मुलीचा जवळच्या नातलगाकडूनच विनयभंग झाल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. यामुळे नात्याला काळीमा फासण्याचा प्रयत्न झाला असून त्या नातलगाविरूध्द पोलिसात तक्रार दाखल झाली आहे.

यातील पिडीता ही मुळची सोलापुरातील रहिवाशी आहे. तिचे बाहेरील जिल्ह्यातील तरुणाबरोबर लग्न झाले होते. परंतु दोघांचे वैचारिक पटत नसल्याने ते विभक्त झाले. यानंतर पिडीता सोलापुरात नातलगांकडे राहण्यास आली होती. ही बाब जवळच्या नातेवाईकांना माहिती होती. दरम्यान एके दिवशी जवळच्या नातेवाईकांने पिडीतेशी लग्न करण्याचा प्रयत्न केला. त्यास विरोध करताच, त्याने पिडीतेला मारहाण केली. त्यादरम्यान माझ्या विरोधात पोलिसात तक्रार करते का? म्हणून त्याने पिडीतेचे डोके भिंतीवर आपटले. तसेच काठीने पाठीत मारले. दरम्यान यापूर्वीही पुण्यात पिडीता राहत असताना असाच प्रयत्न त्या नातेवाईकाकडून झाला होता.

## संक्षिप्त वृत्त



### अश्विनी रुग्णालयामध्ये डे-केअर वॉर्डाचे उद्घाटन

**सोलापूर, दि. ७ मार्च-**

अश्विनी सहकारी रुग्णालय आणि संशोधन केंद्र नियमित, सोलापूर येथे दुसऱ्या मजल्यावर नूतनीकरण केलेल्या डे-केअर वॉर्डाचे उद्घाटन मा.व्हा.चेअरमन डॉ. विजय पाटील यांच्या हस्ते झाले. एनएबीएचच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार नूतनीकरण केलेल्या ह्या डे-केअर वॉर्डमध्ये रुग्णांकरिता आवश्यक त्या सर्व सुविधा पुरविण्यात आलेल्या आहेत.या वॉर्डामध्ये नेत्र शस्त्रक्रिया झालेले रुग्ण, अँजिओग्राफीचे रुग्ण, केमोथेरपी व इतर प्रोसिजर झालेले रुग्णांवर उपचार करण्यात येणार आहेत. या उद्घाटन प्रसंगी संचालक मेहूल पटेल, डॉ. राजीव प्रधान, विलास पाटील, डॉ.सिध्देश्वर रुद्राक्षी, डॉ.गुरुनाथ परळे, डॉ. विद्यानंद चव्हाण, डॉ.विपुल दोशी, वैद्यकीय अधिक्षक डॉ. प्रशांत औरंगाबादकर, प्रशासकीय अधिकारी सचिन बिज्जरगी उपस्थित होते. संस्थेचे चेअरमन बिपीनभाई पटेलयांच्या मार्गदर्शनाखाली सदर विभाग कार्यान्वित करण्यात आलेला आहे.



### बँक ऑफ महाराष्ट्रच्या क्रेडिट लिंकेज कॅम्पला महिलांचा प्रतिसाद

**सोलापूर, दि. ७ मार्च-**

आंतरराष्ट्रीय महिला दिना निमित्त दि. ७ मार्च रोजी पंढरपूर येथे बँक ऑफ महाराष्ट्र सोलापूर विभागाचा स्वयं सहाय्यता गट (एसएचजी) क्रेडिट लिंकेज कॅम्प मुख्य कार्यालयाच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीपणे आयोजित केला होता. या कार्यक्रमाला २९० हून अधिक महिलासदस्य तसेच एसएसआरएलएम आणि एमएव्हीआयएम संस्थांचे प्रतिनिधी यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. मुख्य कार्यालयाच्या वतीने सुरू करण्यात आलेल्या एसएचजी क्रेडिट लिंक मोहिमेअंतर्गत, बँक ऑफ महाराष्ट्र सोलापूर विभागाने २५० खात्यांसाठी १५ कोटींची कर्जराशी मंजूर केली आहे. या कॅम्पच्या मदतीने या विभागाने चालू आर्थिक वर्षात एसएचजसाठी १०० कोटींपेक्षा जास्त कर्ज मंजूर केले आहे. यावेळी विभागीय व्यवस्थापक संजीव कुमार यांनी सदस्यांना मार्गदर्शन केले.



### विद्यार्थ्यांमध्ये पूर्णत्व आणणे हे शिक्षकांचे ध्येय : भाग्यश्री जाधव

**सोलापूर, दि. ७ मार्च-**


विद्यार्थ्यांमध्ये पूर्णत्व आणणे हे शिक्षकांचे ध्येय असले पाहिजे असे मत राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या अधिक्षिका भाग्यश्री जाधव यांनी व्यक्त केले. येथील रोटरी नॉर्थ राधाकिशन फोमरा मूक बधिर विद्यालयात जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून महिला दिनाच्या पूर्व संध्येला आयोजित केलेल्या कार्यक्रमात जाधव बोलत होत्या. यावेळी रोटरी नॉर्थ च्या अध्यक्षा डॉ. जानवी माखिजा, शाळेचे सचिव सुनील दावडा, राज गोपाळजी झंवर, बळीराम पावडे, दीपक आर्वे, आरती गांधी आदी उपस्थित होते. याप्रसंगी शाळेतील विद्यार्थिनींनी भारतात होऊन गेलेल्या पहिल्या कर्तव्यदक्ष महिलांच्या रूपरेषा सादर केल्या.प्रास्ताविक मुख्याध्यापिका क्षितिजा गाताडे यांनी केले. यावेळी शाळेच्यावतीने पाहुण्यांना स्मृतिचिन्ह देऊन गौरविण्यात आले. याप्रसंगी शाळेतील महिला कर्मचाऱ्यांचा आणि रोटरी महिला सदस्यांचा प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते वस्तू देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास डॉ. शितोळे, रेणुका पसपुले, संध्या चंदनशिवे, विजया पिताळकर, योगिता बोधले, गजानन गडगे, नागनाथ बसाटे, सोमनाथ ठाकर, दिनेश ताटे, सकलेन बडे खान, विठ्ठल सातपुते, चिदानंद बेनुरे, गंगाधर मदभवी, साहेब गौडा पाटील, अजित पाटील, सोमनाथ थोरात, बाबासाहेब पवार, शबाना शेख आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन अजित पाटील यांनी केले तर आभार दीपक आर्वे यांनी मानले.

# डोकेदुखीच्या गोळ्या खाललेल्या महिलेला रक्तस्त्राव

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ मार्च-**

डोकेदुखीच्या कोणत्यातरी गोळ्या सल्ल्याविना खालल्याने महिलेला पोट दुखीसह रक्तस्त्रावाचा त्रास सुरू झाला. या महिलेवर शासकीय रुग्णालयात उपचार सुरू आहेत. इसरत शाहीद नदाफ (वय ३४, रा. चपळगाव ता. अक्कलकोट) असे महिलेचे नाव आहे.

गुरुवारी सकाळी १० च्या सुमारास इसरत यांना राहत्या घरी पोटदुखीचा त्रास होऊ लागला. तसेच त्यांना रक्तस्त्राव होत असल्याने अक्कलकोट येथील सरकारी रुग्णालयात प्राथमिक उपचार केले. त्यानंतर



डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार सोलापूर येथील शासकीय रुग्णालयात दाखल केले. येथील डॉक्टर जिकरा यांनी तपासणी केली असता, रुग्ण महिलेने कोणत्या तरी डोके दुखीच्या गोळ्या कोणाच्याही सल्ल्याविना खालल्याचे लक्षात आले. महिला रुग्ण शुध्दीवर असल्याची नोंद सिव्हील चौकीत झाली आहे.

# ‘नाविण्यपूर्ण’ दाराशा प्रसुतीगृहाचे आज लोकार्पण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ मार्च-**

भारतातील अग्रगण्य रसायन उद्योग बालाजी अमाईन्स संचलित बालाजी स्पेशालिटी केमिकल्स लिमिटेड कंपनीने आपली सामाजिक बांधिलकी जपत ९५ लाख रुपये सीएसआर निधीतून नूतनीकरण केलेल्या महापालिकेच्या दाराशा प्रसुतीगृहाचे लोकार्पण शनिवार, दि. ८ मार्च रोजी सकाळी १०:३० वाजता करण्यात येणार आहे, अशी माहिती बालाजी स्पेशालिटी केमिकल्सचे व्यवस्थापकिय संचालक एन. राजेश्वर रेड्डी आणि बालाजी अमाईन्सचे व्यवस्थापकिय संचालक डी. राम रेड्डी, राजेश्वर रेड्डी यांनी पत्रकार परिषदेत दिली.

डफरीन चौक येथील महापालिकेच्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर प्रसुतीगृहाच्या नूतनीकरण केले होते. खाजगी रुग्णालयांप्रमाणे उत्तम सोयी-सुविधा उपलब्ध करुन दिल्यामुळे त्याठिकाणी गरोदर महिलांची प्रसुतीपूर्व आणि नंतर उत्तमप्रकारे देखभाल आणि काळजी घेण्यात येत आहे. त्यानंतर आता गांधीनगर नजीकच्या दाराशा प्रसुतीगृहाचे नूतनीकरण करुन कायापालट केला आहे.

नूतनीकरणामुळे या प्रसुतीगृहाचे रुपडे पालटले आहे. डफरीन चौकातील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर प्रसुतीगृहात महापालिका आणि तेथील कर्मचारी स्वच्छता, सुरक्षा, नीटनेटकेपणा, जलद रुग्णसेवा आणि व्यवस्थापन योग्य प्रकारे करत आहेत. त्याचप्रमाणे दाराशा प्रसुतीगृहातील कर्मचारीही उत्तम व्यवस्थापन करतील.

# रिक्षातील सहप्रवाशी महिला जखमी

**सोलापूर, दि. ७ मार्च-**

जुना कुंभारी नाका ते नवीन विडी घरकुल असे रिक्षातून जाताना लक्ष्मीनारायण टॉकीज समोरील रस्त्यावर रिक्षाचालकाने ब्रेक मारल्याने सहप्रवाशी महिला अंगावर पडून महिला जखमी झाली. सविता हिराचंद गायकवाड (वय ४२, रा. नवीन विडी घरकुल) असे महिलेचे नाव आहे. गुरूवारी रात्री ९ च्या सुमारास सविता या नवीन विडी घरकुल येथे जाण्यासाठी जुना कुंभारी नाका येथून रिक्षात बसल्या. त्यावेळी रिक्षात आणखी एक महिला प्रवाशी होती. रिक्षा लक्ष्मी नारायण टॉकीजजवळ गेली असता, अचानक दुसरी रिक्षा आडवी आली. त्यामुळे सविता बसलेल्या रिक्षाच्या चालकाने अचानक ब्रेक मारला. तेव्हा रिक्षातील महिला प्रवाशाच्या हाताचा कोपरा लागून सविता यांच्या उजव्या डोळ्याला मार लागला.




# बँक ऑफ महाराष्ट्र एम्प्लॉईज फेडरेशनचे आंदोलन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ मार्च-**

बँकेमध्ये तात्पुरती अर्धवेळ स्वीपरची भरती करणे, शिपाई व लिपिकाची भरती करणे, विशेष सहाय्यक (एसपीएल)ची भरती करणे, संघटनेची ताब्यात घेतलेली कार्यालये परत करणे, तसेच डी-जुरे कराराचे पालन करणे या अशा विविध मागण्यासाठी बँक ऑफ महाराष्ट्र एम्प्लॉईज फेडरेशन औरंगाबाद सोलापूर युनिटतर्फे बँक ऑफ महाराष्ट्र जुळे सोलापूर शाखेसमोर जोरदार आंदोलन करण्यात आले.

२४ फेब्रुवारीला स्वाक्षरी मोहिमेपासून या आंदोलनास सुरवात झाली आहे. यामध्ये २८ फेब्रुवारी रोजी मागणी दिवस ब्यॅचेस लावून काम करण्यात आले. २ मार्च रोजी ऑल इंडिया फेडरेशनची कार्यकारिणी सभा झाली. त्याचाच एक भाग म्हणून ६ मार्च रोजी विविध शहरातील झोनल ऑफिस समोर जोरदार निदर्शने करण्यात आली.यापुढील आंदोलनात ९ मार्च रोजी सोशल मीडिया कॅम्पन, १२ मार्च रोजी सर्व झोनल ऑफिससमोर धरणे कार्यक्रम, १७ मार्च रोजी मुख्य लोकमंगल कार्यालय समोर धरणे व मास डिप्युटेशन आणि २० मार्च रोजी देशव्यापी संप करणार आहे. या आंदोलनास सरिता कुलकर्णी, अतुल कुलकर्णी, संतोष चित्त्याळकर, अविनाश मगर, किरण श्रीगिरी आणि अधिकारी वर्गाचे सागर दीक्षित यांनी मार्गदर्शन केले. हे आंदोलन यशस्वी करण्यासाठी कॉ. मंडलिक, कॉ. आईवले, शिल्पा कुलकर्णी, श्रीदेवी मेंगुले, सचिन काळे, सुजाता होंडरे यांनी विशेष परिश्रम घेतले.

# फरार आरोपी अजित लकडेचा अटकपूर्व जामिन अर्ज फेटाळला

## पुरुषोत्तम बन्ने खूनप्रकरण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ मार्च-**

पत्रा तालीमचा कार्यकर्ता पुरुषोत्तम बन्ने यांच्या खूनप्रकरणात फरार असलेला आरोपी अजित लकडे याचा अटकपूर्व जामीन अर्ज प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश मनोज शर्मा यांनी फेटाळला.

अजित आप्पासाहेब आडके (वय २९, रा. मु.पो. देगाव) असे जामीन अर्ज फेटाळलेल्या आरोपीचे नाव आहे. पुरषोत्तम उर्फ आप्पा दिंगबर बन्ने (वय ४८, रा. उत्तर कसबा) असे खून झालेल्याचे नाव आहे. याबाबत देविदास दिगंबर बन्ने (वय ४२, रा. पत्रा तालीम) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

२१ जून २०२४ रोजी दुपारी साडेबारा वाजण्याच्या सुमारास बाळे येथील गट नंबर ४१/३ या शेतामध्ये यातील फिर्यादी, मयत व साक्षीदार हे त्यांच्या शेतीची शासकीय मोजणी करत असताना शांतप्पा यशवंत आडके, सागर शांतप्पा आडके, विजयकुमार उर्फ बाळू शांतप्पा आडके, महादेव सदाशिव धबाले, अमित उर्फ पप्पू आप्पासाहेब आडके अमित आप्पासाहेब आडके यांनी त्याच्यातील शेतीच्या वादातील राग मनात धरुन, ही शेती आमची आहे, मोजणी करायची नाही, नाहीतर एकेकाला सोडणार नाही, नाहीतर या हरामखोरांना संपवू असे म्हणून या सर्वांनी एकत्ररित्या त्यांच्या हातातील लोखंडी कोयता, लोखंडी पाईपने मयतास डोक्यावर, दोन्ही हातापायावर, कंबरेवर, शरीरावर वार करुन त्यास गंभीर जखमी करुन जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला होता. तसेच यातील फिर्यादीस देखील लोखंडी पाईपने उजव्या खांदयावर, डाव्या पायाच्या पिंडरीवर मारहाण करुन जखमी केले होते. म्हणून यातील फिर्यादीने सदर आरोपींविरुध्द फौजदार चावडी पोलीस स्टेशन येथे भा.द.वि. कलम ३०७ व अन्य कलमान्वये फिर्याद दिले होते. दरम्यानच्या काळात यातील मयतास उपचाराकरीता रिक्षाने सिध्देश्वर हॉस्पीटल व त्यानंतर वळसंगकर हॉस्पीटल येथे दाखल केले असता, मयत हा उपचार चालू असताना २३ जून २०२४ रोजी मृत्यू पावला. तदनंतर सदर आरोपीच्या विरोधात गुन्हा दाखल करून गुन्हयातील ५ आरोपींना अटक केली.

सदर गुन्हयातील आरोपी अजित आडके हा अदयाप फरार आहे. त्याने त्यास अटकपूर्व जामिन मिळावा म्हणून अर्ज दाखल केला होता. अर्जाच्या सुनावणीवेळी जामीन अर्जास सरकार पक्षातर्फे तीव्र हरकत घेऊन म्हणणे सादर केले होते. सदर प्रकरणामध्ये शासकीय साक्षीदार व इतर नेत्र साक्षीदार आहेत. सदर आरोपी हा सराईत गुन्हेगार असल्याने त्यांची जामिनावर मुक्तता झाल्यास तो साक्षीदारांवर दबाव टाकेल व साक्षीदार फोडण्याची शक्यता आहे. त्यामुळे त्याचा अटकपूर्व जामिन अर्ज नामंजूर करण्यात यावा, असा युक्तीवाद केला. तो युक्तीवाद ग्राहय धरुन अजित आडके याचा अटकपूर्व जामिन अर्ज फेटाळला. सदर प्रकरणात सरकारपक्षातर्फे जिल्हा सरकारी वकील प्रदिपसिंग राजपूत यांनी काम पाहिले तर आरोपीच्या वतीने ॲड. शशी कुलकर्णी यांनी काम पाहिले.




**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी**. ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## दुबई येथे नोकरी लावण्याचे आमिष दाखवून ६३ हजारांची फसवणूक

### ▸ दोघांवर गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ मार्च-**

दुबई येथे नोकरी लावण्याचे आमिष दाखवून ६३ हजार ३०० रुपयांची फसवणुक करणाऱ्या दोघांवर एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.याबाबत सुलतान रियाज पटेल (वय ३१, रा. सम्राट नगर, मजरेवाडी, सोलापूर) यांच्या फियादीवरुन साहेराबानू शब्बीर शेख (रा. सम्राट नगर, म जरेवाडी, सोलापूर) आणि मो. फुकरान अली फारूख अली अन्सारी (रा. भिवंडी, सध्या मुंबई) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सुलतान पटेल आणि साहेराबानू शेख हे एकमेकांच्या ओळखीचे असून ते एकाच नगरात राहतात. साहेराबानू हिने सुलतान याचा विश्वास संपादन करून त्यास आपला नातेवाईक मो. फुकरान अन्सारी याच्या मदतीने दुबई येथे द कॅस्केड मल्टिक्युझिन रेस्टा या हॉटेलमध्ये कॅशियर पदाची नोकरी लावतो असे खोटे बोलून १० सप्टेंबर २०२४ पासून वेळोवेळी ६३ हजार ३०० रुपये घेतले. पैसे घेऊनदेखील नोकरी लावली नसल्याने सुलतान याने साहेराबानू हिच्याकडे पैशाची मागणी केली. त्यावेळी पैसे देण्यास नकार दिल्याने आपली फसवणुक झाल्याचे दिसून आल्यानंतर पटेल याने एमआयडीसी पोलिस ठाण्यात फसवणुकीची फिर्याद दाखल केली. पोलिस उपनिरीक्षक गाढवे पुढील तपास करीत आहेत.



### ▸▸ संक्षिप्त वृत्त...

### सोलापूरच्या स्वरादा मोहोळकरचा आवाज मालिकेत

**सोलापूर, दि. ७ मार्च-**



दि. १० मार्चपासून सायंकाळी ७.३० सुरु होणाऱ्या सन मराठी या वाहिनीवर सखा माझा पांडुरंग या मालिकेत येथील गायिका स्वरादा मोहोळकर ही गाणार आहे. काही अभंग आणि ओव्या तिच्या आवाजात ऐकायला मिळणार आहेत. घरात संगीताचे वातावरण असल्याने गायनाचे संस्कार होत गेले. स्वरादाचे बाबा उमेश हे तबला वादक आहेत. आई स्वरांगी या बी.एस.कुलकर्णी प्रशालेत संगीत शिक्षिका आहे. तिचे शास्त्रीय गायनाचे शिक्षण शर्वरी झंकार कुलकर्णी यांच्या कडे विशारद पूर्णचे शिक्षण चालू आहे. या वाहिनीवर गाण्याची संधी पंढरपूरचे गायक, संगीतकार, साउंड रेकॉर्डिस्ट विनोद शेंडगे यांनी उपलब्ध करून दिली.

### शनि मंदीर येथे १५ हजारांचा मोबाईल चोरीस

**सोलापूर, दि. ७ मार्च-**

शहरातील रेल्वे स्टेशन जवळील शनि मंदीरात दर्शनासाठी गेलेल्या तरूणाचा १५ हजार रुपये किंमतीचा मोबाईल चोरट्याने चोरून नेला.याबाबत धनाजी लक्ष्मण कोळी (वय ३३, रा. अंबाबाई पटांगण, गोविंदपूरा जवळ, पंढरपूर, जि. सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १ मार्च रोजी दहाच्या दरम्यान धनाजी कोळी हे शनि मंदीर येथे दर्शनासाठी गेले होते. त्यावेळी गर्दीमध्ये कोणीतरी अज्ञात चोरट्याने कोळी यांच्याजवळील पिशवीत ठेवलेला १५ हजार रुपये किंमतीचा मोबाईल चोरून नेला.

# ७ महिला महापौरांनी गाजविले महापालिकेवर राज्य

● सहा जणींना मिळाला उपमहापौरपदाचा मान ● १४ महिला अधिकारी पाहतायत प्रशासनाचे कामकाज

**तभा वृत्तसेवा । किरण बनसोडे**
**सोलापूर, दि. ७ मार्च-**




सोलापूर महापालिकेच्या स्थापनेपासून ६० वर्षांच्या कार्यकाळात महापालिकेत महापौरपदी ७ महिला विराजमान झाल्या तर ६ महिलांना उपमहापौर पदाचा मान मिळाला आहे. महापालिकेत महिला पदाधिकारी व अधिकाऱ्यांचे योगदान मोलाचे ठरले आहे.

सध्या १४ महिला अधिकारी विविध विभागाची प्रशासकीय जबाबदारी समर्थ आणि सक्षम पणे पहात असल्याचे चित्र दिसून येते. दि. १ ऑगस्ट १८५२ रोजी स्थापन झालेल्या सोलापूर नगरपालिकेचे १ मे १९६४ मध्ये महापालिकेत रूपांतर झाले. पालिकेला स्वातंत्र्य लढ्याचा जाज्वल्य व क्रांतिकारी असा इतिहास आहे. दरम्यान, महानगरपालिकेच्या स्थापनेपासून ते आतापर्यंत ६१ वर्षांच्या कार्यकाळात महिला महापौर, उपमहापौर यांचे योगदान महत्त्वपूर्ण असेच ठरले आहे. त्या-त्या कार्यकाळात महिला महापौर व उपमहापौरांनी आपापल्या कामाचा वेगळा ठसा उमटविला आहे.

सन १९६४ ते २०२२ पर्यंत ३७ पैकी सात महिला महापौरांना संधी मिळाली. याच कार्यकाळात ३६ उपमहापौरपैकी सहा महिला उपमहापौर झाल्या. शहराच्या पहिल्या महिला महापौर म्हणून शेवंताबाई पवार यांना मान मिळाला. दरम्यान, मार्च २०१२ ते मार्च २०२२ या दहा वर्षांच्या कार्यकाळात अलका राठोड, प्रा. सुशीला आबुटे, शोभा बनशेट्टी, श्रीकांचना यन्नम या चार महिला महापौरांनी सलग कारभार सांभाळला. सन २०१७ ते २०१९ या कालावधीत महापौर आणि उपमहापौर या दोन्हीही महिला होत्या. त्यावेळी शोभा बनशेट्टी या महापौर तर उपमहापौर शशिकला बत्तुल होत्या.

#### ● महापौर व उपमहापौरपदी या मान्यवर महिलांना मिळाली संधी

सोलापूर महापालिकेत आतापर्यंत ७ महापौर व उपमहापौरपदी ६ मान्यवर महिलांना संधी मिळाली. महापौरपदी शेवंताबाई पवार (सन १९९७- ९८), नलिनी चंदेले (२००२- ०५), अरुणा वाकसे(२००७- ०९), अलका राठोड(२०१२-१४), प्रा. सुशीला आबुटे(२०१४-१७), शोभा बनशेट्टी (२०१७-१९) व श्रीकांचना यन्नम (२०१९-२२) या विराजमान झाल्या होत्या. तर उपमहापौर म्हणून प्रा. नसीमा पठाण (१९७६-७७), सुषमा घाडगे(१९९२-९३), फातिमा शेख(१९९४-९५), महानंदा भोसले(१९९८-९९), सुमन मुदलियार (मार्च १९९९-ऑगस्ट १९९९), शशिकला बत्तुल(२०१७-१९) यांनी कारभार पाहिला.



#### ● ९ प्रमुख महिला अधिकारी पाहतायत प्रशासकीय कारभार !

ऐतिहासिक वारसा असलेल्या सोलापूर महापालिकेच्या प्रशासकीय विविध विभागाचा कारभार सुमारे ९ प्रमुख महिला अधिकारी यशस्वीपणे चालवत असल्याचे प्रेरणादायी चित्र दिसून येत आहे. यामध्ये विविध विभागाची जबाबदारी सांभाळणाऱ्या सहाय्यक आयुक्त मनीषा मगर, सहाय्यक आयुक्त ज्योती भगत, मुख्य लेखा परीक्षक रूपाली कोळी, नगर अभियंता सारिका अकुलवार, आरोग्य अधिकारी डॉ. राखी माने, संगणक विभाग प्रमुख स्नेहल चपळगावकर, विधान सल्लागार संध्या भाकरे, मनपा प्राथमिक शिक्षण मंडळाच्या मुख्य लिपिक माहेजबीन शेख, युसीडी विभागांतर्गत राष्ट्रीय शहरी उपजीविका अभियानाच्या तांत्रिक तज्ञ उज्वला गणेश आदींसह महिला अधिकारी आपले कर्तव्य सक्षमपणे बजावत आहेत.

#### ● पहिल्या महिला आयुक्त म्हणून शितल तेली-उगले यांना मिळाला मान

सोलापूर महापालिकेत साठ वर्षांच्या कार्यकाळात आत्तापर्यंत एकूण तीन वेळा प्रशासकीय राजवट होती. या प्रशासकीय राजवटीत आतापर्यंत एकूण सात प्रशासक तथा आयुक्तांनी कारभार पाहिला. आठवे प्रशासक म्हणून शितल तेली-उगले यांनी काम पाहिले. शितल तेली- उगले या सोलापूर महापालिकेच्या पहिल्या महिला आयुक्त तथा प्रशासक ठरल्या. नुकतीच त्यांची बदली झाली. तसेच पहिल्या नगर अभियंता म्हणून सारिका अकुलवार यांना मान मिळाला आहे.

#### ● आरोग्य विभागात महिला राज

सोलापूर महापालिकेच्या आरोग्य अधिकारी डॉ. राखी माने यांच्या मार्गदर्शनाखाली या विभागाचा कारभार बहुतांश महिला अधिकारी सांभाळत आहेत. यामध्ये जन्म-मृत्यू नोंदणी विभाग प्रमुख डॉ. मंजिरी कुलकर्णी, शहर क्षयरोग अधिकारी डॉ. अरुंधती हराळकर, कुटुंब कल्याण अधिकारी डॉ. वैशाली शिरशेट्टी, नेत्ररोग तज्ञ डॉ. तनवंगी जोग, सोनोग्राफी विभागाच्या डॉ. मीनल चिडगुपकर आदींसह महिला अधिकारी आरोग्य सेवेची जबाबदारी चांगल्या पद्धतीने सांभाळत आहेत.

# शिवदारे महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय विज्ञान परिषद

### ▸ इनोव्हेशन्स इन बायोटेक्नॉलॉजी फॉर सस्टेनिबिलीटी या विषयावर मार्गदर्शन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ मार्च-**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ आणि दक्षिण सोलापूर तालुका शिक्षण मंडळ संचलित व्ही. जी. शिवदारे कॉलेज ऑफ आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स, जैवतंत्रज्ञान विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने १० व ११ मार्च रोजी आंतरराष्ट्रीय विज्ञान परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती विश्वस्त भीमाशंकर शेटे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

शिवदारे महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय स्तरावरील परिषदेचे दुसऱ्यांदा आयोजन करण्यात आले आहे. इनोव्हेशन्स इन बायोटेक्नॉलॉजी फॉर सस्टेनिबिलीटी या महत्त्वाच्या विषयावर मार्गदर्शन चर्चा आणि सादरीकरण होणार आहे. या परिषदेचे उद्घाटन विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. प्रकाश महानवर यांच्या हस्ते व दक्षिण सोलापूर तालुका शिक्षण मंडळाचे अध्यक्ष राजशेखर शिवदारे यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. सिंबायोसिस संस्थेचे कुलसचिव डॉ. एम. एस. शेजुळ यांचे बीजभाषण होणार आहे. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील नामांकित संस्था व विद्यापीठांमधून




तज्ञ संशोधक या परिषदेत मार्गदर्शन करणार आहेत.

या परिषदेत पुत्रा युनिर्व्हिसिटी, मलेशिया येथील डॉ. मरियातुलबक अब्दुल रझाक, डॉ. नूर फतेह मोहम्मद युसुफ, ऑस्ट्रेलिया येथील फिजीओथेरेपिस्ट डॉ. सीन गोल्डबर्ग, एन. आर.सी.पी. सोलापूर येथील वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. मंजुनाथ, आय. ए. आर. आय. नवी दिल्ली येथील वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. राघवेंद्र, सी. एस. आर. आय. नीरी, नागपूर येथील वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. देवश्री खान, आय. सी.ए.आर. एन.बी.पी.जी.आर. नवी दिल्ली येथील डॉ. गौथमी, मिस्टर बायोलॉजिस्ट, गुवाहाटी, आसाम येथील डॉ. प्रियांका पन्ही आदी तज्ञ मार्गदर्शन करणार आहेत. दोन दिवसीय परिषदे दरम्यान मार्गदर्शन सत्रे, संशोधकांशी थेट संवाद, प्रकल्प सादरीकरण स्पर्धा, सायंटिफिक पोस्टर स्पर्धा अशा उपक्रमांचे नियोजन करण्यात आले आहे. या परिषदेत सुमारे २७५ विद्यार्थी आणि प्राध्यापक सहभागी होणार आहेत.

या पत्रकार परिषदेस प्राचार्य डी. एस. सुत्रावे, डॉ. गोपिका मंजुनाथ, प्रा. डॉ. अनमोल वळसंगे, प्रा. डॉ. ऋषिकेश धनवे, प्रा. लक्ष्मीपुत्र गोटे, प्रा. डी.एस. बनसोडे आदी उपस्थित होते.



# बसस्थानकाच्या सुरक्षेसाठी ‘नो कॉम्प्रोमाइज’

### ▸▸ भाडेतत्त्वावरील सुरक्षेऐवजी एसटीने स्वतःच्या सुरक्षारक्षकांची करावी नेमणूक

**तभा वृत्तसेवा । यशवंत गुरव**
**सोलापूर, दि. ७ मार्च-**

पुण्यातील स्वारगेट येथील घटनेनंतर राज्यातील सर्व बसस्थानक परिसर अलर्ट मोडवर आलेले आहेत. कोणतीही दुर्दैवी व अप्रिय घटना यांच्यावर ताप बसण्यासाठी एसटी म हामंडळ मध्यवर्ती कार्यालयाकडून ठोस उपाययोजना राबविण्यात येत आहेत. महिलांच्या सुरक्षेसाठी आता एसटीच्या मध्यवर्ती कार्यालयाच्यावतीने ‘‘नो कॉम्प्रोमाइज’’ ही भूमिका घेत महिला सुरक्षारक्षकांची नेमणूक करण्याची तयारी सुरू केली आहे. त्यासंबंधी निविदा प्रक्रिया ही राबवण्यात आली आहे. मात्र भाडेतत्वावरील सुरक्षारक्षकांची नेमणूक करण्यापेक्षा स्वतःच्या मालकीची सुरक्षारक्षकांची नेमणूक एसटी महामंडळाने करावी, असा सूर आता प्रवासी व महिलांमधून उमटत आहे.

दरम्यान, बसस्थानकासह, कार्यशाळा व डेपो येथे देखील सुरक्षारक्षकांची नेमणूक करणे गरजेचे आणि कर्मप्राप्त बनलेले आहे. पहाटेच्या व रात्रीच्या अंधाराचा फायदा घेत, अप्रिय घटनांना वाव मिळत आहे. अशा परिस्थितीत सुरक्षारक्षकांची जबाबदारी आणि महत्त्व अधिक मोठे आहे. परंतु भाडेतत्त्वावर नेमण्यात आलेले सुरक्षारक्षक याकडे फारसे लक्ष देत नाहीत. त्यामुळे अशा घटना वारंवार घडत राहतात. त्यावर चाप बसत नाही. परंतु त्याच ठिकाणी एसटी महामंडळाच्या स्वतःच्या मालकीची सुरक्षारक्षकांची नव्या दमाची फळी तैनात करण्यात आल्यास, अशा घटनांना अप्रिय व दुःखद घटनांना जबर खीळ बसणार आहे. कारण एसटी महामंडळाची नेमण्यात आलेली सुरक्षारक्षकांची फळी अत्यंत जबाबदारीने आणि कारवाई होण्याच्या भीतीने कार्यरत राहणार आहे. ज्या पद्धतीने एसटी महामंडळाचे चालक वाहक दिवस-रात्र शिफ्ट मध्ये कार्यरत राहतात त्याचप्रमाणे एसटीच्या स्वतःच्या मालकीचे सुरक्षारक्षक देखील कार्यरत राहतील. त्यामुळे अशा घटनांना वेळीच आळा घालण्यात येणार आहे.

सध्या सोलापूर विभागासह राज्यातील इतर एसटी विभागात मेस्को या खाजगी कंपनीद्वारे विविध एसटी बसस्थानक, डेपो, कार्यशाळा येथे सुरक्षारक्षकांची नेमणूक केली जाते. ज्यामध्ये सेवानिवृत्त माजी सैनिक, तैनात केले जातात. परंतु सेवानिवृत्त झालेल्या सुरक्षारक्षकांवर मर्यादा येतात. त्याच पद्धतीने कंपनीकडून देखील त्यांच्यावर कोणतीच कारवाई केली जात नाही. स्वारगेट घटनेनंतर तेथील सुरक्षारक्षकांना काढून दुसरे सुरक्षारक्षक नेमण्यात आले. परंतु त्यांच्यावर कोणतीच कायदेशीर कारवाई झाली नाही किंवा होऊ शकत नाही. अशाप्रसंगी एसटीचे सुरक्षारक्षक तैनात करण्यात आले, असता त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्याचा अधिकार एसटी महामंडळाकडे राहिला असता, त्यामुळे कर्मचारी अत्यंत प्रामाणिकपणे व जबाबदारीने आपले कर्तव्य बजावले असते. त्यासाठीच एसटी महामंडळाद्वारे सुरक्षारक्षकांची देखील भरती करावी, अशी मागणी आता केली जात आहे.

यापूर्वी सन२०१६ सालापर्यंत सुरक्षारक्षकांची नेमणूक एसटी महामंडळातर्फे करण्यात आली होती. त्यातील काही सुरक्षारक्षक सेवानिवृत्त झाले, तर काही हाताच्या बोटावर म ोजण्या इतकेच सुरक्षारक्षक कार्यरत आहेत. परंतु मोजक्याच कर्मचाऱ्यांच्या जोरावर एसटीच्या मोठ्या क्षेत्रफळाचे रक्षण करणे अवघड आणि जिकरीचे आहे. त्यामुळे खाजगी कंपनीद्वारे सुरक्षारक्षकांची नेमणूक करण्याऐवजी महामंडळाने स्वतःचे कर्मचारी भरती करावेत, यापूर्वी प्रमाणेच भरती प्रक्रिया राबवण्याची गरज आहे. अशी चर्चा आता दबक्या आवाजात एसटी महामंडळाच्या कार्यालयात ऐकण्यास मिळत आहे.

#### एसटीने स्वतःची का करावी सुरक्षारक्षकांची नेमणूक?

रेल्वे पोलीस फोर्स ज्या पद्धतीने रेल्वेसाठी कार्यरत आहे. अगदी त्याचप्रमाणे एसटी महामंडळाची सुरक्षारक्षकांची फौज कार्यरत करावी. जेणेकरून बसस्थानक परिसरात कोणतेही अप्रिय घटना घडणार नाही. एसटी बसस्थानकात प्रवाशांच्या सेवेसाठी आणि चोरीसारख्या घटना घडू नये, यासाठी पोलीस चौकी उभारण्यात आली आहे. त्याचप्रमाणे सुरक्षारक्षकांची चौकी उभारावी. येथे सुरक्षारक्षकांची नेमणूक करावी. रात्री तसेच पहाटे प्रवास करणाऱ्या प्रवाशांना यामुळे धैर्य मिळणार आहे. विशेषतः महिला वर्गांना सुरक्षेबाबत निश्चिंत राहता येऊ शकणार आहे. अन्यथा अशा घटनांना अधिक वाव मिळण्याची शक्यता नाकारता येत नाही. तालुका तसेच गावपातळीवरील बसस्थानक परिसरात अशी सुरक्षा अत्यंत महत्वाची ठरणार आहे. त्यासाठी एसटी महामंडळ पर्यायने परिवहन मंत्रालय आणि राज्य शासनाने याकडे गंभीर्याने पाहिले पाहिजे.

#### तर वेतनावरील होणारा अतिरिक्त खर्च होणार कमी


सन २०१६ पूर्वी एसटी महामंडळाची स्वतःची सुरक्षा रक्षकांची फळी तैनात होती. परंतु त्यानंतर सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांच्या बदल्यात कोणतीच भरती झाली नाही. शासनाने व महामंडळाने देखील यामध्ये स्वारस्य दाखवले नाही. निविदाप्रक्रिया काढून खाजगी कंपनीला टेंडर देणे पसंत केले. वास्तविक पाहता सेवानिवृत्त माजी सैनिकाचे वेतन स्केल पाहता, एसटी कर्मचाऱ्यांचे वेतन स्केल हे आवाक्यात असणार आहे. जे की, महामंडळाच्या खिशाला परवडणारे आहे. सध्या एका माजी सैनिक सुरक्षारक्षकाचे वेतन एसटीमध्ये कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या वेतनापेक्षा जास्त आहे. अशा परिस्थितीत एसटी महामंडळाने जर आपली स्वतःची सुरक्षारक्षकांची नेमणूक केल्यास वेतनावरील होणारा अतिरिक्त खर्च कमी होणार आहे.



## ज्ञानामृत आनंदलहरी - १०५०

**माकडाच्या गळां रत्न कुळांगना ।**
**सांडुनियां सुना बिदी धुंडी ।।**

बलाढ्य व हिंस्र असणारे पशुदेखील मणसाच्या शिकवणीमुळे खूप चांगले वागतात. अर्थात, बुध्दीवादी मानवाप्रमाणे वर्तन करतात. पण मानवाच्या पोटी जन्माला आलेले अनेक लोक पुन्हा-पुन्हाफ शिकवूनही किंवा समजावून सांगूनही माणसाप्रमाणे वागत नाहीत. त्यांच्या मनाला येईल तेच ते करतात. माणसाने स्वत:च्या मनाप्रमाणे वागावे, हे जरी खरे असले तरी समाज हिताच्या किंवा नीती- नियम ाच्या विरुध्द वागू नये हे ही तेवढेच खरे आहे. स्वत:ला खूप शहाणा समजणारा माणूस कितीही सांगितले तरी त्याला वाटेल तेच म्हणजेच अेकवेळा चुकीचेच करतो. आपलेच खरे म्हणणाऱ्यांकडून किंवा वाईटाचीच संगत योग्य म्हणणाऱ्याकडून चांगलेपणाची अपेक्षा करणे चूक आहे. बीजच मूळात योग्य नसेल तर चांगल्या वृक्षाची व फळाची अपेक्षा करणे योग्य नसते. त्याप्रमाणे मनाशी मीपणाची, अहंकाराची गाठ बांधून भरधाव वागणाऱ्यांकडून चांगलेपणाची अपेक्षा व्यर्थ ठरते.



माकडाच्या गळयात रत्नाची माळ बांधली तरी ते माकड ती माळ तोडून टाकते, किंवा श्वानप्रवृत्तीच्या म्हणजेच बाहेरख्याली माणसाचे लग्न कुलस्त्रीशी लावून दिले तरी तो मूर्ख त्या कुलस्त्रीला टाकून वेश्येचे दार ठोठावल्याशिवाय राहात नाही. हे सांगतांना तुकाराम महाराज म्हणतात, माकडाच्या गळां रत्न कुळांगना । सांडुनियां सुना बिदी धुंडी ।। कांही माणसं समजावण्याच्या किंवा सुधारण्याच्या पलीकडे गेलेली असतात. त्यांचा अहंकार, मीपणा त्यांना सुधारु देत नाही. इतरांचे ऐकण्याची मानसिकता न जोपासणारे हे लोक समाजासाठी एक प्रकारची कीड असतात. ही कीड सुधारणे अत्यंत आवश्यक आहे. संत, महात्म्येच अशा मूर्ख लोकांना सुधारु शकतात. हे खरे असले तरी आपणही अशांना सुधारण्याचा प्रयत्न केलाच पाहिजे. महाराजांनी बाहेरख्याली व्यक्तींच्या स्वभावाचे स्पष्टीकरण आजच्या अभंगात केले आहे. बाहेरची घाण गोड वाटून घेणारी ही माणसं आपला संसार आपल्या हाताने उघडयावर पाडतात. कुलस्त्री पत्नी म्हणून लाभली याचं भाग्य न समजता हे लोक आपल्या सुस्वभावी पत्नीला लाथाडतात. तिच्या भावनेशी खेळून बाहेर जातात. बाहेर जाण्याची त्यांची ही वृत्ती त्यांना एड्ससारख्या रोगाच्या जाळयात ओढू शकते. त्यांच्या अशा चुकीच्या वृत्तीमुळे त्यांना जडला जाणारा हा एड्स दूर्दैवाने कुलस्त्री असणाऱ्या पत्नीच्या नशिबीही येऊ शकतो. सुखी संसाराची राख-रांगोळी होऊ शकते. आपल्या हातानीच संसार उध्वस्त करायचा, आणि आपल्या डोळयांनीच आपला संसार उध्वस्त झालेला पहायचा म्हणजे किती मूर्खपणा आहे. असा मूर्खपणा करणारी माणसं समाजात आहेत. म्हणूनच महाराजांनी हा दृष्टांत दिला आहे. आपल्या धर्मपत्नीबरोबर सुखाने संसार करणाऱ्याच्या बाबतीत चुकीचे व वाईट असे कांही घडत नाही. चुकीची जाणीव आपणाला होणे व त्यात सुधारण होते अत्यंत आवश्यक असते. वेळ निघून गेल्यानंतर त्यात बऱ्याचवेळा सुधार करण्याची इच्छा होऊनही कांही अर्थ उरत नाही. म्हणून माणसाने चुकीच्या दुरुस्तीचे पाऊल तातडीने उचलायला हवे. ज्ञानोबा-तुकोबांच्या भक्तांकडून अशा चुकाच होणार नाहीत, अशी अपेक्षा बाळगणे योग्यच होईल.

**जय जय राम कृष्ण हरी ।**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| वार : शनिवार | दिनविशेष - |
| दि. ८ मार्च २०२५ | चांगला दिवस |
| विक्रम संवत् २०८०-८१ | जागतिक महिला दिन |
| शके - १९४६ | ....राहू काल.... |
| संवत्सर - क्रोधी नाम | रविवार : दु.४.३० ते ६.०० |
| मास - फाल्गुन | सोमवार : स. ७.३० ते ९.०० |
| शु. नवमी (०८.१६) | मंगळवार : दु. ३.०० ते ४.३० |
| ऋतु - वसंत | बुधवार : दु. १२ ते १.३० |
| नक्षत्र - आर्द्रा (२३.२७) | गुरुवार : दु. १.३० ते ३.०० |
| योग - आयुष्मान (१६.२३) | शुक्रवार : स.१०.३० ते १२ |
| करण - तैतिल (१९.५६) | शनिवार : स. ९ ते १०.३० |

### राशीभविष्य

**मेष :** अनावश्यक चिंतापासून दूर रहा. देणे-घेणे पासून सावधानता बाळगा. लोभ-लालचे पासून दूर रहा. धंदा मध्यम राहील. कौटुंबिक परिवारात सुख - शांती मिळेल.
**वृषभ :** मुलांनी केलेल्या कामां मुळे प्रतिष्ठा वाढेल. कामकाजाचा विस्तार होईल. अनावश्यक कामासाठी वेळ वाया घालू नका. प्रयत्न केल्यास थांबलेला पैसा निघून येईल.
**मिथुन:** व्यवसायाच्या विस्तारा संबंधी योजना आखाल. आरोग्याची काळजी घ्या. रोजगारात यश व फायदा मिळण्याची शक्यता.
**कर्क:** अडकलेला पैसा मिळेल. राजकीय व्यक्तींपासून फायदा होईल. वहान चालविताना सावधानीने चालवा. नवीन योजनांची सुरूवात कराल.
**सिंह :** व्यावहारिक अडचणी दूर होतील. विद्यार्थ्यांना आपल्या प्रगतीत वाढ होईल. प्रतिस्पर्धा मुळे लाभ होण्याची शक्यता. पत्नीसोबत मतभेद होईल.
**कन्या :** कुटुंबात प्रसन्न वातावरण राहील. व्यापारासाठी प्रवास होण्याचा योग आहे. काम काजात गुप्तता बाळगा, आर्थिक स्थिती चांगली राहील.
**तुळ :** आवश्यक कामांसाठी पूर्ण वेळ द्यावा. आर्थिक योग चांगला. नोकरीमध्ये उत्साह वाढेल. प्रवास जपून करा. वाचनाची आवड लागेल.
**वृश्चिक :** अनिश्चिततेमुळे अडचणी वाढतील. व्यापारीक वाद, मतभेद होण्याची शक्यता, जबाबदारीचे काम सांभाळून करा, आर्थिक योग मध्यम, कौटुंबिक जीवन सुखी राहील.
**धनु :** योजनेनुसार कामे पार पडणार नाहीत. व्यावसायिक चिंता राहील. मुलांच्या व्यवहारामुळे दु:खी व्हाल. सहयोगी मदत करणार नाहीत.
**मकर :** फायद्याच्या बातम्या ऐकण्यास मिळतील. सामाजिक किंवा राजकीय प्रसिद्धी मिळेल. व्यापार चांगला चालेल. घरासंबंधी समस्या दूर होतील.
**कुंभ :** मागे केलेल्या कामाचे फळ मिळेल. धंद्यात स्वत: निर्णय घेतल्यास निश्चित फायदा. दुसऱ्यांवर विश्वास ठेवू नका.
**मीन:** कर्मा विषयी उत्साह ठेवा. बुद्धी व तर्काने कार्यामध्ये सफलता मिळण्याचे योग आहेत. व्यापारात नवीन योजनेमुळे लाभ होईल.

# पाणी व स्वच्छतेसाठी योगदान देण्याऱ्या महिलांचा आज सन्मान

### मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ मार्च-**

जिल्हा परिषदेच्या जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्षच्यावतीने जिल्हयात पाणी, स्वच्छता व आरोग्य संबंधित उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या महिलांना प्रेरणा देण्यासाठी जागतिक महिलादिनी शनिवारी ८ मार्च रोजी जिल्हा, तालुका व गावस्तरावर विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. पाणी व स्वच्छता संबंधित उत्कृष्ट व आदर्श काम करणाऱ्या महिलांचा सन्मान करण्यात येणार असल्याची माहिती जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी दिली.

यावेळी कुलदिप जंगम म्हणाले, जिल्हा परिषदेच्या जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्षच्यावतीने जिल्हयात दरवर्षी जागतिक म हिला दिनी विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाते.त्यानुसार यावर्षी जागतिक महिला दिवस शनिवारी ८ मार्च रोजी सर्व ग्रामपंचायती मध्ये महिलांची विशेष धाव (वॉश रन) आयोजित करण्यात येणार आहे. यामध्ये महिला, बचत गटातील उमेद, किशोरवयीन मुली, विद्यार्थीनी, स्वच्छता कर्मचारी,पाणी व स्वच्छता समितीचे सदस्य, ग्रामपंचायत सदस्य आणि समुदयातील प्रभावशाली लोकांचा समावेश करून पाणी, स्वच्छता व आरोग्य संबंधित संदेशाद्वारे जनजागृती करण्यात येत आहे. ८ मार्च रोजी जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायतीमध्ये विशेष महिला सभेचे आयोजन केले आहे. या दिवशी ग्रामपंचायतीमध्ये पाणी, स्वच्छता व आरोग्य संबंधित कार्यक्रमाच्या अंमलबजावणी दरम्यान सद्यस्थितीत येणाऱ्या अडी अडचणी बाबत चर्चा करण्यात येणार आहे.

सर्व तालुकास्तरावर सत्कार सोहळा आयोजित करणे, ग्रामस्तरावर पाणी, स्वच्छता व आरोग्य क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या स्वच्छता कामगार महिला, स्वच्छतेच्या मालमत्तेचे परिचालन, देखभाल व दुरुस्ती संबंधित सुयोग्य व्यवस्थापन करणारे महिला नेतृत्व, किशोरवयीन चॅम्पियन, क्षेत्रीय तपासणी संचाच्या सहाय्याने पाणी गुणवत्ता सनियंत्रण व सर्वेक्षण करणाऱ्या महिलांचा तालुकास्तरावर सत्कार सोहळा आयोजित केला आहे.तालुका स्तरावर आयोजित करणेत येणाऱ्या कार्यशाळेत महिला आरोग्य अधिकाऱ्यांचे महिलांच्या आरोग्याविषयी मार्गदर्शन करण्यात येणार आहे. यावेळी महिलांचा विशेष सन्मान करण्यात येणार आहे. पाणी व स्वच्छतेचे व्यवस्थापन करणारे स्वयंसेवी गट, नेते, किशोरवयीन चॅम्पियन, पाणी गुणवत्ता बाबत देखभाल दुरुस्त करणाऱ्या महिला (एफटीके किट वापरून) आणि वॉशच्या कार्यात महत्त्वपूर्ण योगदान देणाऱ्या सर्व व्यक्तींचा समावेश करण्यात आला असल्याचेही मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी सांगितले.

### एक महिला आदर्श ग्रामपंचायतीची उभारणी

जिल्हयातील सर्व ग्रामपंचायतीमधून एक महिला अनुकूल आदर्श ग्रामपंचायतींची (मॉडेल) ग्रामपंचायत म्हणून उभारणी करण्यात येणार आहे .स्थानिक महिला नेतृत्वासोबत गट चर्चा किंवा कथाकथन सत्रे तसेच आरोग्याविषयी गावस्तरावर आरोग्य अधिकारी यांची मार्गदर्शने आयोजित करण्यात आले आहेत. समाज माध्यमे व कथा कथनाच्या माध्यमातून प्रचार प्रसिद्धी करण्यात येणाऱ्या तसेच पाणी, स्वच्छता व आरोग्य संबंधित उत्कृष्ट काम करणाऱ्या महिलांच्या प्रेरणादायी कथांना समाज माध्यमे व कथा कथनाच्या माध्यमातून प्रचार प्रसिद्धी करणेत येणार आहे. **- अमोल जाधव, उपमुख्य कार्यकारी अधिकारी**

### महिला दिनानिमित्त सर्व ग्रामपंचायतीमध्ये ग्रामसभा

जिल्हयात जागतिक महिला दिनी राबविण्यात येणारे उपक्रम प्रत्येक ग्रामपंचायती मध्ये राबविणे बंधनकारक असणार आहे. ग्रामपंचायतीमध्ये ८ मार्च रोजी विशेष ग्रामसभेचे आयोजन करून पाणी, स्वच्छता व आरोग्य संबंधित कार्यक्रमाच्या अंमलबजावणी दरम्यान सद्यस्थितीत येणाऱ्या अडचणीबाबत चर्चा करणे आवश्यक आहे.

**- इशाधीन शेळकंदे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी**




# ज्ञान प्रबोधनी प्रशालेत वैभव भोईचा सन्मान सोहळा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ मार्च-**

पुणे- सोलापूर महामार्गावर दि. ९ फेब्रुवारी २०२५ रोजी वेल्हेतील महिलांचा झालेल्या भीषण बस अपघातात १७ महिला प्रवासी अडकल्या होत्या. मात्र त्यावेळी धाडस दाखवत तेथील हॉटेलमध्ये काम करणारा युवक वैभव भोई याने प्रसंगावधान राखून पायात काच घुसत असताना देखील स्वतःची पर्वा न करता, इतर कुणाची मदतीची वाट न पाहता पटापट जखमी अवस्थेतील महिलांना व लहान मुलांना सुखरूप बाहेर काढले. त्याच्या धाडसाचे आणि समाजसेवेच्या भावनेचे कौतुक करण्यासाठी ज्ञान प्रबोधिनी सोलापूर प्रशालेत बुधवार दिनांक ६ मार्च रोजी त्याचा सन्मान करण्यात आला.

या कार्यक्रमात प्रशालेतील ५०० विद्यार्थी शिक्षक वृंद आणि युवक उपस्थित होते. त्याच्या सत्कारार्थ ज्ञान प्रबोधिनी पुण्याच्या ज्येष्ठ कार्यकर्त्या बागेश्रीताई पोंक्षे यांच्या देणगीतून रु.२५००/- पारितोषिक त्यास दिले. सभेत वैभवने विद्यार्थ्यांसमोर झालेल्या प्रसंगाचे अनुभव कथन केले. बोलताना वैभव म्हणाला, माझी ती नैतिक जबाबदारी होती. मानवतेच्या दृष्टिकोनातून मी ते कर्तव्य पार पाडले. मदत मिळवून देणे हीच खरी सेवा आहे. मुख्याध्यापिका सुनीता चकोत यांनी वैभवचे आभार मानले आणि अशा युवकांमुळे समाजात माणुसकी जिवंत राहते, असे मत व्यक्त केले. कार्यक्रमाच्या शेवटी विद्यार्थ्यांनी वैभवच्या धाडसाला टाळ्या वाजवून दाद दिली.

# २६ हजार शेतकऱ्यांचा पिकविमा अडकला ‘पोर्टलवरच’

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ मार्च-**

आपल्या राज्यात २०१६ च्या खरिप हंगामापासून प्रधानमंत्री पीक विमा योजना राबवण्यात येत आहे. महाराष्ट्र सरकारनं २०२३ मध्ये या योजनेत मोठा बदल करण्याचा निर्णय घेतला. नवीन बदलांनुसार, गेल्या वर्षीपासून 'सर्वसमावेशक पीक विमा योजना' राज्यात राबविण्यात येत आहे. त्यानुसार, शेतकरीदादा आता केवळ १ रुपयात पीक विम्यासाठी अर्ज भरतो.


दरम्यान, २०२३-२४ साली जिल्ह्यातून खरीप हंगामासाठी ४ लाख ५ हजार ८५७ शेतकऱ्यांनी अर्ज केला होता अन् रब्बीसाठी ४५ हजार ६९८ जणांनी पिकविमा भरला होता. यातील मंजूर पिकविम्यापैकी अजून २६ हजार २५५ शेतकऱ्यांचे जवळपास २ कोटी रुपये अडकल्याची माहिती संबंधित यंत्रणेकडून मिळाली. प्रधानमंत्री पीक विमा योजना खरिप हंगाम २०२३ नुकसान भरपाईची मिळालेली माहिती अशी आहे. जिल्ह्यातून ४ लाख ५ हजार ८५७ शेतकऱ्यांनी पिकविमा मिळण्यासाठी अर्ज भरला. यासाठी २१८.०९ कोटीची नुकसानीची पिकविमा मागणी संबंधित विमा कंपनीकडे केली होती. यातील ३ लाख ९५ हजार ३३७ इतक्याच शेतकऱ्यांना २१६.४४ कोटीची नुकसान भरपाई मिळाली आहे तर २० हजार ५७१ शेतकऱ्यांचे अर्ज विविध कारणांमुळे प्रलंबित असून, त्यांचे १ कोटी ६३ लाख आजही पोर्टलवरच अडकले आहेत.

### पीक विमा भरताना घ्या खालील गोष्टींची काळजी

पीक विमा योजनेत भाग घेणेसाठी आधार कार्ड, बँक खाते आणि सातबारा उतारा यावर नाव एकसारखे असणे आवश्यक असून, यात किरकोळ बदल असला तरी विमा योजनेत सहभागी होता येणार नाही, याबाबत स्पष्टीकरण देताना कृषी आयुक्तालयानं म्हटलंय की, आधार कार्ड व बँक खात्यात बहुतेक नावे सारखी असतात. पण सातबारा उताऱ्यावर कधीकधी नावात किरकोळ बदल असतो. असं असलं तरी विमा अर्ज भरण्यासाठी कोणतीही अडचण येणार नाही. नावात थोडासा बदल असल्यास हरकत नसेल, पण पूर्णनाव, आडनाव वेगळे असल्यास ते चालणार नाही. नावात असलेला बदल विमा कंपनी मार्फत तपासला जाईल आणि तपासणी अंती अर्ज स्वीकृतीबाबत पुढील कार्यवाही केली जाईल. त्यामुळे शेतकऱ्यांनी गोंधळून जावू नये, असे आवाहन कृषी विभागामार्फत करण्यात आलं आहे.

## संघ हीच जीवनगाथा

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जनक डॉक्टर केशव बळीराम हेडगेवार (जन्म १ एप्रिल १८८९, मृत्यू २१ जून १९४०). आपल्यासमोर संघ हीच जीवनगाथा या शीर्षकाखाली मी छोट्या छोट्या कथा लिहित आहे. या कथांचे स्वरूप आहे अलक. म्हणजे अति लघु कथा.



ही कथा वाचायला सोपी; स्मरणात ठेवायला सोपी; समजायला सोपी; अशी असेल असा माझा प्रयत्न आहे. आधीच सांगते कथा म्हणजे निव्वळ गोष्ट नव्हे एवढे ध्यानी ठेवावे. जसे यथा म्हणजे येन प्रकारेण; तथा म्हणजे तेन प्रकारेण; सर्वथा म्हणजे सर्वे प्रकारेण तसेच कथा म्हणजे केन प्रकारेण, या अर्थाने मी अलक लिहिले आहे.

**- सुरेखा विजय काणे,**
छत्रपती संभाजीनगर
माजी जिल्हा बौद्धिक प्रमुख राष्ट्र सेविका समिती, मो. ९९६००५३५२१

### अलक:- (७२) समर्पण

श्री गुरुजींचे जीवन श्रेष्ठ समर्पणाचे एक उज्वल उदाहरण आहे. ध्येयका ध्यान ना भुले कार्य मे रत हो सदा हा संदेश श्री गुरुजींमध्ये संस्कारगत होता. ध्येयासाठी आपले दैनंदिन आयुष्य त्यांनी अक्षरशः वेचले. संकल्प शक्ती व कष्ट सहन करण्याची शक्ती त्यांनी ध्येय सिद्धीसाठी पणाला लावली. गुरुजी हजारो लोकांच्या मध्ये सतत वावरत असत आणि त्यांच्यामध्ये समाज बोध व राष्ट्रभक्ती जागवत असत. त्यांनी जीवनभर एकच व्यक्तित्व स्वीकारलं ते म्हणजे स्वयंसेवकत्व. त्यांची एकच आकांक्षा होती- पूर्ण स्वयंसेवक म्हणूनच जगायचं. त्यासाठी विश्राम आणि विराम ला त्यांनी आग्रहाने दूर सारले होते. गुरुजी स्वतःच सांगतात-मी एक दिवस गृहत्याग करून अध्यात्म मार्गावरून चालू लागलो; हिमालयात हिंडता हिंडता 'सारगाछी' आश्रमात स्थिर झालो. त्यांचे गुरु होते स्वामी अखंडानंदजी. स्वामीजी रामकृष्ण परमहंस यांच्या ११ पट शिष्यातील ते एक होते. एकदा स्वामी अखंडानंदजी गुरुजींच्या डोक्यावरून हात फिरवत म्हणाले होते-माधव तेरे सिरके बाल, तेरी दाढी-तेरे व्यक्तित्व को निखार रही है। हे तू सदैव असेच राहू दे. गुरुच्या भावनेचा आदर त्यांनी जीवनभर केला. आणि म्हणूनच त्यांच्या व्यक्तित्वावर अध्यात्मिकतेची छाप कायम होती.

**- क्रमशः**

# जिल्ह्यातील शेतकऱ्यांची अर्थवाहिनी असणाऱ्या जिल्हा बँकेचा पुन:श्च सुवर्णकाळ सुरु : संजयमामा शिंदे

**सोलापूर जिल्ह्याची अर्थवाहिनी असलेल्या सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने दि. ०८.०३.२०१८ रोजी शतकोत्तर वाटचालीस सुरुवात केली असून, दि.०८.०३.२०२५ रोजी बँकेचा १०७ वा वर्धापन दिन साजरा करत आहोत. दरम्यान, जिल्ह्यातील शेतकऱ्यांची अर्थवाहिनी असलेल्या या जिल्हा मध्यवर्ती बँकेचा पुन:श्च सुवर्णकाळ सुरू झाल्याचे दिसून येत आहे.**





सन १९९७-९८ साली सोलापूर जिल्हा मध्यवर्ती बँकेत तत्कालीन चेअरमन आ. दिलीप सोपल यांनी जिल्ह्यातील शेतकरी, कामगार, मजूर यांच्या ८५० मुलांना बँकेत नोकरी दिली. तथापि तत्कालीन राजकीय परिस्थिती व तत्कालीन संघटनेने ८५० कर्मचा-यांना सेवेत कायम होण्यास विरोध केला होता. या संघर्षातून दि.०३.१२.२००७ रोजी सहकाराचे महामेरु कै. सुधाकरपंत परिचारक यांच्या आशिर्वादाने व मार्गदर्शनाखाली जिल्हयात कार्यरत असलेल्या सर्व सहकारी बँकामध्ये काम करणा-या कर्मचा-यांच्या आर्थिक व इतर प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी सोलापूर जिल्हा सहकारी बँक कर्मचारी संघटना स्थापना करण्यात आली. सर्व कायदेशीर बाबींची प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर दि.१२.०५.२०१७ रोजी संघटनेस कायदेशीररित्या कामकाज करण्यासाठी प्रातिनिधीक व मान्यताप्राप्त दर्जा प्राप्त झाला.

संघटनेस प्रातिनिधीक व मान्यताप्राप्त दर्जा प्राप्त झालेनंतर, सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेतील कर्मचा-यांचे सेवानिवृत्तीचे वय ६० वर्षावरुन ५८ वर्षे करण्याबाबत तत्कालीन संचालक मंडळाने घेतलेला निर्णय संघटनेने कामगार आयुक्त, पुणे यांचे कार्यालयाकडे दि. १२.०६.२०१७ रोजी पत्र देवून यशस्वी होवू दिला नाही. तद्नंतर रिझर्व्ह बँकेच्या आदेशानुसार शासनाने सोलापूर जिल्हा बँकेचे संचालक मंडळ बरखास्त करुन दि.२९.०५.२०१८ पासून बँकेवर प्रशासकाची नियुक्ती केली.

त्यानंतर संघटनेने सोलापूर जिल्हयाचे भूमिपुत्र डॉ. संजय भोसले तत्कालीन साखर संचालक, संतोष पाटील, खाजगी सचिव कृषिमंत्री महाराष्ट्र राज्य व शैलेश कोतमिरे, तत्कालीन अपर निबंधक सहकारी संस्था, पुणे यांच्या समक्ष जिल्हा बँक उर्जितावस्थेत आणण्यासाठी त्यांचेकडे सहकार्य मागून व चर्चा करुन शासनाकडून आजारी जिल्हा बँकांचे डॉक्टर म्हणून राज्यात प्रसिध्द असणा-या शैलेश कोतमिरे यांची प्रशासक म्हणून नियुक्ती करुन घेतली. यासाठी मला तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, देशाचे नेते शरद पवार, तत्कालीन सहकार मंत्री आ. सुभाष देशमुख यांचे विशेष सहकार्य लाभले.

कोतमिरे यांनी प्रशासक पदाचा पदभार स्विकारलेनंतर संघटनेला बरोबर घेवून सर्व कर्मचा-यांमध्ये आत्म विश्वास निर्माण करुन कर्मचा-यांची मानसिकता बदलवली. बँकेचा दैनंदिन व्यवसाय हा कोटीच्या अंकातून लाखाच्या अंकात स्थिरावला होता. यामध्ये वृध्दी होणेसाठी सोलापूर शहर/जिल्हयातील नागरी सहकारी बँका, नागरी सहकारी पतसंस्था यांना समक्ष भेटी देवून जिल्हा बँकेशी दैनंदिन व्यवहार वाढविणेस प्रवृत्त केले. याची परिणती बँकेच्या ठेवी माहे मार्च २०१८ अखेरीस रु.२३३०.८० लाख होत्या

यामध्ये वृध्दी होवून त्या माहे मार्च २०२४ अखेर रु.४८४६.०६ लाखापर्यंत वाढून बँकेस उर्जितावस्था प्राप्त झाली आहे. या दरम्यान बँकेवरील प्रशासक पदाचा कालावधीस मुदतवाढीसाठी वेळोवेळी माझे नेते व उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

या दरम्यान बँकेवरील प्रशासक कालावधीस मुदतवाढ देणेसाठी व कर्मचा-यांचे प्रश्न सोडविणेसाठी माझे नेते व राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार, माझे मित्र अक्कलकोटचे आ. सचिन कल्याणशेट्टी व बार्शीचे माजी आमदार राजेंद्र राऊत, विधीज्ञ उमेश मराठे व जी. एच. कुलकर्णी यांचे मोलाचे सहकार्य लाभले. याप्रमाणे संघटनेचे काम करत असताना मला व्यक्तिशः राजकीय त्रास झाला, तथापि त्याची पर्वा न करता जिल्हयातील लाखो शेतकरी ठेवीदार व बँकेचे कर्मचारी यांचा विचार करून मी हे पाऊल उचलण्याचे धाडस केले. यामध्ये मला जिल्हा बँकेतील संघटनेचे सचिव राजेश गवळी, महेश जाधव, दिलीप पवार, तात्या कोळी, बाळासाहेब सुरवसे, शशिकांत तेलकर, आनंद डांगे, सिध्दाराम करजगीकर व संघटनेच्या इतर पदाधिकारी यांचेसह बँक व्यवस्थापनाचे मोलाचे सहकार्य मिळाले. याची परिणती बँक आज आर्थिक सक्षम झाली आहे. यात माझे संघटनेच्या प्रत्येक घटकाचा सिंहाचा वाटा आहे. याचा मला सार्थ अभिमान आहे.

बँकेचा मागील संचित तोटा रु.२५८ कोटी इतका भरुन निघून दि.३१.०३.२०२३ रोजी बँकेस रु.२०.०० कोटी इतका नफा झालेला आहे. बँक नफ्यामध्ये आल्यामुळे कर्मचा-यांचे गेल्या २७ वर्षापासूनचे आर्थिक व इतर प्रश्न प्राधान्यक्रमाने खालीलप्रमाणे सोडवून कर्मचा-यांना न्याय मिळवून दिला.

बँकेच्या कर्मचा-यांना सन २०१६-१७ पासून देय असलेले हक्क रजेचे दीडपट दराने होणारी रोखीकरणाची रक्कम मिळवून दिली. याअंतर्गत सन २०१६-१७ ते दि.३१.०३.२०२४ अखेर एकूण रु.५८ कोटी इतकी रक्कम १५०० कर्मचा-यांना मिळवून दिली. सन २०१५ पासून सेवाजेष्ठतेनुसार श्रेणीनिहाय कर्मचा-यांच्या रखडलेल्या पदोन्नती देण्याचे सुरु केले. अनुकंपा तत्वावर बँकेच्या सेवेत नियुक्त करण्यात येणा-या कर्मचा-यांचा ५ वर्षाचा प्रोबेशन कालावधी कमी करुन तो दोन वर्ष इतका करुन घेतला. मयत कर्मचा-यांच्या नातेवाईकास अनुकंपा तत्वावर नेमणूक देणेसाठी शासकीय मान्यता आणून नियुक्ती पत्रे देणेत आली. या दरम्यान बँकेचे कुशल प्रशासक कुंदन भोळे यांच्या सहकायनि दि. १७.०९.२०२४ रोजी पगारवाढ व इतर प्रश्नाबाबत ऐतिहासिक करार बँक व्यवस्थापन व संघटनेबरोबर करण्यात आला.

दि.०१.०८.२०२४ रोजी बँकेच्या पटावर असणा-या ८६६ कर्मचा-यांना दि.०१.०४.२०२४ पासून श्रेणीनिहाय रु.७०००/- ते रु.१२०००/- पर्यंत पगारवाढ मिळवून दिली. तसेच सन १९९७ साली बँकेच्या सेवेत भरती झालेल्या कर्मचा-यांना एक जादा वेतनवाढ मिळवून दिली. माहे मार्च २०२५ नंतर वरिष्ठ श्रेणीतील अधिका-यांच्या पदोन्नती व सन २०१४-१५ व २०१५-१६ सालातील अर्धापट दराने देय राहिलेली हक्क रजा रोखीकरणाची रक्कम मिळवून देणेत येणार आहे. तसेच राज्याचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, सहकार मंत्री, पालकमंत्री यांचेसमवेत बँकेचे व्यवस्थापन व संघटना यांची संयुक्त बैठक घेवून बँकेपुढील समस्या / प्रश्नाची सोडवणूक करण्याचा मानस आहे. बँक कर्मचारी यांचे सर्व प्रश्न सोडविणेकामी प्रयत्नशिल असणारे व बँकेस गतवैभव प्राप्त करुन बैंक प्रगतीपथावर नेणारे सध्याचे कुशल प्रशासक कुंदन भोळे यांचे विशेष व मोलाचे सहकार्य लाभले. तसेच जिल्हा बँकेच्या व कर्मचा-यांच्या हितासाठी मी सदैव तत्पर व कटीबध्द राहणार आहे.

**बँकेच्या आर्थिक स्थितीची मागील ५ वर्षामधील तुलनात्मक बाढ**

**(आकडे लाखात)**

| अ.नं | तपशिल | ३१ मार्च २०१८ | ३१ मार्च २०२४ | वाढ |
|---|---|---|---|---|
| १ | भागभांडवल | १८९३७.६६ | २२८०६.५६ | ३८६८.९० |
| २ | गंगाजळी | ५१८६४.७८ | ७७८२३.६० | २५९५८.८२ |
| ३ | ठेवी | २३३०८०.०५ | ४८४६०६.०६ | २५१५२६.०१ |
| ४ | बाहेरील कर्जे | ३७८६९.९० | २०२७८.९५ | -१७५९०.९५ |
| ५ | गुंतवणूक | ८४४४३.४९ | ११०७३६.१६ | २६२९२.६७ |
| ६ | कर्ज येणेबाकी | २२१४७४.१५ | ४०६५७०.९६ | १८५०९६.८१ |
| ७ | नफा /तोटा - | - २७५५४.१५ | +२०७१.३१ | +२०७१.३१ |

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

# माढा व पंढरपूरच्या सर्वांगीण विकासासाठी आ. अभिजीत पाटलांचे शर्तीचे प्रयत्न

## अर्थसंकल्पीय अधिवेशनात मतदार संघाच्या समस्यांकडे वेधले लक्ष

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ७ मार्च -**

आमदार अभिजीत पाटील यांनी माढा व पंढरपूर मतदार संघातील अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या प्रश्नांकडे लक्ष वेधून घेत हिवाळी अधिवेशनानंतर पार पडत असलेल्या विधानसभा अर्थसंकल्पीय अधिवेशनातही मतदार संघाच्या सर्वांगीण विकासासाठी महत्त्वपूर्ण मागण्या केल्या. सध्या उन्हाचा कडाका वाढत चालल्याने पाण्याचा प्रश्न भेडसावू नये यासाठी माढा तालुक्यातील पाणीप्रश्न सोडवण्यासाठी तातडीने उपाययोजना कराव्यात, माढा तालुक्यातील नागरिकांना दर १० ते १२ दिवसांतून एकदा पाणीपुरवठा केला जातो या संदर्भात तातडीने उपाययोजना कराव्यात.

आष्टी तलाव व दारफळ-सीना माढा प्रकल्प या दोन्ही स्रोतांचा समन्वय करून माढा शहर व तालुक्याला कायमस्वरूपी पाणीपुरवठा करावा. यासाठी आवश्यक पाणीपुरवठा योजनांना तात्काळ मंजुरी मिळावी व निधी उपलब्ध करून द्यावा.



माढा तालुक्यात नवीन पोलीस स्टेशन आणि उपविभागीय पोलीस कार्यालय स्थापन करावे. माढा तालुक्यात सध्या माढा, कुर्डूवाडी आणि टेंभुर्णी ही तीन पोलीस ठाणी कार्यरत आहेत. मात्र मोडनिंब पोलीस स्टेशनचा प्रस्ताव अद्याप प्रलंबित आहे. त्यामुळे तो तातडीने मंजूर करून या परिसरातील कायदा-सुव्यवस्था मजबूत करावी. सध्या माढा तालुक्याचा काही भाग बार्शी व करमाळा या ठिकाणी जोडला जातो. त्यामुळे स्थानिक नागरिकांची गैरसोय होते. यासाठी माढा येथे कार्यालय आणि स्वतंत्र युनिट स्थापन करावे. टेंभुर्णी पोलीस ठाण्यासाठी नवीन इमारतीची गरज आहे. या ठिकाणी ५ एकर जागा उपलब्ध असून त्याचा वापर आदर्श पोलीस स्टेशन उभारण्यासाठी करावा. तसेच पोलीस वसाहत, वरिष्ठ अधिकाऱ्यांसाठी निवासस्थान आणि आधुनिक सुविधा असलेले पोलीस स्टेशन यासाठी निधी मंजूर करावा.याचबरोबर माढा व पंढरपूर परिसरातील ऐतिहासिक व धार्मिक स्थळांचे सुशोभीकरण करावे, यामध्ये भुईकोट किल्ला, माढा येथील छत्रपती शिवरायांचे जावई निंबाळकर यांच्या समाधीचे सुशोभीकरण करण्यासाठी निधी मंजूर करावा.मनकर्णिका नदीचे सुशोभीकरण करणे आवश्यक आहे. नगर विकास खात्यामार्फत या नदीला कॅनॉलचा दर्जा मिळावा आणि तिचा विकास करण्यात यावा. माढेश्वरी तीर्थक्षेत्राचा विकास करणे गरजेचे आहे. पंढरपूरपासून जवळ असलेल्या या महत्त्वाच्या स्थळासाठी ५ ते ७ लाख भाविक दरवर्षी भेट देतात. त्यामुळे पर्यटनवाढीसाठी आवश्यक निधी मंजूर करावा. माढा व पंढरपूर शहरासाठी रिंग रोड व पायाभूत सुविधांचा विकास करावा.माढा शहरासाठी रिंग रोड तयार करण्याची गरज आहे, यामुळे रहदारीचा प्रश्न सुटेल. पंढरपूर शहरातही रिंग रोड आवश्यक आहे, कारण लाखो भाविक दरवर्षी येथे येतात आणि रहदारीच्या समस्येला सामोरे जावे लागते. माढा शहरातील रस्ते, पथदिवे, सीसीटीव्ही कॅमेरे यासाठी निधी मंजूर करावा. पंढरपूर येथील पाणीपट्टी कमी करावी. माढा व पंढरपूर शहरातील आरोग्य व गृहप्रकल्पांचे प्रश्न निकाली काढावेत.माढा ग्रामीण रुग्णालयाचा दर्जा वाढवून उपजिल्हा रुग्णालय करण्यात यावे. पंतप्रधान आवास योजनेंतर्गत ८९२ घरांचे काम पूर्ण होण्यासाठी निधी मिळावा. पंढरपूर येथील नामकिर्तन सभागृहाच्या कामात निष्कृष्ट दर्जाचे काम झाले असून चौकशी करून नवीन निविदा मंजूर करावी. माढा तालुक्यात छत्रपती शिवरायांचा अश्वारूढ पुतळा नाही, त्यामुळे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यासाठी १० कोटी रुपयांचा निधी मंजूर करावा. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, अण्णाभाऊ साठे, अहिल्यादेवी होळकर आणि महात्मा ज्योतिबा फुले यांच्या स्मारकांसाठी निधी उपलब्ध करावा.

> पंढरपूर शहरात सावित्रीबाई फुले आणि अहिल्याबाई होळकर यांचे स्मारक उभारण्यासाठी निधी मंजूर करावा. पंढरपूर शहरात तीन पोलीस ठाणी आहेत. ग्रामीण एक, ग्रामीण दोन आणि शहर पोलीस स्टेशन, परंतु पोलिसांची संख्या कमी आहे. ताण कमी करण्यासाठी पोलिसांची संख्या वाढवण्यात यावी. पंढरपूर पोलीस वसाहतींची अवस्था अत्यंत खराब झाली आहे. नवीन वसाहती उभारून पोलीस कर्मचाऱ्यांसाठी उत्तम सुविधा उपलब्ध करून द्याव्यात.या मागण्यासाठी विधानसभा अर्थसंकल्पीय अधिवेशनात आ. अभिजीत पाटील यांनी आवाज उठून लक्ष वेधून घेतल्याने लवकरच यासाठी निधी मिळेल, अशी अपेक्षा निर्माण झाली आहे.

# नवरंगे बालकाश्रमास बालस्नेही पुरस्कार

**तभा वृत्तसेवा**
**पंढरपूर, दि. ७ मार्च -**

वा.बा.नवरंगे बालकाश्रम पंढपूर या संस्थेस बाल स्नेही पुरस्कार महाराष्ट्र राज्य बालहक्क आयोगाच्या वतीने सन्मानित करण्यात आले.

मुंबई येथील यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठाण सभागृहामध्ये पार पडलेल्या सन्मान सोहळ्यामध्ये बाल कल्याण क्षेत्रात उत्कृष्ट बालगृह पुणे विभागातून उल्लेखनिय कार्ये करणाऱ्या नवरंगे बालकाश्रम संस्थेच्या अधिक्षिका राजश्री गाडे, लेखाधिकारी धर्मराज डफळे यांना उपस्थित मान्यवांच्या हस्ते स्मृतीचिन्ह देवून गौरविण्यात आले.



याप्रसंगी राज्याच्या महिला व बाल विकास कॅबिनेट मंत्री अदिती तटकरे, राज्यमंत्री मेघना बोर्डीकर, राज्यमंत्री पंकज भोयर, मनीषा कायंदे, महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाच्या अध्यक्षा ॲड. सुसीबेन शहा, सदस्य ॲड. नीलिमा चव्हाण, ॲड. प्रज्ञा खोसरे, ॲड. जयश्री पालवे, सायली पालखेडकर, चैतन्य पुरंदरे आदी उपस्थित होते.

अनाथ, निराधार बालकांविषयीच्या कार्याची दखल घेऊन या पुरस्कारासाठी पुणे विभागातून उत्कृष्ट बालगृह म्हणून आयोगाने निवड केली. नवरंगे बालकाश्रम ही संस्था १४९ वर्षापासून अनाथ, निराधार, बेवारस बालकाचे संगोपन, पुर्नवसन, दत्तक व विवाह या विषयांवर कार्यरत आहे. या कार्याची दखल घेवून महाराष्ट्र राज्य बालहक्क आयोगाने नवरंगे बालकाश्रम संस्थेस बालस्नेही पुरस्कार देऊन सन्मानित केल्याचे अधिक्षिका राजश्री गाडे व धर्मराज डफळे यांनी सांगितले.

या पुरस्कार सोहळ्यास राज्यातील विविध विभागातील जिल्हाधिकारी, उपजिल्हाधिकारी, आयुक्त, उपायुक्त, सहायक पोलिस निरीक्षक, जिल्हा बाल संरक्षण अधिकारी, विविध बालगृहांचे अधीक्षक तसेच महाराष्ट्रातील विविध संस्थांचे पदाधिकारी उपस्थित होते.

# आश्रमशाळेतील वसतीगृह कर्मचाऱ्यांच्या साप्ताहिक सुट्टीबाबत शिक्षक भारतीचे निवेदन

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि.७ मार्च -**

सोलापूर जिल्ह्यातील आश्रमशाळांच्या वस्तीगृहामध्ये कार्यरत कर्मचाऱ्यांना शासन निर्णयानुसार साप्ताहिक सुट्टी देण्याचे स्पष्ट आदेश असतानाही काही शाळांमध्ये हे आदेश अंमलात आणले जात नाहीत. त्यामुळे कर्मचाऱ्यांवर अन्याय होत असून, त्यांच्या हक्काच्या सुट्ट्या नोंदवल्या जात नसल्याची तक्रार शिक्षक भारती आश्रम शाळा शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी संघटनेच्या वतीने करण्यात आली आहे.

याबाबत सिहाय्यक संचालकांना निवेदन दिले आहे. सर्व मदतनीस, कामाठी, स्वयंपाकी आणि वसतीगृह अधीक्षकांना साप्ताहिक सुट्टीचा नियम आहे. जिल्ह्यातही सोलापूर कार्यालयाने काढलेल्या परिपत्रकानंतर वस्तीगृह कर्मचाऱ्यांना साप्ताहिक सुट्टी देणे सुरू आहे. मात्र, काही शाळांमध्ये हे आदेश पाळले जात नाहीत. संस्थाचालक व मुख्याध्यापक यांच्या मनमानी कारभारामुळे वसतीगृह कर्मचाऱ्यांना हक्काच्या सुट्टी दिवशी विनाकारण उपस्थिती द्यावी लागत आहे. वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तत्काळ योग्य ती कार्यवाही करावी असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. हे निवेदन सहाय्यक संचालक कार्यालयास देण्यात आले. यावेळी शिक्षक भारतीचे सोलापूर जिल्हाध्यक्ष सुजीतकुमार काटमोरे, आश्रम शाळा शिक्षक शिक्षकेतर संघटनेचे जिल्हाप्रमुख विकास दसाडे, उपाध्यक्ष शुक्राचार्य ढवण, किरण सरकाळे सचिव विजय काशीद, कार्याध्यक्ष बसवंत बगले, कोषाध्यक्ष चंद्रकांत शिंदे, जिल्हा संघटक अलीसाहेब मुल्ला, प्रसिद्धीप्रमुख शंकर चव्हाण व संघटनेच्या जिल्हा महिला आघाडी प्रमुख प्रियदर्शनी आवटे उपस्थित होत्या. वसतीगृह कर्मचाऱ्यांच्या साप्ताहिक सुट्टीची मागणी मान्य न झाल्यास शिक्षक भारती आंदोलनात्मक भूमिका घेईल, असा इशारा यावेळी संघटनेने दिला आहे.

> काही आश्रमशाळा वसतीगृहातील कर्मचाऱ्यांना हक्काची साप्ताहिक सुट्टी मिळत नसल्यामुळे कौटुंबिक जबाबदाऱ्या, मुलांचे संगोपन, शिक्षण, स्वतःचे आरोग्य या गोष्टींकडे त्यांचे दुर्लक्ष होत आहे. कर्मचाऱ्यांच्या संघटनेकडे तक्रारी प्राप्त होत आहेत. शासन निर्णय व सहाय्यक संचालक यांच्या पत्राप्रमाणे सर्व कर्मचाऱ्यांना साप्ताहिक सुट्टी मिळाली पाहिजे.
>
> **- विकास दसाडे**
> जिल्हाप्रमुख, शिक्षक भारती आश्रम शाळा विभाग.

# ग्रामीण रुग्णालय मंगळवेढा येथे कुपोषित बालकांसाठी शिबीर

## ६३ बालकांची तपासणी

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि.७ मार्च -**

राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमाच्या विशेष तपासणी मोहीम २.० अंतर्गत ग्रामीण रुग्णालय मंगळवेढा येथे कुपोषित बालकांचे आरोग्य तपासणी शिबिर संपन्न झाले. या शिबिराचे उद्घाटन ग्रामीण रुग्णालयाच्या वैद्यकीय अधीक्षक डॉ.सुलोचना जानकर, बालरोगतज्ञ डॉ.आसावरी घोडके व पंचायत समितीचे बालविकास प्रकल्प अधिकारी जगन्नाथ गारोळे यांच्या हस्ते करण्यात आले.

महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत १ मार्च ते ३१ मार्च अखेर ० ते १८ वर्षे वयोगटातील शाळा व अंगणवाडी मधील मुला-मुलींची विनामूल्य आरोग्य तपासणी, जन्म जात आजार,व इतर आजारावर मोफत उपचार संदर्भसेवा व मोफत शस्त्रक्रिया करण्यात येणार आहेत.

या शिबिरात मंगळवेढा तालुक्यातील २८३ अंगणवाडीतील शून्य ते सहा वर्षे वयोगटातील ६३ बालकांची तपासणी करण्यात आली. बालकांतील रक्ताचे प्रमाण, छातीचा फोटो, वजन, उंची आदी तपासण्या मोफत करण्यात आल्या. ८ तीव्र कुपोषित बालकांना छठउ पंढरपूर येथे संदर्भित करण्यात आले व इतर बालकांना रक्त वाढीचे औषधे, कॅल्शियम,जंतनाशक व इतर आजारावरील औषधोपचार मोफत करण्यात आला. मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम,जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. सुहास माने,निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ.श्रीकांत कुलकर्णी,जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संतोष नवले, वैद्यकीय अधीक्षक डॉ. सुलोचना जानकर,तालुका आरोग्य अधिकारी डॉ. भाऊसो जानकर यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आलेल्या शिबिरासाठी राष्ट्रीय बाल स्वास्थ्य विभागाचे वैद्यकीय अधिकारी डॉ. अनिल चौगुले, डॉ. शिरीष कुलकर्णी, डॉ. प्रवीण माने, डॉ. धनश्री केंदुळे, डॉ. ऋतुजा गायकवाड, वैद्यकीय अधिकारी डॉ. महेश रोंगे, डॉ. निखिल जोशी, औषध निर्माण अधिकारी रेश्मा सरडे, अविनाश पट्टणशेट्टी, विवेकानंद कसबे, परिचारिका सुरेखा खरात, सुनिता सातालोलू पूजा वागदरकर, अधिपरिचारिका स्वरा काशीद, शितल कपाटे,सानिका गायकवाड, प्रयोगशाळा विभागाच्या सुजाता कुंभार, निकिता वल्लाल तसेच माधुरी गायकवाड, सिद्धराम चनशेट्टी, विकी रोकडे, जाधव आदी अधिकारी कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.





# केम विविध कार्यकारी सोसायटीच्या चेअरमनपदी दत्तात्रय बिचितकर

## माजी आमदार जयवंतराव जगताप गटाची एकहाती सत्ता

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा दि.७ मार्च**

करमाळा तालुक्यातील केम येथील विविध कार्यकारी सोसायटीवर माजी आमदार जयवंतराव जगताप गटाची एकहाती सत्ता आली असून दत्तात्रय बिचितकर यांची चेअरमनपदी बिनविरोध निवड झाली असून यावेळी माजी आमदार जयवंतराव जगताप यांच्या हस्ते दत्तात्रय बिचितकर यांचा सत्कार करण्यात आला.यावेळी करमाळा कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक सागर दौंड, आनंद शिंदे, दिलीप दौंड, विलास बिचितकर,भैरू दौंड, तानाजी बिचितकर, दीपक बिचितकर, महादेव पारखे, राहुल बिचितकर, चंदू बिचितकर, ओंकार जाधव, प्रकाश तळेकर, विजय तळेकर,आदि विविध कार्यकारी सोसायटीचे सर्व संचालक आजी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.



# मंडल कृषी अधिकारी नातेपुते अंतर्गत ॲग्रीस्टॅक प्रचार, प्रसिद्धी मोहीम

**तभा वृत्तसेवा,**
**नातेपूते, दि. ७ मार्च-**

मंडल कृषी अधिकारी नातेपुते अंतर्गत येणाऱ्या गावांमध्ये शेतकऱ्यांचा युनिक फार्मर आयडी काढण्यासाठी प्रचार व प्रसिद्धी मोहीम हाती घेण्यात आलेली आहे.

सदर प्रचार प्रसिद्धी मोहिमे अंतर्गत मौजे मोटेवाडी, पळसमंडळ, एकशिव तांबेवाडी दहिगाव, फोंडशिरस, येथे शेतकऱ्यांना युनिक फार्मर आयडी काढण्याबाबत व गावातील सीएससी सेंटर बाबत काही अडचण असल्याबाबतची विचारणा केली बोरुडे मंडळ कृषी अधिकारी नातेपुते यांनी मार्गदर्शन केले व पांढरे कृषी पर्यवेक्षक यांनी ऊस पाचट व खोडवा व्यवस्थापन याविषयी माहिती दिली कृषी सहाय्यक पांढर मिसे यांनी कृषी विभागाच्या योजनांची माहिती दिली. कृषी सहाय्यक श्रीमती दडस यांनी शेतकऱ्यांना लवकरात लवकर फार्मर आयडी काढावे, असे आवाहन केले. कृषी सहाय्यक गणेश जाधव यांनी सूत्रसंचालन केले.

# बुद्धविहार मुक्तीसाठी बार्शीत आंदोलन

## बहुजन संघटनांनी दिले निवेदन

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ७ मार्च-**

बुद्धगया (बिहार) येथील प्रसिद्ध महाबोधी महाविहार ब्राह्मणांपासून मुक्त करावे, १९४९ चा बुद्धगया महाविहार व्यवस्थापन कायदा रद्द करुन हे महाविहार बौध्दांच्या ताब्यात द्यावे, या मागण्यासाठी शुक्रवारी (दि. ७) आंदोलन करण्यात आले. भीमनगर चौक येथून निघालेल्या मोर्चात असंख्य भीमसैनिक सहभागी झाले होते. यात महिलांची संख्या लक्षणीय होती.

महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलन समितीच्यावतीने या मोर्चाचे आयोजन केले होते. या मोर्चाला वंचित बहुजन आघाडी, भटक्या विमुक्त संघटना, भीम टायगर संघटना, संभाजी ब्रिगेड यांच्यासह अनेक बहुजन आघाडी व संघटनांनी पाठिंबा दिला. शहराच्या विविध भागातून हा मोर्चा तहसील कार्यालय विसर्जित करण्यात आला. यावेळी अण्णासाहेब लोंढे, ॲड. शंकर ननवरे, ॲड. विवेक गजशिव, ॲड. प्रसन्नजीत नाईकनवरे, मक्रोज बोकेफोडे, भारत मुक्ती मोर्चाचे तानाजी बोकेफोडे, लहुजी क्रांती मोर्चाचे राज्य प्रभारी भाऊसाहेब कांबळे यांनी बिहार सरकारवर टीका केली. १९४९ चा महाविहार व्यवस्थापन कायदा रद्द करून बुद्धविहार पूर्णपणे बौध्दांच्या ताब्यात देण्याची जोरदार मागणी केली. मागण्याचे निवेदन तहसील प्रशासनास देण्यात आले.



या मोर्चात तानाजी बोकेफोडे, भाऊसाहेब कांबळे, आनंद काशीद, ॲड. अविनाश गायकवाड, ॲड. धीरज कांबळे, सनी गायकवाड, शंकर वाघमारे, आनंद चांदणे, कनिष्क शिंदे, दयावान कदम, राजेंद्र कदम, सुमित खुरंगळ, अजय वाघमारे, यांच्यासह समाज बांधव व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## संक्षिप्त वृत्त




### आ. समाधान आवताडे यांचा मंगळवेढा-मुंबई मित्रमंडळातर्फे सत्कार

**मुंबई, दि. ७ मार्च-**

मंगळवेढा-मुंबई मित्रमंडळातर्फे पंढरपूर-मंगळवेढा विधानसभा मतदारसंघाचे आमदार समाधान आवताडे यांचा नागरी सत्कार व कौटुंबिक स्नेहमेळावा नवी मुंबईतील वाशीच्या आर्य समाज सभागृहात पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अमरावती पदवीधर मतदारसंघाचे आमदार धीरज लिंगाडे उपस्थित होते. यावेळी व्यासपीठावर मंगळवेढा-मुंबई मित्रमंडळाचे संस्थापक अध्यक्ष डॉ. सर्जेराव सावंत, दत्ता घाडगे, आनंद पाटील, डॉ. शिवाजीराव पवार, संजय पवार, आझाद पटेल उपस्थित होते. याप्रसंगी गुणवंत विद्यार्थ्यांचा व मान्यवर व्यक्तींचा सत्कार आमदार समाधान आवताडे यांच्या हस्ते झाला. आमदार धीरज लिंगाडे यांनी मंगळवेढा आणि तेथील संस्कृतीच्या आठवणी सांगत मित्रमंडळाच्या उपक्रमांचे कौतुक केले. आपल्या मनोगतात आ. आवताडे यांनी मतदारसंघाच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबध्द असल्याचे सांगितले. तसेच मंगळवेढा-मुंबई मित्रमंडळाने यापुढेही सामाजिक आणि सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करावेत, असे आवाहन करत मंगळवेढा फेस्टिवल आयोजित करण्याची कल्पना त्यांनी मांडली. सुरूवातीला कार्यक्रमाची प्रस्तावना डॉ. सर्जेराव सावंत यांनी मांडली. याप्रसंगी दत्ता घाडगे आणि आनंद पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमात ज्येष्ठ पत्रकार मंदार जोशी यांनी आ. आवताडे यांची मुलाखत घेतली. यावेळी महिलांसाठी हळदी-कुंकुवाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. हा कौटुंबिक स्नेहमेळावा यशस्वी करण्यासाठी मंगळवेढा-मुंबई मित्रमंडळाचे अध्यक्ष दत्ता घाडगे, कार्याध्यक्ष आनंद पाटील, उपाध्यक्ष लक्ष्मण खरात, सचिव महादेव बनसोडे यांचे सहकार्य लाभले. सूत्रसंचालन चंद्रकांत गुंजेगावकर यांनी केले.




### नागनाळी आश्रम शाळेच्या विद्यार्थ्याचा राज्यस्तरावर डंका

**अक्कलकोट, दि. ७ मार्च-**

विकसित भारताच्या स्वप्नपूर्तीसाठी राष्ट्रीय स्तरावरील कार्यक्रमाचे आयोजन सिंहगड संस्थेच्या वतीने सोलापुरात करण्यात आले होते. त्यामध्ये रेशीम उद्योगाची फिरती प्रयोगशाळा, कृषी मूल्यवर्धन व कौशल्य प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. राज्यातील विविध अभियांत्रिकी महाविद्यालयातील व विद्यालयातील २१८ स्पर्धकांनी भाग घेतला होता. या प्रदर्शनात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून विद्यार्थ्यांनी उपकरणाची निर्मिती केली होती.नागनळी आश्रमशाळेच्या जमीर जमादार, जुबेर जमादार व बसवराज आजूरे या विद्यार्थ्यांनी बनवलेल्या gricultural lown mower या उपकरणास तृतीय क्रमांकाचे पारितोषिक देऊन गौरवण्यात आले. या विद्यार्थ्यांना प्रा. रवींद्र नवले, प्रा.वसीम शेख, प्रा.अमोल पाटील यांनी मार्गदर्शन केले. सर्व यशस्वी विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षकांचे संस्थेचे सचिव श्री जावेद पटेल, प्राचार्य आय. एम. मुजावर, मुख्याध्यापक आर. जी. शेख यांनी अभिनंदन केले.



### झाडबुके महाविद्यालयाच्या विद्यार्थ्याची मुंबई पोलीस भरतीत निवड

**बार्शी, दि. ७ मार्च-**

श्रीमान भाऊसाहेब झाडबुके महाविद्यालयाच्या भौतिकशास्त्र विभागातील विद्यार्थी सारुक ऋषिकेश भागवत (रा. नांदगाव, ता. वाशी) यांची मुंबई पोलीस भरतीत निवड झाली आहे. त्यांच्या या यशाबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ मनोज गादेकर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. याप्रसंगी प्लेसमेंट सेलचे समन्वयक डॉ व्ही. पी. लिंगायत, भौतिकशास्त्र विभागाचे विभागप्रमुख डॉ. आर. एम.मोहिते यांनी त्यांचे अभिनंदन केले.




### 'नर्सिंग'मध्ये संवाद कौशल्यवर व्याख्यान

**अकलूज, दि.७ मार्च-**

शिवरत्न शिक्षण संस्था संचलित विजयसिंह मोहिते पाटील कॉलेज ऑफ नर्सिंग न्ड मेडिकल रिसर्च इन्स्टिटयूट मध्ये नाशिक येथील महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या विद्यार्थी कल्याण विभाग व नर्सिंग कॉलेज यांच्या विद्यमाने संवाद कौशल्य व व्यक्तीमत्व विकास या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. सदर उपक्रम बहिशाल शिक्षण मंडळ योजना-२०२५ अंतर्गत राबविण्यात आला. यावेळी लेखक व पर्यावरण अभ्यासक प्राचार्य डॉ. अरविंद कुंभार हे व्याख्याते म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपप्राचार्य डॉ. शिवतीर्थ हिरेमठ हे होते. उत्तम संवादक बनण्यासाठी स्पष्ट मत मांडणे, चिकित्सक वाचन करणे, लक्षपूर्वक ऐकणे, प्रभावी लेखन करणे हे गुणधर्म अवगत करावे लागते, असे प्रतिपादन डॉ. कुंभार यांनी केले. यावेळी शिवरत्न इन्स्टिटयूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीजचे प्रभारी प्राचार्य भरत साठे यांनी मार्गदर्शन केले. प्रास्ताविक प्रा. रेश्मा शेंडगे यांनी केले तर यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. विजया सुतार यांनी आभार मानले.

CMYK

# आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## पंढरपुरात तीन दिवसीय व्याख्यानमालेचे आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ७ मार्च -**

महाराष्ट्र साहित्य परिषद शाखा पंढरपूरच्या वतीने मराठी भाषा गौरव दिनानिमित्त १० ते १२ मार्च अशी तीन दिवसीय व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले आहे.

या व्याख्यानमालेत पहिल्या दिवशी सोम वारी (दि.१०) पुणे येथील सुप्रसिद्ध वक्ते,लेखक आशुतोष जावडेकर यांचे समाज माध्यम, समाज आणि साहित्य या विषयावर व्याख्यान होणार आहे. अध्यक्षस्थानी स्वेरी इंजिनिअरिंग कॉलेज पंढरपूरचे प्राचार्य डॉ.बी.पी.रोंगे हे उपस्थित राहणार आहेत.मंगळवारी (दि.११) रमजान मुल्ला,(सांगली), सुनील जवंजाळ (नाझरे),शिवाजी बंडगर (सांगोला)सूर्याजी भोसले(पंढरपूर)प्रेमकुमार वाघमारे(सांगोला) या निमंत्रित कवींचे कवी संमेलन आयोजित केले आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उमा महाविद्यालय पंढरपूरचे माजी प्राचार्य डॉ.मिलिंद परिचारक हे उपस्थित राहणार आहेत. बुधवारी (दि. १२) सुप्रसिद्ध कथाकथनकार जयवंत आवटे (सांगली) यांचे कथाकथन आयोजीत करण्यात आले आहे. अध्यक्षस्थानी सिंहगड इंजिनिअरिंग कॉलेज कोर्टी पंढरपूरचे प्राचार्य डॉ.कैलास करांडे हे उपस्थित राहणार आहेत. सदरची व्याख्यानमाला पांडुरंग उद्यान, दत्तनगर, उमा कॉलेज जवळ पंढरपूर येथे दररोज सायंकाळी ६ वाजता आयोजित केल्याची माहिती मसाप पंढरपूरचे प्रमुख कार्यवाह कल्याणराव शिंदे, कार्याध्यक्ष अशोक माळी, यांनी दिली.



## संक्षिप्त वृत्त...



### पंढरपूर अर्बन बँकेस सहाय्यक निबंधक योगिता मुरडे यांची भेट

**पंढरपूर, दि. ७ मार्च -**

येथील सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था या पदावर नियुक्त झालेल्या प्रशासकीय अधिकारी योगिता मुरडे यांचा पंढरपूर अर्बन बँकेचे चेअरमन सतीश मुळे व माधुरी जोशी यांचे हस्ते बँकेची शतसुधा ही स्मरणिका भेट देऊन स्वागत केले. यावेळी बँकेचे संचालक अनिल अभंगराव, शांताराम कुलकर्णी, अमित मांगले, व्यंकटेश कौलवार, प्रभूलिंग भिंगे, गणेश शिंगण, गजेंद्र माने, हृषीकेश उत्पात, अनंत कटप, सुनील डोंबे, संचालिका संगीता पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी उमेश विरधे, राजेश आगवणे, गणेश हरिदास, पेंडाल आदि बँकेतील अधिकारी वर्ग तसेच सहायक निबंधक कार्यालयातील पी.बी.सावंत, सहकार अधिकारी श्रेणी-१ व एस.एस.सांगोलकर, सहकार अधिकारी श्रेणी-२ उपस्थित होते. बँकेचे चेअरमन सतीश मुळे यांनी बँकेची स्थापने पासून सर्वसाम ान्य जनतेच्या सोयीसाठी तसेच पंढरपूर येथील जडणघडणीत (स्व.) सुधाकरपंत परिचारक व सध्या मा.आमदार प्रशांतराव परिचारक यांचे मार्गदर्शनाखाली बँकेचे केलेले कामांची माहिती दिली. यावेळी सहाय्यक निबंधक योगिता मुरडे यांनी बँकेच्या आर्थिक परिस्थितीची माहिती घेत भविष्यात पंढरपूर परिसरातील सर्वच सहकारी संस्थांचे अडचणीचे प्रश्न मार्गी लावणेबाबत त्यांनी आश्वासन दिले.



### कन्या शाळेच्या विद्यार्थ्यांनींच्या प्रकल्पास इनस्पायर नामांकन

**अक्कलकोट, दि. ७ मार्च-**

मराठा मंदिर श्रीमंत राणी निर्मलाराजे कन्या प्रशाला, अक्कलकोट प्रशालेच्या विद्यार्थिनी गायत्री सुतार व भूमिका सोनटक्के (१०वी) यांना त्यांच्या उत्कृष्ट प्रकल्पांसाठी प्रतिष्ठित INSPIRE MNK WRD पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. हा पुरस्कार प्राप्तकर्ता म्हणून दोघींनाही त्यांचे प्रकल्प विकसित करण्यासाठी प्रत्येकी १०,००० रुपये अर्थसाह्य प्राप्त होणार आहे. यामध्ये कुमारी गायत्री लक्ष्मण सुतार या विद्यार्थिनींने nimal Safty from Vehicles व भूमिका महादेव सोनटक्के या विद्यार्थिनींने wireless charging for electric vehicles हे प्रकल्प तयार केले आहेत. या यशस्वी विद्यार्थिनींना विज्ञान शिक्षिका मनीषा मोरे, रेखा चव्हाण, शंभूराजे गाटे यांचे मार्गदर्शन लाभले.




### विद्या हराळे-लांबतुरे जनाई-मुक्ताई समाजभूषण पुरस्काराने सन्मानीत

**सोलापूर, दि. ७ मार्च-**

वृंदावन फाऊंडेशन आणि जनाई-मुक्ताई मंच पुणे आयोजित कार्यक्रमात संत रविदास शिक्षण प्रसारक मंडळ सोलापूर संचलित यम ईदेवी प्राथमिक आश्रम शाळा मार्डी तालुका उत्तर सोलापूर येथील शिक्षिका विद्या हराळे -लांबतुरे यांना जनाई-मुक्ताई समाजभूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यावेळी वृंदावन फाऊंडेशनचे अध्यक्ष सचिन पाटील, करमाळ्याचे तहसीलदार शिल्पा ठोकडे, डॉ. राजेंद्र थोरात, ॲड. प्रितीजी परांजपे, पत्रकार योगिताजी साळवी यांच्या हस्ते प्रदान करून गौरव करण्यात आला. त्यांच्या या पुरस्काराबद्दल संस्थेचे पदाधिकारी आणि शाळेतील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी त्यांचे अभिनंदन केले.

### महूदचे अनिल नागणे यांची ओएसडी म्हणून मुंबई येथे नियुक्ती

**सांगोला, दि. ७ मार्च-**



सांगोला तालुक्यातील महूद गावचे सुपुत्र अनिल नागणे यांची मंगलप्रभात लोढा (मंत्री, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता, मंत्रालय महाराष्ट्र राज्य, मुंबई) यांचे ओएसडी या पदावर नियुक्ती झाली आहे. अनिल नागणे यांचे प्राथमिक शिक्षण महूद जिल्हा परिषद शाळा येथे झाले. त्यानंतर त्यांचे पुणे या ठिकाणी पुढील उर्वरित शिक्षण झाले. एमपीएससीतून नंतर त्यांची पोस्टिंग गट विकास अधिकारी, पंचायत समिती, संगमनेर, जि.अहिल्यानगर या ठिकाणी झाली. त्यांच्या कामाची दखल घेत महाराष्ट्र शासनाने त्यांची मंगलप्रभात लोढा (मंत्री, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता, मंत्रालय महाराष्ट्र राज्य, मुंबई ) यांचे ओएसडी या पदावर नियुक्ती केली. या निवडीबद्दल अनिल नागणे यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

## अक्कलकोटमधे रिक्षाचालकांमुळे होतेय वाहतूक कोंडी

### सर्रास धावतात स्क्रॅप रिक्षा, परिवहन विभागाचे दुर्लक्ष

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ७ मार्च -**

अक्कलकोटमध्ये रिक्षाचलकांच्या वेशिस्त वाहतूकीचा फटका भाविकांसह शहरवासियांना बसत असल्याने मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत आहे. तसेच प्रादेशिक परिवहन विभागाच्या दुर्लक्षामुळे मुंबई पुणे येथील स्क्रॅप रिक्षा सर्रास रस्त्यावर धावत असून त्यांची संख्या अधिकृतपेक्षा दुप्पट आहे.

स्क्रॅप रिक्षांच्या वाहतूकीमुळे मोठ्या प्रमाणात प्रदूषण होत आहे. त्याचा फटका ज्येष्ठ नागरिक व आजारी माणसाना बसत आहे. येथे देशभरातून भाविक मोठ्या संख्येने येतात. त्यांनाही या वेशिस्त वाहतूकीचा फटका बसत आहे. या वाहतूक कोंडीला काही रिक्षाचालक कारणीभूत आहेत. बिनधास्तपणे भर बाजारात रस्त्यांवर रिक्षा पार्क करून फिरत असतात. नियम न पाळणाऱ्या रिक्षाचालकांवर कारवाई करण्याची मागणी नागरिकातून होत आहेत.

शहरात ठरवून दिलेल्या रिक्षा स्टैंड ऐवजी रस्त्यातच रिक्षा थांबवल्याने त्रास होत आहे. शहरातील गजबजलेल्या बसस्थानक, कारंजा चौक, मेन रोड, श्री स्वामी समर्थ मंदिर परिसर, अन्नछत्र चौक आदी परिसरात मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत असते. यासंदर्भात अनेकवेळा नागरिकांनी तक्रारी करून देखील काही होत नाही. त्यामुळे वाहतूक विभागाने यासंदर्भात दखल घेणे गरजेचे आहे. नियम न पाळणाऱ्या रिक्षाचालकावर कारवाई करण्याची मागणी नागरिकांतून होत आहे. पोलिस व प्रादेशिक परिवहन कार्यालय (आरटीओ) कडून बेकायदेशीर रिक्षां तसेच रिक्षाचालकांवर कारवाई करण्यात यावी अशी मागणी होत आहे. रिक्षामध्ये मोठ्या आवाजात गाणी वाजवणे आदी प्रकार होत असल्याने प्रवाशांमधून नाराजी व्यक्त होत आहे. काही परिसरात दुकानदारांनी आपली दुकाने रस्त्यावर मांडली आहेत. पालिका प्रशासन आणि पोलिसांनी वाहतुकीचे नियोजन केले नसल्याने नागरिकांना रोजच वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत आहे.

### सुमारे आठशे स्क्रॅप रिक्षांचा हातोय सर्रास वापर

अक्कलकोट शहरात आरटीओ परमिट असलेल्या फक्त १५६ रिक्षा असून सुमारे आठशे रिक्षा स्क्रॅप केलेल्या पुन्हा रस्त्यावर धावत आहेत. ९९ टक्के रिक्षांना मीटर रिडिंग नाही. लायसन्स, परमिट, इन्शुरन्स, पीयूसी, पासिंग, युनिफॉर्म कोड आरटीओ कडून तपासले जात नाही. प्रत्यक्ष तपासणी करण्याऐवजी फक्त कागदोपत्री चपासणी दावली जात आहे.

अनेक रिक्षामालक वेगळे अन चालक वेगळे आहेत. मालकाकडून चालकाची पडताळणी केली जात नसल्याने अनेक गुन्हेगारही या क्षेत्रात असल्याचे दिसत आहे. त्यामुळे मालकांनी चालकाकडे रिक्षा सोपवताना सर्व बाबी तपासणे गरजेचे आहे.

**- राजेंद्र टाकणे पोलिस निरीक्षक**
उत्तर पोलिस स्टेशन अक्कलकोट



रिक्षामध्ये तीन प्रवाशांची वाहतूक करण्याचा नियम असताना पाच ते सहा प्रवासी कोंबले जातात. अनेक वेळा जादा भाडे आकारले जाते. तसेच रांगा न लावता मनमानी पद्धतीने रिक्षा लावल्याने इतर वाहतुकीला अडचण निर्माण केली जात आहे.

## २५० बचतगटांना १५ कोटींचे अर्थसहाय्य

### महिला दिनानिमित्त बँक ऑफ महाराष्ट्र पंढरपूर येथे कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि.७ मार्च -**

आंतरराष्ट्रीय महिला दिना निमित्ताने बँक ऑफ महाराष्ट्र पंढरपूर येथे मुख्य कार्यालयाच्या मार्गदर्शनाखाली स्वयं-सहायता गट क्रेडिट लिंकज कॅम्प पंढरपूर, सोलापूर विभागात यशस्वीपणे संपन्न झाला. या कार्यक्रमाला ३०० हून अधिक महिला सदस्यांनी सहभाग नोंदवला. यावेळी एम.एस.आर.एम.एल.चे प्रकल्प संचालक सुधीर ठोंबरे यांनी उपस्थिती लावली.

यावेळी २५० बचतगटांना १५ कोटींचे अर्थसहाय्य वितरित करण्यात आले.

पीक कर्ज नूतनीकरण, व्यवसाय कर्ज परतफेड आणि सुरक्षा विमा याबाबत म हिलांना सखोल मार्गदर्शन करण्यात आले. तसेच, प्रधानमंत्री जीवन ज्योती योजना, प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना आणि अटल पेन्शन योजना यांची देखील माहिती देण्यात आली. बँकेने प्रदान केलेल्या आर्थिक मदतीचा उपयोग महिलांनी स्वतःचा उद्योग उभारण्यासाठी करावा. नियमित कर्ज परतफेड करणाऱ्या बचत गटांना बँकेकडून अधिक सहकार्य मिळते, त्यामुळे घेतलेले कर्ज वेळेवर परतफेड करणे आवश्यक आहे. महिलांनी स्वयं-सहायता गटाच्या कर्जाचा पूर्ण लाभ घ्यावा, असे प्रतिपादन बँक ऑफ महाराष्ट्र, सोलापूर झोनचे झोनल प्रबंधक संजीव कुमार यांनी केले. बँक ऑफ महाराष्ट्र पंढरपूर शाखेने आयोजित केलेला कार्यक्रमासाठी वैभव घाडगे, युवराज केदार, निरंजन झिरपे, सचिन चवरे, सुधीर ठोंबरे, महेश गव्हाणे, अजय गौड रविकिरण शिकारे, गौरव सहरान, सीताराम देठे, अमोल नलवडे, सोमनाथ हिंगमिरे आदींचे सहकार्य लाभले. सूत्रसंचालन पंढरपूर शाखेचे शाखाधिकारी चंद्रकांत मोरे यांनी केले.



## सरपंच देशमुख यांच्या हत्येच्या निषेधार्थ उद्या सांगोला बंद, मूक मोर्चा

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला,दि. ७ मार्च-**

बीड येथील मस्साजोग गावचे सरपंच स्व.संतोष देशमुख यांची निर्घृण हत्या करण्यात आली. तरी या प्रकरणातील सर्व आरोपींना भर चौकामध्ये फाशीची शिक्षा झाली पाहिजे.

या मागणीसाठी रविवार दि.९ मार्च रोजी सकल मराठा समाज सांगोला शहर व तालुका यांच्यावतीने सांगोला शहर व तालुका बंदची हाक देण्यात आली आहे.

सरपंच स्व.संतोष देशमुख यांच्या हत्येच्या निषेधार्थ तसेच आरोपींना लवकरात लवकर फाशी व्हावी या मागणीसाठी रविवार दि.९ मार्च रोजी सांगोला शहर व तालुका पुर्णदिवस पुर्णपणे कडकडीत बंद ठेवण्यात येणार असून महात्मा फुले चौक ते तहसील कार्यालय सांगोला असा पदयात्रा मुक मोर्चा काढण्यात येणार आहे.

तरी रविवारी स.१० वा. महात्मा फुले चौक येथे सर्व बहुजन समाज बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन सकल मराठा समाज सांगोला शहर व तालुका यांनी केले आहे.

## काही मिनिटांत दरोडेखोर जेरबंद

### बार्शी तालुका पोलिसांची धडाकेबाज कामगिरी

**बार्शी, दि. ७ मार्च-**

बार्शी तालुक्यातील सुर्डी येथील डीसीसी बँकेवर दरोडेखोरांनी आज दरोडा टाकण्याचा प्रयत्न केला. मात्र, बार्शी तालुका पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक दिलीप ढेरे यांच्या नेतृत्वाखालील पथकाने केवळ काही मिनिटांत आरोपींना अटक करुन मोठी कामगिरी बजावली. सुर्डी येथील बँकेवर दरोडा पडल्याची माहिती मिळताच दिलीप ढेरे यांनी तातडीने तपासाचे आदेश दिले. त्यानुसार पोलीस पथकाने परिसरात गस्त वाढवली आणि काही तासांतच आरोपींचा माग काढला. या कारवाईत पोलिसांनी तीन दरोडेखोरांना अटक केली असून, त्यांच्याकडून एक पिस्तूल व एक कोयता जप्त करण्यात आला आहे. या तातडीच्या कारवाईमुळे बार्शी तालुक्यातील नागरिकांमध्ये पोलिसांच्या कार्यक्षमतेबद्दल कौतुकाची भावना आहे. सहाय्यक पोलीस निरीक्षक दिलीप ढेरे आणि त्यांच्या पथकाचे सर्वत्र अभिनंदन केले जात आहे. या प्रकरणाचा पुढील तपास बार्शी तालुका पोलीस करत आहेत.

## वैराग पत्रकार संघातर्फे महिलांचा सन्मान

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि. ७ मार्च-**

जागतिक महिला दिनानिमित्त वैराग पत्रकार संघाच्या वतीने विविध श्रेत्रामध्ये काम करणाऱ्या नवदुर्गांचा रविवारी ९ मार्च रोजी सकाळी १० वाजता आदर्श महिला पुरस्काराने सन्मान होणार आहे.

साई आयुर्वेदिक महाविद्यालयात होणाऱ्या कार्यक्रमात राणी आदमाने (सामाजिक), अर्चना डिसले, (शैक्षणिक), अर्चना राऊत (कृषी), सरिका करंडे (उद्योग), सुवर्णा वैद्य (मुख्याध्यापिका), स्वाती कांबळे (महिला बचत गट), उत्कर्षा एखंडे (नूतन प्रशासकीय अधिकारी अन्न व सुरक्षा), करिष्मा गायकवाड (नूतन अधिकारी महसुल सहाय्यक), निर्मला नवले (आदर्श माता) यांना मान्यवरांच्या हस्ते पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. तसेच वीर पत्नी म्हणून रोहिणी काकडे (गौडगाव) आणि हर्षदा चव्हाण (रातंजन) यांना गौरविण्यात येणार आहे. कार्यक्रमासाठी साई चॅरिटेबल ट्रष्टच्या अध्यक्षा डॉ. मिरा सुर्यवंशी, सोलापूर कृषी विज्ञान केंद्राच्या अनिता शेळके, जय जगदंबा शिक्षण संस्थेच्या डॉ. अमिता कोरके, वैद्यकिय अधिकारी-ज्योती तिर्थ, पोलीस निरीक्षक कुंदन गावडे आदी उपस्थित राहणार असल्याचे प्रसिद्धी प्रमुख अण्णासाहेब कुरुलकर यांनी सांगितले.

## प्रथम केलेला साठेखत दस्ताचा व्यवहार वहिवाटीस ग्राह्य

### माळशिरस जिल्हा न्यायालयाचा निकाल

**श्रीपूर, दि. ७ मार्च -**

मालमत्तेचे साठे खत व मुखत्यारपत्र करून दिल्यावर ती जमिन दुसऱ्या व्यक्तिस परस्पर विकण्याऱ्याला कसता येणार नसल्याचा महत्वपूर्ण निकाल माळशिरस येथिल दिवाणी न्यायालयाने दिल्यामुळे प्रथम साठेखत व कुलमुखत्यार करणाऱ्या वादीस दिलासा मिळाला आहे.

मूळ मालकाने आपली जमीन प्रथम खरेदी करणाऱ्या इसमास साठेखत व कुलमुखत्यार पत्र करून दिली. त्याची संपूर्ण रक्कम २०१४ साली मुळ मालकास देण्यात आली. त्याप्रमाणे प्रथम खरेदी करणारास मालमत्ता कसण्यासाठी मिळाली. परंतू पैशाच्या अमिशाने मूळ मालकाने सदरची मालमत्ता दुसऱ्या व्यक्तिस परस्पर विकली व मुळ खरेदीदाराची घोर फसवणूक केली. आपली फसवणूक झाल्याचे निदर्शनास येताच माळशिरस येथिल कनिष्ठ दिवाणी न्यायालयात याबाबत मुळ खरेदीदाराने दुसऱ्या व्यक्तीस सदरची मालमत्ता वहिवाटण्यास प्रतिबंध घालून मनाई करावी, असा दावा दाखल करण्यात आला होता. न्यायालयाने दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून मुळ मालकाने दुसरा केलेला व्यवहार असंवैधानिक असल्याचे म ान्य करत दुसऱ्या व्यवहारास मालम त्ता वहिवाटीस मनाई करणारा निकाल दिला. प्रतिवादीकडून श्रीपूर येथील ॲड. ओंकार जाधव यांनी दाव्याचे काम पाहिले. कनिष्ठ न्यायालयाच्या या निकालास वादीकडून जिल्हा न्यायालयात अपिल दाखल करण्यात आले होते. सदरचे अपिल गुणान्वये चालून तेथेही ॲड. जाधव यांनी सर्वो च्च न्यायालयाच्या घनश्याम विरुद्ध योगेश राठी या निकालाचा आधार घेत प्रतिवादी ची बाजू मांडली आणि जिल्हा न्यायालयाने वादींचे अपिल फेटाळत नोटरी दस्ताचे आधारे प्रतिवादीची वहिवाट ग्राह्य धरणे आवश्यक असल्याचे मत नोंदविले. या निकालामुळे फसवणुकीचे प्रकार थांबण्यास मदत होणार आहे.

## भगवंत मोहोत्सव साजरा करण्यासाठी कार्यकारणीची स्थापना

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ७ मार्च-**

बार्शीचे ग्रामदैवत असलेले श्री भगवंत यांचा श्री भगवंत महोत्सव पुणे येथे साजरा करण्यासाठी पुण्यात स्थाईक असलेल्या बार्शीकरांनी श्री भगवंत महोत्सव मंडळ, पुणे या नावाने मिटींग घेऊन त्यामध्ये महोत्सव समिती कार्यकारणी एकमताने गठीत करण्यात आली. जे बार्शीकर श्री भगवंत महोत्सवासाठी बार्शीला जाऊ शकत नाहीत त्यांचेसाठी हा महोत्सव पुणे येथे ९ मे रोजी साजरा करण्यात येणार आहे. नूतन कार्यकारणी खालील प्रमाणे- ओंकार एकशिंगे - अध्यक्ष, अरुण उन्हाळे - उपाध्यक्ष, कैलास बडवे - सचिव, सुनिता पाटील - खजिनदार कार्यकारणी सदस्य- प्रविण शिरसीकर, प्रवीण झांबरे,प्रशांत जाधव, संजय जगदाळे, चिन्मय कुलकर्णी, सुनंदा परंडकर, उज्वला धर्माधिकारी अशी श्री भगवंत महोत्सव मंडळ पुणेची नूतन कार्यकारणी तयार करण्यात आलेली आहे.

## पाककलेने गाजवला महिला महोत्सव

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि. ७ मार्च-**

आ. नारायण आबा पाटील मित्रमंडळ व ग्रामपंचायत जेऊर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या जागतिक महिला दिन महोत्सवात आजचा दिवस पाककलेने गाजवला.

या पाककला स्पर्धेची सुरुवात ग्रामपंचायत सदस्या सुलभा घाडगे यांनी तयार केलेला केक ज्योती पाटील यांच्या हस्ते कापून झाली. स्पर्धेत कल्पना आखाडे (कवटाचा नाम), सोनल कांबळे (मंचुरिअन), स्वाती सुरवसे (पाटवडी रस्सा), मंगल सुरवसे (मेदुवडा), मनिषा लोंढे (पोहे बटाटा पुरी), शोभा बेरे (चंपाकळी ढौकळा), उर्मीला आदलिंग (आंबील व गव्हाच्या शंकरपाळ्या) जनाबाई कांबळे (मेदु पकोडे), अश्विनी काळे (ढोकळा), दिपाली तंटक (चिरोटे), जोस्तना कांबळे (लिंबाचे लोणचै), शारदा बादल (राघवदास लाडू), रत्नम ाला बादल (मुगाचे अप्पे), सुनिता कुलकर्णी (पाटवडी), अर्चना कुलकर्णी ( काकडीचा हलवा,



गाजराचे लोणचे), रागीनी ठाकर (शेगाव कचोरी), धनश्री राजमाने (बर्ड नेस्ट स्नॅक), अश्विनी सोहनी (कोबीचे रोल), प्रणिता डोणे (गुलाबजामुन), प्रभावती व्हरे (लवंग लतिका), वर्षा तांदळे (ताकवडी), वर्षा उघडे (दाळीचे लाडू), रोहिणी हेळकर (ढोकळा), नंदा गादिया (केळीचे वडे), काजल गादिया (खांडवी), अंकीता गादिया (पोह्याचे कटलेट), साधना लुणावत (ब्रेकफास्ट स्मुदी), मीना कात्रेला (होममेड मुखवास ), ऐश्वर्या छत्रबंध ( खिच्चे पापड ), रंजना छत्रबंध (शंकरपाळ्या), कृष्णाई मोटे (फ्रुट सलाड), आरती घाडगे (मेदुवडे), अंबिका सातव (ज्वारीच्या पीठाची पुरी ), उज्वला कळसाईत (बीटाचे कटलेट व आप्पे), शीतल माने (रवा मेदुवडा), अंकीता बादल (काकडी बीट सलाड), मंगल गादीया (पोहे वडे ), प्रतिभा शिंदे (तीळ गुळ शेंगदाणे पोळी) सुमन घोरपडे (गुळाचे अनारसे ), संध्या हेळकर (पालेभाजी पुरी), मनिषा वनवे (गूळ भेंडी हुरडा), लता निंबाळकर (साखरेचे अनारसे), मीना जाधव (ढोकळा), छाया पाटील (वडापाव), वैशाली पाथ्रुडकर (बीट हलवा), मनीषा कांडेकर (पालक भजी), भारती बलदोटा (गहु मोमोज ), सुरेखा शिंदे (दहि पोहे), वर्षा मुटके (दहि धपाटे), परवीन नदाफ (ढोकळा) आदिंनी उत्तम व रुचकर पदार्थ या महोत्सवात मांडले.

धाराशिव
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## तलाठी महिलेस ३५०० लाच घेताना एसीबीच्या जाळ्यात

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.७ मार्च -**

लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या (ला.प्र.वि.) पथकाने धाराशीव जिल्ह्यातील लोहारा तालुक्यातील पेठसांगवी सज्जातील तलाठी अश्विनी बालाजी देवनाळे यांना ३५०० रुपयांची लाच स्वीकारताना रंगेहाथ पकडले. तक्रारदाराने आपल्या वडिलांच्या नावे असलेली जमीन स्वतःच्या नावावर फेरफार करण्यासाठी अर्ज केला होता. या अर्जावर प्रक्रिया करण्यासाठी तलाठ्याने ८००० रुपयांची लाच मागितली होती. तडजोडीनंतर ही रक्कम ३५०० रुपये ठरली होती. तक्रारदाराने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाशी संपर्क साधल्यानंतर आज (६ मार्च) सापळा रचण्यात आला. तलाठ्याने आपल्या कार्यालयात तक्रारदाराकडून पंचासमक्ष लाच स्वीकारली. त्याच वेळी अधिकारी व कर्मचाऱ्यांनी कारवाई करून तिला ताब्यात घेतले. लाचखोर महिलेकडून ३५०० रुपये लाच रक्कम, इतर २७६० रुपये रोख रक्कम, अंदाजे ५ ग्रॅम वजनाची सोन्याची अंगठी, सोनाटा कंपनीचे मनगटी घड्याळ, सॅमसंग मोबाईल आरोपीच्या घराची झडती सुरू असून तिचा मोबाईल पुढील तपासासाठी जप्त करण्यात आला आहे. या कारवाईत पोलिस निरीक्षक विकास राठोड, पोलीस उपअधीक्षक सिध्दाराम म्हेत्रे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस अंमलदार नेताजी अनपट, सिध्देश्वर तावसकर, जाकेर काझी यांनी सहभागी होते.



## संक्षिप्त वृत्त...

### मंत्री ॲड.आशिष शेलार आज जिल्ह्यात

**धाराशिव, दि.७ मार्च -**



माहिती तंत्रज्ञान व सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड.आशिष शेलार हे ८ मार्च रोजी जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहे.त्यांचा दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे आहे. सकाळी ८.१० वाजता सोलापूर विमानतळ येथे आगमन व शासकीय वाहनाने तुळजापूरकडे प्रयाण करतील. सकाळी ९ वाजता तुळजापूर येथे आगमन, राखीव व श्री तुळजाभवानी देवीजींचे दर्शन घेतील. सकाळी १० वाजता तुळजापूर मंदिर प्रशासकीय कार्यालय येथे पुरातत्व विभागाची आढावा बैठक घेतील. सकाळी ११ वाजता तुळजापूर येथून शासकीय वाहनाने अक्कलकोटकडे प्रयाण करतील.

### हनुमान जयंती उत्सवाच्या अध्यक्षपदी पवार

**तुळजापूर, दि.७ मार्च -**

शहरात मोठ्या जल्लोषात साजरी होणारी सार्वजनिक हनुमान जयंती निमित्ताने बैठक पार पडली. या बैठकीत सर्वानुमते यंदाच्या जयंती उत्सव समितीच्या अध्यक्षपदी सोमनाथ पवार यांच्या निवडीची घोषणा जय बजरंग जय वडार प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष श्रावण पवार यांनी केली. तुळजापूर शहरात ६ मार्च रोजी सायंकाळी हनुमान जयंती निम्मित बैठकित विविध समिती पदाधिकारी निवडण्यात आले. यात उपाध्यक्षपदी बाळू शिंगे,कोषाध्यक्षपदी सनी इटकर,सचिन बनपट्टे, मिरवणूक प्रमुख म्हणून सुरज इटकर,लक्ष्मण शिंगे,बापू राधे पवार,तुकाराम देवकर, मशा काका पवार, चंद्रकांत पवार,श्रावण भापू पवार,रमा पवार,गोकुळ पवार यांची एकमताने निवड करण्यात आली. या बैठकीला प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष श्रावण पवार, लक्ष्मण पवार, धर्मराज पवार आदी वडार बांधव यांच्या मोठ्या संख्येने उपस्थितीत होते.

### मिनी ट्रॅक्टर योजनेची संधी

**धाराशिव, दि.७ मार्च -**

अनुसूचित जाती व नवबौद्ध स्वयंसहायता बचत गटांसाठी मिनी ट्रॅक्टर व त्याच्या उपसाधनांच्या पुरवठा योजनेचा लाभ घेण्याची संधी उपलब्ध झाली आहे. इच्छुक बचत गटांनी २५ मार्चपर्यंत http://mto.mahasamajkalyan.in या संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज सादर करावेत,असे आवाहन समाज कल्याण विभागाने केले आहे. ऑनलाईन अर्जाची एक प्रत व आवश्यक कागदपत्रांची सत्यप्रत ३० मार्च २०२५ पर्यंत सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण कार्यालय,धाराशिव येथे सादर करणे बंधनकारक आहे. अधिक माहितीसाठी संबंधित कार्यालयाशी संपर्क साधावा,असे आवाहन समाज कल्याणचे सहाय्यक आयुक्त बी.जी.अरवत यांनी केले आहे.

### अवैध मद्य विरोधी कारवाई

**धाराशिव, दि.७ मार्च -**

वरुडा पारधी पिडीजवळ बापू भगवान पवार यांचे शेतामध्ये अंदाजे १८ हजार किंमतीचे ४०० लिटर गुळमिश्रीत रासायनिक द्रव व ७० लिटर गवठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने ठेवल्याने गुन्हा दाखल केला आहे.

# आर्थिक, धोरणात्मक दिशा देणाऱ्या संस्थेच्या उपाध्यक्षपदी राणादादा

**मित्र उपाध्यक्ष म्हणून शासन आदेशाद्वारे केली निवड जाहीर होताच जिल्ह्यात कार्यकर्त्यांचा जल्लोष... जिल्ह्यालाही मिळणार नवी दिशा...**

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.७ मार्च -**

केंद्र सरकारच्या नीति आयोगाच्या धर्तीवर राज्यात 'महाराष्ट्र इन्स्टिट्यूशन फॉर ट्रान्सफॉर्मेशन' अर्थात 'मित्र' या संस्थेची स्थापना करण्यात आली आहे.राज्याची आर्थिक व धोरणात्मक दिशा ठरविणाऱ्या या महत्वपूर्ण संस्थेच्या उपाध्यक्षपदी तुळजापूर विधानसभा मतदारसंघाचे कर्तव्यदक्ष तथा अभ्यासू आमदार राणाजगजितसिंह पाटील यांची निवड करण्यात आली आहे. गुरुवारी राज्य सरकारने तसा शासन आदेश जारी करीत आमदार पाटील यांची उपाध्यक्षपदी निवड करण्यात आल्याचे जाहीर केले आहे. निवड जाहीर होताच जिल्ह्यात कार्यकर्त्यांनी फटाके फोडून पेढ वाटत जल्लोष साजरा केला. त्यांच्या निवडीने जिल्ह्यालाही नवी दिशा मिळणार असल्याचे जाणकार सांगत आहेत.

'मित्र' च्या नियामक मंडळाचे अध्यक्ष मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आहेत तर सहअध्यक्ष उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व अजित पवार आहेत. या शासन निर्णयानुसार 'मित्र'द्वारे कृषी व त्यासोबत संलग्न क्षेत्र, आरोग्य व पोषण, शिक्षण, कौशल्य विकास व नावीन्यता, नागरिकरण व बांधकाम क्षेत्र विकास, भूमी प्रशासन, वित्त, पर्यटन, क्रीडा, ऊर्जा संक्रमण, वातावरणीय बदल, उद्योग, लघुउद्योग, पायाभूत सुविधा, माहिती तंत्रज्ञान, पूरक सेवा व दळणवळण आदी विविध क्षेत्रांवर लक्ष केंद्रित करून या क्षेत्रात महत्वपूर्ण काम केले जाणार आहे. राज्याच्या विकासाला आर्थिक, धोरणात्मक, तांत्रिक तसेच कार्यात्मक दिशा देणारा विचार गट म्हणून मित्र या संस्थेकडे पाहिले जाते. राज्याच्या सर्वांगीण विकासासाठीच ही संस्था कार्यरत आहे. त्याशिवाय विविध शासकीय विभाग, भारत सरकार, नीती आयोग, सिव्हिल सोसायटी, विविध शासकीय संस्था तसेच खासगी व्यावसायिक संस्था यांच्यात सुसंवाद घडवून आणत विकासाच्या नवीन उपाययोजना सुचवण्यासाठी काम करण्याची जबाबदारी देखील 'मित्र' नावाच्या महत्वपूर्ण संस्थेवर सोपविण्यात आली आहे.



राज्य सरकारने गुरुवारी तसा शासन आदेश जारी करीत आमदार राणाजगजितसिंह पाटील, आमदार दिलीप वळसे पाटील व नियोजन मंडळाचे कार्यकारी अध्यक्ष राजेश क्षिरसागर यांची उपाध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली आहे. राज्याच्या विकासात प्रादेशिक समानता आणण्यासाठी विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्राकरिता 'मित्र'साठी प्रादेशिक मित्रचीही स्थापन करण्यात येणार आहे.

राज्य सरकारला आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्था आणि सीएसआर ट्रस्ट फंड यांच्याकडून विकासात्मक उपक्रमांसाठी राज्य शासनाच्या मालमत्तेचे मुद्रीकरण आणि सवलतीचा वित्तपुरवठा यांसारख्या नाविन्यपूर्ण साधनांद्वारे अर्थसंकल्पबाह्य संसाधने उभारण्याचा सल्ला देणे. राज्य शासनाच्या विविध विभागांना मदत करत असताना स्थानिक पातळीवरील नियोजन आणि विकासात्मक कार्यक्रमांच्या अंमलबजावणीत सुधारणा करण्यासाठी जिल्ह्यांचा डेटा ॲनालिटिक्स माध्यमातून सहाय्य करणे, अंमलबजावणी करणाऱ्या यंत्रणांची कार्यक्षमता सुधारण्यासाठी परिणाम अधारित रिअल टाईम मुल्यांकनाच्या माध्यमातून मदत देणे आदी महत्वपूर्ण आणि मूलभूत कामे 'मित्र'च्या माध्यमातून साकारली जाणार आहेत. तसेच कमी प्रगती असणाऱ्या तालुक्यांमध्ये आणि शहरांमध्ये विकासाच्या विविध आणि लोकोपयोगी योजना राबविणे आणि त्या कामाचा वेळोवेळी आढावा घेणे हेदेखील मित्रचे महत्वाचे काम असणार आहे.नियुक्तीबाबत प्रतिक्रिया देताना आ.राणाजगजितसिंह पाटील म्हणाले, राज्याचा विकास साधण्यासाठी महाराष्ट्र इन्स्टिट्यूशन फॉर ट्रान्स्फॉर्मेशन (मित्र) या संस्थेची स्थापना करताना त्यातील मूळ उद्देश साध्य करण्याची मोठी जबाबदारी आहे. नीती आयोगाशी संलग्न अशी मित्रया संस्थेची कार्यपद्धती असून अशा महत्वाच्या संस्थेच्या उपाध्यक्षपदी नियुक्ती झाल्याने मला राज्याची सेवा करण्याची एक सुवर्णसंधी प्राप्त झाली आहे. या नियुक्तीबद्दल या संस्थेचे अध्यक्ष राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आभार व्यक्त करतो. मित्र संस्थेच्या झालेल्या नियुक्तीच्या माध्यमातून राज्याचा विकास साध्य करण्याचा आपण प्रामाणिक प्रयत्न करणार आहोत.

## वार्षिक परीक्षा १५ एप्रिलपूर्वी घ्याव्यात, शिक्षक परिषदेचे शिक्षणमंत्र्यांना निवेदन

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.७ मार्च -**

इयत्ता पहिली ते नववी वर्गाच्या वार्षिक परीक्षा/पॅट अंतर्गत संकलित मूल्यमापन परीक्षा १५ एप्रिल पूर्वीच घेण्यात याव्यात, अशी मागणी महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेच्या वतीने शालेय शिक्षणमंत्री दादाजी भुसे यांच्याकडे केल्याची माहिती राज्य कार्याध्यक्ष उमाकांत कुलकर्णी यांनी दिली.



यासंदर्भात देण्यात आलेल्या निवेदनात म्हटले आहे की, राज्य शिक्षण मंडळांच्या शाळांमधील इयत्ता पहिली ते नववी वर्गाच्या वार्षिक परीक्षा दरवर्षी मार्च अखेर अथवा एप्रिलच्या १२ तारखेपर्यंत शाळस्तरावरुन पूर्ण करण्यात येतात. परंतू दि. ५ मार्च रोजी शालेय शिक्षण विभागाने काढलेल्या परिपत्रकात यावर्षी वार्षिक परीक्षा दि. ८ एप्रिल ते २५ एप्रिल या कालावधीत घेण्याबाबत आदेश देण्यात आलेले आहेत.

२५ एप्रिल रोजी शेवटचा पेपर झाल्यावर उत्तरपत्रिका तपासणी, सर्व विषयांचे गुण संकलित करुन निकाल तयार करणे, प्रगती पुस्तके लिहिणे, विद्यार्थी संचिका लिहिणे इत्यादी कामे पूर्ण करणे ४ ते ५ दिवसांत शक्य होत नाही. शिवाय शिक्षक मुख्याध्यापक यांना दररोज करण्याची ऑनलाईन कामांची व्याप्ती वाढतच आहे. माध्यमिक शाळांमध्ये विषय निहाय शिक्षक असतात. एका शिक्षकाकडे किमान तीन चार विषयांचा कार्यभार असतो. त्यामुळे उत्तरपत्रिका तपासून निकाल तयार करण्यास त्यांना पुरेसा वेळ मिळणार नाही.

तसेच वेळापत्रकात अचानक बदल केल्यामुळे पालकांनी एप्रिल महिन्यात केलेले कौटुंबिक प्रवास नियोजन विस्कळीत होणार आहे. शिवाय उन्हाची तीव्रता, पिण्याच्या पाण्याची टंचाई या गोष्टी विचारात घेता २५ एप्रिल पर्यंत परीक्षा चालू ठेवणे विद्यार्थ्यांच्या दृष्टीने योग्य राहणार नाही.

या सर्व बाबींचा गांभिर्य पूर्वक विचार करून पहिली ते नववीच्या वार्षिक परीक्षा / झढ अंतर्गत संकलित मूल्यमापन परीक्षा दरवर्षीप्रमाणे १५ एप्रिल पूर्वीच घेण्यात याव्यात , अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. निवेदनावर परिषदेचे वेनुनाथ कडू , निरंजन गिरी आदींच्या स्वाक्षरी आहेत.

## तलावांचे होणार पुनरुज्जीवन : 'गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार' योजना

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.७ मार्च -**

गावोगावी जलसंधारणाच्या दृष्टीने मोठे पाऊल उचलण्यात आले असून, शासनाने तलावांचे पुनरुज्जीवन आणि नाला खोलीकरण-रुंदीकरणासाठी विशेष योजना राबविण्याचा निर्णय घेतला आहे. 'गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार' आणि 'नाला खोलीकरण व रुंदीकरण' या योजनांच्या माध्यमातून तलावातील गाळ काढण्याचे काम हाती घेण्यात आले आहे.

प्रत्येक गावाच्या तलावातील गाळ काढण्याचा संपूर्ण खर्च शासनाने उचलण्याचे निश्चित केले असून,हे काम एकाच दराने संपूर्ण राज्यात होणार आहे. यासाठी ग्राम पंचायती आणि स्वयंसेवी संस्थांना जिल्हा प्रशासनाच्या नियमानुसार अर्ज करून सहभागी होता येईल. याशिवाय,तलावातून काढलेल्या गाळाचा उपयोग शेतजमिनीच्या सुपीकतेसाठी करता यावा,यासाठी अल्पभूधारक, विधवा, दिव्यांग आणि आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबांना शासनाकडून ठराविक दराने अनुदानही दिले जाणार आहे. या उपक्रमाला गती देण्यासाठी आणि तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करण्यासाठी भारतीय जैन संघटना (बीजेएस) आणि महाराष्ट्र शासन यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला आहे. एमागणी अर्ज भरण्यासाठी बीजेएसने 'बीजेएस डिमांड अँप उपलब्ध करून दिले असून, प्रशिक्षित समन्वयक व कार्यकर्ते जिल्हा, तालुका व गावपातळीवर ग्राम पंचायतींना आणि शेतकऱ्यांना सहकार्य करणार आहेत.

या योजनेसाठी 'सुहाना स्पाइसेस' यांनीही जनजागृतीसाठी सहकार्य केले आहे. अधिक माहिती करून घेण्यासाठी 'गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार' या शासनाच्या पोर्टल www.shiwaar.com ला भेट द्यावी.संबंधित गावाच्या सरपंचांनी त्वरित अर्ज करून आपल्या गावातील तलाव पुनरुज्जीवित करण्यासाठी पुढाकार घ्यावा, तालुकानिहाय समन्वयक यांची नेमणूक करण्यात आली आहे.

### दिव्यांग प्रमाणपत्र तपासणी शिबिर

**परंडा, दि.७ मार्च -**

दिव्यांग बांधवांना दिव्यांगत्वाचे ऑनलाईन प्रमाणपत्र मिळावे त्याचबरोबर तालुक्यातील दिव्यांग प्रमाणपत्र पासून वंचित राहू नये या उद्देशाने दिव्यांग उद्योग समूहाचे राज्याध्यक्ष तानाजी घोडके यांच्या मार्गदर्शनाखाली दिव्यांग तपासणी शिबिर पार पडले. यात ३१ दिव्यांगाची तपासण्या करण्यात आल्या आहेत. या शिबिरामध्ये अस्तिव्यंग दिव्यांग, मतिमंद दिव्यांग, अंध अशा एकूण ३१ दिव्यांग नागरिकांची तपासणी करण्यात आली. या तपासण्या करण्यासाठी धाराशिव येथील तज्ञ डॉ. ज्योती कल्याणी, डॉ.आयुश शिंदे, डॉ. खंडागळे यांनी कामकाज पाहिले हा कॅम्प यशस्वी करण्यासाठी दिव्यांग उद्योग समूहाचे जिल्हाप्रमुख तानाजी घोडके, ता.प्रमुख तानाजी सांगडे, प्रकाश बदर, शिक्षण विभागातील हाजगुडे, जाधव व वैद्यकीय अधिकारी डॉ.कुलकर्णी, बापू खताळ आदींनी सहकार्य केले.




## युवा संसद २०२५ : युवकांसाठी सुवर्णसंधी, ९ मार्चपर्यंत नोंदणी करण्याचे आवाहन

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.७ मार्च -**

भारत सरकारच्या युवा कार्य व क्रीडा मंत्रालयाच्या वतीने विकसित भारत युवा संसद २०२५ या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ,सोलापूर आणि धाराशिव जिल्ह्यातील १८ ते २५ वयोगटातील युवक-युवतींना या उपक्रमात सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक डॉ.राजेंद्र वडजे यांच्या माहितीनुसार,इच्छुक उमेदवारांनी ९ मार्च २०२५ पर्यंत MyBharat.gov.in या पोर्टलवर नाव नोंदणी करणे आवश्यक आहे.जिल्हास्तरीय निवड चाचणी १० व ११ मार्च रोजी सोलापूर विद्यापीठात होणार आहे.

सहभाग इच्छुक उमेदवारांनी What Does Viksit Bharat Mean To You या विषयावर मराठी,हिंदी किंवा इंग्रजी भाषेत २५MB पर्यंतचा एका मिनिटाचा व्हिडिओ तयार करून YouTube वर अपलोड करावा.त्याची लिंक ९ मार्चपूर्वी MyBharat पोर्टलवर अपलोड करणे अनिवार्य आहे.

सोलापूर आणि धाराशिव जिल्ह्यातून एकूण १५० विद्यार्थ्यांची निवड केली जाणार असून,त्यांना १२ व १३ मार्च रोजी सोलापूर विद्यापीठ येथे होणाऱ्या युवा संसदेत सहभागी होता येईल.

विशेष म्हणजे,या युवा संसदेतून निवड झालेल्या युवकांना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याशी विकसित भारत २०४७ या विषयावर थेट संवाद साधण्याची सुवर्णसंधी मिळणार आहे. युवकांनी या संधीचा लाभ घ्यावा,असे आवाहन नेहरू युवा केंद्राचे उपसंचालक यांनी केले आहे.

# मराठवाड्याला पाणी देताना अटीमध्ये भेदभाव का? आ. कैलास पाटील यांचा जलसंपदा मंत्री यांना सवाल

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.७ मार्च -**

पार खोऱ्यातून पाणी वाटप करताना गिरणा प्रकल्पासाठी ३५० तालांकची पण त्याच खोऱ्यातून मराठवाड्याला देताना ही अट ५०० तालांक असा भेदभाव का करण्यात आला व अश्या अधिकाऱ्यावर कारवाई करणार का असा प्रश्न आमदार कैलास पाटील यांनी जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांना विचारला. त्यावर अशी विसंगती जाणीवपूर्वक केली असेल तर निश्चित कारवाई करु असे उत्तर विखे पाटील यांनी दिले.



कैलास पाटील यांनी प्रश्न उत्तराच्या तासामध्ये मराठवाड्याच्या हक्काच्या १८३ द.ल.घ.मी पाण्याचा दुर्लक्षित मुद्दासमोर आणला. दुर्दैवाने आजपर्यंत मराठवाड्यातील एकाही लोकप्रतिनिधीनी या मुद्द्याकडे लक्ष वेधले नाही तो मुद्दा आमदार पाटील यांनी मांडला.

यावेळी पाटील म्हणाले की, पार या खोऱ्यात मराठवाड्यासाठी १८३ द.ल.घ.मी एवढे पाणी नियोजित होत मात्र हे पाणी देताना उंचीची अट घालून गिरणा प्रकल्पासाठी वेगळा न्याय तर मराठवाड्यासाठी वेगळा असा प्रकार झाल्याने गोदावरी खोऱ्यासाठी फक्त ४५.११ दलघमी पाणी उपलब्धता जलविज्ञान नाशिक यांनी दिल्याचे आमदार पाटील यांनी सभागृहासमोर मांडले.

गिरणासाठी ३५० तालांक एवढी अट ठेवण्यात आली तर मराठवाड्यासाठी त्याच खोऱ्यातून पाणी उचलण्यासाठी ही अट ५०० तालांकावर नेण्यात आल्याने गोदावरी खोऱ्यासाठी पाणी उपलब्धता कमी झाल्याचे पाटील यांनी सांगून असा प्रकार करण्याऱ्या अधिकाऱ्यावर कारवाई करणार का? असा सवाल आमदार पाटील यांनी मंत्री विखे पाटील यांना केला. तसेच याला जोडूनच आमदार पाटील यांनी सध्या नार आणि पार खोऱ्यात शिल्लक असणारे १७२ दलघमी हे पाणी मराठवाड्यासाठी देण्यासाठी कार्यवाही केली जाणार का असाही प्रश्न उपस्थित केला. त्यावर विखे पाटील यांनी असा भेदभाव झाल्याचे मान्य केल पण आता उंचीची अट शिथिल केली असून जाणीवपूर्वक असे झाले असेल तर निश्चित अश्या अधिकाऱ्यांवर कारवाई करु, असे आश्वासन विखे पाटील यांनी दिले.

# तुळजाभवानी मंदिरात चुकीच्या नोंदीने व्हीआयपी दर्शन पासचे वाटप

**कर्मचाऱ्यांच्या बेशिस्तपणा, कृत्यामुळे तुळजाभवानी मंदिर संस्थानचे आर्थिक नुकसान...व्हीआयपी दर्शन पासची रक्कम वसूल करण्यासाठी कर्मचाऱ्यांना पत्र..**

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.७ मार्च -**

व्हीआयपी दर्शन पास रजिस्टर मध्ये चुकीच्या नोंदी करून व्हीआयपी नसणाऱ्या भाविकांना व्हीआयपी दर्शनास सोडले म्हणून येथील सामाजसेवक जयकुमार पांढरे यांनी मंदिर संस्थांचे अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी यांना तक्रार अर्ज दिला होता.

सदर तक्रारीवर २२ फेब्रुवारी रोजी मंदिर संस्थानकडून पांढरे यांना पत्राद्वारे कळवले की, मंदिरचे कर्मचारी गणेश मोटे व प्रशांत जाधव यांना पत्र दिले की दर्शनासाठी सोडलेली व्यक्ती कोणत्या पदावर कार्यरत आहे. त्यांना कशाच्या आधारे दर्शनाला सोडण्यासाठी आपण शिफारस केली याचा बोध होत नसल्याने संबंधित दर्शन व्यवस्था करण्याचे प्रयोजन लेखी खुलासा मध्ये आपण सादर सदरील व्यक्ती हे त्याप्रमाणे आपणाकडून प्रतिव्यक्ती पाचशे रुपये प्रमाणे एकूण तीन व्यक्तींचे रुपये दीड हजार का वसुल करू नये,

याबाबत आपण हे पत्र प्राप्त होताच २४ तासांच्या आत स्वयंस्पष्ट खुलासा निम्न स्वाक्षरीत यांच्याकडे सादर करावे हे स्पष्ट खुलासा द्यावा, असे पत्र दिले आहेत. तरी देखील आपले पत्र देऊन एकूण तेरा दिवस होत असून सदर अधिकाऱ्यांनी कसलाही खुलासा आपणास दिलेला नाही तसेच आपल्या पत्राचा सदर अधिकाऱ्यांनी अवमान केला असून त्यांच्यावर असतागायत कोणत्याही प्रकारची कारवाई झालेली नाही. वरील व्यक्तींना आपल्या पत्रानुसार कामात कसूर व चुकीच्या पद्धतीने व्हीआयपी दर्शन पास दिले, असे सिद्ध झाले आहे. अशा कर्मचाऱ्यांकडून बेशिस्तपणा घडला व त्यांच्या कृत्यामुळे तुळजाभवानी मंदिर संस्थान (ट्रस्ट) चे आर्थिक स्वरूपाचे नुकसान केले आहे.

त्यांच्या कामात कसुर केलेला दिसून आला असून अशा दोषी कर्मचारी अधिकारी यांच्याकडून प्रति व्यक्ती (५००) रुपये प्रमाणे संपूर्ण रक्कम त्यांच्या वेतनातून वसूल करावे व महाराष्ट्र नागरिक (सेवा व शिस्त) अपील नियम ५ मधील तरतुदीनुसार/१९६९/ नियमानुसार त्यांच्याविरुद्ध विना विलंब शिस्तभंग व दंडात्मक स्वरूपाची कारवाई करून त्यांच्या गोपनीय अहवालावर व सेवा पुस्तकेवर याची नोंद करावी, अशी मागणी पांढरे यांनी केली आहे.

### व्हीआयपी भाविकांचे पदनाम चेक न करता नोंदी...

तुळजाभवानी मंदिरामध्ये चुकीच्या पद्धतीने व्हीआयपी स्पेशल दर्शन पास कुठलीही शाहनिश न करता दिले जातात. व्हीआयपी दर्शन पास रजिस्टरच्या नोंदी बघितल्यानंतर व्हीआयपी नसणाऱ्यांच्या बोगस नोंदी करून व्हीआयपी पास दिल्याचे दिसून येत आहे. पाच देणाऱ्यांचे पदनाम चेक न करता दिल्याचे दिसून येत आहे. रजिस्टरला अनेक ठिकाणी केवळ नोकरी व्यवसाय अशा नोंदी आहेत. किरकोळ व्यापारी दुकानदारांना वर्ग तीन वर्ग चारच्या नोकरी असणाऱ्या कर्मचाऱ्यांना देखील व्हीआयपी पास दिल्याचे नोंदीवरून समजते. रजिस्टर नोंदीसाठी असणाऱ्या शेराचे रखने देखील रिक्त आहेत. एकंदरीत यावरून रजिस्टरला व्हीआयपींच्या अनेक बोगस नोंदी असल्याचे निष्पन्न होते.


**जाहीर प्रकटन**
**तालुका कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसीलदार यांचे कार्यालय कळंब**
**(संकलन-कुळ)**
दुरध्वनी क्र.०२४७३-२६२२५४ Email Id-tahkalambgmail.com

**जा.क्र.२०२४/कुळ/कावि-८७ दिनांक :०५/०३/२०२५**

कळंब बाबुराव होनमाने रा. नागझरवाडी ता. कळंब यांनी ज्याअर्थी श्रीमती कलावती मा.जिल्हाधिकारी कार्यालय, धाराशिव येथे अर्ज सादर करुन मौ. नागझरवाडी येथील जमीन ग.नं.३० क्षेत्र००हे.९३ आर सिलींग जमीन विक्री करण्यास परवानगी मिळणे बाबत विनंती केली आहे. सदर प्रकरणाचा संचिका क्र.२०२४/कुळ/कावि-८७ असा आहे. त्यावरुन मौ.नागझरवाडी तसेच कळंब तालु तमाम जनतेस कळविण्यात येते की, वरील नमुद अर्जाच्या अनुषंगाने कोणाचा कांही आक्षेप असल्यास त्या ईसम, संस्थेने हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासुन आठ दिवसाच्या आत तहसिल कार्यालय, कळंब यांचेशी लेखी स्वरुपात आक्षेप नोंदवावा. जर मुदतीत कोणाचा कांही आक्षेप आला नाही तर प्रकरण उचित आदेशासाठी राखीव ठेवण्यात येईल.

**जाहीर प्रगटन देणार**
**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार, कळंब**

# धाराशिव जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## पुणे १० मार्चपर्यंत फुले कृषी-२०२५ प्रदर्शन

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.७ मार्च -**

महात्मा फुले कृषी विद्यापीठाच्या कृषी महाविद्यालय, पुणे येथे फुले कृषी - २०२५ हे कृषी प्रदर्शन ६ ते १० मार्च २०२५ दरम्यान आयोजित करण्यात आले आहे.या प्रदर्शनात शेतकऱ्यांसाठी विविध तंत्रज्ञान, संशोधन आणि आधुनिक कृषी पद्धतींचे सादरीकरण केले जाणार आहे. प्रदर्शनाच्या ७ ते ९ मार्च २०२५ या कालावधीत शेतकरी उत्पादक संस्था मेळावा देखील आयोजित करण्यात आला आहे.

केंद्र शासनाच्या १० हजार शेतकरी उत्पादक संस्था स्थापना व बळकटीकरण योजनेअंतर्गत उत्तम कार्य करणाऱ्या शेतकरी उत्पादक संस्थांचा या मेळाव्यात सहभाग राहणार आहे.त्यांचे उत्पादन प्रदर्शन आणि विक्रीसाठी उपलब्ध राहणार असून,शेतकऱ्यांसाठी शेतकरी उत्पादक संस्थेसंदर्भात मार्गदर्शन व चर्चासत्र आयोजित केले आहे. देशामध्ये प्रथमच रासायनमुक्त शेतीचे प्रात्यक्षिक व प्रदर्शन आयोजित करण्यात आले असून,शेतकरी उत्पादक संस्थांसाठी आणि नवीन शेतकरी उत्पादक संस्था स्थापन करू इच्छिणाऱ्या शेतकऱ्यांसाठी हे प्रदर्शन मार्गदर्शक ठरेल.राज्यातील सर्व शेतकरी बांधवांनी या प्रदर्शनाचा आणि मेळाव्याचा लाभ घ्यावा,असे आवाहन कृषी विभागामार्फत करण्यात आले आहे.



## राजकारणाच्या पलीकडे मंदिर संवर्धन जतन आवश्यक : छत्रपती संभाजी राजे

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.७ मार्च -**



महाराष्ट्राची कुलस्वामिनी आई तुळजाभवानी मंदिर हे पुरातन ऐतिहासिक असून या मंदिराचे पुरातन जपण्याची गरज आहे. मंदिरचे शास्त्र युक्त पद्धतीने जतन आणि संवर्धन होण्यासाठी मी आजचा दौरा हा केला आहे असे मंदिर प्रशासकीय कार्यालयात घेण्यात आलेल्या पत्रकार परिषदेमध्ये छत्रपती संभाजी राजे यांनी सांगितले.

तुळजापूर शहरात छत्रपती संभाजी राजेंच आगमन होताच फटाक्यांची आतिषबाजी तुळजापूरकरांच्या वतीने करण्यात आली. देवी दर्शनानंतर पत्रकार परिषद घेऊन मंदिराच्या विकासाबाबत त्यांनी आपले मत व्यक्त केले. यावेळी त्यांच्यासोबत रायगड येथील प्राधिकरण समितीचे सदस्य उपस्थित होते.

छत्रपती संभाजी राजे यांचा मंदिर संस्थान कार्यालयात मंदिर संस्थांच्या वतीने तहसीलदार अरविंद बोळंगे यांनी देवीचे प्रतिमा सत्कार केला. श्री तुळजाभवानी मंदिर चा विकास होणे गरजेचे आहे पण यामध्येही विकास होताना मंदिरचे पुरातन जपणं तेवढेच गरजेचे आहे.तुळजाभवानी देवीच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना मंदिरची प्राचीनता दिसली पाहिजे. नवीन आणि लेटेस्ट पणा आणण्यापेक्षा जुनं जपता आलं पाहिजे. साडेतीन शक्तीपीठातील एक पूर्ण पीठ असणारे हे मंदिर आहे.

काही दिवसापूर्वी एक टीम पाठवून मंदिराचे पाहणी केली त्यांनी मला अहवाल दिला अहवाल पाहुन मुख्यमंत्र्यांशी चर्चा केली आहे. मंदिरातील शिळांना जरी तडे पडले असले तरी त्याचं निरंतर होऊ शकते. मग तुम्हाला शिखर उतरायची काय गरज आहे. शिखराच्या विटा सुध्दा प्राचीन आहेत. केंद्राची टीम बोलून राज्यातील पुरातन विभागाने अहवाल दिला असला तरी काही गडबडीत कुठलाही निर्णय न घेता केंद्रीय पुरातन विभागाचे टीम बोलावून त्यांचा देखील अहवाल घेणे गरजेचे आहे. यावेळेस मंदिर संस्थांचे तहसीलदार अरविंद बोळंगे धार्मिक व्यवस्थापक अमोल भोसले, मंदिर संस्थानचे कर्मचारी जयसिंग पाटील, विश्वास कदम,, रवींद्र भराटे,अनिरुद्ध देशपांडे, अभिजीत तेरखेडकर, पुजारी मंडळाचे अध्यक्ष अमर परमेश्वर,अण्णासाहेब क्षीरसागर, अजय साळुंके,जीवन इंगळे, अमोल कुतवळ, कुमार टोले, महेश गवळी, महेश चोपदार, सत्यजित साठे, प्रवीण कदम, विकास मलबा इत्यादी उपस्थित होते.

## आ.राणाजगजितसिंह पाटील यांच्या निवडीबद्दल तुळजाभवानीस महाआरती

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.७ मार्च -**



केंद्र सरकारच्या नीति आयोगाच्या धर्तीवर स्थापन केलेल्या 'महाराष्ट्र इन्स्टिट्यूशन फॉर ट्रान्सफॉर्मेशन' अर्थात 'मित्र' या राज्याची आर्थिक व धोरणात्मक दिशा ठरविणाऱ्या महत्वपूर्ण संस्थेच्या उपाध्यक्षपदी आमदार राणाजगजितसिंह पाटील यांची निवड झाल्याबद्दल तुळजाभवानी मंदिरासमोर महाआरती करण्यात आली. आरती केल्यानंतर फटाके फोडून आनंदोत्सव साजरा केला

यावेळी तुळजाभवानी दूध संघाचे चेअरमन बाबासाहेब शिंदे, युवा मोर्चाचे तालुकाध्यक्ष आनंद कंदले, माजी नगरसेवक सुहास साळुंके, औदुंबर कदम, अविनाश गंगणे, भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष संदीप गंगणे, तालुका सरचिटणीस शिवाजी बोधले, शहराध्यक्ष शांताराम पेंदे, शहर सरचिटणीस धैर्यशील दरेकर, युवा मोर्चा जिल्हा उपाध्यक्ष राजेश्वर कदम, युवा मोर्चाचे शहर अध्यक्ष राम चोपदार, उमेश गवते, ऋतुराज भोसले, रोहित चव्हाण, समर्थ पैलवान, शुभम बागल यांची उपस्थिती होती.

## स्त्री जन्मा तुझी कहाणी... तु जगाची उध्दारी,तूच जगत जननी!

### जागतिक महिला दिन विशेष

स्त्रीची अनेक रूपे आहेत पुर्ण विश्वाला व्यापून टाकणारी स्त्री विधात्याने स्त्रीला दिलेले अनण्य साधारण महत्त्व . स्त्री म्हणजे ईश्वर आणि आत्मा यांचे मिलन ,विश्वनिर्मिती हे सर्व असुनही ती अबला ! महाभारतापासून स्त्रीचा वापर केला गेला. तिच्याकडून प्रचंड अपेक्षा केल्या गेल्या.

जन्माला आल्या पासून अंतापर्यंत अपेक्षा पूर्ण करता करता स्त्री आपले अस्तित्व विसरून गेली. मुलगी म्हणून आईवडिलांची,पत्नी म्हणून पती समाज कुटुंबातील सदस्यांच्या अपेक्षा.

आई झाली की, मुलांच्या अपेक्षा हे सर्व करताना स्वतः च्या अस्तित्वाचा विचार कधी तिने केला ? स्त्री तु खरचं खुप भाग्यवान आहेस.कारण तुझ्याशिवाय हे विश्व अपुरे आहे. ज्या राष्ट्राच्या मातीत मैत्रिय गार्गीय मदर तेरेसा यासारख्या जन्माला आल्या ते राष्ट्र भाग्यवानचं

एवढेच नव्हे तर स्त्री खुप भाग्यशिल आहे त्यामुळे अनेकांचे संसार साधत आहे. नाहीतर पाश्चात्य संस्कृतीने सकाळी लग्न आणि संध्याकाळी घटस्पोट झाला असता. पण आज गरज आहे स्त्री जागृतीची,डोळस पणे जगण्याची आपले अस्तित्व शोधण्याची प्रथम स्त्री ने आपल्या स्त्रीत्वाचा अभिमान बाळगायला पाहिजे.मुलगी जन्माला येण्यापासून रोखु नये यामुळे समाज संतुलन राहिले.

स्त्रीला समाजात वावरणे समाज सुरक्षित होईल .

प्रचलित समाजाने स्त्रीला शिक्षणापासून वंचित ठेवले. पण सावित्रीबाई फुले यांच्या कतृत्वाने स्त्री शिक्षणाची दारे खुली झाली. समाजात प्रत्येक क्षेत्रात दिवसंदिवस प्रगती होत आहे. गतिमान होऊन देशाच्या प्रमुख पदावर स्त्री विराजमान झाली. समाजामध्य अबला म्हणाऱ्या स्त्रीने शेतीपासून अवकाशापर्यंत मजल मारली.

पुरुषांच्या खांद्याला खांदा लाऊन स्त्री समाजात वावरत आहे. पण स्त्री खऱ्या अर्थाने मुक्त झाली का? स्त्रीने आज जागे व्हावे व प्रचलित कर्म समाजबंधाने झुंगारून आपल्या स्त्री मुक्तीचा झंझावत सुरु करावा.

स्त्री मुक्ती म्हणजे काय ? हे प्रथम जाणावे पँटशर्ट घालून अवेळी घराबाहेर पडणे किंवा घरी येणे म्हणजे स्त्री मुक्ती नव्हे. शिक्षणाच्या नावाखाली गैरमार्गाने जाणे.

आधुनिकतेच्या नावाखाली घरातील मोठ्या माणसांचा अपमान करून कुटुंबस्वाथ्य प्रेम बिघडून पार्टी सभा करणे म्हणजे नवीन विचार,आदर्श जोपासणे ? शिक्षणाबरोबर नम्रता , संस्कार संस्कृती जोपासना करून अंधश्रद्धा झुंगारून नवीन विचार स्वीकारणे म्हणजे मुक्ती होय!

**- राजश्री कुटे-मुंढे**
**जि.प.प्रा.शाळा चोराखळी**

## शरणाप्पा धरणे यांचे निधन

**जळकोट, दि.७ मार्च -**



तुळजापूर तालुक्यातील जळकोट येथील रहिवासी सेवानिवृत्त मुख्याध्यापक शरणाप्पा सांबप्पा धरणे (वय ८२) यांचे वृद्धापकाळाने शुक्रवार (दि.७) रोजी सकाळी ७.४५ वाजण्याच्या सुमारास निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर सायंकाळी ५ वाजण्याच्या सार्वजनिक स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात २ पत्नी, भावजय असा परिवार आहे. शरणाप्पा धरणे यांनी शिक्षक, सहशिक्षक व मुख्याध्यापक या पदावर सेवा बजावली होती. जळकोट, नळदुर्ग येथील धरणे उद्योग समूहाचे धरणे ब्रदर्स यांचे ते काका होत. जळकोट येथील शिवराज, ओंकार आळंगे यांचे ते मावस काका होत.

## एक पाऊल नव्या बदलाकडे



**अनिता निकते**
**९११२२४२०११**

८ मार्च जागतिक महिला दिनाच्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा या दिनानिमित्त समाजातील यशस्वी महिलांचा सन्मान केला जातो. जेणेकरून बाकीच्या महिलांना प्रेरणा मिळेल महिला सक्षम बनेल. ती स्वतः स्वावलंबी बनेल शारीरिक आर्थिक मानसिक दृष्ट्या सक्षम बनेल.

महिला सबलीकरण हे झालेच पाहिजे पण कोणी असा विचार केलाय का की समाजात अशा काही एकल महिला आहेत त्यामध्ये विधवा, परितकता घटस्फोटीत मुलींचे वयात आल्याबरोबर लग्न करून देतात, काहींचे दुर्दैवाने तीन-चार वर्षामध्ये पती मरण पावतात, व ती विधवा होते त्या महिलेचा काहीही दोष नसताना तिला समाजात तिला वेगळी वागणूक दिली जाते, काही भागात तर एकलं ना बोलण्याची पद्धतच बदलते, ते विधवा, रांडव, पांढऱ्या कपाळाची, नवऱ्याला गिळून बसलेली, असे शब्द वापरले जातात अशावेळी तिच्या मनावर काय आघात होतो याचा विचार केलाय कुणी? लग्नाआधी त्याच मुलीला कुमारिका म्हणून सुहासिनीचा मान मिळायचा तिच्या डोक्यावर अक्षदा पडल्या आणि तिचा काहीही दोष नसताना तिचा पती मरण पावला, तिचा यात काय दोष तिच्याबद्दलची समाजाची मतेच बदलली, हे कुठेतरी थांबले पाहिजे.

एकीकडे आपण महिला सक्षम झाली पाहिजे यासाठी प्रयत्न करतो आणि दुसरीकडे आपणच आपल्या बहिणी समान असणाऱ्या एकल विधवा महिलांचा समाजात दुजाभाव करतो, अगोदर सती जाण्याची प्रथा होती आता ती बंद झाली, आता सध्या त्या मुलीचा पती वारला ती विधवा झाली की तिच्या गळ्यातील मंगळसूत्र तोडतात, पायातली जोडवे काढतात बांगड्या फोडतात, कपाळावरचे कुंकू पुसतात, इतकच नाही तर तिला कोणत्याच समारंभा मध्ये जसे लग्न समारंभ, पूजा, हळदी कुंकू अश्या ठिकानी मान देत नाहीत, हे सर्व तिच्यासोबत करत असताना तिच्या मनावर काय आघात झाला असेल याचा विचार केलाय कोणी? समाजाला तिचा मन दुखवण्याचा काय अधिकार आहे, या तिचा काय दोष ती मंगळसूत्र घालू शकत नाही कुंकू लावू शकत नाही, नाकात नथ घालू शकत नाही,गजरा घालू शकत नाही, अशी बंधने तिच्यावर लादली जातात, प्रत्येक स्त्रीला शृंगार करण्याचा अधिकार आहे, देवाने नाक दिले ते नथ घालण्यासाठी, लांब केस दिले ते गरजा घालण्यासाठी तुला शृंगार करण्याचा नटण्याचा अधिकार आहे, तिच्या जागी स्वतःला उभे करून बघा मग तुम्हाला तिच्या भावना तिच्यावर झालेला आघात समजेल, विधवा म्हणून जीवन जगणे किती अवघड आहे.

इतकच नाही तर ती जगाच्या वाईट नजरा अवतीभवती असतात स्वतःच्या सुरक्षेसाठी जर तिने सर्व अलंकार घातले कुंकू लावले, मंगळसूत्र घातले तअसा काय गुन्हा केला तिने म्हणून समाज तिच्याकडे संशयाच्या दृष्टीने पाहतो, समाजात चालणारी ही अंधश्रद्धा रूढी परंपरा यावर आळा बसलाच पाहिजेत, यासाठी मला सर्वांच्या सहकार्याची गरज आहे, आपण म्हणतो महिलांचे सक्षमीकरण झाले पाहिजे मग विधवा एकल महिलांचे काय? त्यांचे मानसिक खच्चीकरण होते त्याचे काय? आज आपली महिला खरच सक्षम आहे का? तिला मानसिक सक्षम करण्याची गरज आहे, छोट्या छोट्या मुलांचा सांभाळ करणे त्याचबरोबर स्वतः मनाने खंबीर होऊन या समाजात वावरणे किती कठीण असते, त्यात या अशा अंधश्रद्धा रूढी परंपरा आपण सर्वजण मिळून समाजाचे काहीतरी देणे लागतो एक सामाजिक बांधिलकी लक्षात घेऊन एकल महिलांच्या समस्येवर आपण काम करून त्यांना समाजामध्ये इतर महिला प्रमाणे सर्व अधिकार व मान मिळवून देऊयात. या आठ मार्च जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने विधवा महिलांच्या मनावर आघात करणाऱ्या अंधश्रद्धा रूढीपरंपरा,चालीरीती यावर आळा घालून, माणसातल्या माणूसपणाची जाण व भान ठेवून एका नव्या बदलाकडे वाटचाल करूयात व महिलांना खऱ्या अर्थाने सक्षम बनवण्याचा मानस निर्माण करूयात, त्यासाठी सामाजिक बांधिलकी असणाऱ्या व्यक्ती व ग्रामपंचायत यांनीही पुढाकार घेऊन सहकार्य करावे.

## मुरूम ग्रामीण रुग्णालयात स्वतंत्र विद्युत रोहित्र बसवण्याची गरज

### यंत्रसामुग्री असूनही विजेअभावी बंद

**तभा वृत्तसेवा**
**जळकोट, दि.७ मार्च -**

मुरूम (ता.उमरगा) येथील शासकीय ग्रामीण रुग्णालयाला अत्यंत कमी दाबाने व अनियमित वीज पुरवठा होत आहे. त्यामुळे रुग्णालयातील क्ष-किरण यंत्र ,लसीचे फ्रिजर, रक्तदाब तपासणी मशीन व इतर विद्युत उपरकणे बंद राहत आहेत शिवाय संगणकीय कामकाज देखील रखडत आहेत. या रुग्णालयासाठी उच्च दाबाचे स्वतंत्र विद्युत रोहित्र कार्यान्वित करणे गरजेचे आहे.विशेष म्हणजे याबाबतची मागणी रुग्णालयाच्यावतीने संबधित विभागाला करण्यात आली आहे. मात्र अद्यापही या समस्याचे निराकरण होत नसल्याने रुग्णालयाचा कारभार ढेपाळत चालला आहे.



मुरूम शासकीय ग्रामीण रुग्णालयाला यशवंतनगर येथील ज्ञानदान डीपी येथून वीज पुरवठयाची जोडणी आहे.या डीपीवर इतर असंख्य वीज जोडणी असल्याने रुग्णालयाला आवश्यकतेनुसार उच्च दाबाचे वीज पुरवठा होत नसल्याचे दिसून येते. शिवाय विद्युत रोहित्रमध्ये सतत तांत्रिक बिघाड होत असल्याने रुग्णालयातील वीज पुरवठा वारंवार बंद पडत आहे.

अशा प्रकारामुळे रुग्णालयातील क्ष - किरण यंत्र, लॅब टेस्टिंग,रक्तदाब तपासणी मशीन व इतर विद्युत उपकरणाद्वारे रुग्ण सेवा देण्यात अडचणी येत आहेत तसेच संगणकाद्वारे कार्यालयीन अहवाल तयार करणे,पोर्टल अपडेट करणे, रुग्णसेवा संबधीचे ऑनलाइन सेवा देण्यावर विलंबपणा लागत आहेत.

रुग्णसेवेसाठी आवश्यक उपकरणे उपलब्ध असतानाही केवळ अनियमित आणि कमी दाबाच्या वीज पुरवठयामुळे रुग्णांना सेवा देण्यात अडचणी येत आहेत त्यामुळे रुग्णालयासाठी स्वतंत्र विद्युत रोहित्र कार्यान्वित करणे गरजेचे आहे.

रुग्णालयात रुग्ण सेवेसाठी अनेक यंत्रसामुग्री आहेत मात्र कमी दाबाने वीज पुरवठा होत असल्याने यंत्र सामुग्री बंद पडत आहेत. त्यामुळे रुग्ण सेवा देण्यात अडचणी येत आहेत.

रुग्णालयासाठी स्वतंत्र विद्युत रोहित्र कार्यान्वित असणे आवश्यकता आहे. यासाठी रुग्णालयमार्फत महावितरणकडे वर्षांपूर्वी लेखी पत्र देऊन मागणी करण्यात आली आहे. मात्र अद्याप कार्यवाही झाली नाही, असे मुरूम ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ.एम.एम.अरदाले यांनी प्रतिनिधीशी बोलताना सांगितले.

## मारहाणप्रकरणी दोन वेगवेगळ्या ठिकाणी गुन्हे दाखल

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.७ मार्च -**

जिल्ह्यातील वाशी आणि परंडा पोलीस ठाण्यांत दोन वेगवेगळ्या मारहाणीच्या घटनांमध्ये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. दोन्ही प्रकरणांमध्ये संबंधित आरोपींनी किरकोळ कारणांवरून शिवीगाळ करत लाथाबुक्यांनी व हत्यारांचा वापर करून मारहाण केल्याची घटना घडली आहे.

वाशी तालुक्यातील मांडवा येथे २ मार्च २०२५ रोजी सायंकाळी ६ वाजता दिलीप सुब्राव शिंदे (रा.मांडवा, ता.वाशी) यांनी फिर्यादी पूजा रामकिसन शिंदे (वय४०) यांच्यासह त्यांच्या पती व मुलीला पाहुण्यांचे पैसे का दिले नाहीत व दाखल केलेले प्रकरण का मिटवले नाही, यावरून वाद घातला. यानंतर आरोपीने शिवीगाळ करत लाथाबुक्यांनी मारहाण केली. इतकेच नव्हे, तर पूजाबाई यांना लाकडाने मारहाण करून गंभीर जखमी केले आणि त्यांना ठार मारण्याची धमकी दिली. या प्रकरणी ६ मार्च २०२५ रोजी वाशी पोलीस ठाण्यात भारतीय दंड संहितेच्या कलम ११८(२), ११५(२), ३५२, ३५१(२), ३५१(३) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

परंडा तालुक्यातील माणकेश्वर येथे ३ मार्च २०२५ रोजी सायंकाळी ६.३० वाजता रामराजे अभिमान मस्तुद (रा. माणकेश्वर, ता. भूम) यांनी फिर्यादी सागर सुरेश पवार (वय २९) यांना किरकोळ कारणावरून मारहाण केली.

सागर पवार हे आरोपीच्या चप्पलच्या दुकानासमोर बसले होते, यावरून आरोपीने शिवीगाळ केली आणि दगड व लाथाबुक्यांनी मारहाण करून त्यांना जखमी केले. या घटनेबाबत फिर्यादीने ६ मार्च २०२५ रोजी परंडा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली असून, भारतीय दंड संहितेच्या कलम ११८(१), ११५(२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या दोन्ही घटनांमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, पुढील तपास पोलीस करीत आहेत.

## स्वाधार योजनेस अर्ज करण्यास १५ मार्चपर्यंत मुदतवाढ

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.७ मार्च -**

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेसाठी अर्ज करण्याची अंतिम मुदत १५ मार्च २०२५ पर्यंत वाढविण्यात आली आहे. शासकीय वसतिगृहात प्रवेश न मिळालेल्या किंवा प्रवेश न घेतलेल्या अनुसूचित जाती व नवबौद्ध प्रवर्गातील इयत्ता ११ वी, १२ वी तसेच व्यावसायिक व बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या सुविधांसाठी भोजन भत्ता, निवास भत्ता, निर्वाह भत्ता आणि इतर शैक्षणिक मदत दिली जाते. विद्यार्थ्यांचे उशिरा सुरू होणारे शैक्षणिक सत्र आणि ऑनलाइन अर्ज करताना उद्भवलेल्या तांत्रिक अडचणी लक्षात घेता, स्वाधार योजनेचा विस्तार तालुकास्तरापर्यंत करण्यात आला आहे. त्यामुळे योजनेसाठी अर्ज करण्याची मुदत १५ मार्च पर्यंत वाढविण्यात आली आहे. धाराशिव नगरपालिका तसेच सर्व तालुका नगरपालिका, नगरपरिषद हद्दीतील महाविद्यालयातील पात्र विद्यार्थी ज्यांनी अद्याप अर्ज सादर केलेला नाही, त्यांनी १५ मार्च पूर्वी अर्ज सादर करावा व योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, धाराशिव यांनी केले आहे.

## गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवारामुळे निर्माण होतेय जलसंधारणाचे नवयुग

जलसंधारणाच्या दिशेने महाराष्ट्र शासनाने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे.गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार ही योजना त्याच दिशेने टाकलेले ठोस पाऊल आहे.या योजनेचा मुख्य उद्देश जलसाठ्यात साचलेला गाळ काढून पाणीसाठ्याची क्षमता वाढविणे आणि तो गाळ शेतीसाठी उपयुक्त बनवणे हा आहे. विशेषतः लहान व अत्यल्पभूधारक शेतकऱ्यांना या योजनेचा मोठा फायदा होत आहे.

या योजनेचे वैशिष्ट्ये म्हणजे या योजनेत शेतकऱ्यांचा सहभाग असून आणि त्यांना गाळ काढून शेतात टाकण्यासाठी अनुदान देखील देण्यात येत आहे अत्यल्प व अल्पभूधारक शेतकऱ्यांना त्यांच्या शेतात गाळ वाहून नेण्यासाठी अनुदान देण्यात येते.बहुभूधारक शेतकऱ्यांनी मात्र गाळ वाहून नेण्याचा खर्च स्वतःला करावा लागतो.यंत्रसामग्री आणि इंधनाचा खर्च शासन निधीतून करण्यात येतो.

ग्रामपंचायत आणि अशासकीय संस्थांच्या मदतीने या योजनेबाबतची जागृती आणि माहिती संकलनाची जबाबदारी पूर्ण करण्यात येते.या योजनेत अद्ययावत तंत्रज्ञानाचा वापर करून काम करण्यात येत आहे.

अवनी ॲप च्या माध्यमातून जीओटॅगिंग,फोटो-व्हिडिओ रेकॉर्डिंग आणि माहितीचे संकलन केले जात आहे.

शेतकरी,वाहतूक साधने,गाळाचे प्रमाण आणि यंत्रसामग्रीच्या कामाच्या तासांची नोंद केली जाते. योजनेच्या प्रभावाचे मूल्यमापन दोन पावसाळ्यानंतर करण्यात येते. जलसाठ्यात वाढ,उत्पादन,उत्पन्न आणि जीवनमान सुधारण्यावर आधारित निष्कर्ष नोंदवले जातात.

या योजनेत १० वर्षांपेक्षा जुन्या जलसाठ्यांना प्राधान्य देण्यात येत आहे.६०० हेक्टरपेक्षा कमी लाभक्षेत्र असलेल्या जलसाठ्यांचा गाळ प्रथम काढण्यात येत आहे.त्यासाठी जिल्हा जलसंधारण अधिकारी हे वार्षिक आराखडा तयार करून शासनाची मान्यता घेतात. १ हेक्टरपर्यंत जमीन असलेल्या अत्यल्पभूधारक शेतकऱ्यांना आणि १ ते २ हेक्टर असलेल्या लहान शेतकऱ्यांना या योजनेचा लाभ घेण्यासाठी प्राधान्य दिले जाते. विधवा,दिव्यांग आणि आत्महत्याग्रस्त शेतकरी या योजनेच्या अनुदानासाठी पात्र आहे

प्रति एकर १५ हजार रुपये अनुदान दिले जाते.(कमाल ३७ हजार ५०० पर्यंत).विधवा,दिव्यांग आणि आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांना या योजनेंतर्गत ही सवलत लागू आहे.

या योजनेअंतर्गत काढण्यात येणाऱ्या गाळाची विक्री किंवा इतर कारणांसाठी वापर करता येत नाही.

जलसाठ्यांचा सविस्तर प्रकल्प अहवाल (उझठ) तयार करून समितीकडे पाठविण्यात येतो. जलसाठ्याचे फोटो आणि व्हिडिओ जिओटॅगिंगसह नोंदवले जातात.गाळ काढण्यापूर्वी आणि काढल्यानंतरची माहिती अवनी ॲपवर अपडेट केली जाते.या योजनेचे अनुदान थेट शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा केले जाते.

डीबीटी (उइढ) प्रणाली कार्यान्वित होईपर्यंत ग्राम पंचायतीकडून शेतकऱ्यांना अनुदान देण्यात येते. गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार ही योजना राज्यातील जलसंधारण व्यवस्थापनासाठी क्रांतिकारी ठरणार आहे. जलसाठ्यांची पाणी साठवण क्षमता वाढवून आणि गाळाचा योग्य वापर करून शेतकऱ्यांचे उत्पादन, उत्पन्न आणि जीवनमान उंचावण्यासाठी ही योजना उपयुक्त ठरणार आहे. शासनाच्या योग्य नियोजन आणि आधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने ही योजना यशस्वी होईल आणि पाण्याची समस्या काही प्रमाणात सुटण्यास मदत होणार आहे.

**संकलन**
**जिल्हा माहिती कार्यालय**
**धाराशिव**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# गुरुव्दारा परिसरातील अतिक्रमणावर मनपाची कारवाई

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. ०७ मार्च**

वजिराबाद पोलीस ठाणे, शहर वाहतूक शाखा व महापालिकेने संयुक्त कारवाई करत गुरुव्दारा परिसरातील अतिक्रमण हटविले. हि कारवाई दि.७ मार्च शुक्रवार रोजी करण्यात आली.

गुरुव्दारा परिसरात रस्त्याच्या दोन्ही बाजूला असलेल्या फुटपाथवर दुकानदार, किरकोळ विक्रेते त्यांनी साहित्य, हातगाडे व टपऱ्या लावल्याने वाहतुकीची समस्या निर्माण झाली होती. त्याचबरोबर दि.१४ मार्च रोजी हल्लाबोल कार्यक्रम होणार आहे. या कार्यक्रमासाठी देश-विदेशातून यात्रेकरु नांदेडात दाखल होतात. त्यामुळे वाहतुक सुरळीत व्हावी यासाठी दि.७ मार्च रोजी गुरुव्दारा गेट नं.१ ते लंगर साहिब गुरुव्दारा मार्गावरील दोन्ही बाजूचे अतिक्रमण हटविले. यात ८० अतिक्रमण धारकांवर कारवाई करण्यात आली तर तब्बल दहा ट्रक साहित्य जप्त करण्यात आले आहे. या कारवाईत अतिक्रमण विभागाचे सहाय्यक आयुक्त रावण सोनसळे, पोलीस निरीक्षक कदम, वाहतुक पोलीस निरीक्षक गुट्टे, सहाय्यक पोलीस निरीक्षक सानप, कार्यकारी अभियंता विश्वनाथ स्वामी, क्रिडा व सांस्कृतिक अधिकारी तथा क्षेत्रिय अधिकारी रमेश चवरे, मुख्य उद्यान अधिक्षक तथा क्षेत्रिय अधिकारी डॉ. मिर्झा बेग, अग्निशमन अधिकारी के. जी. दासरे, कनिष्ठ अभियंता किरण सुर्यवंशी, क्षेत्रिय अधिकारी गौतम कवडे, राजेश जाधव अतिक्रमण पथक प्रमुख विशाल सोनकांबळे, अनिल चौदंते व पथकातील इतर कर्मचाऱ्यांचा सहभाग होता.



## संक्षिप्त वृत्त

### दुकान फोडणाऱ्या चोरास अटक

**कुंडलवाडी**-कुंडलवाडी येथे दि.३ मार्च रोजी रात्री दोन दुकाने फोडून चोरी केल्या प्रकरणी पोलिसांनी तपास करून एकास अटक केले आहे.



कुंडलवाडी येथील मेन मार्केट मधील मैनोद्दिन शेख यांचे भुसार दुकान व बाबा चूडीवाले यांचे किराणा दुकान चोरट्यांनी फोडून गल्यातील नगदी ५८ हजार रूपये (दोन्ही दुकानातून)रक्कम चोरी झाली होती. .पो. नि.ज्ञानेश्वर शिंदे यांनी तपास करून नांदेड पोलिस अधीक्षक सायबर तांत्रिक विभागाची मदत घेऊन गुप्त आरोपीस पोंतगल जिल्हा निझमाबाद येथून दि .६ मार्च रोजी अटक केली असता त्याच्याकडून ५२ हजार १७५रुपये जप्त केले. चोरटा हा कुंडलवाडी येथील सतरंजी गल्ली येथील राहणारा आहे.चोरटा हा अल्पवयीन असल्या कारणाने कुंडलवाडी पोलीसांनी त्याच्या आई समक्ष पंचनामा करून नोटीस देऊन त्यास सोडून देण्यात आले आहे. हया पथकात स.पो. नि.ज्ञानेश्वर शिंदे , पो. हे. कॉ. शेख गफुर, पो. कॉ. रघविर सिंह चौहान, होमगार्ड सुरेशअशमोड, सुप्रिया बोलचटवार अदि होते.

### नागेंद्र देशमुख यांचे निधन

**मुदखेड**-बारड ता. मुदखेड येथील प्रगतशील शेतकरी नागेंद्र केशवराव देशमुख (एन के) (वय ५५) यांचे ता ०७ (शुक्रवार) अल्पशा आजाराने निधन झाले आहे. त्यांच्या मागे पत्नी एक मुलगा, दोन मुली असा परिवार आहे. त्यांच्या पार्थिव देहावर राहत्या गावी अंत्यसंस्कार करण्यात आले आहे. जिल्हा मध्यवर्ती बँकेचे शाखाधिकारी आनंदराव देशमुख यांचे ते बंधू होत.



### गणपत आठवले यांचे निधन

**मुदखेड**-बारड ता. मुदखेड येथील सामाजिक कार्यकर्ते गणपत कृष्णाजी आठवले (वय ५२) यांचे ता ०६ (गुरुवार) रोजी हृदयविकाराने निधन झाले आहे. त्यांच्या मागे पत्नी, दोन मुले, एक मुलगी असा परिवार आहे. त्यांच्या पार्थिव देहावर राहत्या गावी बौद्ध स्मशान भूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले आहेत.



# राष्ट्रवादी काँग्रेसच्या प्रदेश उपाध्यक्षपदी व्यंकट गोजेगावक तर सरचिटणीसपदी प्रविण चिखलीकर

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. ०७ मार्च**

राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या नियुक्त्या जाहीर करण्यात आल्या असून, व्यंकटराव पाटील गोजेगावकर यांची प्रदेश उपाध्यक्षपदी तर प्रविण पाटील चिखलीकर यांची प्रदेश सरचिटणीसपदी निवड करण्यात आली आहे. त्याचबरोबर अन्य नियुक्त्या देखील जाहीर करण्यात आल्या असल्याची माहिती आमदार प्रताप पाटील चिखलीकर यांनी पत्रकार परिषदेत दिली.

राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री अजित पवार, राष्ट्रीय कार्याध्यक्ष खासदार प्रफुल्ल पटेल, प्रदेशाध्यक्ष सुनिल तटकरे, महिला प्रदेश अध्यक्षा रुपाली चाकणकर, युवती प्रदेशाध्यक्ष संध्या सोनवणे त्याच बरोबर न्याय विभागाचे प्रदेशाध्यक्ष प्रा.सुनिल मगरे यांच्या आदेशानुसार या नियुक्त्या जाहीर करण्यात आल्या आहेत. यात प्रदेश उपाध्यक्षपदी व्यंकटराव पाटील गोजेगावकर, प्रदेश सरचिटणीसपदी प्रविण पाटील चिखलीकर, प्रदेश संघटक सचिव ॲड.मुक्तेश्वर धोंडगे, प्रदेश सचिव दादाराव ढगे, नांदेड उत्तर जिल्हाध्यक्ष बाळासाहेब रावणगावकर, राष्ट्रवादी महिला काँग्रेस प्रदेश उपाध्यक्षपदी वैशाली चव्हाण, राष्ट्रवादी महिला प्रदेश सरचिटणीसपदी चित्रा लुंगारे, प्रदेश सरचिटणीस अनुसया केंद्रे, प्रदेश संघटक निलम यादव, शहराध्यक्षा रोहिणीताई कुलकर्णी, सामाजिक न्याय विभागाच्या प्रदेश कार्यकारिणी संघटक पदी संघरत्न गायकवाड तर नांदेड महानगराध्यक्षपदी साहेबराव धनगे यांची नियुक्ती करण्यात आली असल्याची माहिती आमदार प्रताप पाटील चिखलीकर यांनी दिली. यावेळी माजी आमदार मोहन हंबर्डे, माजी आमदार अविनाश घाटे, राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष दिलीप धर्माधिकारी, शहर अध्यक्ष जीवन घोगरे, प्रविण पाटील चिखलीकर, माधव पावडे, ॲड.मुक्तेश्वर धोंडगे, वैशाली पवार यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.



# संघ हीच जीवनगाथा

अलकः- (५९) संचलन

१९३२ मधील दसरा उत्सवात १२०० गणवेशधारी स्वयंसेवक होते त्यांचे शिस्तबद्ध संचलन हा नागपूरातील सर्वांचा कौतुकाचा विषय होता. या उत्सवाचे प्राध्यापक माधवराव गोळवलकर प्रमुख पाहुणे होते. त्यांचा काशी शाखेतील उत्साही कार्यकर्ता असा परिचय डॉक्टरांनी केला होता व हेच प्राध्यापक पुढे सरसंघचालक गुरुजी झाले. शिस्तबद्ध संचलन डोळ्यांनी पाहणे व घोषाचा निनाद कानानी ऐकणे यामुळे नागरिकांच्या हृदयातील स्वाभिमान झंकृत होत असे. त्रयस्थांच्या हृदयात कौतुक, मित्रांच्या हृदयात अभिमान व शत्रूच्या हृदयात भय उत्पन्न होत असे. उज्वल भविष्यासाठी मिळालेल्या या विरासतीवर सर्वांना गर्व वाटत असे. कारण विरासतीचा खरा इतिहास फक्त संघ शाखेतच सांगतात / शिकवतात. संघ म्हणजे सामान्य शक्तीचे असामान्य गठबंधन आहे. संघ राष्ट्र उपासक आहे. संघाला आपल्या विरासतीवर गर्व आहे. क्रमशः



**लेखन : सौ. सुरेखा विजय काणे,**
**छत्रपती संभाजीनगर. मो. ९९६००५३५२१**
**माजी जिल्हा बौद्धिक प्रमुख राष्ट्र सेविका समिती**

# जिल्हाधिकारी कार्यालयात मंगळवारी पेन्शन अदालतीचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. ०७ मार्च**

जिल्ह्यातील महसूल विभागातून सेवानिवृत्त झालेले अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या अडचणीचे निवारण करण्यासाठी मार्च महिन्याच्या दुसऱ्या मंगळवारी ११ मार्च २०२५ रोजी सकाळी ११ ते १.३० वा. जिल्हाधिकारी कार्यालय येथे पेन्शन अदालतीचे आयोजन करण्यात आले आहे. सेवानिवृत्त झालेले अधिकारी कर्मचारी यांनी अडचणी निवारण्यासाठी पेन्शन अदालतीच्या दिवशी उपस्थितीत राहून तक्रारीचे निवेदन द्यावेत, असे आवाहन जिल्हाधिकारी नांदेड यांनी केले आहे.

# माहूर तालुका क्रीडा संकुलासाठी १ कोटीचा निधी वितरित ; लवकरच भूमिपूजन

**तभा वृत्तसेवा**
**माहूर,दि.०७ मार्च**

आयुक्त,क्रीडा व युवक सेवा महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी नियंत्रण अधिकारी म्हणून नमुद केलेल्या माहूर तालुका क्रीडा संकुल समितीला तालुका क्रीडा संकुल बांधकाम अनुदान सन २०२४-२५ निधी वितरण (मंजूर ५ कोटी पैकी) १ कोटी रुपये अनुदानाचा पहिला हप्ता दि.५ मार्च २०२५ रोजी वितरित केला आहे. लवकरच भूमिपूजनानंतर क्रीडा संकुलाच्या कामास सुरुवात करण्यात येणार असून,माहूर तालुका क्रीडा संकुल हे या आदिवासी बहुल तालुक्यातील क्रीडा क्षेत्रातले पुढले पाऊल आहे.काळाची गरज ओळखून अत्याधुनिक सुविधांसह खेळाडू घडविण्याचे काम इथे होणार असून,तालुक्यातील नवनवीन खेळाडूंना आपले कसब दाखविण्याची याठिकाणी संधी मिळेल.या क्रीडा संकुलाच्या माध्यमातून आपल्या तालुक्याचे ,जिल्ह्याचे, राज्याचे आणि देशाचे प्रतिनिधीत्व करणारे,देशाचे नाव उज्वल करणारे उत्कृष्ट खेळाडू घडावेत!असे प्रतिपादन आ.भीमराव केराम यांनी यानिमित्ताने केले आहे.



शासनाच्या सन २०१२ च्या क्रीडा धोरणानुसार प्रत्येक तालुक्यात तालुका क्रीडा संकुल बांधण्यात येत आहे.राज्यात खेळ आणि खेळाडूंना पोषक वातावरण आहे. आज मोबाईल, इंटरनेटच्या युगात मुले मैदानांपासून दूरावली आहेत,हा घोर चिंतेचा विषय आहे. मुलांना पुन्हा मैदानी खेळाकडे आकर्षित करणे गरजेचे आहे. त्यात पालकांची जबाबदारी मोठी आहे. त्यांनी मुलांना खेळासाठी प्रोत्साहित करायला पाहिजे. मात्र त्याआधी गरज आहे क्रिडांगणाची, दर्जेदार मैदानाची. आणि याच निकडीतून शासनाच्या क्रीडा धोरणानुसार प्रत्येक तालुक्यात तालुका क्रीडा संकुल बांधण्यात येत आहे.

माहूर तालुक्यात विविध क्रीडा क्षेत्रातील खेळाडूंची कमतरता अजिबात नाही मात्र कमतरता आहे ती क्रिडांगण आणि मैदानाची,सोई, सुविधा, खेळ साहित्य,साधने यासोबतच अनुभवी प्रशिक्षकाची.ही गरज लक्षात घेऊन क्रिडा पटू सुरेश गिऱ्हे,भाजपा ओबीसी आघाडीचे प्रदेश चिटणीस अनिल वाघमारे व भाजपाचे नगरसेवक सागर महामुने यांनी क्रीडा माहूर शहरात तालुका क्रीडा संकुलासाठी आ. भिमराव केराम यांच्याकडे मागिल बऱ्याच वर्षांपासून सातत्याने पाठपुरावा केला होता. या गोष्टीची दखल घेत आ.केराम यांनीही शासनस्तरावर ही बाब अविरतपणे लावून धरली होती. त्यामुळे त्यांचे फलितही त्यांना शासनाकडून माहूर तालुका क्रीडा संकुलास मंजुरीच्या रुपाने मिळाले. तब्बल ५ कोटींचा बांधकाम निधी देखील मंजूर करण्यात आला.मात्र आता प्रत्यक्षात त्यापैकी १ कोटी रुपयांचा अनुदानाचा पहिला हप्ता वितरित करण्यात आला आहे. लवकरच भूमीपूजनानंतर प्रत्यक्षात बांधकामाला सुरुवात होणार आहे. या क्रीडा संकुलांचा तालुक्यातील सर्व खेळाडूंना लाभ होणार असून,माहूर तालुका क्रीडा संकुल बांधकामाचा मार्ग मोकळा करून दिल्याबद्दल सुरेश गिऱ्हे, सागर महामुने,अनिल वाघमारे यांनी राज्य शासनासह आ.भीमराव केराम यांचे विशेष आभार मानले आहे.

माहूरचे तालुका क्रीडा संकुल हे प्रसिद्ध ऐतिहासिक निसर्गरम्य परिसर असलेल्या पांडवलेणी जवळील २.५० एकर एवढ्या प्रशस्त शासकीय जमिनीवर निसर्गाच उभारले जाणार आहे. क्रीडा संकुलात अंतर्गत व बाह्य क्रीडांगणांचा समावेश असून, बॅटमिंटन हॉल, बास्केट बॉल, जिमनॅस्टिक, ज्युडो-कराटे, पॉवर लिफ्टींगसह २०० मिटरचा धावण्याचा ट्रॅक आदी अत्याधुनिक क्रीडा सुविधेसह खेळाडूंना उपलब्ध असणार आहे.माहूर सारख्या अतिदुर्गम डोंगराळ आदिवासी बहुल तालुक्यातील खेळाडूंची क्रीडांगणाअभावी आजपर्यंत होत आलेली कुचंबणा आता क्रीडा संकुलाच्या निर्मितीनंत निश्चितच संपणार असल्याने तालुक्यातील क्रीडापटू व क्रिडा रसिकांमध्ये यामुळे आनंदाचे वातावरण पसरले आहे.

# महाबोधी विहार मुक्ती आंदोलनाचा मोर्चा भोकर तहसीलवर धडकला

**तभा वृत्तसेवा**
**भोकर,दि. ०७ मार्च**

येथील तहसील कार्यालयावर सकल बौद्ध समाजाच्या वतिने बुद्ध गया येथील महाबोधी विहार ब्राह्मण पुजाऱ्यांच्या ताब्यातून मुक्त करून बौद्ध भंन्तेच्या ताब्यात द्या या मागणीकरिता भोकर तहसीलवर गुरूवार दि.६ मार्च रोजी भव्य मोर्चा काढण्यात आला.

गुरुवार दुपारी एक वाजता भर उन्हात भोकरच्या विश्रामगृहापासून निघालेल्या मोर्चात तालुक्यातील महिला, पुरुष मोठ्या संख्येने सहभागी झाले शहरातल्या उड्डाण पुलावरून डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौकातून तहसील कार्यालयासमोर पोहोचला मोर्चेकरी महाबोधी महाविहार बौद्धांच्या ताब्यात देण्यात यावे, देत कसे नाही घेतल्याशिवाय राहत नाही, महाबोधी विहार आमच्या हक्काचं नाही कुणाच्या बापाचं अशा गगनभेदी घोषणा देऊन शहर दणाणून सोडले मोर्चाचे नेतृत्व समाजभूषण एल.ए.हिरे,वंचित बहुजन आघाडीचे दिलीप राव,सुभाष तेले,भीमराव दुधारे,भीम टायगर सेनेचे जिल्हाध्यक्ष मिलिंद गायकवाड,राजेश चंद्रे आदिनी केले.

मोर्चात प्रतिक कदम, डॉ.मनोज गीमेकर, बौद्ध महासभेचे सुरेश जोंधळे ,प्रसाद शहाणे यु.एन. एडके,ज्ञानूचव्हाण,राहुलसोनकांबळे ,विक्रम क्षीरसागर,सुरेखा माळे, सुलोचना ढोले, यशोदा महाबळे, सरपंच दत्ता व्यवाहरे,दत्ताजी डोंगरे,आनंद एडके,पी.पी.हनवते, आदिंसह शेकडोजन सहभागी झाले मोर्चा तहसीलवर गेल्यावर तिथे जाहीर सभेत रूपांतर झाले यावेळी बौद्ध महासभेचे ता.अध्यक्ष सुरेश जोंधळे,डॉ.साईनाथ वाघमारे, प्रबोधनकार साहेबराव येरेकर,शाहीर बाबुराव गाडेकर, दिलीप राव ,मिलिंद दादा गायकवाड,आनंदराव एडके,भीमराव दुधारे,प्रतीक दादा कदम डॉ.मनोज गीमेकर, विक्रम क्षीरसागर आदींनी मोर्चास मार्गदर्शन केलेभारतीय बौद्ध महासभा व महाबोधी विहार मुक्ती आंदोलकांच्या वतीने तहसीलदारांना मागण्यांचे निवेदन देण्यात आले कार्यक्रमाचे सुत्रसंचलन सुभाष तेले यांनी केले तर आभार राजेश चंद्र यांनी मानले.

# शिक्षण क्षेत्रात नारायणा इंटरनॅशनल स्कुलची गगनभरारी

## गौरी बगाडे या चिमुकलीला नॅशनल चॅम्पियन प्रथम पुरस्कार

**तभा वृत्तसेवा**
**लोहा,दि. ०७ मार्च**

राष्ट्रीय विश्राम एज्युटेक द्वारे १८ वी राज्यास्तरीय स्पर्धा हैदराबाद येथे आयोजित करण्यात आली होती.या स्पर्धेत नारायणा इंटरनॅशनल स्कुलची विद्यार्थी कु.गौरी बगाडे या चिमुकलीने स्किल कार्निवल इंटरनॅशनल स्पर्धेत भाग घेऊन नॅशनल चॅम्पियन प्रथम अजिंक्यपद पटकावले.





लोहा शहरातील नारायणा इंटरनॅशनल स्कूलची अल्पावधीत शिक्षणात गगनभरारी घेतल्याचे दिसुन येते, विश्राम एज्युटेकद्वारे घेण्यात येणाऱ्या स्पर्धेत नारायणा इंटरनॅशनल स्कुलची विद्यार्थीन कु. गौरी बगाडे हिने सहभाग घेऊन राष्ट्रीय पातळीवर आपले गुण कौशल्य दाखवुन नॅशनल चॅम्पियन चा पुरस्कार पटकावला आहे. या स्पर्धेत विविध शाळेतील स्पर्धकांनी सहभाग घेतला होता.

यामध्ये बौद्धिक क्षमतेला वाव देणाऱ्या खेळांचा यात समावेश असतो. अबॅकस, रुब्रिक क्युब्स, मेंटल मॅथ्स, ऑडिटरी मॅथ्स, फ्लॅश मॅथ,वैदिक मॅथ्स, अशा विविध बौद्धिक विषयांचा समावेश असलेल्या या स्पर्धेत गौरी बगाडे हीने प्रथम क्रमांक मिळवून शाळेचे नावलौकिक वाढवले. तिने मिळवलेल्या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष प्रा. मुंडे ,कोअर कमेटीचे सदस्य नारायण केंद्रे, नारायण इंटरनॅशनल स्कुलचे मुख्याध्यापक शिवाजी केंद्रे, कुलकर्णी यासह गौरी बगाडे या चिमुकलीला वेळोवेळी मार्गदर्शन करणारे शिक्षकवर्ग मिस पुनम चव्हाण -गौर, वैशाली कनकदंडे, पूजा कदम, सुमन केंद्रे, अनिता शहाणे, अनिता बेलाळे, गीते , पाटील मिस, पूजा शामे, कविता सोमा , रोशनी श्रोते, कळसकर, कु. गौरी बगाडेचे आई वडील विकास गोपाळराव बगाडे, माधवी बगाडे,आजी आजोबा गोपाळराव बगाडे, सुमन बगाडे, गणेश गोपाळराव बगाडे, प्रियांका बगाडे व इतर नातेवाईकांनी अभिनंदन केले आहे.

# आ.चिखलीकर यांच्या नेतृत्वात माजी न.पा.विरोधी पक्षनेते पंचशील कांबळे यांचा राष्ट्रवादीत प्रवेश

**तभा वृत्तसेवा**
**लोहा,दि. ०७ मार्च**

विधानसभा मतदारसंघाचे आ.तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या नेतृत्वात नगरपालिकेचे माजी विरोधी पक्ष नेते पंचशील कांबळे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस (अजितदादा पवार) पक्षात प्रवेश केला आहे.



यावेळी नगरपालिकेची माजी उपनगराध्यक्ष दत्ता वाले, लोहा पंचायत समितीचे माजी सदस्य बालाजीराव पाटील कदम यांची उपस्थिती होती.

विधानसभा निवडणुकीनंतर नांदेड जिल्ह्यात राष्ट्रवादी काँग्रेसला संघटनात्मक मजबूत करण्यासाठी जिल्ह्यातील विविध भागातील विविध राजकीय व सामाजिक संघटनांचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये मोठ्या प्रमाणात प्रवेश करत आहेत. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका डोळ्यासमोर ग्रामीण भागातील नेतृत्वाला उभारी देण्याच्या अनुषंगाने आ.प्रतापराव पाटील चिखलीकर यांचा प्रयत्न आहे याचं दृष्टीकोनातून लोहा नगरपालिकेचे माजी विरोधी पक्ष नेते पंचशील कांबळे यांच्यासह बळीरामपूर ग्रामपंचायतचे सदस्य ॲडव्होकेट कपिल सोनकांबळे, भीमकिर्तीराज कलंबरकर, आनंद धनसडे, किरण सोनकांबळे, संदीप घोजसकर, शैलेश वाघमारे, बालाजी अन्नदाते यांनी राष्ट्रवादी काँग्रेस (अजित दादा पवार) पक्षामध्ये प्रवेश केला.

**IIFL FINANCE**
**CIN: L67100MH1995PLC093797**
**Regd. Office:** IIFL House, Sun Infotech Park, Road No. 16V, Plot No.B-23, Thane Industrial Area, Wagle Estate, Thane - 400604
Tel: (91-22) 41035000 • Fax: (91-22) 25806654
E-mail: reach@iifl.com • Website: www.iifl.com

**सोन्याचा दागिन्यांचा लिलावाची सार्वजनिक सूचना**

येथे सगळ्या संबंधित ऋणकोंना विशेषत: आणि सर्व सामान्य नागरिकांना, सामान्यपणे असे सूचित करण्यात येते की, आम्ही आयआयएफएल फायनान्स लिमिटेड (''आयआयएफएल'') येथे थकबाकी असलेल्या कर्जदारांच्या सोन्याच्या दागिन्यांचा लिलाव करणार आहोत, यामध्ये वारंवार सूचना देऊन देखील कर्जाची रक्कम न भरलेल्या किंवा कर्ज खाते सामान्य करू न शकलेल्या ऋणकोंचा समावेश केला गेला आहे. खालील कर्ज खात्यांमध्ये तारण ठेवलेल्या सोन्याच्या दागिन्यांचा सार्वजनिक लिलाव **दिनांक 11.03.2025** रोजी **सकाळी 10.00** वाजल्यापासून जिल्हा केंद्र **औरंगाबाद-पैठण गेट रोड - जोशी हाईट्स, कमर्शियल तळमजला, उजव्या बाजूचा भाग, सीटीएस क्रमांक १४१८५ क्रांती चौक ते गुलमंडी रोड, पैठण गेट परिसर, औरंगाबाद-४३१००१,** येथे होणार आहे. स्थान किंवा तारखेतील कोणताही बदल (जर असल्यास) लिलाव केंद्राकडे प्रदर्शित केला जाईल. कोणत्याही कारणास्तव येथे उल्लेखित तारखेस लिलाव होऊ शकला नाही किंवा त्या दिवशी लिलाव पूर्ण होऊ शकला नाही, तर आयआयएफएलला त्याच अटी व शर्तींवर कोणत्याही पुढील तारखेस उक्त लिलाव आयोजित करण्याचा किंवा पुढे नेण्याचा हक्क आरक्षित आहे. ग्राहकाचा मृत्यू झाला, तर त्या लिलावाशी संबंधित सर्व अटी नामनिर्देशित व्यक्ती/कायदेशीर वारसाला लागू होतील.

**गोल्ड लोन खाता क्रमांक :** GL26936673, GL31339538, GL33065677, GL33169401, GL32755676, GL33301816, GL33725755, GL33837837, GL33906026, GL33320202, GL33312804, GL27893024, GL31851672, GL31843447, GL31884433, GL31901178, GL33053875, GL33040111, GL33286577, GL33318079, GL33313268, GL33397983, GL33382645, GL33507337, GL32465538, GL33142999, GL33147979, GL33505640, GL33508199, GL33562242, GL31526049, GL32789846, GL32257359, GL32240955, GL32946947, GL32954055, GL33049432, GL33084987, GL33072341, GL33191694, GL33333090, GL33352126, GL33339097, GL33431064, GL33405721, GL33604307, GL33610544, GL33639727, GL33697829, GL33861656, GL33829490, GL33832113, GL33861197, GL33837991, GL30267837, GL33170858, GL33193535, GL33223605, GL33237839, GL33283696, GL33341879, GL33407173, GL33488833, GL33512903, GL33499873, GL33612715, GL33671985, GL33737525, GL33814426, GL33852446, GL33510049, GL33501004, GL33528630.

लिलाव हा ''जिथे आहे तसे'', ''जसे आहे तसे'' आणि ''जेवढे आहे तेवढे'' या तत्वावर केला जाईल आणि आयआयएफएल द्वारे कोणत्याही प्रकारे सोन्याच्या दागिन्यांची गुणवत्ता, शुद्धता, कॅरेट, वजन किंवा मूल्यांकनाचे प्रतिनिधीत्वं केले जाणार नाही. आयआयएफएल स्वत:हून, लिलाव पुढे ढकलू किंवा रद्द करू शकेल, लिलावाच्या यादी मधून एखाद्या खात्याचे नाव वगळण्याचा अधिकार देखील आयआयएफएल कडेच असेल आणि हे करताना त्याकरिताची पुर्व सूचना, करण्यामागची कारणे, एखाद्या बोलीचा स्वीकार किंवा रद्दीकरण केल्याची कारणे देण्याची कोणतीही आवश्यकता नसेल. थकबाकी असलेल्या ऋणकोंची यादी, त्यांनी जमा केलेले दागिने आणि इतर तपशील हा संबंधित शाखांमध्ये दिलेला असेल. अयशस्वी कर्जदारांकडे हा पर्याय आहे की त्यांनी अद्ययावत व्याज आणि सर्व लागू शुल्कांसह संपूर्ण थकबाकीची परतफेड करावी जेणेकरुन ही नोटीस प्रकाशित झाल्यानंतरही त्यांचे कर्ज खाते बंद करण्याचा किंवा नियमित करण्याचा पर्याय असतो परंतु कोणत्याही परिस्थितीत लिलावाच्या तारखेपर्यंतच हे शक्य आहे, यात ते अयशस्वी झाल्यास सोन्याचे दागिने विकले जातील आणि थकबाकी (असल्यास) व्याज आणि खर्चासह वसूल केली जाईल. ही सूचना छापून आल्यानंतर जर एखाद्या ऋणकोने आपल्या कर्जाचा व्यवहार पूर्ण केला किंवा आपली थकबाकी भरून कर्ज खाते बंद केले, तर त्याला या सूचनेच्या छपाईचा संपूर्ण खर्च मात्र उचलावा लागेल. ऋणकोंना आपल्या बँक खात्यांचा तपशील शाखेकडे जमा/अद्ययावत करण्याची विनंती केली जाते आहे जेणेकरून लिलाव प्रक्रियेमधून निघालेला परतावा असल्यास तो जमा करता येऊ शकेल.

**तपशीलवार माहिती, अटी आणि नियम जाणून घेण्याकरिता कृपया आयआयएफएल फायनान्स लिमिटेडच्या नजिकच्या शाखेशी संपर्क साधा.**

**तारीख: 08.03.2025**
**स्थळ: छत्रपती संभाजी नगर**

**स्वाक्षरीकर्ता/-**
**अधिकृत स्वाक्षरीकर्ता**
**आयआयएफएल फायनान्स लिमिटेड**

# महानगरपालिका हद्दीतील आरक्षण रद्द : उपमुख्यमंत्री शिंदे यांनी शब्द पाळला

## आ. कल्याणकर यांच्या प्रयत्नांना यश

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. ०७ मार्च**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या वाढीव हद्दीतील क्षेत्र करिता नव्याने विकास आराखडा रद्द करण्यासाठी आमदार बालाजीराव कल्याणकर यांनी शासन दरबारी पाठपुरावा केला होता तर याच अनुषंगाने उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नांदेड दौऱ्यात नांदेड महानगरपालिका हद्दीतील आरक्षण उठविण्याचे अनुषंगाने शब्द दिला होता. उपमुख्यमंत्री शिंदे यांनी शब्द पाळला असून आज राज्य शासनाने आदेश निर्गमित करत नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेतील जमिनीवरील आरक्षण रद्द केले आहे.

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेचे हद्दीतील अनेक भागातील जमिनी विकासाच्या नावाखाली आरक्षित केल्या होत्या. शहर विकास आराखड्याच्या नावाखाली असंख्य मालमत्ता आरक्षित करण्यात आल्याने मालमत्ता धारकही हैराण होते . महानगरपालिकेच्या मूळ हद्दीपासून दोन किलोमीटर अंतराच्या परिघात निवासी वापर यावरही आरक्षण लादण्यात आल्याने अनेक मालमत्ताधारकांना अडचणी निर्माण झाल्या होत्या. ही बाब लक्षात घेता आ. बालाजीराव कल्याणकर यांनी नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेचा विकास आराखडा रद्द करण्याच्या अनुषंगाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस , उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे , उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांच्याकडे पाठपुरावा केला होता . या मागणीसाठी आ. बालाजीराव कल्याणकर हे महानगरपालिकेत नगरसेवक असताना महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत अंगावर रॉकेल ओतून घेऊन आत्मदहन करण्याचाही प्रयत्न केला होता.



अखेर या पाठपुराव्याला यश आले असून नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेतील विकास आराखडा रद्द करण्यात आल्यानंतर आता या भागातील आरक्षण ही रद्द करण्यात आले आहे. नांदेड वाघाळा महानगरपालिकेच्या वाढीव हद्दीमध्ये समाविष्ट क्षेत्राकरिता नियोजन प्राधिकरणामार्फत दिनांक २९ ऑगस्ट २०१९ आणि दिनांक ४ सप्टेंबर २०१९ मधील शासन राजपत्रात महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगरचना अधिनियम १९६६ कलम २६ अन्वये प्रेशर करण्यात आलेल्या प्रारूप विकास योजनेतील प्रास्तावित रस्त्यांचे जाळे आवश्यकतेनुसार विचारात घेऊन अथवा त्यामध्ये सुधारणा फेरबदल करून त्यास विकास परवानगी प्रस्तावांवर कारवाई करावी असेही आदेशित करण्यात आले आहे. महानगरपालिकेचा क्षेत्राचा होणारा नैसर्गिक वाढ ,विकास लक्षात घेता या भागामध्ये लोकसंख्येच्या प्रमाणात आवश्यकता सार्वजनिक सोयीसुविधा पुरेशा प्रमाणात उपलब्ध करून देण्याचे अनुषंगाने ही आदेशित करण्यात आले आहे. महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रापासून दोन किलोमीटर पर्यंत नागरी निवासासाठी या जमिनी अनुज्ञय असतील असेही आदेशात नमूद करण्यात आले आहे.

त्यामुळे तरोडा भागासह नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेचे हद्दीतील असंख्य भागातील जमिनीवरील आरक्षणाचा प्रश्न कायमस्वरुपी सुटणार आहे . आ. बालाजीराव कल्याणकर यांच्या या कामगिरीमुळे नांदेडकरांना मोठा दिलासा मिळाला आहे तर नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या हद्दीतील आरक्षण रद्द केल्याबद्दल आ. कल्याणकर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस , उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे , उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे आभार मानले आहेत.

लातूर
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## लातुरात वस्तूंचे ८ मार्चपासून प्रदर्शन व विक्री

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.७ मार्च -** महिला आर्थिक विकास महामंडळ (माविम) लातूर जिल्हा कार्यालयामार्फत 'माविम'च्या ५० वा वर्धापन दिन व जागतिक महिला दिनानिमित्त ८ ते १० मार्च, २०२५ या कालावधीमध्ये जिल्हा क्रीडा संकुल येथे महिला बचत गटांनी उत्पादित केलेल्या वस्तूचे जिल्हास्तरीय भव्य प्रदर्शन व विक्री - नवतेजस्विनी महोत्सव चे आयोजन करण्यात आले आहे. ८ मार्च २०२५ रोजी दुपारी ३ वाजता जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांच्या हस्ते व जिल्हा पोलीस अधीक्षक सोमय मुंडे , जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहूल कुमार मीना यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रदर्शनाचे उद्घाटन होईल.

तीन दिवसीय प्रदर्शनामध्ये बचत गटातील महिलांचा सन्मान समारंभ, शासनाच्या विविध योजनांची माहिती, विविध चर्चासत्रे व मार्गदर्शन, महिलांचे आरोग्य व सकस आहार या विषयी मार्गदर्शन, महिला बचत गटांचे स्टॉल, विविध खाद्य पदार्थांची मेजवानी तसेच सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहे. या प्रदर्शनात बचत गटातील महिलांनी तयार केलेले घरगुती मसाले, शुद्ध हळद पावडर, विविध प्रकारचे पापड, विविध प्रकारचे लोणचे, शेवया, सांडगे, कुरुडी, लाल व काळे तिखट, हडोळातीचे प्रसिद्ध काळे तिखट, घाण्याचे करडी व सूर्यफूल तेल, खोबर तेल, विविध दुग्धजन्य पदार्थ - खवा, पेडा बासुंदी, पनीर व तूप, कडक ज्वारी व बाजरी ची भाकरी, सोलापुरी शेंगदाना चटणी, लाडू,चिवडा, विविध प्रकारच्या डाळी, जात्यावर तयार केलेल्या डाळी, गहू, मधुमेहग्रस्त रुग्णांसाठी उपयुक्त पिवळी ज्वारी, जवसाची चटणी, तीळ, दुरडी, झाडू, खराटा, फडा, रुखवताचे सामान, लोकरीचे पडदे, मायक्रॉनच्या वस्तू, इमिटेशन ज्वेलरी आदिंचे स्टॉल असणार आहेत.



https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com
सोलापूर तरुण भारत

### संक्षिप्त वृत्त...

## आरटीईचे प्रवेश पन्नास टक्केच

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.७ मार्च -**
आरटीई अंतर्गत २५ टक्के प्रवेश घेण्याची सध्या प्रक्रिया सुरू आहे. मात्र, पालकांना ऑनलाईन प्रवेश घेण्यात अडचणी येत असल्याने आतापर्यंत २१२० पैकी ११९२ च प्रवेश झाले आहेत. पालक प्रवेश घेण्यासाठी धडपड करीत असले तरी ऑनलाईन प्रक्रिया करताना अडचणी येत आहेत.
लातूर जिल्ह्यातील २०७ इंग्रजी माध्यमांच्या शाळांमध्ये २१२० विद्यार्थ्यांचे पालक ऑनलाईन प्रवेश घेत आहेत. ऑनलाईन प्रवेश घेतेवेळी तांत्रिक अडचणी येत असल्याने पालक परेशान आहेत. प्रारंभी शिक्षण संचालकांनी १४ ते २८ फेब्रुवारी २०२५ अशी प्रवेश घेण्याची मुदत दिली होती. पालकांची ओरड आणि तांत्रिक अडचण येत असल्याने संचालकांनी पुन्हा १० मार्च २०२५ पर्यंत प्रवेश घेण्यास मुदत वाढवली. ९२७ पालक अजूनही प्रवेश घेण्याच्या प्रतीक्षेत आहेत. जिल्ह्यात लातूर ग्रामीण, लातूर शहर, उदगीर तालुक्यांत सर्वाधिक आरटीईचे प्रवेश झाले आहेत. उदगीरचा एक प्रवेश रद्द झाला असून, पालक ऑनलाईन अडचण येत असल्याने परेशान आहेत. आणखी ९२७ प्रवेश घेण्यासाठी पालकांची धडपड सुरू असली तरी ऑनलाईनसाठी तासंतास प्रतीक्षा करावी लागत आहे. येत्या चार दिवसांत सव्वानऊशे प्रवेश होतील की नाही, अशी शंका आहे.

## गुरुनाथ स्वामी यांचे निधन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.७ मार्च -**
लातूर तालुक्यातील चिकलठाणा येथील ज्येष्ठ नागरिक गुरुनाथ बसलिंग स्वामी यांचे गुरुवारी सकाळी सहाच्या सुमारास वृद्धापकाळाने निधन निधन झाले. मृत्यूसमयी त्यांचे वय ९५ वर्षे होते.
कै . गुरुनाथ स्वामी मागच्या काही दिवसांपासून आजारी होते. त्यांच्यावर लातूर शहरातील रुग्णालयात उपचार सुरु होते. रुग्णालयातील उपचारानंतर ते आपले चिरंजीव शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे ज्येष्ठ शिवसैनिक त्र्यंबक स्वामी यांच्या निवासस्थानी वास्तव्यास होते. निवासस्थानीही त्यांच्यावर नियमित उपचार चालू होते. या उपचारादरम्यान गुरुवार, दि. ६ मार्च २०२५ रोजी सकाळी सहा वाजता त्यांची प्राणज्योत मालवली. कै . गुरुनाथ स्वामी यांच्या पार्थिवावर चिकलठाणा येथील त्यांच्या शेतात दुपारी तीन वाजता शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. कै . गुरुनाथ स्वामी यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, सुना, नातवंडे - पतवंडे असा मोठा परिवार आहे.

## मैनाबाई ढगे यांचे निधन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.७ मार्च -**
खंडोबा गल्ली येथील रहिवासी सौ.मैनाबाई श्रीराम ढगे यांचे वयाच्या ६८ व्या वर्षी अल्पशा आजाराने दु:खद निधन झाले. त्यांच्यावर मारवाडी स्मशानभुमी येथे शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पती, मुलगा-मुलगी, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे.

## सुशोभिकरणासाठी मार्केट यार्डातील जागा देण्यात यावी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.७ मार्च -**
मार्केट यार्डातील भगवान गौरीशंकर मंदिर हे लातूर जिल्ह्यातील, शहरातील व मार्केट यार्डातील भाविकांच्या श्रध्देचे ठिकाण आहे. या मंदिरातील श्री भगवान गौरीशंकराचे दर्शन घेण्यासाठी शहर व परिसरातील भाविक मोठ्या संख्येने येतात. परंतु मंदिर परिसरात भाविकांच्या व्यवस्थेसाठी पुरेसी जागा नसल्यामुळे भाविकांना अनेक अडचणीला सामोर जावे लागत आहे. त्यामुळे मंदिरालगत असलेली मोकळी जागा मार्केट कमिटीने श्री भगवान गौरीशंकर मंदिर गार्डन व सुशोभिकरणासाठी द्यावी, अशा मागणीचे निवेदन श्री भगवान गारीशंकर मंदिर व्यवस्थापन समितीच्यावतीने बाजार समितीचे सभापती जगदीश बावणे यांना देण्यात आलेले आहे.
१९९३ मध्ये लातूर मार्केट कमिटीचे तत्कालीन सभापती माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर पुढाकारातून मंदिर उभारणीचे काम सुरुवात झाले. त्या कामास तत्कालीन सचिव टी.जी.भोसले, अरविंदराव सोनवणे, ललीतभाई शहा यांच्या सहकार्यातून हजारो भाविकांचे श्रध्दास्थान असलेले श्री.भगवान गौरीशंकर मंदिर उभारण्याचे काम जगत्गुरू शंकराचार्य व राष्ट्रसंत मोरारी बापू यांच्या उपस्थितीत करण्यात आले. यासाठी कै.मदनलाल बियाणी , शिवाजीराव नरवटे यांचेही मोलाचे सहकार्य मिळाले.




## बंद पडलेल्या कारंजाची लातूरमध्ये महाआरती

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.७ मार्च -** शहरात अनेक ठिकाणी हवा शुद्धीकरण करण्यासाठी व पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी केंद्र सरकारच्या योजनेंतर्गत पाण्याचे कारंजे बसविण्यात आले आहेत. अनेक महिने ते चालू अवस्थेत दिसून आले. त्यामुळे शहराच्या सौंदर्यात भर पडत होती. मात्र, मागील काही दिवसांपासून हे कारंजे बंद असल्याने ते सुरू करावेत, या मागणीसाठी प्रभूराज प्रतिष्ठानकडून कारंज्यासमोर महाआरती करण्यात आली.

मागील काही दिवसांपासून कारंजे फक्त शोभेची वस्तू बनले आहेत. याकडे मनपा प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याने मनपा प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी महाआरती करण्यात आली. यावेळी नागरिक उपस्थित होते.

प्रभूराज प्रतिष्ठान व नाना-नानी पार्क येथील नागरिकांतर्फे महाआरती करून निषेध व्यक्त करण्यात आला. यावेळी ॲड. अजय कलशेट्टी, गजानन हुंडेकरी, गोविंद कुंचमवार, शिरीष माळी, अशोक पंचाक्षरी, डॉ. श्रीराम कोळेकर, संजय बागडे, विलास भूमकर, सचिन गोलावार, शेख हुसेन, नीळकंठ स्वामी, अजय घाळे, पारस चापसी, दता ढगे, सुनील कोटलवार, मुन्ना बट्टेवार, अण्णा मुळे, विनोद गायकवाड, विकास सावनसुरे, नंदकुमार बनाळे, शशीकिरण नागुरे, महेश सूर्यवंशी, शांतप्पा टेंकाळे, मंजित गेरेवार, नाना भोळे, यळमकर अप्पा उपस्थित होते.

महापालिकेने कारंजे तातडीने सुरू करावेत, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

## जिल्ह्यातील १४४ प्रकल्पांमध्ये ५५ टक्के पाणीसाठा उपलब्ध

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.७ मार्च -** यावर्षी समाधानकारक पाऊस



झाल्याने जिल्ह्यांतील दोन मोठे, आठ व मध्यम व १३४ लघु असे एकूण १४४ प्रकल्प पूर्ण क्षमतेने भरले होते. परंतु, पावसाळा लातूर जिल्ह्यात यावर्षी समाधानकारक पाऊस झाल्याने बहुतेक प्रकल्प पूर्ण क्षमतेने भरले होते. २२ नोव्हेंबर रोजी या पावसाळ्यातील शेवटचा पाऊस झाला.

त्यानंतर तीन संपून तीन महिन्यांतच प्रकल्पातील पाणीसाठा झपाट्याने खालावल्याचे दिसून येत आहे. जिल्ह्यातील एकूण प्रकल्पांमध्ये सध्या ५५.४९ टक्के पाणीसाठा शिल्लक आहे. मांजरा धरणातील पाणीही झपाट्याने कमी होत आहे. या प्रकल्पात सध्या ६८ टक्के पाणीसाठा शिल्लक आहे.

आठवडे शेतीसाठी पाणीउपसा झाला नाही. म्हणून डिसेंबर महिना संपेपर्यंत प्रकल्पांमध्ये पूर्ण क्षमतेने पाणीसाठा होता. जानेवारी व फेब्रुवारी महिन्यात मात्र रबी पिकांना पाणी देण्यास सुरुवात झाली. त्यानंतर मात्र सर्वच प्रकल्पातील पाणी कमी होण्यास सुरुवात झाली. लातूर शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या मांजरा प्रकल्पात सध्या ६८.१७ टक्के पाणीसाठा शिल्लक आहे. या प्रकल्पाची एकूण पाणीपातळी क्षमता २२४.९३ दलघमी आहे. सध्या १६७.७६५ दलघमी पाणीसाठा शिल्लक आहे. आतापर्यंत तब्बल ५७ दलघमी पाणीसाठा कमी झाला आहे. तेरणा प्रकल्पात सध्या ७६ टक्के पाणीसाठा शिल्लक आहे.

जिल्ह्यातील आठ मध्यम प्रकल्पांमध्ये ४५ टक्के पाणीसाठा शिल्लक आहे. रेणापूर तालुक्यातील भंडारवाडी ५६.४० टक्के व शिरूर अनंतपाळ तालुक्यातील घरणी प्रकल्पातील ५५.९४ टक्के पाणीसाठा वगळता अन्य सहा प्रकल्पांमध्ये ५० टक्केच्या खालीच पाणीसाठा शिल्लक आहे. निलंगा तालुक्यातील मसलगा प्रकल्पाची पाळू खचल्याने यातील पाणी सोडून देण्यात आले आहे. यात सध्या ११.६६ टक्के पाणीसाठा शिल्लक आहे.

## भरधाव बसने दुचाकीस ठोकरले; तरुण गंभीर जखमी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.७ मार्च -** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या भरधाव बसने एका दुचाकीस ठोकरल्याची घटना गुरुवारी (दि. ६) सायंकाळी साडेसहा वाजेच्या सुमारास महानगरपालिका कार्यालयाच्या मुख्य प्रवेशद्वारासमोर घडली. या अपघातात दुचाकीवरील तरुण गंभीर जखमी झाला आहे.

एस. टी. महामंडळाची निलंगा-नांदेड एमएच १३ सीयू ६८४७ या क्रमांकाची भरधाव बस निलंग्याहून गुरुवारी सायंकाळी साडेसहा वाजेच्या सुमारास शहरातील महानगरपालिकेच्या मुख्य प्रवेशद्वारासमोरून मुख्य




बसस्थानकाकडे निघाली होती. दरम्यान, अशोक हॉटेल चौकाकडून महात्मा गांधी चौकाकडे जाणाऱ्या एमएच २४ एक्स १२२९ या क्रमांकाच्या दुचाकीला भरधाव बसने ठोकरले. या अपघातात दुचाकीवरील तरुण बसखाली फेकला गेल्याने तो गंभीर जखमी झाला आहे. घटनास्थळी बघ्यांची एकच गर्दी झाली होती. दरम्यान, जखमी तरुणास एका ऑटोरिक्षात घालून उपचारासाठी रुग्णालयात नेण्यात आले. मात्र, जखमी तरुणास नेमके कोणत्या रुग्णालयात दाखल करण्यात आले, त्या तरुणाचे नाव काय आहे, याची माहिती रात्री उशिरापर्यंत मिळू शकली नाही. बेदरकार वाहनांमुळे दिवसेंदिवस जिल्ह्यात अपघातांचे प्रमाण वाढले आहे. अशा अपघातात अनेकांना आपले प्राण गमवावे लागत आहेत तर अनेकांना अपंगत्व येत आहे. गेल्या कांही दिवसापासून अपघातांचे प्रमाण वाढले आहे.

## भरधाव कारची दुचाकीस धडक

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.७ मार्च -** औसा तालुक्यातील शिवणी (बु) शिवारात भरधाव कारने दुचाकीस पाठीमागून जोराची धडक दिल्याची घटना बुधवारी रात्री ८ च्या दरम्यान घडली. याप्रकरणी कारमधील तिघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अरविंद गोविंदराव सावंत (ह. मु. नंदनवन कॉलनी, लातूर) हे शिवणी बु येथे दुचाकीवर गेले होते. लातूरला परतत असताना कार चालकाने पाठीमागून त्यांच्या दुचाकीला जोराची धडक दिली. यामध्ये ४० हजार रुपयांचे नुकसान तर झालेच पण कारमधील तिघांनी फिर्यादी अरविंद सावंत यांना शिवीगाळ करुन लाथाबुक्यांनी मारहाण केल्याची फिर्यादीमध्ये नमूद करण्यात आले आहे.

## 'मांजरा' कडून दुसरा हप्ता शेतकऱ्यांच्या खात्यात जमा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.७ मार्च -** शेतकऱ्यांना शेतीच्या उन्हाळी कामांसाठी मदत व्हावी म्हणून यंदाच्या हंगामात गाळपास आलेल्या उसाला १०० रुपये प्रतिमेट्रिक टनाप्रमाणे दुसरा हप्ता विकासरत्न विलासराव देशमुख मांजरा शेतकरी सहकारी साखर कारखान्याने ऊस पुरवठादार शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा केला आहे.

राज्यातील सहकारी साखर उद्योगात दीपस्तंभ असलेल्या विकासरत्न विलासराव देशमुख मांजरा शेतकरी सहकारी साखर कारखान्याचा यंदाचा गळीत हंगाम यशस्वीपणे झाला आहे. मांजरा परिवाराचे प्रमुख तथा कारखान्याचे चेअरमन दिलीपराव देशमुख यांनी यंदाच्या हंगामात कारखान्याकडे गाळपास येणाऱ्या उसाला किमान ३ हजार रुपये प्रतिमेट्रिक टनाप्रमाणे दर देण्याचे जाहीर केले. कारखान्याने यापूर्वी ऊस पुरवठा केलेल्या शेतकऱ्यांना २ हजार ७०० रुपये प्रतिमेट्रिक टनाप्रमाणे पैसे अदा केले आहेत.आता शेतकऱ्यांना शेती कामास मदत व्हावी म्हणून यंदाच्या हंगामात गाळपास आलेल्या ऊस पुरवठादारांच्या खात्यावर शंभर रुपये प्रतिमेट्रिक टनाप्रमाणे दुसरा अंतरिम हप्ता बुधवारी जमा केला आहे. तसेच जाहीर केल्याप्रमाणे लवकरच उर्वरित ऊसदरही अदा केला जाणार आहे, अशी माहिती कारखाना प्रशासनाकडून देण्यात आली आहे.

## विभागीय आयुक्तालय लातूरलाच झाले पाहिजे : आ. अभिमन्यू पवारांची मागणी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.७ मार्च -** गेल्या अनेक वर्षांपासून लातूर विभागीय आयुक्तालयाची मागणी असून विभागीय आयुक्तालयाच्या दृष्टीने इमारतीसह सर्व सेवा सुविधा असताना सर्व सामान्य लोकांच्या सोयीसाठी लातूर विभागीय आयुक्तालय गरजेचे असून लातूरला नैसर्गिक न्यायाने लातूरला विभागीय आयुक्तालय झाले पाहिजे अशी मागणी आमदार अभिमन्यू पवार यांनी मुंबईत सुरू असलेल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात केली आहे.

मागच्या काळामध्ये नांदेडला विभागीय आयुक्तालय होऊन गेले. त्यावेळी मुख्यमंत्री असलेले देवेंद्र फडणवीस आजही मुख्यमंत्री आहेत त्यांनी दांगड समिती गठीत केली होती. त्या समितीचा अहवाल लागू करावा. लातूरला विभागीय आयुक्तालय व्हायला पाहिजे ही बऱ्याच वर्षापासून लातूरकरांची मागणी आहे.

नैसर्गिक, प्रशासकीय व भौगोलिकदृष्ट्या आणि गुणवत्तेच्या दृष्टीने लातूरला विभागीय आयुक्तालय व्हायला पाहिजे. लातूरला २२ विभागीय व प्रादेशिक कार्यालय आहेत. त्यामुळे विभागीय आयुक्तालय व्हायचे असेल तर लातूरलाच व्हायला पाहिजे, नाहीतर एखाद्या नवीन जिल्ह्याची निर्मिती करून नांदेड जिल्ह्याला तीन व लातूर जिल्हे जोडून दोन विभागीय आयुक्तालय करावे, तेही करायचे नसेल तर लातूर व नांदेड अपर आयुक्तालय करावे विभागीय आयुक्तालय ही लातूरकरांच्या अस्मितेचा विषय झाला असून विभागीय आयुक्तालयाच्या दैनंदिन कामकाजासाठी दररोज तीनशे किलोमीटरचे अंतर कापावे लागत असून सर्व सामान्यांची फरफट थांबविण्यासाठी लातूर विभागीय आयुक्तालय करावे आणि दोन्ही जिल्ह्यातील राजकीय, भौगोलिक वाद न करता दोन्ही जिल्ह्यात अपर आयुक्तालय तयार करावे अशी मागणी यावेळी आ. पवार यांनी केली.

## कालानुरूप शिक्षण व व्यवसायामधील बदल आत्मसात करणे आवश्यक




**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.७ मार्च -** कृषि महाविद्यालय, विलासराव देशमुख कृषि जैवतंत्रज्ञान महाविद्यालय, लातूर, एडिएम एग्रो इंडस्ट्रीज व एसएमएल यांच्या संयुक्त विद्यमाने शाश्वत कृषि विकासासाठी रासायनिक शेतीचे टप्प्याटप्प्याने एकात्मिक शेतीकडे संक्रमण या विषयावर प्रशिक्षकांना एक दिवसीय प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी व्यासपीठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. बाबासाहेब ठोंबरे, प्रमुख मार्गदर्शक प्रा. अश्रोबा जाधव, तर प्रमुख पाहुणे डॉ. व्यंकट जगताप, डॉ.अच्युत भरोसे, अमोल ढवण व वशीष्ट घुले उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. बाबासाहेब ठोंबरे म्हणाले कि हवामान बदलामुळे शेतीमध्ये होणारे जलद संक्रमनात पिकांना तग धरून राहण्यासाठी शेतकरी, शास्त्रज्ञ, कृषि निविष्ठा उत्पादक, विद्यार्थी व धोरणकर्ते यांचा सुसंवाद असणे आवश्यक आहे. ते पुढे असे म्हणाले कि, मराठवाड्यातील शेतकऱ्यांचे अनुभव व नाविन्यपूर्ण कृषि तंत्रज्ञान यास कृत्रिम बुद्धीमत्तेची सांगड घालणे क्रमप्राप्त आहे. तसेच नवनिर्मित तंत्रज्ञानाच्या प्रशिक्षणातून कालानुरूप शिक्षण व व्यवसायामधील बदल आत्मसात करणे गरजेचे आहे. या प्रशिक्षणास ३० प्रशिक्षकांनी सहभाग नोंदविला. या प्रशिक्षकांद्वारे सोयबीन, तूर, हरबरा, ऊस, कापूस ई. पिकासाठी मराठवाड्यातील दिड लक्ष शेतकऱ्यांना प्रशिक्षित करण्यात येणार आहे यातूनच शेतकरी स्वावलंबी होण्यास मदत होईल. याप्रसंगी अमोल ढवण, प्रा. अश्रोबा जाधव, वशीष्ट घुले यांनी प्रशिक्षणार्थींना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. विजय भामरे, सूत्रसंचालन दयानंद माने, तर आभार प्रदर्शन डॉ. अच्युत भरोसे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ.योगेश भगत, अतुल मानकर आदिंनी प्रयत्न केले.

## न्यायमूर्ती वराळे यांच्या सन्मानार्थ गौरव सोहळा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.७ मार्च -** लातूर जिल्हा वकिल मंडळ आणि दयानंद विधी महाविद्यालय माजी विद्यार्थी संघाच्या संयुक्त विद्यमाने दि. ८ मार्च २०२५ रोजी सायंकाळी ५.०० वा. दयानंद सभागृह, लातूर येथे सर्वोच्च न्यायालयाचे सन्माननीय न्यायमूर्ती श्री. प्रसन्ना भालचंद्र वराळे यांच्या सन्मानार्थ गौरव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

श्री. प्रसन्ना वराळे हे दयानंद विधी महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी असून १९८५ ला कायद्याची पदवी उत्तीर्ण झाले आहेत. त्यांनी यापूर्वी मुंबई उच्च न्यायालय तथा कर्नाटक उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश म्हणून कार्यभार सांभाळला आहे. त्यांच्या सर्वोच्च न्यायालयातील नियुक्तीमुळे महाविद्यालयाचा गौरव वाढला आहे.

या पार्श्वभूमीवर, दयानंद शिक्षण संस्थेच्या वतीने त्यांच्या सन्मानार्थ या गौरव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. २५ जानेवारी २०२५ ला त्यांची सर्वोच्च न्यायालयात न्यायाधीश म्हणून नेमणूक झाली. त्यांनी कायद्याच्या क्षेत्रात स्वकर्तृत्वाने भरीव योगदान दिले आहे. त्यांच्या न्यायक्षेत्रातील उल्लेखनीय व यशस्वी वाटचालीचा आणि कार्याचा गौरव करण्यासाठी प्रस्तुत सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या प्रसंगी अनेक नामवंत विधीज्ञ, न्यायाधीश, प्राध्यापक, माजी विद्यार्थी, सन्माननीय पत्रकार आणि मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

विधी क्षेत्रातील सर्व अभ्यासक, विद्यार्थी आणि नागरिकांनी या ऐतिहासिक क्षणाचे साक्षीदार होण्यासाठी उपस्थित राहावे, असे आवाहन दयानंद शिक्षण संस्थेचे पदाधिकारी, दयानंद विधी महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या, दयानंद माजी विद्यार्थी संघ व लातूर जिल्हा वकिल मंडळ यांनी केले आहे.

MACP No. 178/2021

**IN THE COURT OF HONBLE MOTOR ACCIDENT CLAIM TRIBUNAL, SOLAPUR**

MSRTC Solapur ----- Petitoner
V/S
Mr. Daivshala Tukaram Chevle - Respondent

To,
Respondent No. 1) Mr. Daivshala Tukaram Chevle,
Age- adult Occu. Driver
R/O Near Chanda Hospital, Vishal Nagar, Latur,
Driver/Owner of Car No. MH 04 HM 2322

Whereas the above named petitioner has filed a M.A.C.P. No.u/Sec 166 of Motor vehicle Act.1988 against you are bearing M.A.C.P. No.178 of 2021 in the court of Hon'ble District judge, Solapur but inspire multiple summons issue in your name you have failed to appear before the hon'ble court to answer the claim of the petitioner. Hence this paper publication notice. Hence the notice kindly be published in daily news paper.
You are hereby directed to appear before the Hon'ble court on 29/03/25 at 11.00 a.m.personal to answer the claim of the petition, failing at which the case will be heard decided in your absence accordance with law.
Given under my hand and seal of the Hon'ble court on this 16 th Jan, 2025

Junior Clerk
Hon'ble District
Court, Solapur

By order
Superintendent
Hon'ble District Court.
Solapur